
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भूप्रवास
सं. क्र.



# हिमालयातील प्रवास



REFBK-0009225

काका कालेलकर

८५४२१
१९।३।७९.

16 DEC 1979.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्ध योजना
* १९७० *

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प २० वें

# हिमालयांतील प्रवास

" चराति चरतो भगः । "

— अिन्द्र

REFBK-0009225

REFBK-0009225

आचार्य काका कालेलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रमांक ५५७२९ दि: १०/३/८७
वर्गांक

अनुवादक

भाऊ धर्माधिकारी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ८२३५

चतुर्थावृत्ति १९५६ ]

[ मूल्य ३ रु.

प्रकाशक
गोविंद वामन कुलकर्णी
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य स. ज. भागवत

मुद्रक
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ, पुणें २

९२२५

# जीवन नित्यनवें

मनुष्य स्वभावतः स्थावर आहे कीं जंगम ?

सहज विचार केला असतां दिसून येअील कीं, त्याच्यांत या दोन्ही वृत्ती भरल्या आहेत. 'जंगली अवस्थेंतून प्रगति करतां करतां आजची अवस्था मनुष्याला मिळालेली आहे' ही गोष्ट खरी असेल तर मनुष्य मुळांत जंगमच असला पाहिजे. अन्न आणि पाणी जिकडे मिळेल तिकडे जावें, ही प्राणिमात्राची स्वाभाविक वृत्ति आहे. जोंवर मनुष्य शिकारी वृत्तीनें राहत होता तोंवर त्याला असेंच करणें भाग होतें. अेका जंगलांतील शिकार संपली कीं पांडवांसारख्या आरण्यकांना दुसरें जंगल शोधावें लागे, अशीं वर्णनें महाभारतांतसुद्धां येतात. शिकारी जीवन सोडून देअून मनुष्यानें जेव्हां धनगराचें, गुराख्याचें आणि गवळ्याचें जीवन पसंत केलें, तेव्हांसुद्धां अेका जंगलांतील किंवा चराअू रानांतील गवत संपलें कीं नंदासारख्यांना आपले कळप घेअून दुसऱ्या ठिकाणीं जावें लागे. पुढें पुढें जिकडे अन्न मिळेल तिकडे जाअून राहण्यापेक्षां जिथें आपण राहतों तिथेंच अन्न काढतां आलें तर किती छान होअील, असा मनुष्याच्या मनांत विचार आला. त्यानें रखडण्याचें सोडून देअून जमीन खेडण्याला आरंभ केला, आणि तो आर्य* झाला. शेतीच्या वाढीबरोबर माणसाच्या जीवनांत मोठ्यांत मोठा फेरबदल होत गेला. संस्कृति वाढली आणि स्थावरता आली. स्थावरतेबरोबर माणसाची कार्यशक्ति वाढली, पण त्याची वीर्यशक्ति ( Vitality ) कांहींशी कमी झाली असली पाहिजे. अेका बाजूनें कांहीं झीज सोसल्यावांचून दुसऱ्या बाजूनें मनुष्य वाढूंच शकत नाहीं.

पण मनुष्य पडला लोभी. त्याला दोन्ही अवस्थांचा लाभ घ्यायचा होता. त्याला जगांत असें दिसलें कीं, निसर्गानें वनस्पतिसृष्टीला जेथें स्थावर केली, तेथें वनस्पतींचीं लग्नें लावणाऱ्या पुरोहितासारखीं जंगम फुलपांखरेंहि निर्माण केलीं. अमुक अेका मोठ्या वर्गानें स्थावर राहावें, आणि त्याला

---

* अर् = जमीन कसणें, खेडणें.

जंगमपणाचा लाभ मिळवून देणाऱ्या दुसऱ्या वर्गानें भटकत राहावें अशी व्यवस्था माणसाला सोयीची वाटली. त्यानें गृहस्थाश्रमाबरोबर भटक्या लोकांचे अेक-दोन आश्रम स्थापन केले. ब्रह्मचारी शिकून तयार झाला कीं तो भटकायला जायचाच. तीर्थयात्रा पुरी झाली म्हणजेच त्याला लग्नाची परवानगी मिळायची. दुसऱ्या बाजूला, गृहस्थाश्रमाची ओढ थोडी ढिली पडली, स्थावर झाल्याचा गंज चढला कीं धर्मशास्त्र सांगतें, 'आतां पुष्कळ भोगलें, बना आतां वानप्रस्थ आणि चला परत अरण्याकडे.' जेथून आलों तिकडे परत जाण्यांत अेक प्रकारचा आनंद, अेक प्रकारचा विसांवा असतोच. सकाळीं अुठून भटकायला गेलेलीं मुलें सांज होतांच आअीची अुबदार कूस शोधीत यायचींच. जें अरण्य सोडून मनुष्यप्राणी वस्तींत आला, आणि गृहस्थ आणि शहरी नागरिक बनला त्या अरण्याकडे परत जाअून वानप्रस्थ होअून परिव्राजक होण्याची तयारी करणें यामध्यें हाच आनंद आहे. प्रगति ही बहुधा स्क्रूच्या पेंचांसारखी असते. अेक कुंडाळें पुरें झालें कीं अेक पायरी वर चढली.

गृहस्थाश्रमी लोकांनींहि मधून मधून यात्रेला गेलेंच पाहिजे अशी जुनी व्यवस्था होती. यात्रेमुळें मनुष्याला देशादेशांतील गोष्टी पाहतां येतात, समजून घेतां येतात, नवे नवे संबंध जोडतां येतात आणि स्थावरतेमुळें जीवनावर जमलेलें शेवाळ काढून टाकतां येतें.

समाजशास्त्राचा विकास करणाऱ्या धर्मकारांनीं अशी ही व्यवस्था केली नसती, तरीहि मनुष्यस्वभावानें हीच वस्तु या ना त्या रीतीनें शोधून काढलीच असती. मनुष्यमात्रांत जी नैसर्गिक किंवा अीश्वरी प्रेरणा आहे तिलाच हितकर शास्त्रीय स्वरूप देण्याचें काम धर्मकार करीत असतात. केवळ नैसर्गिक वृत्ति ही खालींहि पाडील आणि वरहि चढवील. जी नैसर्गिक वृत्ति मनुष्याला वर घेअून जाते तिलाच अीश्वरी प्रेरणा म्हणतात. अीश्वराकडे घेअून जाते ती अीश्वरी. या कारणानें स्वतंत्रपणें विकसलेल्या निरनिराळ्या धर्मांतूनहि जवळ जवळ अेकसारखीच व्यवस्था दिसून येते. यात्रेला जाण्याचा रिवाज जपानांत शिंटो किंवा बुशीडो धर्मांतहि आढळतो, आणि हिंदूंच्या आश्रमव्यवस्थेंतहि तो सांपडतो. मक्केच्या हज्जयात्रेंत पुण्य

आहे असें सांगणाऱ्या अिस्लामी धर्मांतहि त्याला स्थान आहे; आणि तागाचे कपडे घालून यरुसलेमच्या पवित्र भूमीचा प्रवास करणाऱ्या ख्रिस्ती भक्तजनांनाहि ही वस्तु प्रिय होअून बसली आहे.

आपल्या अिकडे यात्रेला प्रधानधर्म समजणारे परिव्राजक तर होतेच, पण प्रत्येक वर्णालासुद्धां थोडा-फार प्रवासाचा धर्म सांगितला होता. ब्राह्मण प्रथम ब्रह्मचारी म्हणून विद्यायात्रेला जात, मागाहून यज्ञसत्रांत जात, चातुर्मास्य सोडून अधूनमधून तीर्थाटन असायचेंच आणि वृद्धांनीं वृद्धपणीं मरण्याकरितांसुद्धां अेका स्थानीं बसण्याअैवजीं पाय चालतात तोंवर अीशान्य दिशेकडे चालत राहावें असेंच विधान केलेलें आहे.

क्षत्रिय जर मृगयेसाठीं दरवर्षी बाहेर पडले नाहींत, तर शेतीचें रक्षण व्हावें कसें? आणि शेतकऱ्यांनीं राजाला पिकाचा षष्ठांश द्यावा कसा? राजांत जर कांहीं पुरुषार्थ असेल तर घोडा सोडून अश्वमेध करायला तो निघायचाच. दिग्विजयासाठीं सीमोल्लंघन न करील तो राजा यथातथाच म्हटला जाअी.

वैश्य म्हणजे सौदागर. ते आपला काफला घेअून जंगलें पसार करतील, अेका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत जातील, अिकडचा माल तिकडे विकतील, तिकडचा अिकडे घेअून येतील, तेव्हांच सार्थवाहाचें त्यांचें जीवन सार्थ झालें म्हणावयाचें. घरच्या नववधूलासुद्धां घरांत सोडून समुद्राची सफर करायला जाणाऱ्या वाणिज्य-वीरांच्या कथा आपल्या साहित्यांत कांहीं कमी नाहींत.

बौद्ध साधू म्हणजे जबरदस्त प्रचारक. त्यांनीं समुद्रयात्रेचा विधिनिषेध न बाळगतां, दूरदूरच्या देशांपर्यंत संस्कृतीचा विस्तार केला आणि देशदेशान्तराच्या लोकांनाहि त्यांनीं या देशांत आणलें. श्रमणानें अेकाकी सर्वत्र विहार केला पाहिजे अशी बुद्धभगवानाची शिकवण होती; आणि त्यानें स्वतः तर असा विहार करून अेका सबंध प्रांतालाच त्या प्रवृत्तीचें नांव देअून टाकलें.*

अशोक राजानें दिग्विजय सोडून देअून धर्मविजय सुरू केला आणि

---

* विहार = बिहार प्रांत.

दरवर्षीं नव्या नव्या दिशेकडे धर्मयात्रा चालविल्या. वृद्धश्रवा अिंद्रानें वैदिक संस्कृतीच्या प्रारंभकाळींच आदेश दिला कीं, जो बसून राहतो त्याचें नशीबहि बसून राहतें, जो चालूं लागतो त्याचेंच भाग्य चालतें. 'चराति चरतो भगः।' ही प्रेरणा घेअून मेंढपाळ चालले, खलाशी चालले, भक्त चालले, सैनिक चालले आणि परिव्राजकहि चालले. या जगतांत सर्वच कांहीं चालतें आहे; आणि मनुष्य जेव्हां चालून चालून कंटाळतो, तेव्हां स्थावर होअून राहण्याअैवजीं या जगाला सोडून तो कायमचा चालता होतो. 'प्रैति अस्मात् लोकात्।'

मनुष्याला प्रवासाची दीक्षा जर कोणाकडून मिळाली असेल, तर ती व्योमयात्रा करणाऱ्या आकाशांतील ताऱ्यांकडून नसून अखंड जीवनप्रवाह चालविणाऱ्या नद्यांच्याकडून. त्यांतसुद्धां दोन प्रकारच्या वृत्ती दिसून येतात. प्राचीन काळीं कित्येक लोक हा सूर्य अुगवतो तरी कोठून हें शोधून काढण्यासाठीं जसे अुत्तरोत्तर पूर्वेकडे जात, आणि दुसरे कित्येकजण हाच सूर्य विसांवा घ्यायला मावळतो कुठें हें शोधून काढण्याला पश्चिमेकडे जात, त्याचप्रमाणें कित्येक लोक या नदीचें अितकें अुसळणारें पाणी येतें तरी कोठून हें प्रत्यक्ष पाहण्यासाठीं तिच्या उगमाकडे चढूं लागत, तर अितर कित्येकजण या सगळ्या पाण्याचें विसर्जन कोठें होतें, कशांत होतें, आपल्याला तेथें काय आढळेल याचा अनुभव घेण्यासाठीं खलाशी होअून समुद्राकडे जात. गंगोत्रीकडे जाणारा मेंढपाळ आणि गंगासागराकडे दौडणारा खलाशी हे भाअूभाअूच होत. नदी-मुखानेंच समुद्रांत प्रवेश करावा अशी शिफारस करणाऱ्या कवीच्या वंशजांनीं समुद्र-यात्रा किती केली आहे याचा तपास काढतांना मात्र निराशाच पदरीं यावयाची. वेदकाळचे तुग्र व भुज्यु जी यात्रा करीत ती नदीची होती कीं समुद्राची हें आज सांगणें कठीण आहे. जातक-कथेंत वर्णिलेले वैश्य लोक अेका बाजूला जावा, बाली आणि श्यामचीनपर्यंत जात असतील आणि दुसरीकडे आफ्रिकेचा सगळा पूर्व किनारा पादाक्रान्त करीत असतील. पण त्यांच्यांतून अेकानेंहि प्लिनी-( Pliny )-प्रमाणें पूर्व वा पश्चिम सागराचें पेरिप्लस लिहिलें नाहीं. जावाला गेल्यानंतर परत येण्याची आशाच ज्यानें सोडली, त्याच्या वंशजांनीं समुद्र-यात्रेचा निषेध

करावा यांत आश्चर्य तें काय ? आणि हा निषेध कां, तर म्हणे, तेथें खाण्या-पिण्यांत सोंवळ्या-ओंवळ्याचा कांहीं धरबंध राहणार नाहीं, आचारधर्म बरोबर पाळला जाणार नाहीं. या संकटांतून वांचवण्यासाठीं हा खासा अुपाय शोधून काढला ! अुन्हांत जाण्यानें अेकाला पित्त-प्रकोप होत असे; त्यानें त्याबद्दल वैद्याला विचारलें. शहाण्या वैद्यबुवांनीं मोठा गंभीर चेहरा करून सांगितलें, ' भल्या गृहस्था, अुन्हांत जाणें हेंच मुळीं चुकीचें आहे, सावलींत बसून रहा ना, मग बघूं बरं कसा पित्त-प्रकोप होतो तो ! ' अेकाद्याची पापी नजर आपल्या पत्नीवर पडेल या धास्तीनें बदमाषाला ठीक करण्याअेवजीं आपल्या बायकोलाच अंतःपुरांत डांबून ठेवण्याचें ज्यांनीं पसंत केलें, त्या लोकांनीं समुद्र-यात्रेचा निषेध करून स्वतःला स्वतःच्या देशांत कोंडून घ्यावें हें यथायोग्यच आहे. फार काय सांगावें ? या भेकड व्यवस्थाकारांनीं वैराग्य-धन अशा संन्याशांनाहि आज्ञापिलें आहे कीं जेथें खाण्याची पंचाअीत असेल, लोक श्रद्धाभक्तिपूर्वक पुढील बोलावीत नसतील, जेथें दंगा मारामारी चालत असेल अशा देशांत जाअूंच नये ! प्रवासाची ज्यांना हौस आहे, अशांना आपली मुलगी देअूं नये, असाहि अेक दंडक होता. सुरक्षितता हाच प्रथमधर्म ना ?

अितकें करून आणि जीवनांतील सर्वोत्कृष्ट सत्त्व सुकवून टाकून आपण जें सांभाळूं अिच्छीत होतों तें तरी सांभाळलें गेलें काय ? ज्यांचा संसर्ग टाळण्यासाठीं आपण समुद्र-यात्रा सोडून दिली, तेच सारे अुलट पेंव फुटावें तसे समुद्र-यात्रा करीत आपल्या अिकडे आले आणि आपलें राज्य, आपला व्यापार, आपलें शिक्षण आणि आपलें भाग्य या सगळ्यांचाच ताबा घेअून येथें कायम झाले. ' जो बसून राहतो त्याचें भाग्यहि बसूनच राहायचें. '

वस्तुस्थिति अशी आहे कीं, जीवनाचें अुत्थान जेव्हां मंद पडूं लागतें तेव्हां माणसाच्या हृदयांत अज्ञाताविषयीं भीति शिरूं लागते. याच्या अुलट, जर जीवनांत यौवनाचा प्राण मुसमुसत असेल तर त्याच अज्ञाताचें आमंत्रण टाळतो म्हटलें तरी टळत नाहीं. अज्ञातामागें धांवणें, त्याचा अनुभव घेणें, त्याच्यावर विजय मिळवून त्याला ज्ञात बनविणें हा जीवनांतील मोठ्यांत

मोठा आनंद आणि अुत्कृष्ट पौष्टिक खुराक आहे. वैज्ञानिक प्रयोग करून जसा अज्ञातावर विजय मिळवितां येतो, तसा प्रवास करूनहि मिळवितां येतो.

मनुष्य घोड्यावर स्वार होतो तेव्हां घोड्याच्या शक्तीचाहि स्वतःमध्यें संचार झाला आहे अशा प्रकारें त्याची छाती फुलते, आणि शक्तीचा साक्षात्कार झाल्यामुळें मनुष्याचें व्यक्तित्व तितक्या अंशानें परिपुष्ट होतें. अैंशी मैलांच्या वेगानें धांवणाऱ्या मोटारीचें अंकुशचक्र हातीं धरतांच हा सगळा वेग माझाच आहे, असें माणसाला वाटूं लागतें. अेकादी संस्था किंवा राज्य चालविण्याचें फळ—त्याचा व्यक्तिगत आनंद—'अितक्या लोकांशीं माझें तादात्म्य आहे, अितकी मोठी शक्ति मला वापरतां येते, अितक्या व्यक्तींना गोळा करून मी अेक विराट् शक्ति अुत्पन्न करूं शकलों आहे' या अनुभूतींतच आहे. व्यक्तित्वाचा विकास, शक्तीचा संचय आणि भवितव्यतेचें नियंत्रण हाच माणसाला मोठा आनंदाचा विषय आहे. प्रवासाच्या द्वारा मनुष्य जितका भूमिभाग दृष्टीच्या योगानें आपलासा करतो, जितकें अंतर पादाक्रान्त करतो, जितका अनुभव सांठवितो, तितक्या अंशांनीं त्याचें जीवन समृद्ध होतें. भांडारांत सांठविलेलें धन बाह्य असल्यामुळें ओझ्यासारखें होतें; अनुभवाच्या द्वारा सांठविलेलें ज्ञान कमाविलेले संस्कार आणि मिळविलेली शक्ति आंतरिक असल्यामुळें त्यांचें ओझें वाटत नाहीं. अुलट त्यांची जोड मिळाल्यामुळें जीवनांत दुसरा पुष्कळ बोजा अुचलण्याची शक्ति अुत्पन्न होते. जो प्रवासाला निघाला त्याला पुष्कळ वस्तूंचा परिग्रह टाळण्यावांचून गत्यंतर नसतें. ज्याला बोजा कमी करून हलकें होतां येत नाहीं त्याला प्रवासच करतां येणार नाहीं. मग तो ढग असो वा मनुष्य असो; आणि प्रवासद्वारा मिळविलेलें ज्ञान, संस्कार किंवा कौशल्य असें कांहीं पचून जातें, कीं त्याचा बोजा किंवा परिग्रह भासतच नाहीं !

प्रवासद्वारा मिळविलेलें ज्ञान आणि शिक्षणसंस्थांत राहून मिळविलेलें ज्ञान या दोहोंत मोठ्यांत मोठा फरक हाच असतो. आजकालच्या शिक्षणाच्या द्वारा मिळाविलेलें ज्ञान भाररूप असतें. कारण तें वापरलेलें किंवा पचविलेलें नसतें. म्हणूनच लहान लहान मुलांना शाळेंतलें शिक्षण

देण्यापेक्षां प्रवासाचें शिक्षण दिलें तें परिणामीं कमी खर्चाचें आणि अधिक फलद्रूप होअील.

प्रवासी जसजसा प्रवास करीत जातो, तसतसा तो चातुर्यांचा सांठा वाढवीत जातो. चिकाटी आणि अुदारता शिकतो; आणि अंतीं तो अेक अुत्कृष्ट समाजशास्त्री बनतो. प्रवास म्हणजे अुत्साहानें अडचणी सोसण्याचा बादशाही प्रकार ! प्रवासांत अडचणी आल्यानें माणसाला असें नाहीं वाटत कीं, आपल्या दारिद्र्याचें हें अेक प्रतीक आहे. त्याला असें वाटतें कीं, सुचणूक अंगीं आणण्याची ही अेक संधीच आपल्याला मिळाली आहे. अेका दृष्टीनें प्रवास हें व्यक्तित्वाच्या विकासाचें साधन आहे; तर दुसऱ्या दृष्टीनें तो अनुभवानें थबथबलेला देशभक्तीचा अेक प्रकार आहे. जितका देश आपण पाहिला—निरीक्षिला—आपलासा केला, तेवढ्या देशाविषयीं आपल्यांत विशिष्ट भावना अुत्पन्न होते, त्याच्याशीं आपली आत्मीयता बांधली जाते, त्याच्यासंबंधीं अभिमान किंवा भक्ति अुत्पन्न होते आणि त्यामुळें आपण त्याचे अनन्य भक्त बनतों. अेकाद्या प्रांताचा प्रवास करून आल्यानंतर वर्तमानपत्रांत येणाऱ्या तिथल्या समाचाराविषयीं आपल्याला केवढी आस्था वाटूं लागते !

पण या प्रवासाच्या मागें जगाला लुटण्याची दुर्बुद्धि असतां कामा नये. जगाचा कस काढून घेण्याची, जास्तींत जास्त फायदा मिळविण्याची वृत्ति असेल, तर वर वर्णिलेल्या अुच्च लाभांपैकीं फारच थोडें हातीं लागावयाचें. मोठ्या लोभानें प्रवृत्त होअून केलेल्या प्रवासाच्या लाभांची मर्यादाहि तितकीच मोठी असते. भक्त-सेवक प्रवासाला निघतो तेव्हां अंतर्बाह्य साऱ्या शक्ती आपला संघ घेअून त्याला सोबत करायला निघतात. जगाचें शोषण करूं पाहणारा मनुष्य शेवटीं अिंद्रियपरायणच व्हायचा आणि अिंद्रियानुभव हा विशिष्ट मर्यादेपर्यंतच आवश्यक असल्यामुळें, त्यापुढें त्याची मात्रा जसजसी वाढत जाअील, तसतसें सुखाचें व्यस्त प्रमाण सुरू होअून तो अधिकाधिक बेचव होअूं लागतो आणि शेवटीं त्याचा अुथळपणाच दिसून पडतो. अिंद्रियानुभवांतून मिळणारा आनंद परिमित असतो. मनुष्यजातीनें त्याचा अंत पाहिला आहे.

पण अजूनहि माणसाला अंत सांपडलेला नाहीं. हृदयानुभवानें होणाऱ्या विकासाचा. त्याची विविधता अजून संपलेली नाहीं. मनुष्य जितका अधिक निःस्पृह, निराग्रही आणि निरहंकारी, तितकी त्याला प्रवासामधून जास्तींत जास्त संस्कारिता लुटतां येते. भक्त–सेवक जेव्हां प्रवासाला निघतो तेव्हां त्याच्यांत आत्मानुभव, आत्मविकास आणि आत्मैक्य तिन्ही वाढतच जातात. रोजच्या रोज विकास पावणारें विश्व बघून भोगैश्वर्यामागें लागलेल्या माणसाला वाटतें कीं, 'हें विश्व माझें होवो, माझ्या ताब्यांत येवो.' त्याच्याऐवजीं भक्त–सेवक अिच्छितो कीं, 'मींच त्याचा सेवक व्हावें, त्याचा अंश व्हावें आणि अभेद अंगीं बाणवून घेअून तेंच होअून जावें.' हाच जीवनाचा परमोत्कर्ष आहे.

प्रवास करण्यानें लाभ काय असें जर मला कोणीं विचारलें, तर त्याचें अुत्तर मी सहज आणि सविस्तर देअूं शकेन. पण लोक मला विचारतात, कीं तुम्ही कोणत्या अुद्देशानें प्रवासाला निघालांत? हा प्रश्नच वेगळा आहे; आणि त्याचें अुत्तर देणें कांहीं सोपें नाहीं. खाणें, निजणें, भिणें, लग्न करणें अित्यादि विश्वजनीन क्रिया मनुष्य कोणत्या अुद्देशानें करतो हें सांगणें सोपें नाहीं. पुष्कळ वेळां मनुष्य असेंच सांगेल कीं, राहावत नाहीं म्हणूनच या सार्वत्रिक प्रवृत्तींत आम्ही पडतों. यांतून जितके लाभ होतील ते सारे आम्हांला अिष्ट आहेतच. पण कोणत्या लाभाच्या लोभानें प्रेरित होअून आम्ही प्रवृत्त झालों तें आम्ही सांगूं शकणार नाहों. आंतून अेक अदम्य प्रेरणा अस्वस्थ करून सोडते. म्हणून मुकाट्यानें तिला वश व्हावेंच लागतें. निसर्गाची ही रचना आहे–योजना आहे कीं जीवनासाठीं जी वस्तु अत्यंत अुपयोगी आहे, तिच्या लाभालाभाचा विचार करून ती पसंत करावी असें कांहीं असतच नाहीं. आंघोळ करावी कीं न करावी हा माणसाच्या पसंतीचा विषय होअूं शकेल, पण निजावें कीं न निजावें हें निसर्ग माणसाला पसंत करूंच देत नाहीं. निद्रेचा हल्ला झाला कीं विवश होअून मनुष्य तिच्या ताब्यांतच जातो.

ज्या मनुष्याच्या वृत्ती विकृत झालेल्या नाहींत, अशा मनुष्याच्या बाबतींत प्रवासाची वृत्तीहि तितकीच स्वाभाविक असते. पाअूस पडला

कीं खोंड जसा आपल्या शिंगांनीं जमीन खोदून हुंगायला लागतो, तशी प्रवासाला निघायची संधी आली, कीं प्राकृतिक मनुष्याचीं पाउलें न विचारतां चालायलाच लागतात. 'कुठें चाललां ?' असें कोणीं त्याला विचारलें तर तो म्हणेल कीं, 'तें कांहीं आम्हांला माहीत नाहीं. असेल तिकडे जाऊं खरें. जाणें, चालणें, स्थानान्तर करणें, एके ठिकाणीं न बसणें नवे नवे अनुभव घेणें, अितकेंच आम्हांला माहीत आहे. डोळ्यांना तहान लागली आहे; सगळ्या शरीराला भूक लागली आहे, म्हणून पाय चालताहेत; याहून जास्त आम्हांला कांहीं समजत नाहीं.'

ही चालण्याची खाज पहाडांतील रहिवाशांना अधिक असण्याचा संभव आहे. पण सपाटीवरचे लोकसुद्धां कांहीं कमी भटक्ये असत नाहींत. काशीचें गंगाजळ रामेश्वराला घेअून जाअून रामेश्वरच्या सेतूची रेती काशीला किंवा हारिद्वारला पोंचविणारे यात्रेकरू कांहीं पहाडीच असत नाहींत.

हिमालयाच्या यात्रेला मी कसा गेलों आणि त्यांतून मीं काय काय मिळविलें, याचें थोडेंसें वर्णन या प्रवासवृत्तान्तांत आरंभापासून शेवटपर्यंत ठिकठिकाणीं आलेंच आहे. हिमालयाला जाण्याची वृत्ति हिंदुमात्रांत स्वाभाविक असते. सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा आणि त्याच्या सख्या साऱ्याच हिमालयाच्या मुली आहेत. तेव्हां प्रत्येक नदीभक्त केव्हां केव्हां आजोळी मजा करायला हा जायचाच. हिमालयाचें वैभव दुनियेंतील तमाम सम्राटांच्या समस्त वैभवापेक्षांहि वरचढ आहे. हिमालय हाच आपला महादेव आहे. साऱ्या विश्वाची समृद्धि वाढवीत असूनसुद्धां अलिप्त, विरक्त, शांत आणि ध्यानस्थ. हिमालयाला जाअून त्यालाच आपल्या जीवन-समृद्ध हृदयांत धारण करून घेण्याची ज्यांची शक्ति असेल त्यानेंच जीवन जिंकलें. त्याला अनंत प्रणाम असोत.

पुणें, २७–५–३८

# प्रवाश्याचें निवेदन

माझ्या लहानपणचीं पुष्कळशीं संस्मरणें प्रवासाविषयींचींच आहेत. साताऱ्याहून जरंड्याला किंवा सज्जनगडला जावें आणि तिथला रामदासस्वामींचा मठ आणि हनुमान पहावा; शहापुराहून आठेक मैलांवर असलेल्या बेळगुंदीला जावें आणि तेथें पेरू, आंबे किंवा करवंदें खावीं; बेळगांवाहून तिनअी घाट अुतरून गोव्याची अप्रतिम वनश्री डोळाभर पहावी आणि महिनाभर मंगेशीच्या कुळदेवाची सेवा करीत राहावें. कधीं आंबोली घाट ओलांडून सावंतवाडीच्या मोती तलावाच्या आसपास भटकावें आणि मधून मधून लांकडावरील रंगीन लाखेचें काम पाहावें. कधीं जहाजांत बसून कारवारला जावें आणि तेथें समुद्रकिनारीं वाळूचे किल्ले बांधावे. पुण्याला गेलें असतां मुळा-मुठेचा संगम, पर्वतीवरील मंदिरें आणि चतुःशृंगीवरून दिसणारें अफाट मैदान यांच्या दर्शनानें आनंदित व्हावें. मिरज, जत, रामदुर्ग, मुधोळ आणि सांगली अथवा कानडी मुलखांतील सावनूरसारख्या संस्थानांचे पाहुणे होअून मध्ययुगीन भारतवर्षांचें ओझरतें दर्शन घ्यावें. कृष्णेच्या कांठीं धावपळ करीत असलेल्या खिल्लारी बैलांच्या जोड्या पहाव्या, अथवा पंढरपूरला जाअून काकडआरतीच्या पूर्वीं चंद्रभागेमध्यें स्नान करावें, हेच माझे बाळपणचे संस्कार. गाडींत गवतावर गादी टाकली आहे, गाडी ओढणाऱ्या बैलांच्या गळ्यांतील घंटांचा तालबद्ध आवाज रात्रींच्या मौनाचा छेद करीत आहे, कोठून तरी चोर येतील या भीतीमुळें रात्र जागून काढण्याची आवश्यकता पटली असून सुद्धां डोळे मधून मधून मिटताहेत आणि दचकून पुन्हां अुघडावेत तर ' बघा आम्ही कशा सारी रात्र जागत आहोंत ' असें म्हणणाऱ्या चांदण्या माथ्यावर चमकत आहेत, असें हें दृश्य माझ्या लहानपणच्या जीवनाशीं ओतप्रोत झालें आहे.

प्रवास करायला मला कधीं कारण, हेतु किंवा प्रयोजन लागलेंच नाहीं. संधी असून प्रवास कां केला नाहीं याचें मात्र कारण द्यावें लागेल खरें ! हिमालयाची यात्रा केली असूनहि त्याच्या पलीकडे कैलासला मी कां गेलों नाहीं, अफगाणिस्तानाहून रशियाला जाण्याचा संकल्प शेवटच्या घटकेला कां सोडून

दिला, गांधीजींच्याबरोबर विलायतेला जाण्याची संधी आलेली असतांना-सुद्धां मी तिचा अव्हेर कां केला, या प्रश्नांचें अुत्तर मला द्यावें लागेल. जावा, बाली, श्याम आणि कॅम्बोडिया किंवा सुमात्राच्या बाजूला मी केव्हां जाणार ? मॉरीशियस, फीजी किंवा शीसल वगैरे बेटांतून आलेलीं आमंत्रणें मी केव्हां स्वीकारणार ? असे प्रश्न कोणीं मला विचारले तर तें स्वाभाविक आहे. न जाण्यासाठीं कांहीं तरी कारण असूं शकेल. जाण्यासाठीं कारण कशाला पाहिजे ? नदीला कुणीं विचारलें आहे का कीं, 'तूं कां वहातेस ?' अुलट ती वहातांना जेव्हां थांबते तेव्हांच सर्वजण आश्चर्य करतात.

प्रवास करण्याची हौस फक्त मलाच आहे असें नाहीं. अेका काळीं महाराष्ट्रीयांचा तो स्वभावच मानला जाअी. श्री शिवाजीमहाराजांचा समकालीन मद्रासी कवि वेंकटाध्वरि यानें आपल्या 'विश्वगुणादर्शचम्पु' या संस्कृत ग्रंथांत महाराष्ट्रीयांच्या गुणदोषांचें वर्णन करतांना या लोकांना यात्रा करण्याची मोठी खोड लागली आहे, असें म्हटलें आहे. अितर प्रांतांतील लोक थकल्याभागल्यानंतर म्हातारपणीं यात्रा करीत असतील. आपले लोक विद्याभ्यास संपल्याबरोबर जिज्ञासेची आणि पायांची हौस प्रथम भागवून नंतरच पायांत लग्नाची बेडी अडकवून घेत असत. ज्ञानेश्वरांच्या वडिलांच्या वेळेपर्यंत तरी निदान ही परंपरा चालू होतीशी दिसतें. नामदेवांनींदेखील थोडीथोडकी यात्रा केलेली नाहीं. केस पिकले, तोंडावर सुरकुत्या दिसूं लागल्या म्हणजे आपल्या लोकांना माहेरची ओढ लागते आणि ते अुत्तरेचा रस्ता धरतात. सोहिरोबा आंबिये या संतकवीनेंदेखील वृद्धापकाळीं कोंकण सोडून अुत्तरेकडे यात्रा केली आणि तिकडून तो परत आलाच नाहीं. नामदेवांनींदेखील आपला देह पंढरपुराला ठेवला नसून पंजाबमध्यें घुमान गांवीं तो सोडला असें तिकडील अितिहास सांगतो. अुत्तरेच्या अगस्तीनें दाक्षिणेंत जाऊन वास्तव्य केलें याची जणुं काय परतफेड करण्याचाच दक्षिणी लोकांनीं संकल्प केला होता.

पण आतां आपला हा राष्ट्रीय स्वभाव थोडासा मावळलेला दिसतो. नोकरीसाठीं कुठेंहि पाठवा, जावेंच लागतें. रेल्वेचे मक्ते घेऊन दूरवर जावें लागलें तरीदेखील आम्ही जाऊं; पण केवळ जीवनांतील आनंद म्हणून

देशदेशान्तराला जाण्याचें आपण बहुतेक सोडून दिलेलें असावें. धर्मभावनेनें सगळा देश आणि त्याच्या चार कोपऱ्यांवर असलेलीं चार धामें पाहून येण्याचा आग्रह सध्यां बहुतकरून घराला कंटाळलेल्या विधवांच्या वांट्यालाच अुरलेला आहे ! अशा स्थितींत निदान प्रवासवर्णनें वाचून आपल्या जुन्या महाराष्ट्रीय स्वभावाला संतोष द्यावा आणि तो जागृत ठेवण्याचा प्रयत्न करावा हें अत्यंत आवश्यक आहे.

तसें पाहिलें तर मी हें प्रवासवर्णन मूळ मराठींतच लिहावयास पाहिजे होतें. पण गुजराथमध्यें गांधीजींच्या आश्रमांत जाअून राहिल्यामुळें ते गुजराथींत लिहिलें. आतां श्री. भाअू धर्माधिकारी यांनीं माझ्या त्या गुजराथी पुस्तकाला मराठी रूप दिलें आहे. प्रवास करणारा महाराष्ट्रीय. त्याच्या आवडीनिवडी आणि लेखनशैली महाराष्ट्रीय. अशा स्थितींत गुजराथींवरून मराठींत आणलें असलें तरी हें पुस्तक भाषान्तर आहे असें वाटूं नये. भाअू धर्माधिकारी यांची मराठीची भक्ति अनन्य आहे; त्यांनीं या पुस्तकाला शुद्ध मराठी बनविण्याचा कसून प्रयत्न केला आहे. मलाहि थोडेंसें रिकामपण मिळाल्यामुळें मी हें भाषांतर साद्यंत पाहून गेलों आहें, आणि यांतील भाषेविषयीं आणि शब्दप्रयोगांविषयीं मला संतोष आहे.

अेका गोष्टीची मला जाणीव आहे. या पुस्तकाला कांहीं लोक कदाचित् प्रवासवर्णन म्हणणार नाहींत. यांत प्रवासाबाहेरच्या किती तरी गोष्टींचे अुल्लेख आहेत, आणि विषयान्तर हा तर या ग्रंथाचा जणुं काय विशेषच आहे. मी नम्रपणें अेवढेंच म्हणेन कीं, मी प्रवासाला निघालों म्हणजे केवळ पायांनीं आणि डोळ्यांनीं प्रवास करीत नसतों. चालणाऱ्याचे पाय चालतात; वेदांत म्हटलें आहे कीं त्याचें भाग्यहि चालतें; 'चराति चरतो भगः' आणि माझा अनुभव असा आहे कीं चालणाऱ्याचें डोकेंहि भरधांव चालूं लागतें—मात्र पायांप्रमाणें अेकाच दिशेनें चालण्याचें बंधन त्याला नसतें. जहाजावरचे पक्षी ज्याप्रमाणें मर्जीला येअील तितक्या घिरट्या घालून पुनः डोलकाठीवर येअून बसतात आणि क्षणभरांत कंटाळून पुनः नव्या भराऱ्या मारण्यास निघून जातात, त्याप्रमाणेंच कल्पनाशक्तीचें आहे. मीं प्रवासाला निघतांना पाथेय आणि अितर सामान फारसें बाळगलें नव्हतें. साथीदार असे दोघेच बरोबर होते. पण 'नको नको' म्हटलें असतांना देखील

कल्पनाशक्ति, स्मरणशक्ति, योजनावृत्ति यांचा तांडा मागें लागलाच ! हे लोक जर माझ्या मालकीचे असते तर त्यांना मीं मना केलें असतें. कारण माझा संकल्प होता कीं वैराग्यप्रवण ध्यानशक्तीलाच बरोबर येअूं द्यावयाचें. पण ही सर्व मंडळी अपौरुषेय. ' बरोबर या ' म्हटलें तर यावयाचीं नाहींत, ' नको ' म्हटलें तर अैकावयाचीं नाहींत. तेव्हां शेवटीं त्यांच्याविरुद्ध सत्याग्रह करण्याच्याअैवजीं निराग्रह वृत्तीचेंच सेवन केलें आणि त्यांच्या काचांतून सुटलों.

प्रवासवर्णन लिहितांना या लोकांना मीं आमंत्रण दिलें नव्हतें ! त्यांनाहि फारशी बातमी नव्हती, पण गूळ असेल तिकडे मुंग्या यावयाच्याच या न्यायानें या लोकांनीं मधून मधून येऊन लेखणीचा कब्जा घेतला आणि मनाला येअील तसें भरकटलें, तेव्हां विषयान्तराचा गुन्हा कबूल करण्याअैवजीं ' अिदं न मम ' असें म्हणूनच मी मोकळा होतों.

या पुस्तकाचें नशीबच असें सिकंदर आहे कीं गुजराती असो किंवा मराठी असो, दर आवृत्तीच्या वेळीं जनतेला प्रक्षुब्ध करणारी अशी अेखादी चळवळ देशांत प्रगट झाली आहे. आज या पुस्तकाच्या द्वारा माझी समन्वयवृत्ति जनतेपुढे मांडण्याची मला संधी मिळत आहे.

चांगल्या चांगल्या संस्कारी कुटुंबांत आपला परिचय करून देणाऱ्या स्नेह्यांचे जर आपण अुपकार मानतों, तर ज्या माझ्या पुस्तकांनीं गुजरातेंत, महाराष्ट्रांत आणि हिंदी जगांत माझी ओळख वाढवून दिली त्या पुस्तकां-विषयीं मी कृतज्ञ असणें स्वाभाविक आहे. सरकारनें स्वतःच्या तुरुंगांत मला जवळ जवळ तीन वर्षें डांबून ठेवलें, तरी माझ्या पुस्तकांच्या पायांनीं मी अनेक अनोळखी घरांत आणि हृदयांत प्रवेश करूं शकलों हें भाग्य काय लहानसहान आहे ? गुजराती भाषेंत हा " हिमालयाचा प्रवास " पंचवीस हजार प्रतींनीं वावरत आहे. मराठींत ७५०० प्रती चालूं लागल्या आहेत. श्री. दादा धर्माधिकारी यांनीं याच प्रवासाला त्यांच्या सुंदर हिंदीनें सजविलें आहे. हा सर्व त्या भारत-पित्या हिमालयाचा प्रसाद आहे.

माझ्या सर्व वाचक तरुण-तरुणींना अनेक प्रकारच्या आल्हादक यात्रा घडोत आणि त्यांचीं जीवनें रोमांचानें थरारून अुठोत, हाच माझ्यासारख्या प्रवासपरायणाचा त्यांना शुभाशिष.

आयुष्याचीं माझीं ७१ वर्षे अगदीं भरत आलीं तरीहि जिज्ञासेच्या आणि अुत्साहाच्या बाबतींत मी म्हातारा झालेलों नाहीं. माझ्या वाचकांपैकीं कोणीहि कधींहि म्हातारे होअू नये अशी माझी अपेक्षा आहे.

गुजरातींत काय किंवा मराठींत काय, दर आवृत्तीच्या वेळीं कांहीं ना कांहीं सुधारणा करण्याची संवयच पडून गेली आहे. अेका प्रथितयश अिंग्रज लेखकानें म्हटलें आहे कीं, गद्याची सुधारणा कधीं संपतच नाहीं.— Prose is never done.

शेवटीं गुजरातीच्या सहाव्या आवृत्तीच्या वेळीं मीं ठरविलें कीं आतां या पुस्तकांतील अक्षरहि बदलावयाचें नाहीं. त्यानंतर पुनर्मुद्रणें झालीं. पण मीं त्यांत ढवळाढवळ केली नाहीं. जर कांहीं फेरफार झाले असतील तर त्याचें कारण खिळे जुळविणाऱ्यांची प्रतिभा होय !

मराठीच्या या आवृत्तीचीं मुद्रितें जर तपासण्याची संधी मला मिळाली असती तर ही चौथी आवृत्तीच प्रमाणभूत असें मीं ठरविलें असतें. पण अजून अेक लोभ राहिला आहे. गुजरातीच्या सहाव्या आवृत्तीशीं हें मराठी भाषान्तर पडताळून पाहिलें पाहिजे. मगच या पुस्तकाच्या बाबतींत अलंबुद्धि धारण करतां येअील. माझ्या मनानें प्रस्तुत आवृत्तीच शेवटची आवृत्ति होय. यापुढच्या आवृत्ति म्हणजे पुनर्मुद्रणेंच असतील.

अेखादें पुस्तक समाजांत पुष्कळ वावरलें म्हणजे तें म्हातारें होतें, त्याची चाल मंद पडते आणि त्याची ताजगी क्षीण होते. अशा वेळीं पुस्तकांत यथेच्छ काटछाट करून त्याला जर आटपशीर केलें तर त्यायोगें पुस्तकाला नवीन जन्म लाभतो व तें पुन्हां नव्या दमानें समाजांत नांदू लागतें.

पण या सर्व गोष्टी भाग्यायत्त आहेत. आज तरी हें पुस्तक हातावेगळें करून संतोष अनुभवीत आहें.

'जातो ममायं विशदः प्रकामं ।
प्रत्यर्पितन्यास अिवान्तरात्मा ॥

नवी दिल्ली.
१६–२–५६
वसंतपंचमी

काका कालेलकर

आमच्या या प्रवासांतील सहयात्री

प्रिय सुहृद्

**कै. अनंतबुवा मरढेकर**

यांच्या

पवित्र स्मृतीस

अङ्गान वङ्गान् कलिङ्गानथ मगध–कुरून्
कोसलान् केकयान् वा
काश्मीरान् कुन्तलान्वा यवनजनपदान्
किञ्च पाञ्चालदेशान् ॥
नेपालान् केरलान्वा कतिचन कृतिनः
पाण्ड्य–तुण्डीरचोलान्
कर्नाटान् गौड–लाटान् परगतिघटना—
लम्पटाः पर्यटन्ति ॥

—'व्यंकटाध्वरि' कृत 'विश्वगुणादर्श–चम्पू'

स्वाध्याय
६५४२९
७३:५६
७७३१५७

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | अितिहास ... ... ... | १ |
| १ | संकल्प ... ... ... | ४ |
| २ | प्रयागराज ... ... ... | ६ |
| ३ | अमरपुरी वाराणसी ... ... ... | १० |
| ४ | गयेचें श्राद्ध ... ... ... | १७ |
| ४ अ | गयेची ख्याति ... ... ... | २१ |
| ५ | बोधिगया ... ... ... | २७ |
| ६ | बेलूर मठ ... ... ... | ३० |
| ७ | भक्तीच्या पुण्यक्षेत्रांत ... ... ... | ३८ |
| ८ | रामाची राजधानी ... ... ... | ४२ |
| ९ | आल्मोड्याकडे ... ... ... | ४८ |
| १० | नगाधिराज ... ... ... | ५३ |
| ११ | भीमताल ... ... ... | ५७ |
| १२ | सच्चित्सुख तो तूं परब्रह्म केवळ ... ... | ६२ |
| १३ | आल्मोडा ... ... ... | ७० |
| १४ | खाकीबाबा ... ... ... | ७५ |
| १५ | पदमबोरी ... ... ... | ८५ |
| १६ | गोवध ... ... ... | ९१ |
| १७ | धर्मशाळेंतील ऋषिकुल ! ... ... ... | ९५ |
| १८ | रामकृष्ण सेवाश्रम ... ... ... | १०० |
| १९ | तयारी ... ... ... | १०४ |
| २० | गंगाद्वार ... ... ... | १०६ |
| २१ | प्रस्थान ... ... ... | १११ |
| २२ | हृषीकेशच्या वाटेवर ... ... ... | ११३ |
| २३ | साधूंचें माहेर ... ... ... | ११५ |
| २४ | नवे नवे अनुभव ... ... ... | १२३ |

| | | |
|---|---|---|
| २५ | देवप्रयाग ... ... ... | १३० |
| २६ | श्रीनगरला गेलों नाहीं ... ... ... | १३५ |
| २७ | श्रद्धाभक्तीचा स्पर्श ... ... ... | १३७ |
| २८ | टेहरी ... ... ... | १४० |
| २९ | बादरूचें गांव ... ... ... | १४५ |
| ३० | राढीच्या सीमेवर ... ... ... | १५० |
| ३१ | ' यामुन ' ऋषि ... ... ... | १५४ |
| ३२ | राणागाम ... ... ... | १५८ |
| ३३ | जम्नोतरी ... ... ... | १६२ |
| ३४ | अुपरीकोटची चढण ... ... ... | १६४ |
| ३५ | अुत्तरकाशी ... ... ... | १७१ |
| ३६ | गंगोत्री ... ... ... | १७७ |
| ३७ | बुढ्ढा केदार ... ... ... | १८१ |
| ३८ | भोट चट्टी ... ... ... | १८७ |
| ३९ | पवाली आणि त्रिगुजी नारायण ... ... | १८९ |
| ४० | केदारनाथ ... ... ... | १९३ |
| ४१ | अुखीमठ आणि तुंगनाथ ... ... ... | १९७ |
| ४२ | बदरीधाम ... ... ... | २०० |
| ४३ | परत फिरतांना ... ... ... | २०७ |
| ४४ | द्वाराहाट ... ... ... | २१० |
| ४५ | फलश्रुति ... ... ... | २१३ |
| | अर्थ आणि संदर्भ ... ... ... | २२२ |

# अितिहास

ही लेखमाला मूळ छापण्याच्या अुद्देशानें लिहिलीच नव्हती. साबरमती आश्रमांतील सहकाऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या संतोषासाठीं तेथील अेका हस्तलिखित मासिकाकरितां ही सुरू केली होती. ज्या प्रवासाचें वर्णन, या लेखमालेंत केलें आहे, त्या प्रवासांत आम्ही तिघेजण होतों–स्वामी आनंद, मी आणि आम्हां दोघांचे आत्मीय स्नेही अनंतबुवा मरढेकर. आमच्या या त्रिकुटानें हिमालयाच्या प्रवासांत जो आनंद आणि अनुभव मिळविला त्याचें वर्णन संपतां संपणार नाहीं. आम्ही तिघेहि या प्रवासाचें वर्णन अलग अलग लिहिणार होतों.

माझी लेखमाला खाजगी स्वरूपाची आणि विस्तृत व्हायची होती. पण ती नियमितपणें किंवा क्रमबद्ध लिहिली गेली नाहीं.

*　　　*　　　*

दिल्ली दरबारानंतर झालेल्या दडपशाहीमुळें राष्ट्रीय शिक्षणाची प्रिय प्रवृत्ति जेव्हां अशक्य झाली तेव्हां मला यात्रा सुचली. १९१२च्या सुरवातीला मीं घर सोडलें. बडोदा सोडून प्रयागाचा म्हणजे अलाहाबादचा रस्ता धरला तो दिवस अक्षय्य तृतीयेचा होता, असें मला स्मरतें. प्रयाग, काशी व गया या तीन तीर्थांच्या यात्रेला त्रिस्थळी यात्रा म्हणतात. ही यात्रा पुरी करून मला पितृऋणांतून मुक्त व्हायचें होतें. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचा बेलूर मठ पहाण्याचा आणि 'श्रीरामकृष्ण–कथामृत' लिहिणारे श्री. महेन्द्रनाथ गुप्त यांचें दर्शन घेण्याचा संकल्प पुरा करावयाचा होता. सुदैवानें बेलूर मठाला मी वैशाख पूर्णिमेला पोंचलों. त्यामुळें मठाधिपति स्वामी प्रेमानन्द आणि अितर मठवासी यांच्याबरोबर बुद्ध भगवानांची पूजा तेथें आम्हांला करतां आली. त्याच दिवशीं खरडह नांवाच्या गांवीं चैतन्य-संकीर्तन अैकण्यासाठीं आम्ही गेलों होतों. भगिनी निवेदितानें आपल्या अेका लेखांत या स्थानाचें माहात्म्य सांगितलें आहे. माझे मित्र बुवा रामदासी संप्रदायाचे. त्यांचा संकल्प अयोध्येचें दर्शन घेण्याचा होता. तो पुरा करून आम्ही स्वामी

आनंदांना भेटायला आल्मोड्याला गेलों. वैशाख महिना आम्हीं तेथेंच काढला. तिकडून स्वामी आनंदांना घेऊन परत येऊन आम्हीं हरिद्वाराहून रीतसर यात्रेला सुरवात केली. ते दिवस गंगापूजेचे दशहराचे होते. जसजसा आमचा प्रवास वाढत चालला, तसतसा यात्रेचा संकल्पहि वाढूं लागला; आणि शेवटीं जमनोत्री, गंगोत्री, केदारनाथ व बदरीनाथ हीं अुत्तरखंडांतील चारीं धामें पुरीं करून परत आम्ही आल्मोड्याला गेलों. याच यात्रेचें वर्णन या ठिकाणीं दिलें आहे. त्यानंतर मी काश्मीरकडे अमरनाथच्या यात्रेला गेलों.

यात्रा करणें हें फार कठीण काम आहे असें लोक समजतात. माझ्या मतें यात्रा करण्यापेक्षां यात्रेचा वृत्तान्त लिहिण्यासाठीं वेळ मिळविणें हेंच अधिक कठीण आहे. येथें हिमालयाच्या ज्या प्रवासाचा वृत्तान्त दिला आहे, तो प्रवास आम्हीं चाळीस दिवसांत पुरा केला होता. त्याचें वर्णन लिहिण्याला सुरवात केली १९१९ मध्यें म्हणजे प्रवास पुरा केल्याला सात वर्षें अुलटून गेल्यानंतर ! या जुन्या आठवणी सगळ्याच सारख्या ताज्या कशा राहणार ? आणि ज्या आठवणी ताज्या नाहींत त्या देण्यांत गोडी तरी काय ?

अनेक प्रकारच्या परिस्थितीमुळें थोडी थोडी करतां माझी ही लेखमाला पंधरा वर्षें लिहिलीच जात होती. तिच्यांत अेकरूपता तरी कोठून येणार ? वाचक लक्षपूर्वक पहातील तर या लेखमालेंत जीवनरसाचीं बदलतीं वळणें त्यांना आढळून येतील. शेवटचीं पांच-सात प्रकरणें घाअीघाअीनें लिहिलीं असल्यामुळें त्यांच्यांत वर्णनाचा विस्तार कमी दिसून येअील. अेक तर हीं संस्मरणें पुष्कळशीं पुसून गेलेलीं आणि दुसरें प्रवासाचा शेवटचा भागहि थोड्या थकव्यांतच पुरा केलेला. या मूळ थकव्याची छापहि या शेवटच्या भागावर पडली आहे. वाचकांची जी अपेक्षा होती, आणि ज्या अपेक्षेला मी जबाबदार आहें ती अपेक्षा जर येथें तृप्त झाली नसेल, तर ते अुदार हृदयानें मला क्षमा करतील अशी आशा आहे.

मी आशा करतों कीं, महाराष्ट्राचे त्याचप्रमाणें साऱ्या हिंदुस्थानचे तरुण लोक प्रवासाचें महत्त्व अधिकाधिक समजूं लागतील, चहूं दिशांना फिरून येऊन स्वदेशाचें, तसेंच देशबांधवांचें अवलोकन करतील आणि भारत-भक्तीनें ओथंबलेलीं अशीं अनेक प्रवासवर्णनें प्रसिद्ध करून स्वभाषेला

श्रृंगारतील. मातृभूमीचें आणि मातृभूमीच्या असंख्य बालकांचें अनेक रीतींनें दर्शन घेअून त्यांचें श्रद्धाभक्तीनें वर्णन करणें ही एक पूजाच आहे. या पूजेचें प्रथम पुष्प म्हणून या लेखमालेचें स्मरण थोडे दिवस राहिलें, तरी तिचें सार्थक झालें असें मी मानीन.

—दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर

# संकल्प : : १

गच्छति पुरः शरीरं
धावति पश्चादसंस्तुतं चेतः ।

हिमालयाला जाण्याची माझी अिच्छा प्रबळ होती. पण गंगनाथ विद्यालयांत मी आचार्यांचें काम करीत होतों तें कसें सोडतां येणार ? विद्यालय सोडून देण्याचा विचारसुद्‌धां माझ्या मनाला शिवणें शक्य नव्हतें. हिमालयाला जावें जावें असें वाटत असे; पण कसें जातां येअील याची कल्पनाहि मला नव्हती—चिंताहि नव्हती; कारण माझें चित्त सदोदित गंगनाथ विद्यालयांतच गुंतलेलें असे. शेवटीं अेके दिवशीं दिल्ली येथें दरबार भरला. दरबारांत कुर्निश करण्याच्या वेळीं बडोद्याच्या सयाजीरावांच्या कमरेचा कोन लघु ( Acute ) होण्याअैवजीं विशाल ( Obtuse ) च राहिला, आणि माझा हिमालयाला जाण्याचा रस्ता मोकळा झाला. माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले,

" When I am free how merrily shall I live ?
Merrily, merrily shall I live now
Under the blossom that hangs on the bough."

स्वामींना अेक लांबलचक पत्र लिहून मीं विचारलें, "येअूं का तुजसंगें राहण्या तिथें ?" बुवा म्हणाले, "मीहि तुमच्याबरोबर येतों." मीं म्हटलें, "चला."

पण हिमालयाला जायचें म्हणजे मागली सर्व निरवानिरव केली पाहिजे. म्हणून मी घरच्या मंडळींना घरीं पोंचाविण्यासाठीं बेळगांवला गेलों आणि पुढच्या तयारीला लागलों. तेथून मी कोठें जाणार हें कोणाला न कळवितां 'वडिलांच्या अस्थी मला त्रिवेणीसंगमांत सोडावयाच्या आहेत त्यासाठीं मी जात आहें. गयेचें श्राद्‌ध करून आणखी थोडीशी यात्रा करून परत येअीन' अेवढेंच मीं सांगितलें.

तुकारामाची गाथा, भगवद्‌गीता, अुपनिषत्, दुर्गासप्तशती आणि मनाचे श्लोक अितकीं पुस्तकें मीं बरोबर घेतलीं; आणि आम्हीं निघालों.

वाचकांना वाटेल, कीं अेवढ्याच पुस्तकांनीं माझ्यासारख्या पुस्तक-चुंबकाचें कसें समाधान झालें ? शंका ठीक आहे; पण त्या वेळीं मी ‘ विरक्त दशेच्या मस्तीं ’ त होतों, किंवा त्या दशेंत असल्याचें मी मानीत होतों. तरीहि चांगल्या चांगल्या पुस्तकांची निवड करून त्यांची अेक पेटी मीं आल्मोड्याला स्वामींकडे प्रथम पाठवून दिली होतीच !

आम्ही चाललों. ट्रेनच्या वेगानें चाललों; पण आमच्या कल्पना तर पवनवेगानें-पवनवेगानें काय, मनोवेगानें–चालल्या होत्या. मला वाटायला लागलें कीं, मी महाराष्ट्र सोडून जात आहें. कदाचित् परत येणारहि नाहीं; आतां मराठीचे ते गोड गोड बोल पुनः कोठून अैकायला मिळणार ? अेका बाजूला हिमालय ओढीत होता, दुसरीकडे महाराष्ट्राचा मोह सुटत नव्हता. हृदय पुढें धांवत होतें; पण पाअूल उचलत नव्हतें. शेवटीं विचार केला कीं, गोव्यांतील रमणीय निसर्गश्री पाहण्यांत आठ-दहा दिवस घालविल्याशिवाय नाहींच जायचें. चैत्री पाडव्यापासून रामनवमीपर्यंत गोव्यांत राहिलों, आणि अुदास अंतःकरणानें गोवा सोडलें.

समुद्रमार्गानें आम्ही मुंबअीला आलों. मुंबअींत माझें काम असें कांहींच नव्हतें; पण कांहीं केल्या मला मुंबअी सोडतां सोडवेना. मुंबअी हें महाराष्ट्राचें शेवटचें दर्शन होतें. महाराष्ट्रावर माझें अितकें प्रेम असेल, मराठी भाषा मला अितकी प्रिय असेल, याची कल्पना अितके दिवस मला नव्हती. मी महाराष्ट्रीय आहें ही भावना जेव्हां मी मुंबअी सोडली, तेव्हांच खरोखर खडबडून जागी झाली. मुंबअीहून मी बडोद्याला गेलों. प्रेत झालेला जीवात्मा जसा आपल्या मृत देहाकडे अनेक मिश्रित भावानें पाहतो, तसेंच तितक्याच मिश्रित भावानें गंगनाथ विद्यालयाची अिमारत, घोडदौड-( रेसकोर्स )-जवळचें आमचें शान्तिनिकेतन, सारें सारें मीं अखेरचें पाहून घेतलें. गुरुजनांचा आशीर्वाद घेतला आणि शिवजयन्तीच्या दिवशीं सीमोल्लंघन केलें.

---

वैशाख महिना होता. अुन्हाळा कडक होता. आमची गाडी मध्य-हिंदुस्थानच्या विस्तीर्ण प्रदेशांतून जात होती. डबे अितके गरम झाले होते कीं जणुं काय पावरोटी भाजण्याची भट्टीच ! दरेक स्टेशनावर पाणी पीत होतों, तरीहि जीव कसा सुकून जात होता. तरी पण अेका गोष्टीमुळें शांति वाटत होती. प्रत्येक स्टेशनवर मराठी भाषा अैकूं येत होती; आणि पुंडलिकाच्या पुण्यक्षेत्राच्या रस्त्यानें जात असल्याप्रमाणें रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बाभळीचीं झाडें नजरेला पडत होतीं. मराठी भाषा आणि बाभळींचीं झाडें जोंवर होतीं तोंवर मी महाराष्ट्रांतच आहें या जाणिवेनें मनाला समाधान वाटत होतें. जवळ जवळ जबलपुरापर्यंत असें चाललें. जबलपुरांत माझे अेक मित्र राहात होते. त्यांना शोधून काढून भेटलों आणि त्यांच्या येथेंच जेवण केलें. माझ्या मनांत विचार आला कीं हें माझें शेवटचें महाराष्ट्रीय भोजन. विचित्रता अशी कीं, हें भोजनसुद्धां मला गुप्त वेषानें करावें लागलें ! कित्येक वर्षांपूर्वी माझे हे मित्र एल्‌एल्. बी. चा अभ्यास करीत होते. त्या वेळीं मीं त्यांना समजावून दिलें होतें कीं, वकिलीचा धंदा घाणेरडा आहे. त्यापेक्षां राष्ट्रीय शिक्षक होणें चांगलें. या कटांत मी सफळ झाल्यामुळें माझ्या मित्राचे सारे आप्तअिष्ट संतापानें माझ्यावर जळफळत होते. मला त्यांनीं पाहिलें नव्हतें, पण माझें नांव अैकलें होतें. मला बघून माझे मित्र अिंग्रजींत मला म्हणाले, “ गृहस्था, तूं कोण आहेस हें माझ्या आअीला जर समजलें, तर लागलीच तुझ्यावर पुष्पवृष्टि होअील. अर्ध्या तासांत तुला परत जायचें आहे; तेवढ्यांत ही शोभा कोठें करून घ्या ? ” मलाहि त्यांचें बोलणें पटलें आणि चोरासारखें गुपचुप स्नान करून मीं जेवून घेतलें. नाम आणि रूप यांचा संयोग झाला नव्हता म्हणून बिचाऱ्या आअींनीं अतिशय प्रेमानें स्वयंपाक करून मला गरमागरम महाराष्ट्रीय जेवण खाअूं घातलें. निघायच्या वेळीं त्यांच्यापुढें डोकें टेकून मीं नमस्कार केला आणि त्या प्रेमळ आअीच्या साऱ्या शुभ आशीर्वादांसह मीं निरोप घेतला. परशुरामापासून कर्णानें अस्त्रविद्या मिळवावी, तसेच हे आशीर्वाद मिळविले होते.

प्रयागराज हें आमच्या यात्रेचें पहिलें धाम. येथें अितिहास-पुराणांत प्रसिद्ध असा गंगा–यमुनांचा रमणीय संगम आहे. अेका बाजूकडून दोन्ही

कांटची सफेत रेती प्रवाहांत पाडत पाडत स्वर्धुनी वाहात येते, दुसऱ्या बाजूनें यमराजाची बहीण आपलें महत्त्व आणि प्रतिष्ठा सांभाळीत शांतपणें पुढें येते. संगमापासून दूरवर या दोन नद्यांचे धवल आणि श्याम प्रवाह जणूं वेगळे वेगळे असल्यासारखे वाहातात. प्राचीन काळापासून आपल्या कविवर्यांनीं संगमाच्या या काव्यमय ठिकाणीं आपली सरस्वती वाहविली आहे. धर्मनिष्ठ प्रजेनें अतिशय प्राचीन काळापासून या त्रिवेणी संगमाची असाधारण अुत्साहानें पूजा केली आहे. गंगेचें नांव घेतांच हरद्वार आणि ब्रह्मावर्ताची आठवण होते; आणि यमुनेचें नांव अैकतांच केव्हां कुंजविहारीच्या मथुरा—वृंदावनाचें स्मरण होतें, तर केव्हां शहाजहानची दिल्ली व आग्रा आठवतात. हिंदु आणि मुसलमान संस्कृतीच्या अैक्याचें ओझरतें दर्शन करून देणाऱ्या सम्राट् अकबरानें येथें संगमापाशीं असलेल्या सनातन अक्षयवटाच्या आसपास अेक मजबूत किल्ला बांधला आहे.

आम्ही किल्ला पहावयास गेलों, किल्ल्यांत गोऱ्या लोकांची फौज राहाते. किल्ल्याच्या संगमाकडील दरवाजाकडे जेव्हां पुष्कळ यात्रेकरू गोळा होतात, तेव्हां आंतून अेक शिपाअी येअून साऱ्यांना आंत घेअून जातो आणि अक्षयवटाचें दर्शन करवून दुसऱ्या दरवाजानें बाहेर सोडतो. अक्षयवट हा अेका भुयारांत आहे. वट कसला, अेक भलें मोठें खोडच आहे तें. भाविक लोक सांगतात कीं, खोड येथें आहे व फांद्या बोधिगयेंत आहेत. याचा अर्थ समजणें कठीण आहे. काय, अेके काळीं बौद्धधर्म बोधिगयेपासून अलाहाबादपर्यंत पसरला होता असा याचा अर्थ करावा ? हिमालयांत सुद्धा महादेवाच्या महालिंगाचें अेक टोक केदारनाथ येथें आणि दुसरें टोंक नेपाळांत असलेल्या पशुपतिनाथ या ठिकाणीं आहे असें म्हणतात, याचाहि अर्थ काय ? अेवढेंच काय, हिंदु लोक असें सुद्धां म्हणायला कमी करीत नाहींत कीं, गदाधर श्रीविष्णूचा अेक पाय गयेंत आणि दुसरा पाय मक्केंत आहे ! कल्पनेच्या साम्राज्यांत संयम कसला ? अक्षयवट असलेलें भुयार बरेंच लांबरुंद आहे, आणि त्यांत अनेक मूर्ती आहेत. कुबेराच्या आणि कपिलमहामुनीच्या मूर्तीकडे माझें लक्ष अधिक गेलें. अेका वेळीं गंगा-यमुनांचा प्रवाह अक्षयवटाला जवळ जवळ लागून जात होता. त्या काळीं कित्येक हिंदु लोक या

अक्षयवटावरून प्रवाहांत अुडी घेअून देहत्याग करीत असत. अशा रीतीनें अक्षयवटावरून अुडी घेअून केलेल्या आत्महत्येंत कांहीं पाप नाहीं, अुलट मोक्ष आहे, असें मानीत असत. जणुं काय लोकांच्या या अघोर साधनेला कंटाळूनच संगमानें आपलें स्थान बदललें आणि अकबरानें वडाच्या आसपास किल्ला बांधून अशा आत्महत्येचा संभव कायमचा बंद करून टाकला. लष्करी दृष्टीनें तर किल्लयाचें महत्त्व आहेच.

याच किल्लयांत बौद्‌धधर्मी अशोकाचा अेक शिलास्तंभ आहे. त्यावर अशोकाची धर्मलिपि कोरलेली आहे. समुद्रगुप्ताचा राजकवि हरिषेण यानें लिहिलेले कित्येक श्लोक सुद्‌धां याच स्तंभावर कोरलेले आहेत. अितिहासज्ञ दोन्ही लेख मोठ्या महत्त्वाचे मानतात.

बरोबरीच्या शिपायाची थोडी खुशामत करून अशोकाच्या या स्तंभाजवळ जाण्याची परवानगी मीं मिळविली. शिपाअी बिचारा होता पंजाबी. तो म्हणे, ‘ तेथें दर्शन करण्यासारखें कांहीं नाहीं. दर्शन सारें अिकडे भुयारांतच आहे. ’ बिचारा भोळा पंजाबी ! माझ्यासाठीं दर्शनीय काय, हें त्याला काय समजणार ? या दगडी गोल खांबावर दिग्विजयाचे आणि धर्मविजयाचे दोन स्वतंत्र आणि अमर लेख आहेत याची जागती जाणीव त्याला केव्हां होअील ? हिंदुस्थानांत शिक्षण सक्तीचें आणि सार्वत्रिक होअील तेव्हां ? राष्ट्रीयतेची स्फूर्ति घरोघर पोंचेल तेव्हां ? कीं कोणी लोककवि प्रजेच्या भाषेंत त्यांचा महिमा गाअील तेव्हां ?

किल्लयाच्या नजरेखालीं संगमापुढें रेतीचा अेक विस्तीर्ण पट आहे. त्यांत प्रयागचे पंडे लोक आपापले डेरे ताणून पडलेले असतात. तंबूच्या या दाटींत आपल्या पंड्याचा तंबू कोणता हें ओळखतां यावें यासाठीं प्रत्येक तंबूवर विशिष्ट चिह्न असलेली ध्वजा लाविलेली असते. कोणी कपिध्वज, कोणी मकरध्वज, तर कोणी नौकाध्वज. नव्या युगाचें सूचन करणाऱ्या ‘ हवाअी गाड्या ’ ( मोटारी ), आगगाड्या याहि ध्वजावर दिसून येत.

प्रख्यात कुंभमेळा दर बारा वर्षांनीं येथें भरतो. दरसाल फक्त माघमेळाच भरतो. अशा मेळ्यांना निरनिराळ्या प्रांतांचे साधू , संन्यासी,

तपस्वी आणि संत-महंत येतात. धर्मचर्चा होते, तत्त्वज्ञानाचे सामने होतात, नव्या नव्या मुद्द्यांची देवघेव होते. आतुर शिष्यांना गुरूंचा लाभ होतो आणि शिष्यवेड्या गुरूंना चेल्यांची प्राप्ति होते. दरअेक वादविवादांत प्रमाणें किती मानावीं याविषयीं तासन् तास चर्चा चालत असायची. कोणी प्रत्यक्ष आणि अनुमानालाच मानणारे. पुष्कळसे अुपमान आणि शब्दप्रमाणाला मान देणारे. नंगे बैरागी वादविवाद करूं लागले म्हणजे न्यायशास्त्रांत न सांगितलेलीं अशीं दोन प्रमाणें—सोटा आणि शिव्या—यांचा बऱ्याच प्रमाणांत अुपयोग होतो ! या नंग्यांना मरणाचें भय नाहीं. पण पोलिसांची त्यांना भारी भीति; कारण पोलिसांनीं पकडून चौकींत नेलें तर तेथें आपला धर्म पाळतां येणार नाहीं ना ! दंडाबाजींत दहा-पांच साधू कामीं आले तर पोलिस येण्याच्या पूर्वीं त्यांचे मुडदे रेतींत पुरून रेती सारखी करून ते वर बसून जातील ! हजारों बैरागी तेथें उभे असले, तरी पोलिसाला साक्षीदार अेकहि मिळायचा नाहीं. गुन्हेगारांना शिक्षा झाल्यामुळें समाजांतील गुन्हे कांहीं कमी झाले नाहींत, आणि अशा साधूंना शिक्षा न झाल्यामुळें त्यांच्यांत गुन्हे वाढले नाहींत, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

प्रयागराज येथें मला माझ्या वडिलांच्या अस्थी त्रिवेणीसंगमांत सोडावयाच्या होत्या. तें काम पुरें करून मीं श्राद्ध केलें. नदीकांठीं मिशा काढलेले पुष्कळ लोक पाहण्यांत येत असल्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत मद्रासी लोकांनीं तळ ठोकला असावा असें वाटत होतें. सिंधी लोकांना आपण पाहतों तेव्हां ते अर्धे अिंग्रजासारखे, अर्धे पारशासारखे दिसतात; पण तीर्थ-क्षेत्रांत अत्यंत भाविकता दाखविणाऱ्या आणि भक्तीनें सद्गदित होणाऱ्या यात्रेकरूंत सिंधचा पहिला नंबर येअील. महाराष्ट्रीय लोक थोड्या वेळांत आणि थोड्या खर्चांत जास्तींत जास्त किती पाहतां येअील, आणि किती पुण्याचा संचय होअील, अिकडेच दृष्टि ठेवणारे असतात. गुजराथी लोक नेहमीं खाण्यापिण्याची सोय शोधीत फिरत असतांना दिसतात, आणि बंगाली आपल्या भक्तीचा अुमाळा साऱ्या दुनियेच्या नजरेला बरोबर पडेल अशाविषयीं अधिक अुत्सुक दिसतात. मद्रासी तोंडावरून दिसतात हुशार; पण

त्यांना हिंदी समजत नसल्यामुळें आणि त्यांच्या विचित्र चालीरीती आणि पोषाख यांमुळें रोझ* प्रमाणें अिकडे तिकडे फिरत असलेले दिसतात. मजूर आणि गाडीवाले यांच्याबरोबर त्यांचें जमतच नाहीं.

संयुक्त प्रांताच्या लोकांना प्रयाग कांहीं परका मुलूख नव्हे. ते आपले रीतसर रुभरू अंगरखे घालून, डोक्यावर टोपी जरा तिरकी ठेवून, पान खात खात पोळासारखे सर्वत्र फिरत असतात. त्यांना बघून कोणीहि म्हणेल कीं, ‘ आत्मन्येव च संतुष्टः अस्य कार्यं न विद्यते। ’ अिंग्रजी शिकलेला माणूस वाटेल त्या प्रांताचा असो, त्याची जात वेगळीच पडायची. असल्या यात्रेच्या ठिकाणीं आपण आलों यांत आपल्या शिक्षणाला कांहीं कमीपणा तर आला नाहीं ना, अशी मुखमुद्रा धारण करून तो अेकलकोंडा फिरतो. आणि या सर्वांचे चित्रविचित्र स्वभाव, पोषाख आणि रीतिरिवाज यांकडे पूर्ण दुर्लक्ष करून गंगा-यमुनांचा सनातन प्रवाह अमरपुरी–वाराणसीकडे अखंड अविरत वाहातच चाललेला असतो.

---

# अमरपुरी वाराणसी : : ३

काशीला पूर्वी अेक वेळां मी आलों होतों. तरी परिचयामुळें अुत्पन्न होणारी अवज्ञा माझ्यांत अवतरली नव्हती. गाडींत बसून गंगेच्या पुलावरून ज्या वेळीं मी पसार होत होतों त्या वेळीं काशीचें तें अद्‌भुत दृश्य पाहून मी गद्‌गदित झालों. मोहोळावर बसलेल्या माशा गुणगुणत असाव्यांत तसा आवाज काशिमध्यें नेहमीं दुरून अैकूं येतो. ‘ वारणा ’ नदीपासून ‘ असी ’ नदीपर्यंतच्या दृश्यांत औरंगजेबाच्या मशिदीच्या दोन गगनस्पर्शी

---

* रोझः—काळविटासारखें अेक गुजराथमधील जंगली जनावर.

मनोऱ्यांकडे सर्वांत अधिक लक्ष जातें. हे मनोरे पाहून अेक विचारपरंपरा मनांत जागृत झाली. मीं मनांत म्हटलें, " या दोन मनोऱ्यांमागें हिंदुस्थानच्या अितिहासाचें परम रहस्य—चरम रहस्य लपलेलें आहे. औरंगजेबानें धर्मवेडाच्या आवेशांत काशीचें केंद्र, हिंदुधर्मांचा तिलक असें विश्वनाथाचें देवालय फोडून टाकलें, आणि त्याच्या जागीं अेक मशीद अुभारली. अजूनहि या मशिदीच्या मागच्या भागांत मूळ देवालयाचे अवशेष पाहावयास मिळतात. औरंगजेब मरण पावला. मोंगल साम्राज्याला अुतरती कळा लागली. हिंदु—पद—पादशाही स्थापन करण्याची अिच्छा असणाऱ्या मराठ्यांची आण दिल्लीवर फिरली. मराठे सरदार हरिद्वारच्या पंड्यांना भूमिदान करूं लागले. तरी पण काशीसारख्या पवित्र धर्मक्षेत्राच्या ठिकाणीं अिस्लामी झेंड्याप्रमाणें विराजणारी औरंगजेबाची मशीद फोडून टाकण्याचा विचारसुद्धां या हिंदूंच्या मनांत आला नाहीं. आज ही मशीद तेथें अिस्लामी धर्माच्या विजयाची पताका म्हणून नसून हिंदु लोकांचें साम्राज्य जवळजवळ सर्व देशभर व्यापलेलें होतें, अशा वेळीं त्यांनीं दाखविलेल्या परधर्मसहिष्णुतेची जणुं ध्वजाच ती आहे. हिंदु जातीचा हा प्रेममन्त्र अिंग्रज समजूं शकत नाहींत; मग त्याचा स्वीकार ते कुठला करायचे? म्हणूनच कानपूरच्या विहिरीवर लिहिलेला आपला द्वेष-लेख सुरक्षित राखण्यासाठीं सरकारनें त्या ठिकाणीं गोऱ्यांचा पहारा ठेविला आहे, आणि दिल्ली शहरासमोर तलवार अुगारून अुभ्या असलेल्या सेनापतीचें बाहुलें अुभें करण्यांत मोठा पुरुषार्थ मानला आहे.

अशा विचारांच्या प्रवाहांत मी बराच वाहात गेलों असतों, पण पुलाखालच्या गंगेच्या शांत प्रवाहानें मला शांत केलें; पण ही शांति फार वेळ टिकूं शकली नाहीं. स्टेशनजवळ येतांच माझ्या छातींत धस्स झालें. पंड्यांची झुंड माझ्यापाठीं लागणार असें वाटून माझीं गात्रें ढिलीं पडलीं! रशियाच्या जंगलांत चालणारा अेकादा प्रवासीसुद्धां आपल्या मागें अस्वलांची झुंड लागलेली पाहून अितका घाबरून जात नसेल! भीत भीत मी ट्रेनमधून अुतरलों आणि गाडीवानाजवळ जाअून त्याला सांगितलें, " बाबा, जें भाडें द्यायचें असेल तें घे; पण अेकदम मला येथून दुर्गाघाटाकडे घेअून चल. "

गाडीवानानें गाडी हांकली, तरी दोन पंड्ये आपल्या चोपड्या बगलेंत मारून माझ्या पाठीमागें धांवत सुटलेच. कसाबसा मी त्यांच्या पंजांतून निसटलों, आणि अनंतभटजींच्या येथें जाऊन पोंचलों.

अनंतभट फार सज्जन माणूस. आपलें कर्मकाण्ड ते चांगल्या रीतीनें चालवीत असत. यजमानाची व्यवस्था आपल्या खानदानीला साजेल अशा रीतीनें करीत आणि आपली प्राप्ति वाढवीत. ते व्याजबट्ट्याचा धंदाहि करीत. निजण्यापूर्वी माझ्या मनांत पंड्यांचा विचार आला. मला वाटलें, अनंतभट हे एक प्रकारचे पंड्येच नव्हेत का? ते येथें नसतील, तर माझी यात्रा चांगल्या प्रकारें व्हायची नाहीं; विलायतेंत दरेक मोठ्या शहरांत हॉटेल्स असतात, 'हाउस अेजंट' असतात, टॉमस कुक्सारख्या कंपन्या असतात. दरेक बंदरावर 'शिपिंग अेजंट्स्' भेटतात. आपले हे पंड्ये हेंच काम आपल्या भारतीय लोकजीवनाला अनुकूल अशा ढबीनें करीत नाहींत काय? पंड्याला पत्र टाकावें, कीं तो तुम्हांला न्यायला स्टेशनवर येतो, घरीं घेऊन जाऊन राहण्याची सोय करून देतो, पाहण्यासारखीं देवळें आणि स्थळें दाखवितो, त्या सर्वांचें माहात्म्यहि सांगतो, तुमच्याबरोबर बाजारांतहि येतो, आणि या साऱ्या कामासाठीं घेतो काय? तुम्ही द्याल तें. अितकी स्वस्त आणि साधी व्यवस्था जगांत दुसरीकडे कोठेंहि मिळणार नाहीं. टॉमस् कुक्सारखे अेजंट प्रवाश्यांना राजकैद्याप्रमाणें फिरवितात आणि त्यासाठीं मोठा कर घेतात.

तर मग या पंड्यांचा आपल्याला त्रास कां वाटूं लागतो? याचें कारण अितकेंच कीं, या पंड्यांना आपण आतां गुरुजी किंवा पुरोहित न राहातां 'हाउस अेजंट' किंवा 'हॉटेलकीपर' बनलों आहोंत, याचें पुरतें भान नसतें. दोन धर्म—दोन आदर्श—सांभाळतां सांभाळतां त्यांची ही दशा झाली आहे. लोभ आणि निर्लज्जपणा हे दोन त्यांचे मुद्दाम अंगीं बाणवून घेतलेले गुण होऊन बसले आहेत. पंड्ये हे खरें पाहिलें तर यात्रेकरूंचे गुरु म्हणायचे. आपला भलेपणा आणि आतिथ्यधर्म यांना अनुसरून आपल्या यजमानांची राहण्याकरण्याची सोय त्यांनीं सुरवातीला केली असेल. मग धनवान् यात्रे-करूंना पाहून ब्राह्मणांचें हृदयहि लोभानें वेधून टाकलें असेल. ब्राह्मण

म्हणतात कीं, पंड्यांचा लोभ हा त्यांना सीतेचा शाप आहे. आपल्या गलिच्छ दोषालासुद्धां व्यास किंवा शौनक ऋषींच्या नांवांचा पौराणिक आधार काढून दाखविणाऱ्या ब्राह्मणांची धन्य आहे म्हणायची ! या गंगापुत्रांपैकीं कांहीं जर आधुनिक पद्धति स्वीकारून 'हाउस अेजंट' आणि 'ट्रॅव्हेलर्स गाअीड' बनतील आणि तो धंदा करूनसुद्धां स्वतःची प्रतिष्ठा सांभाळतील, तर त्यांचें चांगलें चालेल आणि ते यात्रेकरूंचा दुवा घेतील.

दुसऱ्या दिवशीं आम्ही मणिकर्णिका घाटावर स्नानाला गेलों. तेथें गंगेचेंच पाणी घेऊन गंगेला अभिषेक केला. चक्र–पुष्करिणी तीर्थावर आलों. जवळ उभा असलेला अेक गंगापुत्र म्हणाला, "आअिये महाराज, स्नान कीजिये." मीं त्याला 'नाहीं' म्हटलें. बुवा चकित झाले. "या तीर्थाचें कांहीं फारसें माहात्म्य नाहीं वाटतें ?" त्यांनीं विचारलें. मी उत्तरलों, "वाः, माहात्म्य कां नाहीं ? यांत अेकदां स्नानाला पडल्यावर पुनः नरकांत जायचं अुरतच नाहीं !" बुवा अुमजले. तरी बुवांचें कुतूहल तृप्त करण्यासाठीं आम्ही तीर्थांजवळ गेलों. तीर्थावर अेक संगमरवरी दगड होता. त्यावर अिंग्रजींत व्हिक्टोरिया राणीचें नांव आणि दुसरें कांहीं लिहिलें होतें. आणि तीर्थांत ? पांच फूट रुंद आणि पंचवीस-तीस फूट लांब असा खड्डा. पाण्याचा रंग आम्हांला दिसला नाहीं; कारण या कुंडांत रोज स्नान करणाऱ्या हजारों यात्रेकरूंच्या घामाचा जाड थर पाण्यावर जमला होता. तरीहि आमच्या डोळ्यांसमोर शेंकडों यात्रेकरू मेल्यानंतरचा नरक टाळण्यासाठीं या नरकांत मोठ्या हौसेनें डुबक्या मारीत होते. माझ्या मनांत विचार आला कीं, शरम वाटूनच कीं काय, अीश्वर या लोकांना नरकवासांतून माफी देत असावा; कारण या कुंडांत स्नान करणाऱ्याला ज्याची शिसारी येअील असें कुंड नरकांत तरी अीश्वर कोठून आणणार ?

आम्ही स्मशानघाटाकडे चाललों. तेथें फोडलेल्या लाकडांची रास करून ठेवण्यांत आली. मला वाटलें माझ्यासाठीं तर ही रचून ठेवली नसेल ? काशीमध्यें जो मनुष्य मरतो त्याच्या कानांत स्वतः महादेव तारस्वरानें मन्त्र जपतात आणि काशी–विश्वेश्वर नेहमीं शरीराला त्याच्या चिताभस्माचा लेप करतात. त्याग आणि वैराग्याचा हा राग अद्भुत आहे !

पुढें जाऊन आम्हीं विंदुमाधवाचें दर्शन घेतलें. शिंदे–होळकरांचीं अन्नछत्रें पाहिलीं. पुण्यश्लोक अहल्याबाओींचें स्मरण झालें. त्यांच्या व्यवस्थेमुळें रोज काशीहून रामेश्वराला जाणाऱ्या कावडीचें चित्र माझ्या दृष्टीपुढें अुभें राहिलें. आम्हीं विश्वनाथाचें दर्शन घेतलें. तेथील गर्दी, जमिनीवरचा चिखल आणि कुजलेल्या बेलाच्या पानांचा वास हें सर्व कसें जरी असलें तरी काव्यमयच वाटत होतें आणि भक्तिभावांत भरच टाकीत होतें. विश्वेश्वराच्या येथें भेदभाव नाहीं. सर्वजण सारखे. दर्शन घ्यायला वाटेल त्यानें जावें, वाटेल तेव्हां जावें. 'मत जाओ'चें नांव नाहीं. मंदिराच्या गर्भगृहाच्या भिंतींत बिळासारखें अेक भोंक ठेवलेलें आहे. हें भोंक ठेवण्याचें कारण प्रथम मी समजूं शकलों नाहीं. पण मंदिराची प्रदक्षिणा करितांना मला दिसून आलें कीं, जगाचा प्रवास करणाऱ्या गोऱ्या 'ग्लोब ट्रॉटर'-(तुरंगप्रवाशां)-ना विश्वेश्वराचें दर्शन घेतां यावें अेवढ्याचसाठीं हें भोंक ठेवलेलें आहे. आम्ही गेलों त्या वेळीं त्या झरोक्यापुढें टॉमस कुक्‌चा अेक अेजंट दोन-तीन मडमांना मंदिराविषयीं माहिती देत होता. देवळाच्या शिखराला जडविलेला सोन्याचा पत्रा हें पंजाबकेसरी रणजितसिंहांच्या श्रद्धेचें अेक चिह्न आहे, असें मला कोणीसें सांगितलें. जवळच औरंगजेबाची मशीद आहे आणि मध्यें ज्ञानवापि आहे. असें सांगतात कीं, जेव्हां यवन लोक मूळ देऊळ भ्रष्ट करण्यासाठीं आले, तेव्हां कलियुगाचें माहात्म्य जाणून विश्वेश्वराच्या मूर्तीनें या विहिरींत अुडी घेतली; ही विहीर थेट पाताळापर्यंत गेलेली आहे.

तेथून पुढें ज्या मठांत राहून अेकनाथ महाराजांनीं आपला 'नाथभागवत' ग्रंथ पुरा केला होता, तो मठ पाहण्यासाठीं आम्हीं गेलों. संस्कृत भाषेचें सामर्थ्य आणि पावित्र्य माझ्या मराठींतहि आहे, हें या ठिकाणीं सिद्ध झालें. ती आठवण होतांच हृदय भक्तीनें भरून आलें. त्या स्थानाला मीं साष्टांग नमस्कार घातला, अेकनाथ स्वामींचें स्मरण केलें आणि त्रिलिंग स्वामींच्या मूर्तीचें दर्शन घ्यायला गेलों. त्रिलिंग स्वामी हे अेक सुविख्यात दाक्षिणी संन्यासी होते. त्यांनीं काशींतील पुष्कळ देवळांचा व अिमारतींचा जीर्णोद्धार करविला होता. तरी एकहि नवीन देअूळ किंवा अिमारत बांधण्याचें ते नाकारीत असत. असें करण्याचें कारण अुघड आहे. काशीमधील

लहान-मोठ्या देवळांची आणि त्यांतील मूर्तींची गणती केली, तर त्यांची संख्या तेथील लोकसंख्येपेक्षां फारशी कमी भरणार नाहीं. तेथें नव्या देवळांची भरती आणखी कशाला पाहिजे ?

हिंदुस्थानांत अनेक साम्राज्यें होअून गेलीं. अनेक राजधान्या झाल्या. आज त्या राजधान्या अेक तर नामशेष झाल्या आहेत, किंवा त्यांचें रूपान्तर लहान लहान खेडेगांवांत होअून गेलें आहे. तरीहि ही देवनगरी अनेक साम्राज्यांची चढती आणि पडती यांची साक्षी होअून अजून जशीच्या तशी टिकून राहिली आहे. भूतकाळ जर सजीव पाहायचा असेल, तर तो काशींत पाहायला मिळेल. गंगा नदी आपलें घाटरूपी बंधन वारंवार तोडीतच असते, आणि आअीची लाथ खाअूनसुद्धां वासरूं जसें गाअीला प्यायला धांवतच असतें, तसें लोकसुद्धां पुनः पुनः घाट बांधीतच असतात.

वाराणशींत आजहि पूर्वमीमांसावादी कर्मकाण्डी लोकांचे यज्ञयाग चालत असतात; वेदान्ती द्वैत–अद्वैताचा झगडा चालवून श्रोतृवृंदाला खंडनखंड खाद्य देत असतात; वैयाकरणी शब्दन् शब्दाचा कीस पाडतात; बंगाली आणि दक्षिणी नैय्यायिक ‘ गदाधरी ’चा अर्थ करण्याची धडपड करीत असतात. ख्रिस्चन आणि आर्यसमाजी वाग्युद्धें माजवितात; वेदाभ्यासी दशग्रंथाचा घोष करितात; कारागीर टाकी मारमारून दगडांचे देव बनवितात, आणि कित्येक भूदेव अन्नक्षेत्रांत जेवून आळशीपणें बसून राहून जिवंत दगड बनतात !

याच नगरींत सत्यसंध हरिश्चंद्राला विश्वामित्रांच्या ऋणांतून सुटण्यासाठीं अग्रजांनीं आणि अंत्यजांनीं मदत केली होती. याच नगरींत तुलसीदासांनीं रामकथा गायिली होती. आणि याच ठिकाणीं कबीरांनीं हिंदु आणि मुसलमान संस्कृति अेकत्र विणली होती.

बनारसला कित्येक लोक The city of the dead and the dying–मेलेल्या किंवा मरणासन्न झालेल्या लोकांची नगरी म्हणतात. पण वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानचीं अनेक शहरें नामशेष झालीं, तरीहि वाराणसी अजून अमरपुरीच राहिली आहे; कारण काशीमध्यें सनातन धर्माचा वास आहे.

अेक दिवस आम्ही दशाश्वमेध घाटापासून पुलापर्यंत होडींत बसून फिरावयास गेलों. गंगामाअीच्या स्पर्शामुळें शीतल आणि पावन झालेला वारा मंद मंद वाहात होता. अनेक प्रकारचीं देवळें ‘ मला पाहा, मला पाहा ’ म्हणत डोळ्यांपुढें येअून अुभीं राहात होती. सर्वांना मी श्रद्धापूर्वक नमस्कार करीत होतों. चकमकीच्या दगडाचे वांकडेतिकडे पैलू जसे सुशोभित दिसतात त्याचप्रमाणें काशीच्या घरांची विशृंखल शोभा दृष्टीला आकर्षक वाटते. सकाळ—संध्याकाळ असंख्य स्त्री-पुरुष, मुलें आणि वृद्ध माणसें गंगामाअीच्या कडेवर खेळत असलेलीं नजरेस पडतात.

दशाश्वमेध घाटावर अेक परमहंस राहात होते. ते नग्न राहात. पहिल्या खेपेला बनारसला आलों तेव्हां त्यांचा फोटो घेण्याचा मी प्रयत्न केला; पण तो निष्फळ ठरला. जसजसा मी फिरे तसतसे ते माझ्याकडे पाठ फिरवीत. त्या वेळीं मी फार खिन्न झालों होतों; पण मागाहून मला वाटलें कीं, अशा परमहंसाच्या शरीराचा फोटो घेणें हा रानटीपणा आहे. या खेपेला मी त्यांच्या दर्शनाला गेलों; पण ते तेथें नव्हते. कोणीं सांगितलें कीं, थोड्या दिवसांपूर्वीं गंगेला पूर आला होता त्यांत ते वाहून गेले. कित्येक मंडळींनीं त्यांना वांचविण्याचा प्रयत्न केला; पण त्यांनीं वांचवून घेण्याचें साफ नाकारलें आणि गंगेमध्यें जलसमाधि घेतली.

काशींत ज्याप्रमाणें अनेक धर्म आणि अनेक संप्रदाय आहेत त्याप्रमाणें तेथें स्थापत्य आणि शिल्पकलेचे प्रकारहि अनेक आहेत. ते पाहाण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं आम्ही बाहेर पडलों. सर्व पाहून संध्याकाळीं थिऑसॉफिस्ट लोकांच्या सेंट्रल हिंदु कॉलेजकडे आलों. तेथें सरस्वतीचें अेक लहानसें देअूळ पाहिलें. अेकदोघे बंगाली विद्यार्थी अंगावर चादर पांघरून अुघड्या डोक्यांनीं फिरत होते. जवळच थिऑसॉफिकल लॉजमध्यें मिसेस् बेझंटचें व्याख्यान होतें. ‘ भविष्यकाळीं माणसें कशीं होतील ? ’ या-विषयीं विवेचन चाललें होतें. व्याख्यानामधून अुठून ‘ रामकृष्ण सेवाश्रमां ’त आलों. तेथें ब्रह्मचारी चंद्रशेखर म्हणून एक साधु होते. त्यांनीं आमचें स्वागत केलें. पुष्कळ ब्रह्मचारी संस्कृत शिकत होते. जवळच्या रुग्णा-लयांत चारुबाबू आजाऱ्यांची शुश्रूषा करीत होते. सेवाश्रमाची व्यवस्था

पाहून मी खूष झालों. अेवढ्यांत दोघे-तिघे बंगाली शहरांतून तंबोरा आणि तबला घेअून आले. तंबोरा आणि तबल्याच्या साथीवर त्यांनीं गायन सुरू केलें. संतकवि रामप्रसादाचें पद होतें तें. गाणारे अद्‌भुत होते. संध्याकाळीं घरीं गेलों तेथेंसुद्‌धां गायनाचे सूर माझ्या कानांत घुमत होते.

शेवटच्या दिवशीं आम्ही काळभैरवाच्या देवळांत गेलों. तेथें हातांत आणि गळ्यांत काळा रेशमाचा दोरा बांधून घेतला. देवळांत जाअून

**“ तीक्ष्णदंष्ट्र महाकाय कल्पान्तदहनोपम ।**
**भैरवाय नमस्तुभ्यं अनुज्ञां दातुमर्हसि ” ॥**

म्हणून काशीच्या या कोतवालाची आम्हीं रजा घेतली; आणि तिरस्थळीची यात्रा पूर्ण करण्यासाठीं गयेला जाण्यासाठीं निघालों. गयेचे गयावळ यात्रेकरूंना फार हैराण करतात हें मला माहीत होतें; म्हणून गयेंत करावयाच्या सर्व विधींची दक्षिणा आणि खर्चाचे पैसे अनंतभटजींना देअून त्यांची मीं पावती घेतली होती. टॉमस कुक् कंपनीला प्रवासाचा सर्व खर्च देअून कूपनबुक घेअून ठेवण्याअितकी सोय यांत होती.

प्रत्येक हिंदवासियानें आयुष्यांत अेकदां तरी वाराणसीचें दर्शन घ्यावेंच.

---

# गयेचें श्राद्ध : : ४

दुनियेंत प्रत्येक वस्तूला मरण आहे. फक्त अेक मरत नाहीं भूतकाल. भूतकाल चिरंजीवी आहे. महासागराला ओहटी लागते, चंद्राचा क्षय होतो, कुबेर निर्धन बनतो, पर्वत धुअून जातात, साम्राज्यें स्मृतिपटावरूनहि पुसलीं जातात; पण भूतकालाला क्षय नाहीं. भूतकाल दिवसेंदिवस समृद्‌धच होत जातो. पण तुम्ही त्याला राखून ठेवूं शकणार नाहीं. कारण तुम्ही वर्तमानकाळांत

आहां. भूतकाळाचा वृक्ष तुमच्या आंगणांत लावावयाचा असेल, तर तुमच्याजवळ अमाप स्मृतिजळ असलें पाहिजे.

प्रत्येक मनुष्याची अिच्छा असते, कीं माझीं मुलेंसुद्धां भूतकाळांत असावींत. आपल्या संततिद्वारां मनुष्याला भविष्यकाळांत पाय पसरतां येतात; पण भूतकाळांत प्रवेश करण्यासाठीं भुताप्रमाणें अुलटे पाय असले पाहिजेत. तरी पण माणसानें अेक युक्ति शोधून काढली आहे. दरवर्षी अेक वेळ मनुष्य भूतकाळांत वास करीत असलेल्या आपल्या पिता, पितामह, प्रपितामह यांचें स्मरण करून श्रद्धांजलि अर्पण करतो आणि भूतकाळावरहि आपला वारसा-हक्क शाबीत करतो.

तसा तर भूतकाळ सर्वत्र आहेच; पण जसा विष्णु सर्वव्यापी असूनहि वैकुंठांत राहतो आणि महादेव कैलासांत राहतो, तसा भूतकाळ गयेंत राहतो. आज अितक्या वर्षांनीं गयेंत मी फिरून प्रवेश करीत आहें, तोहि भूतकाळांत थोडासा प्रवेश करण्यासाठींच. प्रत्येक हिंदु गयेंत जाअून आपल्या पूर्वजांचें श्राद्ध करीत असतो. आज गयेचेंच श्राद्ध करावें, असें माझ्या मनांत आलें आहे.

आम्ही रात्रीं गयेला पोंचलों. पूर्वी अेक वेळ तेथें गेलों असल्यामुळें या खेपेला कसलीहि अडचण पडण्याजोगी नव्हती. गया हें तीर्थस्थळ असल्यामुळें हजारों-लाखों माणसें अेकदम आलीं तरी तेथें अडचण होत नाहीं. प्रत्येक घरांत किती माणसें राहूं शकतील, याची नोंद म्युनिसिपालिटी-कडून करण्यांत आली आहे. आपल्या लोकांना फारशा सुखसोयींची आवश्य-कता नसते, तेव्हां दक्षिणेसंबंधीं जर कांहीं तक्रार नसेल, तर यात्रा सुखानें होअूं शकते. तुम्ही स्टेशनवर अुतरलांत कीं लागलेच गयावळांचे आडती तुमच्यापुढें येअून अुभे राहतात; आणि तुम्ही कुठले, कुठून आलां वगैरे प्रश्न हिंदुस्थानच्या अेकूण अेक भाषांतून विचारतात. तुम्ही ज्या भाषेंत अुत्तर द्याल, त्या भाषेंत संभाषण सुरू होतें. हे आडती ( दलाल ) कोणत्याहि विद्यापीठाचे स्नातक न होतांसुद्धां हिंदुस्थानच्या सान्या भाषा जाणतात, आणि व्याकरणाची हरकत बाजूला ठेवलीत, तर त्या भाषांत अस्खलित बोलतात सुद्धां.

आमच्या वांट्याला कोण पंड्या आला होता, त्याची मला आठवण नाहीं, आणि मला वाटतें मला त्याचें दर्शनहि झालें नाहीं. त्याच्या मुनीमाच्या मुनीमाचा मुनीम मला स्टेशनवर भेटला व तेथून अेका मुक्कामाच्या ठिकाणीं घेअून गेला. त्याच्या वाचाळतेला बळी पडावें लागूं नये म्हणून मीं प्रथमच जरा करडेपणानें त्याला सांगितलें, "हें पाहा बुवा, मी अेक वेळ येथें येअून गेलों आहें. यात्रेचे सर्व पैसे मीं अनंतभटांना बनारस येथेंच दिले आहेत. त्यांच्याकडून तुम्हांला मिळतील. आतां मला या या सवलती पाहिजेत, त्यांचे पैसे हे घ्या. मला अुद्यां श्राद्ध करावयाचें आहे; पण तें कर्णाटकच्या नृसिंहाचार्यांमार्फतच करायचें आहे. त्यांना अुद्यां सकाळीं आठ वाजण्यापूर्वीं अिकडे पाठवून द्या. दुपारीं श्राद्ध संपल्यानंतर तुमचा चोपडा घेअून या. त्यावर सही करून देअीन. आतां अधिक बोलण्याची जरूर नाहीं. जा, सांगितलेलें काम करा आणि आतां आराम घेअूं द्या." माझा हा रुबाब बघून तो बिचारा चकितच झाला आणि अेक शब्दहि न बोलतां सांगितल्या-प्रमाणें व्यवस्था करण्यासाठीं चालता झाला. असा अवतार जर मीं धारण केला नसता, तर या माणसानें आपल्या आशाळभूत गोष्टींत नाहीं म्हटलें तरी माझा अर्धा तास खाल्ला असता.

दुसऱ्या दिवशीं फल्गु नदीच्या कांठीं श्राद्ध करण्यासाठीं गेलों. फल्गु नदी जमिनींत आहे. तिला सीतेचा शाप आहे. वाळूंत खोदावें तेव्हां पाणी मिळायचें. नदींत नेहमीं यात्रेकरूंची गर्दी असते आणि या गर्दीमधून पुष्ट आणि रूपवान् गयावळ पोळाप्रमाणें दक्षिणेच्या आशेनें फिरत असलेले दिसतात. मीं गर्दींत स्नान केलें, शेणकुटें आणून त्यावर चरु तयार केला. नृसिंहाचार्य आले. त्यांना सर्व मंत्र माहीत होते. त्यांचे अुच्चारहि चांगले होते. म्हणूनच मीं त्यांना पत्करलें होतें.

नदीच्या पात्रांत बसून करण्याची क्रिया पुरी करून आणि पिंड घेअून मी गदाधराच्या देवळांत गेलों. तेथें शेंकडों यात्रेकरू ठिकठिकाणीं रांगेनें बसले होते आणि श्राद्धाची कवाअीत करीत होते श्राद्धासारख्या अत्यंत पवित्र भावनामय धार्मिक क्रियेला अितकें यांत्रिक स्वरूप दिलेलें पाहून मला फार वाअीट वाटलें. पावलोंपावलीं दक्षिणेसाठीं झगडून गरीब

अडाणी यात्रेकरूंनीं मागितलेली दक्षिणा दिली नाहीं, तर त्यांच्या मेलेल्या आतेष्टांना शिव्या देणाऱ्या गयावळांना पाहून हिंदुधर्माबद्दल कोणाला निराशा वाटली, तर त्याला फारसा दोष देतां येणार नाहीं. पिंड अर्पण करण्यासाठीं आम्ही धर्मशिलेजवळ जाअून बसलों. धर्मशिलेवर श्रीविष्णूचें पाअूल आहे. या विष्णुपदावर लोक पिंड ठेवीत जातात आणि गायी येअून ते खाअून टाकतात. असा क्रम सतत चालत असतो. पिंडदानक्रिया पुरी झाल्यानंतर गयापुत्रांकडून यात्रेचें सुफळ मिळवायचें असतें. या वेळीं गयापुत्रांना मनाला येअील ती दक्षिणा काढतां येते. त्याच्यापुढें हात जोडून आपण अुभें राहिलों, म्हणजे तो फुलांची माळ घेअून आपले हात बांधून टाकतो; आणि तृप्ति होअील अितकी दक्षिणा मिळेपर्यंत ते सोडीत नाहीं; खिसा भरला कीं मग तो माळ तोडून टाकतो, पाठीवर थाप मारून यात्रा सफळ झाली असें जाहीर करतो आणि सारे पूर्वज थेट स्वर्गाला पोंचल्याची खात्री देतो.

मीं सर्व दक्षिणा बनारसलाच चुकती केल्यामुळें येथेंसुद्धां मी वांचलों. आमच्या मुनीमानें अेका गयापुत्राला आमच्यापुढें आणून अुभें केलें. तो वीस अेक वर्षांचा असेल. तो रेशमी सोंवळें नेसला होता. वर रेशमी सदरा आणि जाकीट होतें. केस अिंग्लिश फॅशनचे राखलेले आणि पोमेटमनें चांगले चकचकीत केलेले होते. माझी सर्व श्रद्धा महा मेहेनतीनें अेकत्र करून मीं त्याच्यापुढें दोन्ही हात जोडले आणि ते माळेनें बांधूं दिले. गयापुत्र रुसण्याच्या तयारींत होता, अितक्यांत मुनीमानें त्याला सांगितलें, ‘दक्षिणेचे पैसे जमा झाले आहेत.’ गयापुत्रानें माळ तोडली आणि तो चालता झाला. तो गयापुत्र मला विसरला असेल; पण मी त्याला विसरलेलों नाहीं.

आमचे अुपाध्याय महाराज म्हणाले कीं, “गयेला येअून श्राद्ध करणें हें माणसाचें गृहस्थजीवनांतील शेवटचें कर्तव्य आहे. तें पुरें झालें; तेव्हां तुम्हीं आतां काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंचा त्याग केला पाहिजे; पण या कलियुगांत तसें होअूं शकत नाहीं, म्हणून त्याअैवजीं तुम्हीं कोणत्या तरी अेका वस्तूचा त्याग करावा.” मीं विचारलें, “साखरेचा त्याग केला तर?” आसपास अुभे असलेले दहा-पंधरा जण हें अैकून थक्क झाले. ते म्हणाले, “साखर कशी काय बुवा सोडतां येणार?” मी

म्हणालों, " आज पांच वर्षें झालीं, मी साखर खात नाहीं." भटजी महाराजांनीं सुचविलें, " कारलीं किंवा भोपळा असें कांहीं सोडा. " मीं म्हटलें, " धर्माशीं अशी प्रतारणा मी नाहीं करणार. मी षड्रिपूंपैकीं क्रोधाचाच त्याग करण्याचा प्रयत्न करीन. " आणि मनांत म्हटलें, आणि " अंधश्रद्धेचाहि."

गदाधराचें देऊळ सुंदर आहे. नदीच्या पात्रापासून तें पुष्कळ अुंचीवर असल्यामुळें त्याची शोभा खूप वाढली आहे. दुपारीं आम्हीं नृसिंहाचार्यांकडे भोजन केलें, गयामाहात्म्य श्रवण केलें, आणि लागलीच बोधिगयेला जाण्याचें ठरविलें. गयामाहात्म्य हें हिंदुधर्मशास्त्रांतील अेक अद्भुत प्रकरण आहे. निष्काम भावानें परोपकार करणाऱ्या गयासुराच्या तेजानें भिअून जाअून देवांनीं त्याच्याविरुद्ध कट केला आणि त्यांत साक्षात् श्रीविष्णूंनीं भाग घेअून अत्यंत निर्दयतेनें—आणि दगलबाजीनें म्हटलें तरी चालेल—त्या महाभागाचा खून केला, अशी कथा या माहात्म्यांत आहे.

अैकावी आतां ही कथा—

---

# गयेची ख्याति : : ४ अ

लोकपितामह ब्रह्मदेवांनीं असुरवृत्तीपासून असुरांची आणि सद्भावापासून देवांची अुत्पत्ति केली. या असुरांमध्यें गयासुर महा बलवान् आणि पराक्रमी होता. त्याचें शरीर खूप स्थूल होतें. असुर म्हणजे महापापी, क्रूर, सर्वांना गांजणारा, अिंद्राला धाक अुत्पन्न करणारा, अप्सरांना पळवून नेणारा असा कोणी मायावी कपटी राक्षस, असाच भाव मनांत येतो; पण सारेच असुर या प्रकारचे असतात असें नाहीं. सत्पुरुष दानशूर बलिराजाहि असुरच म्हटला जातो. गयासुर याच कोटीचा असुर होता. त्याच्यापुढें देव कसे दिसत तें आतां आपण पाहूं.

गयासुराला आपण पवित्र व्हावें अशी तळमळ लागली आणि त्यानें

कोलाहल पर्वतावर दारुण तप आरंभिलें. हजारों वर्षें श्वास स्थिर करून त्यानें तप केलें; त्यामुळें नेहमींप्रमाणें देव अतिशय घाबरले. शिरस्त्या-प्रमाणें ते ब्रह्मदेवाकडे गेले; ब्रह्मदेव शंकराकडे आणि शंकर विष्णूकडे. देवांच्या सनातन रिवाजाप्रमाणें सर्वांनीं विष्णूची स्तुति केली. विष्णूनें त्यांना घाबरण्याचें कारण विचारलें.

"गयासुराच्या भयापासून आमचें रक्षण करा" त्यांनीं आक्रोश केला.

"तुम्ही पुढें जा. मी आत्तां येऊन गयासुराला वरदान देऊन त्याचें तप बंद करतों" हरीविष्णूंनीं आश्वासन दिलें.

सर्वांनीं मिळून गयासुराला 'वर माग' म्हणून सांगितलें. गया-सुरानें मागून घेतलें, "देव, ब्राह्मण, यज्ञ, तीर्थ, ऋषी, मुनी, ज्ञानी, ध्यानी अित्यादि सर्वांपेक्षां मीं पवित्र व्हावें."

देवांनीं 'तथास्तु' म्हणून आनंदानें वर दिला आणि सर्व आप-आपल्या घरीं गेले.

पण आतां 'अेक करतां वेक व्हावें' अशी स्थिति झाली. गया-सुराचें पवित्र दर्शन घेअून, त्याला स्पर्श करून सर्वच माणसें वैकुंठ-धामाला जाअूं लागलीं. तिन्ही लोक ओस पडले. यमपुरी अुजाड झाली. तेव्हां यम, अिंद्र वगैरे अधिकारी मंडळी ब्रह्मदेवाकडे जाअून फिर्याद करूं लागली कीं, "हा घ्या आमचा राजिनामा. तुम्ही दिलेला अधिकार परत घ्या. आमचें आतां कांहींच काम अुरलें नाहीं."

ही टोळी पुनः शिरस्त्याप्रमाणें विष्णूपर्यंत जाअून पोंचली. विष्णु गयासुराला सनद देअून चुकले होते. म्हणून त्यांनीं देवांना अेक युक्ति सुचविली. 'गयासुराकडे जाअून त्याचा पवित्र देह यज्ञासाठीं मागून घ्या, आणि त्याच्या शरिरावरच यज्ञ करा (?) म्हणजे झालें."

देव ब्रह्मदेवांना पुढें घालून गयासुराकडे गेले. गयासुरानें त्यांचा सत्कार करून ते कांहींहि बोलण्यापूर्वींच त्यांचें काम करून देण्याचें वचन दिलें. ब्रह्मदेव म्हणाले, "यात्रेच्या निमित्तानें मी खूप फिरलों; पण तुझ्या शरिरापेक्षां अधिक पवित्र स्थान मला कुठेंहि आढळलें नाहीं. मला यज्ञ करायचा आहे. त्यासाठीं तुझें शरीर दे."

गयासुराला धन्य धन्य वाटलें. तो ब्रह्मदेवाला म्हणाला, "माझ्या पित्याचा आणि मातेचा असे दोन्ही वंश आज धन्य झाले. तूंच हा देह अुत्पन्न केलास आणि तूंच तो पवित्र केलास. माझी खात्री आहे कीं, तुझा यज्ञ सर्वांच्या अुपकारासाठींच असणार, 'सर्वेषामुपकाराय यागोऽवश्यं भविष्यति ।' "

अितक्या निर्मळ भावानें प्रेरित झालेला गयासुर देह द्यायला वेळ कसला लावणार? तो आडवा पडला. सृष्टि रचणाऱ्या ब्रह्मदेवानें यज्ञाची सामग्री आणि यज्ञाचे ऋषी तिथल्या तिथें निर्माण केले. अितके ऋषी कीं त्यांच्या नामावलीला अंतच नाहीं. गयासुराच्या शरिरावर मोठा यज्ञ झाला. ब्राह्मणांना दक्षिणा दिली गेली. गयासुर आतां मेला असेल असें समजून साऱ्यांनीं अुचलून त्याला अेका मोठ्या सरोवरांत टाकून दिलें. अितक्यांत असुर हलूं लागला. अरे भगवान्! आतां काय करावें! आश्चर्यचकित झालेल्या ब्रह्मदेवानें धर्मराज यमाला ओरडून सांगितलें, 'अरे, तुझ्या घरांत असलेली ती मोठी धर्मशिला आणून याच्या डोक्यावर झट्दिशीं ठेवून दे. माझी आज्ञा आहे. या वेळीं पाप-पुण्याचा विचार करूं नकोस (!)'

शिळा डोक्यावर ठेवली तरीहि असुर हलूं लागला. तेव्हां सर्व देवांनीं त्याच्यावर आपापले पाय ठेवून त्याला चांगलाच दाबून टाकला. तरीहि असुर शांत होअीना. आतां मात्र ब्रह्मा व्याकुळ झाला. क्षीरसागरांत विष्णु निजले होते तिथें तो गेला. द्वारपाळानें विष्णूला खबर दिली. श्रीविष्णूनीं ब्रह्मदेवाला आंत बोलावून येण्याचें कारण विचारलें. त्यानें सांगितलें, "आम्हीं यज्ञ केला, देवरूपिणी धर्मशिला त्याच्यावर टाकिली, रुद्र वगैरे सारे देव त्याच्यावर बसले, तरी तो निश्चल होत नाहीं. आतां तुम्हीच आमच्यावर दया करा."

विष्णूंनीं आपल्या शरिरांतून मूर्ति काढून ब्रह्मदेवाला दिली. तिचा भारहि पुरेना. अखेर क्षीरसागरांतून विष्णु स्वतः आले आणि शिळेवर अुभे राहिले. त्यांच्या हातांत त्यांची पुराणप्रसिद्ध गदा होती. विष्णूच्या बरोबर गायत्री, सावित्री, सरस्वती, लक्ष्मी, सीता, यक्ष, गंधर्व, अिंद्र, बृहस्पति वगैरे सर्व देवदेवता येअून गयासुराच्या शरिरावर अुभे राहिले, तेव्हां कुठें तो असुर स्थिर झाला!

'सर्वेषामुपकाराय' ज्यानें आपल्या देहासुद्धां सर्व अर्पण केलें होतें, त्याच्या हृदयावर या कपटानें आघात झाला. अंतःकरण व्याकुळ होअून त्यानें देवांना विचारलें, 'तुम्ही मला अशा रीतीनें कां वरें फसविलेंत? मी माझें निर्मळ शरीर ब्रह्मदेवाला यज्ञासाठीं दिलें होतें. श्रीविष्णूच्या अेका शब्दानें मी निश्चल झालों नसतों का, जे तुम्ही आणि विष्णूनें मला आपल्या गदेनें अितकें पीडिलें? असो. मला छळायचेंच ठरलें असेल, तर त्याच्या योगानें तरी सर्व संतुष्ट होवोत, अेवढीच माझी अिच्छा आहे.

**ऊचे गयासुरो देवान् किमर्थं वंचितो ह्यहम्?**
**यज्ञार्थं ब्रह्मणे दत्तं शरीरममलं मया ॥**
**विष्णोर्वचनमात्रेण किं न स्यां निश्चलो ह्यहम्?**
**यत्सुरैः पीडितोऽत्यर्थं गदया हरिणा तथा ॥**
**पीड्यश्च यद्यहं देवाः प्रसन्नाः सन्तु सर्वदा ॥**

देवांना शरम वाटली कीं नाहीं तें माहात्म्यांत लिहिलेलें नाहीं, पण ते गयासुराला म्हणाले कीं, 'आम्ही तुजवर प्रसन्न झालों आहों, वर माग.' गयासुरानें मागितलें, 'जोंपर्यंत ही पृथ्वी, हे पर्वत आणि हे चंद्र, सूर्य, तारे आहेत तोंपर्यंत ब्रह्मा, विष्णु, महेश व अितर देव, त्रिलोकांतील सर्व तीर्थें, गंगादि नद्या, सारेजण माझ्या डोक्यावरच्या या शिलेवर येअून राहा आणि माझ्याकरितां लोकांचें कल्याण करा. येथें जे लोक स्नान, तर्पण, श्राद्ध करतील त्यांच्या हजार पिढ्यांचा अुद्धार होवो, त्यांचें पाप धुअून जावो, सारीं तीर्थें लोकांचें कल्याण करोत, अधिक काय मागूं? तुमच्यापैकीं अेकाहि देवानें येथून हलूं नये. अेवढें तरी वचन पाळा. समयः प्रतिपाल्यताम्।'

देव 'तथास्तु' म्हणाले. दैत्य हर्षित झाला आणि सदाचा निश्चल बनला.

* * *

हें महत् कृत्य केल्यानंतर ब्रह्मदेवांनीं देवांच्या देखत ती सर्व भूमि आणि पांच गांवें ब्राह्मणांना दिलीं. त्यांना सर्व साहित्यसामग्री असलेलीं घरें बांधून दिलीं आणि सांगितलें, 'आतां तुम्हीं कोणाजवळ कांहीं मागूं नये.' गदाधराला नमस्कार करून ब्रह्मदेव ब्रह्मलोकाला निघून गेले.

७५४२१ ४८९ १८१३।८१

पण ब्राह्मणांच्यानें राहवलें नाहीं. त्यांनीं धन घेऊन यज्ञ करायला सुरवात केली. यज्ञाचा धूर स्वर्गापर्यंत पोंचला. तेव्हां ब्रह्मांनीं येऊन त्यांना दिलेलें सर्व काढून घेतलें.

'तुम्ही सदासर्वदा लोभीच राहायचे !' असें म्हणून ब्रह्मदेवांनीं त्यांना शाप दिला. ब्राह्मण रडायला लागले, 'आमच्या निर्वाहाची कांहीं तरी सोय करा.'

ब्रह्मयांना दया येऊन ते म्हणाले, 'आतां भीक मागाल, तरच तुम्हांला कांहीं मिळेल. आतां तीर्थांचें अुपाध्येपणच तुमच्या नशिबीं सदा राहील. तुमच्या पूजेच्या द्वारानेंच लोक माझी पूजा करतील.' ह्या असल्या ब्राह्मणांचे वंशज ते हे गयावळ पंड्ये !

* * *

आणि आणीबाणीच्या प्रसंगीं ब्रह्मदेवांना ज्या धर्मशिलेचें स्मरण झालें, तिचें माहात्म्य काय, तेंहि अैकावें—

अेका पवित्र साधूला धर्मव्रता नांवाची अेक कन्या होती. ती सर्वलक्षणसंपन्न होती. गुणांत लक्ष्मीहूनहि वरचढ अशी ती होती. ब्रह्मदेवांचा परम तपस्वी पुत्र मरीचि ऋषि यांच्याबरोबर तिचा विवाह झाला होता. म्हातारपणीं अेक दिवस मरीचि ऋषि जंगलांत फळें–फुलें आणण्यासाठीं गेले होते, तेथून थकूनभागून ते घरीं आले. धर्मव्रता थकलेल्या पतीच्या पायाला तूप चोळूं लागली. जसजसा थकवा उतरूं लागला, तशी ऋषीला झोंप येअूं लागली. अितक्यांत तेथें ब्रह्मदेव आले. सासऱ्याला पाहून सती अुठली; कारण कीं ते गुरूचे गुरु होते. त्यांना पाय धुण्यास पाणी देअून सुनेनें सासऱ्याची पूजा केली आणि अेक चांगली बैठक घालून दिली. अितक्यांत मरीचि जागे झाले. स्त्री जवळ नाहीं हें पाहातांच संतापून त्यांनीं शाप दिला कीं, 'पाय चेपण्याचें काम माझ्या आज्ञेवांचून सोडून तूं गेलीस, तेव्हां शिळा होअून पड !' सतीला स्वाभाविकच वाअीट वाटलें. ती म्हणाली, 'घरांत वडील आले तर त्यांची सेवापूजा करण्याचें कर्तव्य तुमचें होतें. तुमची धर्मपत्नी म्हणून मीं तें केलें, यांत माझा काय दोष ?' मरीचि मुनींना आपली चूक समजली. दोघे मिळून हरीला शरण गेले आणि म्हणूं लागले, 'आमचें रक्षण करा.' अितक्यांत ब्रह्मदेवहि झोंपेंतून

जागे झाले. सर्वांनीं सतीच्या तपाची मुक्तकंठानें प्रशंसा केली; पण म्हणाले कीं, 'तुझ्या पतीचा शाप रद्द करण्याची आमच्यापैकीं कोणांताहि शक्ति नाहीं; धर्माचें रक्षण होईल असा दुसरा कोणताहि वर मागून घे.' सतीनें मागितलें, 'पतीचा शाप दूर करण्याची शक्ति तुमच्यांत नसेल तर अेवढें द्या कीं, नदी, नद, सरोवरें, तीर्थें, देव ऋषी, मुनी, प्रधानदेव; यज्ञक्षेत्रें माझ्यामध्यें येअून राहावीं. साऱ्या ब्रह्मांडाची मी पावनी शिला व्हावें. मला पाहून सर्व लोक पातका—अुपपातकांतून मुक्त व्हावे. शिलेवर जे लोक श्राद्ध करतील त्यांना आणि त्यांच्या कुळीला विष्णुलोक मिळावा आणि जोंपर्यंत हें ब्रह्मांड आहे, तोंपर्यंत ही शिळा राहावी.' देवांनीं तसा वर दिला; पण पुढें पस्तावले. सर्व लोक त्या शिळेला स्पर्श करकरून वैकुंठाला जाअू लागले. यमराज घाबरले. त्यांनीं आपला अधिकार आणि यमदण्ड ब्रह्मदेवांना परत केला आणि सांगितलें कीं, 'आतां माझें काम अुरलेंच नाहीं.' ब्रह्मयांनीं यमराजाला सांगितलें, 'ती शिळा अुचलून तुझ्या घरांत नेअून ठेव म्हणजे झालें.' तेव्हांपासून यमराज पुनः लोकशासन करूं लागले आणि लोकांत धर्मशिलेची फक्त कीर्तीच राहिली.

गयासुराच्या शरीरावर यज्ञ केल्यानंतरसुद्धां जेव्हां गयासुर हलूं लागला, तेव्हां ब्रह्मदेवांनीं यमराजाकडून हीच शिला मागून घेतली. त्या शिलेवर सर्व तीर्थें राहात असल्यामुळें ती अत्यंत जड आणि अत्यंत पवित्र झाली होती.

* * *

गयासुराच्या शरीरावर जी गदा घेअून श्रीविष्णु अुभे राहिले होते, त्या गदेसंबंधींसुद्धां कथा आहे. वज्रापेक्षांहि दृढ आणि मजबूत अशा गद नांवाच्या असुराजवळून ब्रह्मदेवांनीं त्याचीं हाडें मागून घेअून विश्वकर्म्याकडून त्या हाडांची अेक वज्रगदा तयार करवून घेतली होती व हेति नांवाच्या महाबलाढ्य राक्षसाला मारण्यासाठीं श्रीहरीला त्यांनीं ती दिली होती; कारण देवांच्या शस्त्रास्त्रांनीं तुझा वध होणार नाहीं, असा वर ब्रह्मदेवांनीं स्वतःच त्याला दिला होता.

* * *

अशा अनेक पुण्य ( ! ) प्रसंगांनीं प्रसिद्ध झालेल्या भूमीवर—

**लोकानां रक्षणार्थाय जगतां मुक्तिहेतवे ।**

श्रीआदिगदाधर लक्ष्मीसहवर्तमान उभे राहिले आहेत. तेथें जे यात्रेसाठीं जातात, त्यांच्या मनकामना तृप्त होतात. मात्र शास्त्रांत लिहिलें आहे कीं, तेथें जाणाऱ्यानें ब्रह्मचारी आणि संयमी राहिलें पाहिजे; शुद्ध आणि संतुष्ट राहिलें पाहिजे. दान घेतां कामा नये; अहंकारापासून निवृत्त राहिलें पाहिजे; जितेंद्रिय आणि दानशील झालें पाहिजे; तरच त्याला तीर्थफल मिळेल.

**कामं क्रोधं तथा लोभं त्यक्त्वा यः सत्यवाक् शुचिः ।**
**सर्वभूतहिते रक्तः स तीर्थफलमश्नुते ॥**
**तीर्थान्यनुसरन्धीरः पाखण्डं पूर्वतस्त्यजेत् ।**
**' पाखण्डं तच्च विज्ञेयं यद्भवेत्कर्म कामतः ' ॥**

धर्मव्रतेला शाप देणाऱ्या मरीचीला ' तूं दुःखी हो ' असा महादेवांनीं शाप दिला; पण त्याला पश्चात्ताप झालेला पाहून ' तुझी गयेंत मुक्ति होईल ' असा नंतर उःशाप दिला. मरीचीनें शिलेवर बसून दुष्कर तप केलें. असें तप करायचें किती तरी पश्चात्तापदग्ध पतींच्या नशिबीं येत असेल ! महादेवाच्या शापानें काळा पडलेला मरीचि तपाच्या योगानें शुक्ल झाला आणि हरीच्या वरानें स्वर्गलोकाला गेला.

इति श्रीवायुपुराणे श्वेतवाराहकल्पे गयामाहात्म्यं सम्पूर्णम् ।

जो मनुष्य हें पवित्र गयाख्यान विचार आणि मननपूर्वक वाचील अथवा ऐकेल त्याला अवश्य सद्गति मिळेल.

---

# बोधिगया : : ५

बोधिगया हें असें तसें तीर्थ नाहीं. बोधिगयेचें नांव ऐकतांच मस्तक भक्तीनें नमतें. जुन्या काळीं या स्थानाला ' उरुवेला ' असें म्हणत असत. अडीच हजार वर्षांपूर्वी नेरंजरा नदीच्या कांठीं ह्या अरण्यांत एका पिंपळाच्या

झाडाखालीं अेक तरुण बसला होता. त्याचें शरीर वाळून गेलें होतें. डोळे कोनाड्यासारखे खोल गेले होते. तरी त्यांतून दया, तप आणि तेज यांचें अमृत स्रवत होतें. छातीचीं अेकूण अेक हाडें मोजतां येत होतीं. दाढी, मिशा आणि केस वाढलेले होते. लांब लांब वाढलेलीं नखें पुष्कळ दिवसांच्या अुपवासामुळें पांढरीं फटफटीत झालीं होतीं. बाहेरून हा तरुण अगदीं शांत दिसत होता, तरी त्याच्या अंतरांत महायुद्ध चाललें होतें. भारतीय युद्ध निदान दिवस मावळतांच बंद होत असे; याचें युद्ध अहोरात्र चालत होतें. भारतीय युद्ध अठरा दिवसांत संपलें; याच्या युद्धाला रंगच अठरा दिवसांनंतर चढला. हें युद्ध कोणा माणसाबरोबर नव्हतें. तर माणसाचा सनातन शत्रू जो मार (सैतान) त्याच्याबरोबर होतें. या युद्धांत मनुष्य-जातीच्या हिताखातर लढणारा हा अेकाकी वीर दृढनिश्चय करून बसला होता. 'मनुष्यजातीचं दुःख आतां माझ्यानं पहावत नाहीं, मनुष्य काय अनंत काळ असाच दुःख सहन करण्यासाठीं जन्मला आहे? या दुःखाचं औषध कुठं ना कुठं तरी असलंच पाहिजे. जर तें असेल, तर त्याच्या शोधांत हें जीवित खर्च करणं यापेक्षां जीविताचं सार्थक दुसरं काय असणार आहे? आणि तसं औषध मिळण्याजोगं नसेल, तर मग जगण्यांत तरी काय अर्थ?'

त्या ठिकाणीं तो तरुण बसला नव्हता, भारतवर्षाची सनातन श्रद्धा बसली होती. तरुणांचा कुलगुरु, आस्तिकतेचा सागर, निर्भयतेची मूर्ति, अशा भगवान् नचिकेताचा तो अवतार होता. अक्षय्यस्थान मागणाऱ्या राजपुत्र ध्रुवाच्या परंपरेंतला तो होता, कारण त्याची निष्ठासुद्धां तितकीच ध्रुव होती. तरुणानें निर्धार केला होता कीं, याच आसनावर शरीर सुकून गेलें तरी बेहेत्तर, हाड, मांस आणि कातडें हवेंत मिसळून गेलें तरी हरकत नाहीं; पण जोंपर्यंत या भवरोगाचें दुःख नाहींसें करणारें बहुकल्प-दुर्लभ बोधि (ज्ञान) मिळणार नाहीं, तोंपर्यंत ही काया येथून हलणार नाहीं.

सत्यसंकल्प निष्फल झाला आहे, असें आजवर घडलेलें नाहीं. तरुणाचें समाधान झालें. सिद्धार्थ हें त्याचें नांव सार्थ झालें. राजपुत्र गौतम आतां गौतम अुरला नाहीं. तो तथागत बुद्ध झाला. त्याच क्षणीं कोणी अेक

श्रद्धाघन साध्वी थाळींत पायस ( खीर ) घेऊन आली आणि तिनें तें वरान्न या वनदेवाला अर्पण केलें.

हें स्थान म्हणजे बोधिगया. ज्या पुरातन अश्वत्थ वृक्षाखालीं बुद्ध भगवानानें ही शेवटची साधना केली, त्याच्यासमोर आज अेक भव्य मंदिर अुभें आहे. जवळच चंक्रमणाचें* स्थान आहे, आसपास प्राचीन ऋषीं-समान मोठमोठे वृक्ष आहेत. या वृक्षांनीं कित्येक ऋतू सहन केले असतील, कित्येक प्राण्यांना आश्रय दिला असेल, व कित्येक साधकांच्या श्रद्धाभक्तीचे ते साक्षी झाले असतील !

आम्ही पहिल्यानें अेका झाडाखालीं बसलों. आडाचें पाणी काढून हातपाय धुतले, पाणी प्यालों आणि प्रसन्न अंतःकरणानें मंदिरांत दर्शन घ्यायला गेलों. मंदिराच्या आंत बुद्ध भगवानाची मूर्ति होती. तिला साष्टांग दंडवत घालून आम्ही मंदिरावर चढून शिखराच्या आसपास फिरलों कारागिरी भव्य आहे; पण तिच्यांत मार्दव किंवा नावीन्य नाहीं. खालीं अुतरून मंदिराला प्रदक्षिणा घातली. जसजसा मी प्रदक्षिणा घालीत होतों, तसतसा माझा भाव बदलत होता. सगळें जीवन डोळ्यांपुढें अुभें राहिलें आणि लगेच दृष्टि शून्य झाली. पाण्यांत पोहतांना मनुष्य बुडी मारून अधिक खालीं जातो, त्या वेळीं जसा तो निर्भय असूनसुद्धां भयभीत झाल्यासारखा होतो, तशी या क्षणीं माझी अवस्था झाली. जीवनाच्या पृष्ठभागावर मी पुष्कळ फिरलों होतों—पोहलों होतों; पण या क्षणीं मी खोलांत शिरलों. अशी स्थिति मागें एकदां ध्यान करीत असतां झाली होती; पण ती या वेळच्या प्रमाणांत स्पर्शमात्र होती. माझ्या प्रदक्षिणा पुऱ्या झाल्या, आणि मी पाठीमागच्या अश्वत्थाला नमस्कार करण्यासाठीं गेलों. घराचा त्याग करून मी हिमालयाकडे निघालों होतों, भविष्यकाळ अज्ञात होता, माझ्या होडीचे सारे दोर मीं कापून टाकले होते, सारीं शिडें चढविलीं होतीं. होडी पुनः परतून मूळ बंदराला येअील अशी धारणा त्या वेळीं नव्हती. त्या वेळच्या मनोवृत्तीचें वर्णन कसें करणार ? मी बाहेरून शांत होतों; पण आंतून ज्वालामुखी धुमसत असल्यासारखी स्थिति होती. मी त्याग करतों आहें याचें मला भान होतें. हें भान आध्यात्मिक उन्नतीला

---

* चंक्रमण—धर्मचिंतन करतां करतां फेऱ्या घालणें.

बाधक आहे हें मला माहीत होतें. तरी तें नाहींसें करण्याजोगें नव्हतें. अितक्यांत आंतून एक आवाज आला, ‘ त्याग करणें सोपें आहे; पण केलेल्या त्यागाला लायक बनणें यांतच पुरुषार्थ आहे ! ’ अहंकाराला अेवढा सपाटा पुरेसा होता. अुठलों आणि जवळच्या तलावाच्या कांठीं जाअून बसलों.

तलावांत असंख्य कमळें फुललीं होतीं; पण त्यांकडे माझें चित्त—नेहमींचें कलारसिक चित्त—आकर्षलें गेलें नाहीं. तेथून अुठून जवळ एक गढी होती ती बघण्यासाठीं गेलों. तिच्यांत पुष्कळ साधू राहात होते. ती कोणा महंताच्या आखाड्यासारखी वाटली, पण पूसतपास करावीशी वाटली नाहीं. मीं पुष्कळ यात्रा केली, हिमालयांत राहून साधना करून समाधान मिळविलें, पण बोधिगयेचा त्या दिवसाचा अनुभव कांहीं औरच होता.

---

## बेलूर मठ : : ६

बोधिगयेहून आम्ही बंगालकडे निघालों. बंगालमध्यें मी अगदीं प्रथमच जात होतों. आगगाडींत रात्र घालवून सकाळीं अुठलों तोंच ‘ सुजला सुफला मलयजशीतला ’ अशा वंग-भूमीचें दर्शन झालें. बंगाल म्हणजे लहान-मोठ्या तलावांचा प्रदेश. तिकडचे लोक त्यांना ‘ पुकुर ’ म्हणतात. पुकुर म्हणजे पुष्कर. माझा बंगालशीं प्रथमपरिचय फारसा आनंददायक ठरला नाहीं. रात्रीं झोंपतां झोंपतां विचार येत होते कीं, रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानन्द यांची वंगभूमि पाहायला मिळणार; बिपिन पाल आणि अरविंद घोष यांच्या पुण्यभूमीचें दर्शन होणार; खुदीराम बोस आणि कन्हैय्यालाल दत्त यांचा ‘ बांगला ’ मी सकाळीं अुठून बघेन; ‘ आनंदमठ ’ आणि ‘ अमृतपुलिन ’ मध्यें वर्णिलेली भूमि प्रत्यक्ष दिसेल.

असे मधुर विचार करीत करीत मी झोंपलों. वैशाख महिना होता, म्हणून बुवांनीं आपले कपडे अुतरून डब्यांत वर टांगून ठेवले आणि तेहि निजले. सकाळीं अुठून पाहातां तों कपडे मिळेनात. बंगालच्या दारिद्र्याची दया आली. माझ्या मनांत आलें कीं, कपडे पळवून नेणारा अिसम जर रात्रीं नजरेस पडला असतां, तर माझेहि कपडे त्याला काढून दिले असते. मीं कलकत्त्याला जाअून अंगावरचे कपडे अुतरले आणि हरिद्वाराला जाअून तेथल्या रामकृष्ण सेवाश्रमांत माझे सर्व कपडे देअून टाकले, पण त्याचें कारण वेगळें होतें.

ट्रेन लेलुआ स्टेशनवर थांबली. आम्ही अुतरलों. लेलुआ स्टेशनपासून अेकच स्टेशन पुढें हौरा—कलकत्ता—आहे. लेलुआ ही रेल्वे-अंमलदारांची वसाहत आहे. तेथें जाअून 'विवेकानन्दांचा बेलूर मठ कोठें आहे?' असें आम्हीं विचारलें. पण कोणाला बेलूर मठ माहीत नव्हता! चारी खंडांत ख्याति पावलेल्या विवेकानन्दांना मठ कोठें आहे हें लेलुआ स्टेशन-वर कोणालाहि ठाअूक नसावें! किती दुःखाची गोष्ट! रखडत रखडत आम्ही बेलूर गांवांत जाअून पोंचलों. तेथें एक वृद्ध सद्गृहस्थ भेटला; तो सज्जनतापूर्वक म्हणाला, 'चला, मी तुम्हांला बेलूर मठापर्यंत पोंचवितों.' सकाळपासून मिळत आलेल्या अुत्तरांवरून अितक्या सज्जनतेची मीं अपेक्षा ठेवली नव्हती. त्या अिसमाच्या मागोमाग आम्ही चाललों. पण अरे देवा! म्हाताऱ्याचा वेग मुंगीच्या वेगाहून वाढेच ना! वेळ गमाविण्याच्या दुःखा-पेक्षां आमच्यासाठीं या वृद्ध गृहस्थाला अितके कष्ट पडत आहेत याचेंच मला अधिक दुःख झालें. मीं त्याला म्हटलें, 'महाशय, आम्ही आमचा रस्ता आतां शोधून काढूं. आपल्याला कष्ट देण्याची माझी अिच्छा नाहीं.' तो म्हणाला, 'छे छे, मलाहि मठांतच जायचं आहे.' झालें! आतां आम्हांलाहि मुंगीच्या पावलासारखें टिकीटिकी चालण्याखेरीज गत्यंतर नव्हतें.

बेलूर मठांत रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानन्द यांच्या समाधी आहेत. मठ गंगानदीच्या अगदीं कांठावर आहे. अेका कडेला दीपस्तंभासारखा लाल दिवाहि आहे. आम्ही मठपति स्वामी प्रेमानन्दांकडे जाअून त्यांना नमस्कार केला. 'या बसा' म्हणून ते परत आपल्या

कामाला लागले. अितक्यांत अेक-दोन ब्रह्मचारी आमच्याजवळ आले. त्यांच्यापैकीं अेकानें मला विचारलें, ‘ तुम्ही परत केव्हां जाणार ? येथें किती दिवस राहाणार आहां ? ’ मी कबूल करतों, अशा प्रकारच्या स्वागताची मला कल्पनाहि नव्हती. मला वाटलें कीं आम्ही येथें अेक अनिष्ट पाहुणे आहों ! मीं सांगितलें, ‘ भाअी, आम्ही अुद्यांच जाणार आहों. ’ अितकें अभयदान दिल्यानंतर मला वाटलें कीं, आतां बोलायला चालायला हरकत नाहीं. अेकाला मीं विचारलें, ‘ स्वामी विवेकानन्दांची समाधि कोठें आहे ? ’ त्यानें सांगितलें, ‘ ती अजून बांधताहेत. स्वामीजी महाराजांचा संगमरवरी पुतळा तयार आहे. तो समाधीच्या खोलींत आहे. तो तुम्हांला दाखवितों. ”

काशी आणि गयेची तिर्स्थळी यात्रा करून मी आलों होतों; पण ज्यांच्या धर्मग्रंथामुळें माझ्यामध्यें धर्मश्रद्‌धा फिरून स्थापित झाली; त्या स्वामी विवेकानन्दांच्या समाधीचें दर्शन ही माझ्या दृष्टीनें महायात्रा होती. पावलापावलागणिक माझ्या हृदयांत श्रद्‌धा आणि भक्ति अुसळूं लागली. बस्, चाळीस-पन्नास पावलें चाललों कीं माझे अितक्या वर्षांचे मनोरथ पूर्ण होतील—यात्रा सफळ होअील, संशयवादाच्या सुषुप्तींत पडलेल्या भारत-वर्षाला अमेरिकेच्या सर्वधर्मपरिषदेच्या व्यासपीठावरून जागें करणाऱ्या स्वामी विवेकानन्दांचें-संगमरवरी रूपांत का असेना-दर्शन होणार, हें माझ्या तळमळ-णाऱ्या हृदयाला कमी नव्हतें. समाधीच्या खोलींत आम्ही गेलों. मी अत्यंत भक्तिभावानें साष्टांग दंडवत घातला आणि क्षणभर बेभान झालों.

परत येअून नदीच्या पात्रांत स्नान केलें. घाटाजवळ मोठमोठ्या रांजणांची अेक रांग होती. तिकडे लक्ष जातांच मीं त्यासंबंधीं तिथल्या अेका ब्रह्मचाऱ्याकडे पृच्छा केली. तो म्हणाला, ‘ गंगा येथें समुद्रापासून फार दूर नसल्यामुळें समुद्राची भरती येथपर्यंत येते, त्या वेळीं नदीचें पाणी खारें होतें. आणि समुद्रांत जेव्हां ओहोटी असते, तेव्हां पाणी गोडें होतें, अेवढ्यासाठीं ओहोटी असेल तेव्हां पिण्याचें पाणी आम्ही या कोठींत भरून ठेवतों. ’

स्नान-धुणें करून आम्हीं मंदिरांत प्रवेश केला. तेथें वरच्या मजल्यावर रामकृष्ण परमहंसांच्या अस्थी एका तांब्याच्या डब्यांत ठेवण्यांत आल्या

आहेत, आणि त्या डब्यावर रामकृष्ण परमहंसांचा अेक लहानसा फोटो ठेवण्यांत आला आहे, त्याचीच पूजा होते. मागच्या बाजूला अेक ध्यानाची खोली आहे. ही व्यवस्था मला फार आवडली. ध्यानाच्या खोलींत नेहमीं शांति असते. वाटेल तितकीं माणसें ध्यान करीत असलीं, तरी अेकाचा दुसऱ्याला अडथळा व्हायचा नाहीं. आवाज न करतां माणसानें आंत येअून बसावें आणि आवाज न करतां बाहेर जावें.

सामान्यतः सभांमधूनसुद्धां आपल्या येण्याजाण्यामुळें दुसऱ्यांना त्रास होअूं नये, याकडे बंगाली लोकांचें विशेष लक्ष असतें. पुष्कळ लोक बसले असतील आणि मधूनच अुठून जावें लागलें, तर खालीं वांकून, आपणाला कोणत्या दिशेला जायचें आहे तें सुचविण्यासाठीं अेक हात पुढें करून प्रत्येकाची माफी मागत असल्यासारखी मुद्रा धारण करून, ते गर्दींतून बाहेर पडतात.

ध्यानमंदिरांत बसून आम्हीं ध्यान केलें. परमहंसांच्या समाधीपुढें बसून गीता आणि अुपनिषदाचा पाठ म्हटला. माझा हा स्वाध्याय आणि शुद्ध संस्कृत अुच्चार यांमुळें तेथील ब्रह्मचारी मंडळींत माझी प्रतिष्ठा जरा वाढलेली मला दिसली.

मंदिरांतून परत मठाकडे आम्ही गेलों. तेथें वरच्या मजल्यावर स्वामीजी महाराजांची खोली होती. या खोलींत स्वामी विवेकानंद राहात होते त्या वेळीं खोलीची जशी स्थिति होती, तशीच्या तशीच कायम राखण्यांत आली आहे. स्वामी महाराजांची निजण्याची गादी, त्यांचा फेटा, अलखल्ला (अंगरख्या-सारखी कफनी), तशीच कानटोपी आणि त्यांचा मोठा कमंडलु, हुक्का-सगळ्या वस्तू तेथें व्यवस्थित ठेवलेल्या आहेत. माझ्यासारख्या प्रेक्षकाला खोलीच्या आंत जाण्याची परवानगी कुठली असणार? दारांतच आडवा अडसर होता. तेथून मीं वांकून पाहिलें आणि परत फिरलों. अज्ञात भिकाऱ्याप्रमाणें देशभर फिरून हिंदुधर्माच्या आणि समाजाच्या आधुनिक स्थितीचें ते ज्या वेळीं लक्षपूर्वक निरीक्षण करीत होते, त्या वेळीं जो मोठा कमंडलु ते बरोबर वागवीत, त्याच्याचकडे माझें लक्ष वेधलें. या कमंडलूच्या पोटांत किती बहुमोल अनुभव सांठविले असतील याचा मी विचार करूं लागलों.

दुपारीं जेवायची वेळ झाली. बंगाली लोक मासे खातात हें मला माहीत होतें, म्हणून मीं मठपतीकडे मुद्दाम जाऊन सांगितलें कीं, ‘ मी शाकाहारी आहें. ’ त्यांनीं सांगितलें कीं, ‘ तुम्हांला भ्यायचें कारण नाहीं. तुम्हांला येथें शाकाहारच मिळेल. ’ आम्ही जेवायला बसलों. बंगाली जेवण घेण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. बंगाली लोकांचा मुख्य आहार भात आणि भाजी हाच आहे. भाजी अितकी आणि अितक्या प्रकारची असते कीं, भातासाठीं भाजी, कीं भाजीसाठीं भात अशी शंका स्वाभाविकच माझ्या मनांत आली. अेक वर्षापूर्वी मीं मसाल्याचा आणि तिखटाचा त्याग केला होता, आणि अिथें तर भाजींत तिखटाचा उपयोग अुदारतेनें करण्यांत आला होता. प्रत्येक घासागणिक मला पाणी प्यावें लागत होतें. अितक्यांत माझ्या पानांत—केळीच्या पानावर-तुपासारखें कांहीं थिजलेलें होतें, त्याकडे माझी नजर गेली. मला वाटलें बरें झालें, आतां तिखटावर औषध मिळालें; पण दुर्दैवानें तें निखाऱ्यावर भाजलेल्या वटाड्याचें रायतें होतें. आणि त्यांतहि हिरव्या मिरच्या होत्या.

## प्रायो गच्छति यत्र भाग्यरहितस्तत्रैव यान्त्यापदः ।

जेवल्यावर बगीचांत हात धुवायला गेलों. मीं विचार केला कीं, हात धुवायचें पाणी वाटेल तेथें ओतण्यापेक्षां फुलझाडांना मिळालें तर बरें. मी हात धुअूं लागलों; अितक्यांत दोन-तीन ब्रह्मचाऱ्यांनीं हाहा:कार माजविला. त्यांना अिंग्रजींत माझी बरोबर समजूत करतां येअीना आणि त्यांचें बंगाली मला समजेना. शेवटीं मला कळलें कीं, या झाडांचीं फुलें ठाकुरजीला वाहिलीं जातात; त्यांना अुष्टें पाणी पाजायचें नसतें.

मी अज्ञ माणूस आणि माझा हा पहिलाच अपराध म्हणून मला क्षमा करावी असा ठराव अेका गृहस्थांनीं आणला आणि कित्येकांनीं अुदारतेनें, तर अितरांनीं शिक्षा काय करावी हें न समजल्यामुळें तो पास केला, हें मीं पाहिलें.

दाक्षिणी शुचिर्भूतपणाचा माझा अभिमान गळाला. खरेंच, पूजेच्या झाडांना अुष्टें पाणी कां बरें घालावें ? कर्णाटकांत लिंगायत लोक आपल्या

जातीच्या लोकांच्या हातचेंच पाणी पितात; अितकेंच नव्हे, तर ज्या गाअीचें दूध कट्टर लिंगायत पीत असेल, त्या गाअीचा चारा आणि पाणी लिंगायतानेंच आणलेलें असावें लागतें. शास्त्रांत लिहिलेंच आहे, ' आहारशुद्धि सत्त्वशुद्धिः ! '

दुपारीं ब्रह्मचारी मंडळींना फुरसत होती म्हणून त्यांच्याबरोबर गप्पा मारण्यांत वेळ काढला. त्यांच्यांत अेकजण मुसलमान होता तोसुद्धां कालीचा उपासक बनला होता, आणि परमहंसाच्या अुपदेशाचा अनुवाद करण्यांत तो काळ घालवीत होता. त्यानें मला विचारलें, ' गुरुमहाराजांचा अुपदेश तुम्हीं वाचला आहे का ? ' मीं म्हटलें, ' होय. ' माझी परीक्षा घेण्यासाठीं त्यानें मला प्रश्न केला, ' सांगा तर मग, कालीचा वर्ण श्याम कां आहे ? ' मीं म्हटलें, ' श्याम वर्ण आकाशाचा आहे, आकाश अनंत आहे. कालीहि अनंत आहे, म्हणून काली श्याम आहे. ' तो म्हणाला, ' बरोबर. ' मी पास झालों आणि त्यांच्या वादविवादांत मिसळायला लायक झालों. त्याला अुलट प्रश्न करण्याची मलाहि हुक्की आली. मीं म्हटलें, " स्वामी विवेकानन्दांच्या Kali the Mother ( कालीमाता ) या कवितेचें रहस्य मला समजावून देतां ? " तो म्हणाला, ' चला जाअूं स्वामी प्रज्ञानंदांकडे. ते देतील समजावून. ' माझा बेत फिसकटला. फार वेळपर्यंत विनोद करण्याची माझी वृत्ति नव्हती. पण स्वामी प्रज्ञानंदांकडे गेल्यावर मला गंभीर चेहरा करून जिज्ञासू व्हावेंच लागलें. त्यांनीं मला विचारलें, " या कवितेंतील रहस्य तुम्हांला स्वतःला काय वाटतें ? " मीं थोडक्यांत सांगितलें. ते म्हणाले, ' बरोबर. ' आणि मी सुटलों.

हे स्वामी प्रज्ञानन्द ओळख करून घेण्यासारखे गृहस्थ होते. त्यांचें मूळ नांव देवव्रत बोस. ते अेक प्रसिद्ध ब्राह्मसमाजी होते. मित्रमंडळींत त्यांची बरीच ख्याति होती. अलीपूर–बॉम्ब केसमध्यें ते सांपडले होते, पण शेवटीं सुटले. त्यांचा खटला बरेच दिवस चालला होता. तितके दिवस त्यांना तुरुंगांत काढावे लागले होते. पुष्कळ लोकांना तुरुंगांत प्रथम अेकान्त मिळतो, आणि मग तेथें ते आत्मपरीक्षण करून आपल्या जीवनाचा सारा प्रवाहच बदलून टाकतात. देवव्रत बोसांचें असेंच झालें. ब्राह्मो न राहतां

तें वेदान्ती बनले आणि संन्यास घेऊन प्रज्ञानन्द झाले. बेलूर मठांत आल्या-नंतर त्यांनीं 'उद्बोधन' नांवाच्या बंगाली मासिकांत 'भारताची साधना' म्हणून अेक सुंदर लेखमाला लिहिली होती. त्या लेखांत त्यांनीं हिंदुस्थानच्या वांट्याला अीश्वरानें कोणतें काम ठेवलें आहे याची सुरेख चर्चा केली होती. थोड्या दिवसांनीं हे स्वामी हिमालयांतील मायावती मठांत मठपति होअून राहिले होते, आणि 'प्रबुद्ध भारत' मासिक चालवीत होते. कांहीं वर्षें हें काम केल्यानंतर ते समाधिस्थ झाले.

मला Gospel of Sri Ramakrishna ('रामकृष्ण–कथामृत') लिहिणाऱ्या श्री. 'M' ना भेटावयाचें होतें आणि जुळल्यास रामकृष्ण परमहंसांच्या धर्मपत्नी व शिष्या श्रीशारदामाताजींचेंहि दर्शन घ्यायचें होतें. 'M' ना येथें सर्वजण मास्टर महाशय म्हणत. मीं मठपति स्वामी प्रेमानन्दांची परवानगी घेतली. त्यांनीं माझ्याबरोबर अेक ब्रह्मचारी दिला. अेका लहानशा होडींत बसून आम्ही पलीकडच्या तीरावर गेलों आणि तेथून लहानग्या स्टीमलॉंचमध्यें बसून कलकत्त्याला गेलों. वाटेंत या ब्रह्मचारी बंधूबरोबर खूप गप्पागोष्टी झाल्या. तो बराच मिसळणारा होता. बंगालमधील अनेक तरुणांप्रमाणें प्रथम तो क्रांतिकारक पक्षांत होता. मागाहून धार्मिक वृत्ति वाढल्यावर त्याची राजकारणांतील गोडी कमी झाली आणि तो रामकृष्ण मिशनमध्यें दाखल झाला. मीं त्यांना विचारलें, 'तुझा आदर्श काय आहे?' तो म्हणाला, 'आत्मनो हिताय' आणि 'जगतः सुखाय' आयुष्य घालवावयाचें अशी आम्हांला दीक्षा मिळाली आहे. स्वामी महाराजांनीं मठांतील ब्रह्मचाऱ्यांना सांगून ठेविलें आहे कीं, तुमचें जीवन सोल्जर लोकांप्रमाणें कठीण असलें पाहिजे. तत्त्वज्ञानांतील अत्यंत कूट प्रश्नांची सुद्धां चर्चा करतां येईल अितकी तुमची बुद्धि तीव्र आणि तेजस्वी असली पाहिजे, आणि शेतांत काम करून भाजीपाला डोक्यावर घेअून बाजारांत विकून याल अितका साधेपणा, मेहनत आणि व्यवहारकुशलता तुमच्यांत असली पाहिजे. या ब्रह्मचाऱ्यानें अेकाच दिवसांत मला खूप माया लावली. बंगाली लोक भावनाप्रधान असतात याची जाणीव या ब्रह्मचाऱ्यानें मला करून दिली. मी त्याला विसरणार नाहीं.

आम्ही मास्टर महाशय—महेन्द्रनाथ गुप्त—यांच्या घरीं जाऊन पोंचलों. ते पूजेला बसले असल्यामुळें थोडा वेळ वाट पाहावी लागली. मी वाट पाहात बसलों होतों, अितक्यांत त्यांची भव्य मूर्ति बाहेर आली. त्यांनीं श्वेत वस्त्रें परिधान केलीं होतीं. लांब दाढी छातीवर शोभत होती गंभीरता व नम्रता ही त्यांच्या मुखाकृतीची विशेषता होती. ते जमिनीवरच बसले. माझे मित्र गुणाजी यांनीं ‘ Gospel of Sri Ramakrishna’चें भाषांतर मराठींत केलें होतें. त्यांत माझाहि हात होता, तेव्हां त्याचविषयीं गोष्टी सुरू झाल्या. माझा परिचय झाल्यावर समाधान प्रदर्शित करून ते म्हणाले, ‘ Gospel चें भाषांतर करणारे शुष्क पंडित नाहींत, साधूहि आहेत म्हणायचे ! ’

मास्टर महाशयांबरोबर अधिक बोलणें झालें नाहीं. ‘ अुद्बोधन ’ कार्यालयांत आम्ही श्री श्रीमांचें दर्शन घ्यायला गेलों. श्री श्रीमा म्हणजे श्री शारदामाता. कार्यालयांत दारासमोर अेक खोली होती, तेथें स्वामी शारदानन्द बसले होते. स्वामी शारदानन्द सगळ्या रामकृष्ण मिशनचे व्यवस्थापक आहेत. साऱ्या दुनियेंत जेथें जेथें म्हणून रामकृष्ण मिशनच्या संस्था चालत आहेत, त्या सर्वांवर त्यांची देखरेख असते; त्यामुळें त्यांच्यावर कार्यभार फार आहे. ते आपल्या आसनावर पाय लांब करून बसतात आणि सारा दिवसभर काम करीत असतात. त्यांचें अंग अुघडें होतें आणि पोट फारच मोठें होतें. अेकाच ठिकाणीं सारखें बसून काम करीत असल्याचा आणि बंगाली आहाराचा हा परिणाम होता. ‘ साधु चलता भला ’ या म्हणीचें रहस्य मला नव्या अर्थानें दिसलें.

‘ नमो नारायण ’ असें म्हणून मीं त्यांना नमस्कार केला. ‘ नारायण ’ म्हणून त्यांनीं मला आशीर्वाद दिला. हा आपला जुना रिवाज आहे. संन्याशाला याच शब्दांनीं नमस्कार करायचा असतो. नमस्कार करून आम्ही आंत गेलों. थोडा वेळ वाट पाहिल्यावर दर्शनाची परवानगी मिळाली. रामकृष्ण परमहंसांचे अनुयायी शारदामाताजींना दुर्गादेवीचा अवतार मानतात; आणि कसलेंहि महत्त्वाचें कार्य त्यांना विचारल्याखेरीज

करीत नाहींत. शारदामाताजींचें मीं अत्यंत भक्तिभावानें दर्शन घेतलें. पतीलाच गुरु करून त्याची ओीश्वराप्रमाणें आजीव शुद्ध सेवा करणाऱ्या व त्याच्या समाधीनंतर अष्टौप्रहर त्याच्या ( रामकृष्ण परमहंसांच्या ) ध्यान-पूजनांत आयुष्य घालविणाऱ्या या तपस्विनी ब्रह्मचारिणी आदर्श पत्नीचें दर्शन मी माझ्या जीवनांतील अेक अद्वितीय अहोभाग्य समजतों. मीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला. दोघांनाहि समजेल अशा सामान्य भाषेच्या अभावीं कांहीं बोलणें होअू शकेल असें नव्हतेंच. मी भक्ति व आर्जवपूर्वक त्यांच्या चरणांकडे दृष्टिपात केला. त्यांनीं मातृवात्सल्यानें आशीर्वाद दिला आणि आम्ही परतलों.

दुसऱ्या दिवशीं वैशाखी पौर्णिमा होती. मठांत बोधि—अुत्सव होता. आणि गंगा नदीच्या कांठीं असलेल्या खरडह नांवाच्या गांवीं चैतन्यांचा अुत्सव होता. त्याला हजर राहण्यासाठीं मठाला आमंत्रण होतें. स्वामी प्रेमानन्दांनीं त्या आमंत्रणांत आम्हांलाहि सामील करून घेतलें आणि दुसऱ्या दिवशीं आम्हीं तिकडे गेलों.

---

## भक्तीच्या पुण्यक्षेत्रांत : : ७

खरडह हें गांव बंगालच्या धार्मिक अितिहासांत प्रसिद्ध आहे. गौरांग प्रभु श्रीचैतन्यांच्या कृपाप्रसादानें नेडानेडी लोक याच ठिकाणीं शुद्ध झाले होते. हे नेडानेडी लोक मूळ कोण होते, ते अशुद्ध कां मानले गेले, हें कोण सांगू शकणार? कोणी समजतात कीं, ते मुसलमान होते, तर कोणी म्हणतात कीं, मलिक कफुरानें बौद्ध लोकांचा नाश केला, त्यांतून वांचले ते हे लोक. प्रवासी लोक दंतकथा अैकतात, पण त्याविषयीं चर्चा करायला बसत नाहींत. रिकामपणा असेल तर कल्पनातरंग चालवितील. नेडानेडी अथवा नेरानेरी लोकांना शुद्ध करण्यांत आलें, तेव्हां ‘ आपण कोण आहों, ’ हें त्यांना माहीत नव्हतें. आपल्याला कां बहिष्कृत केलें, याचेंहि त्यांना ज्ञान

नव्हतें. त्यांना अितकेंच ठाअूक होतें कीं, समाजाला आपला सहवास प्रिय नाहीं. तिरस्काराचें कारण जर त्यांना समजलें असतें तर वेळीं त्यांनीं तें सुधारण्याचा प्रयत्न केला असता; आणि जे त्यांचा तिरस्कार करीत होते, त्यांना तरी तिरस्काराचें कारण कुठें माहीत होतें ? परंपरा चालत आली आहे म्हणून तिरस्कार केला पाहिजे, न केला तर अधर्म व्हायचा; आपल्या ऋषींमुनींनीं हें सारें करून ठेवलें आहे; ते सर्वज्ञ होते; आपण अल्पज्ञ आहोंत, आणि अल्पज्ञच राहाणार ! कारण शोधूं पाहणें यांत धृष्टता आहे, नास्तिकता आहे; म्हणून जें चालत आलें असेल तेंच पुढें चालविलें पाहिजे, ही वृत्ति समाजाची ! आणि नेरानेरी लोक ? ते बिचारे असेंच समजत होते कीं, अीश्वरानें आम्हांला अस्पृश्य म्हणून जन्माला घातलें; आमचीं पूर्वकर्मेंच खोटीं असतील म्हणून आम्ही या ज्ञातींत जन्माला आलों. वरच्या वर्णांनीं पुण्य केलें म्हणून आमचा तिरस्कार करण्याचा, आम्हांला तुच्छ लेखून शिव्या देण्याचा त्यांना हक्कच आहे.

दोघांनाहि समाधान होतें, कीं आहे या स्थितींत कांहीं अन्याय नाहीं. अितक्यांत चैतन्य महाप्रभूंची भक्ति बंगाल्यांत जागृत झाली. त्यांना या दीनांची ही स्थिति रुचली नाहीं. भक्तीनें नेरानेरी लोकांना सांगितलें, ' परमात्म्याच्या घरीं नशिबाचें राज्य नाहीं; अीश्वराचें नांव घ्या, तुम्ही पवित्र आहांत ' नेरानेरी पावन झाले आणि वैष्णव बनले.

या शुद्धीला विरोध झाल्यावांचून राहिला नसेल; सनातन धर्माचा अभिमान बाळगणाऱ्या ' धर्मसंरक्षकां 'नीं या अधर्माला (?) प्रतिबंध करण्यांत कांहीं कसूर केली नसेल, पण त्यांचें नांवहि आज आपल्याला माहीत नाहीं. सनातन हिंदुधर्मांत आपल्या अन्धभक्तांच्या तावडींतून बचावून जाण्याची शक्ति आहे, म्हणूनच तो आजपर्यंत जिवंत राहिला आहे.

होडींत बसून नदीच्या प्रवाहावरून प्रवास करणें यासारखें काव्य दुसरीकडे क्वचितच लाभत असेल. दुपारीं जेवून निघालेले आम्ही दोन-तीन वाजतां खरडहला पोंचलों असूं. वैशाखी पूर्णिमेचा दिवस, तेव्हां अुकाडा चांगलाच होत होता, पण गंगामाअीच्या शीतल स्रोतावरून वाहणारा वायु

अुन्हाचा त्रास हलका करून टाकीत होता. चुना व विटा यांनीं बांधलेले नदीचे अिकडील घाट पाहण्यासारखे असतात. खेड्यांतल्या बायका पाणी भरायला येतात तेव्हां त्यांना पाहून दया अुत्पन्न होते. त्यांची साडी अतिशय थिटी आणि त्यामुळें तंग असते. साडी नेसून हिंडतां फिरतांना त्यांना भारी अडचण पडत असावी असें वाटतें; पण त्यांच्या चेहऱ्यावर दुःखाची छटाहि दिसत नव्हती; खरडहला मुख्य देवालयाच्या प्रांगणांत अनेक लोक भजन करीत होते. झांज, मंजरी, करताल, मृदंग अित्यादि वाद्यें वाजत होतीं; आणि प्रत्येकजण भक्तिरसांत अितका 'माताल' (मस्त) होअून गेला होता, कीं जणुं प्रत्येकाला अेकेका जबरदस्त भुतानेंच झपाटलें असावें !

महाराष्ट्रामध्यें पंढरपुरांत लोक भजनवेडे झालेले मीं पाहिले आहेत; पण त्यांच्यांत कांहीं तरी सौम्यपणा असतो. येथें भक्तीच्या मस्तींत लोक परस्परांशीं चढाओढ करीत असल्यासारखेच दिसत होते. अनेक वाद्यांच्या स्वरसम्मेलनानें आणि बेहोष झाल्यासारखे हावभाव करण्यानें अेक प्रकारचा भक्तिरस अवश्य अुत्पन्न होतो; पण त्यामुळें स्वाभाविक पुष्टि मिळत असेल असें मला नाहीं वाटत. हा अेक प्रकारचा कैफच म्हटला पाहिजे.

यानंतर बेलूर मठांतील संन्याशांना व ब्रह्मचाऱ्यांना आमंत्रण देणाऱ्या आमच्या यजमानांच्या येथें आम्ही गेलों. त्यांनीं आम्हांला फलाहार करण्याचा आग्रह केला. मी साखर खात नव्हतों. तसेंच अेक वेळच अन्न घेण्याचा माझा नियम होता, म्हणून मीं आपलें लाल कलिंगडें खाणेंच पसंत केलें. खाण्याचा आग्रह करण्यांत कांहीं हयगय नव्हती. आमच्या बरोबरच्या संन्याशांनीं जास्ती घेण्याचें नाकारलें, कीं यजमान म्हणे, 'तुम्हांला आवडलें नाहीं तर पानांत राहूं द्या. तेवढाच आम्हांला जास्ती प्रसाद मिळेल.' शिष्टाचाराला अनुसरून गप्प राहण्याचा विचार सोडून मी बोललों, 'दुसऱ्याचें अुच्छिष्ट खाण्यांत धर्माची हानि आहे असें मी मानतों. अुच्छिष्ट खाण्यांत प्रेमाची अेकता आहे हें मी कबूल करतों; पण न खाण्यांत धार्मिक संयम आहे.' मी टीका करीत होतों, त्याच वेळीं डाव्या हातांत पेला घेअून पाणी पिअूं लागलों. तें पाहून अेक बंगाली तरुण म्हणाला, 'हें काय? डाव्या

हातानें पाणी पितां ?' मीं अुत्तर दिलें, 'अुजवा हात अुष्टा आहे, अुष्ट्या हातानें भांडें कसें बिघडवायचें ?' तो हंसला. त्याच्या हंसण्यांत तिरस्कार होता. त्याला वाटत होतें. या रानटी माणसाला शिष्टाचाराचें भान कोठून असणार ! डाव्या–अुजव्या हातांतील फरक याला कुठून कळणार? डावा हात सकाळीं शरीरशुद्धीसाठीं वापरायचा, त्या हातानें पाणी कसें प्यायचें ? येथें माझ्या मनाला वाटत होतें कीं, कणिक मळायच्या वेळेला या लोकांची डाव्या हाताबद्दलची ही शिसारी कुठें अुडून जात असेल ?

हिंदुस्थानांत स्वच्छता, पवित्रता, लाज, सिद्ध व निषिद्ध, ( निलेपें ) निरसें–खरकटें वगैरे संबंधींच्या कल्पना प्रत्येक ठिकाणीं नक्की ठरून गेलेल्या असतात. पण दोन प्रान्त किंवा दोन जाती यांचा या कल्पनांच्या बाबतींत अेकमेकांशीं मेळ नसतो. काश्मीरमध्यें हात खरकटा होअूं नये अेवढ्यासाठीं आपल्या डगल्याच्या लांब बाहींत पोळी किंवा भाकरी धरून खाणारे लोक मला बूट घालतांना हाताचा उपयोग करतांना पाहून हंसत होते. आणि आपण मात्र खाटक्याच्या येथून फळें विकत घेअून तीं धुतल्याशिवाय खुशाल खात होते ! आपल्या देशांतील धर्मनिष्ठ लोक जर दुसऱ्या प्रांतांत जाअून तेथील लोकांचा दोन महिने पाहुणचार घेण्याचें व्रत घेतील, तर मला वाटतें, आपली धर्माविषयींची कल्पना पुष्कळ सुधारेल.

फलाहारानंतर संगीत सुरू झालें. मीं रविबाबूंचें 'अयि भुवन-मनमोहिनी' अैकविण्याची विनंति केली. येथें पुष्कळ तरुण जमले होते; पण 'मनमोहिनी' गायला कोणी तत्पर दिसलें नाहीं. अेकजण म्हणाले, 'आम्ही अिथें फक्त धार्मिक पदेंच गात असतों.' शेवटीं अेकानें आतिथ्यधर्माचा भंग होअूं नये अेवढ्यासाठीं 'मनमोहिनी' गाअून दाखविलें आणि सर्वांनीं तें सहन केलें ! मला शंका येते कीं, या युवक मंडळींत कांहींजण तरी क्रांतिवादी होतेच. अेकानें मला विचारलें, 'बंगाली लोकांच्या तन्दुरुस्तीविषयीं तुमचा काय अभिप्राय आहे ?' मीं म्हटलें, 'सामान्यतः ते दुबळे दिसतात.' तो माझ्या शरीराकडे दृष्टि टाकून तिरस्कारानें हंसला. मी समजलों आणि अुत्तर दिलें, 'मला कांहीं महाराष्ट्राचा प्रतिनिधि समजूं नका हं.' आम्ही दोघेहि हंसलों. तो म्हणाला, 'आम्हांला आमच्या अन्नांत फरक केला पाहिजे. त्याखेरीज शक्ति वाढायची नाहीं.'

बंगालचें ग्रामीण जीवन साधें, पण सुंदर आहे. बंगाली झोपड्यांचीं छपरें घाटदार सुरेख असतात. त्यांच्या भिंती सुंदर मातीनें रंगविलेल्या असतात. जावें तेथें गायनवादन अैकूं येतें; पण जातिभेदाच्या कडकपणामुळें गांवांत अैक्य बरोबर नांदत नसावें, असें मला वाटतें. खरडहसारख्या लहानशा खेड्यांतसुद्धां मोठमोठे पंडित राहतात आणि प्रतिष्ठेची अपेक्षा न ठेवतां विद्येची अुपासना करतात.

परत येतांना सूर्यास्त होअूं लागला होता. आतां नदीच्या प्रवाहा-बरोबर जायचें होतें. नदीच्या प्रवाहांत आम्ही जोरानें ओढले जाअूं लागलों. आमच्याबरोबरचे ब्रह्मचारी रामप्रसादांचीं भजनें गात होते.

रात्र झाली आणि होडी तुफानांत सांपडली. पण तें वर्णन आपण सोडून देअूं.

---

# रामाची राजधानी : : ८

माझ्याबरोबर बुवा होते; ते रामदासी संप्रदायाचे. शंकराचार्यांनीं संन्याशांचीं दहा नांवें म्हणजे प्रकार नक्की केले. चार मठ स्थापन केले, ब्रह्मचाऱ्यांचे चार प्रकार ठरवून दिले, आणि त्या दिवसापासून हिंदुस्थानांतील साधूंच्या आयुष्यांत अेक प्रकारची सुव्यवस्था आली. धर्मक्षेत्रांत शंकराचार्य हे समुद्रगुप्तासारखे किंवा नेपोलियनसारखे विजेते होते. राजा तोडरमल किंवा शिवाजीसारखे व्यवस्थापक होते, तुलसीदासासारखे कवि होते, बुद्ध भगवानासारखे आत्मविश्वासी होते, आणि ज्ञानेश्वरासारखे साहित्याचार्य होते. त्यांनीं सनातन हिंदु लोकांना जी व्यवस्था लावून दिली, तिचे अवशेष अजूनहि कायम आहेत. खरोखर शंकराचार्यांना हिंदुधर्मसम्राट् म्हटलें पाहिजे.

त्यांनीं ठरविलेल्या संन्याशांचीं गिरी, पुरी, भारती, तीर्थ, सरस्वती अित्यादि नांवें आहेत. ब्रह्मचाऱ्यांच्या चार विभागांत स्वरूपसंप्रदाय नांवाचा अेक विभाग आहे. त्याचा अेक मठ अयोध्येंत आहे. महाराष्ट्रांत धार्मिक

पुनर्जीवनाला व्यवस्थित स्वरूप देणारे श्रीसमर्थ रामदास याच अयोध्या मठाच्या स्वरूपसंप्रदायाचे होते, असें समजलें जातें.

अयोध्येला जातांना बुवांना आनंदाचे आणि भक्तीचे असे कांहीं अुमाळे येत होते, कीं कोणाहि माणसाला त्यांची वृत्ति नेहमींच्या स्थितींत नाहीं, हें सहज दिसलें असतें.

**आमुचे कुळीं हनुमंत**
**हनुमंत आमुचें कुळदैवत**
**स्वरूपसंप्रदाय, अयोध्यामठ**

असा अेक संकल्प रामदासीपंथाचे लोक सकाळ—संध्याकाळ बोलतात. त्या अयोध्यामठाचें दर्शन घेणें हा बुवांना अेक अपूर्व ' लाहो ' होता.

माझ्या प्रवासांत तीन तीर्थक्षेत्रांकडे माझें ध्यान विशेष आकर्षलें आहे. अयोध्या, हरद्वार व अमृतसर. तीनहि ठिकाणीं, कोण जाणे कशामुळें पण माझें चित्त प्रसन्न राहिलें आहे. तीनहि ठिकाणीं माझें ओळखीचें असें कोणी नव्हतें; तरीहि या तीनहि स्थानांच्या दर्शनानें व तेथील वातावरणाच्या अनुभवानेंच मला विशेष प्रसन्नता आणि आल्हाद वाटला आहे. तीनहि अनुभव वेगळ्या वेळचे; पण अेकाच जातीचे.

काशीला जाण्यापूर्वी काशीचें जें चित्र माणसानें मनांत काढून ठेवलें असेल, त्याच्या प्रमाणांत काशीचें प्रत्यक्ष दर्शन फारसें निराशाजनक वाटणार नाहीं. गंगेच्या प्रवाहामध्यें होडींत बसून घाटामागून घाट पाहतां पाहतां माणसाच्या तोंडून असे आश्चर्योद्‌गार निघालेच पाहिजेत कीं, ' मला नव्हतें वाटलें कीं, काशीचा देखावा अितका मनोहर, अितका भव्य असेल ! '

अयोध्येचें याच्या अुलट आहे. अयोध्या म्हणजे रामराज्याची राजधानी. अयोध्येचें नांव अैकतांच कल्पनेपुढें अेक अति विशाल मनोहर नगरीचें चित्र अुभें राहातें. अितकी भव्य कल्पना अुराशीं बाळगून माणसानें जावें, तों अयोध्येचें स्टेशन पाहूनच त्याची निराशा होते. जेथें लाखों यात्रेकरूंची सारखी रहदारी आहे, तेथें त्यांच्या सोयीकडे कांहींहि लक्ष पुरविलें जात नाहीं हें बघून आजचें राज्य देशांतील प्रजेसाठीं नाहीं आणि त्यांतसुद्‌धां गरिबांच्यासाठीं तर नाहींच नाहीं, अशी खातरी झाल्याखेरीज राहत नाहीं.

अयोध्येला नदीचा प्रवाह घाटापासून बराच दूर गेला आहे. नदीचें पात्र खूप रुंद आणि म्हणून रेताड आहे. रेतीवरून जातांना गाड्यांना भारी अडचण पडते, म्हणून तेथील लोकांनीं चाकांखालीं रेतींत लांकडाच्या दोन दोन फळ्या टाकून देण्याची युक्ति शोधून काढली आहे. गाडीरस्ता नदीच्या पात्रांतून तिरका जात असल्यामुळें खूप लांब आहे. या सगळ्या रस्त्यावर चाकांच्या जागीं लांब लांब फळ्या रेल्वेसारख्या टाकल्या आहेत. गाड्या या फळ्यांवरून चालतात. पण गाड्यांची विटंबना अेवढ्यानेंच संपत नाहीं. वावटळ आली कीं या फळ्या रेतींत दबल्या जातात. आणि मग रस्ता कोणीकडे आणि फळ्या कोणीकडे हें शोधण्यासाठीं अेक पुरातत्व-खातें अुघडावें लागतें ! तरी लोकांनीं यावरहि अेक अुपाय शोधून ठेवला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना कांटेरी डहाळ्या आणि गवत यांचें अेक हात अुंच कुंपण बांधतात. त्यामुळें वाऱ्याच्या योगानें येणारी रेती तेथल्या तेथेंच अडकते. रेतीच्या भारानें कुंपण आंतल्या अंगाला वांकूं नये म्हणून आंतील बाजूनें रेतीचा ढीग करून कुंपणाला आधार दिलेला असतो. नदीला पाणी येअून अुतरून गेलें म्हणजे पुनः परत असा रस्ता करावा लागतो. सहाराच्या रणांत अुंटाची सोय जर निसर्गानें करून दिली नसती, तर लोकांना याच प्रकारची पण फार मोठी जंगी व्यवस्था करावी लागली असती.

नदींत आंघोळ करून परत फिरतांना अयोध्यानगरीचें आणि तिच्या घाटांचें अचानक दर्शन होतें. अयोध्येंत सर्वत्र चुनखडीचें काम चालतें. त्यामुळें सारीं देवळें सुधाधवल ( सुधा—चुना, धवल—शुभ्र ) दिसतात. आपण स्नान करून नगरांत प्रवेश करीत असावें अशा वेळीं समोर देवळांत घंटारव होत असतो. यात्रेकरू निरनिराळ्या प्रकारचे झळझळीत लोटे आणि घागरी डोक्यावर घेअून ये—जा करीत असतात. पुष्कळांच्या हातांत चंदन—कुंकुम—पुष्पयुक्त पात्रें असतात आणि प्रत्येकजण रामराजा, सीताराणी आणि बजरंगबली हनुमान की जय गर्जत असतो ! असा प्रसंग मनुष्याच्या अंतःकरणांत कायमचा कोरल्यावांचून कसा राहील ? पाषाणासारखी जड स्मृति असली तरी तिच्यावर सुद्धां अशा तऱ्हेचें स्मरण अशोकाच्या शिलालेखाप्रमाणें सदासर्वदां कोरलें जाअील.

स्नान करून, कपडे धुऊन आम्ही दर्शन घ्यायला निघालों. रामाच्या अयोध्येंत वानर नाहींत असें कसें होईल ? वानरांच्या मदतीनें तर रामचंद्रांनीं सीताशुद्धि केली आणि लंका जिंकली; तेव्हां त्याचा मोबदला म्हणून आपल्यामागें ते वानरांना अयोध्येचें राज्य सोंपवून गेलेले दिसतात. आजसुद्धां तेथें वानरांचा निष्कंटक अम्मल चालू आहे. अितिहासकार सांगतात् कीं, अगदीं प्राचीन काळीं दक्षिण हिंदुस्थानांतून जो माल परदेशीं जात असे. त्यांत मोर आणि वानर यांचीहि निर्गत होत असे. रामचंद्रांनीं-सुद्धां दक्षिण हिंदुस्थानांतून वानरांची एक टोळी वसाहत करण्यासाठीं येथें आणली कीं काय ? वसाहत करणाऱ्या लोकांचा विस्तार झपाट्यानें होत असतो, असें मानववंशशास्त्री सांगतात. याच तत्त्वाप्रमाणें मथुरा-वृंदावनांतील वानर-वसाहतीची वृद्धि झाली असावी. आज अयोध्येपेक्षां सुद्धां मथुरा—वृंदावनाकडील त्यांच्या वसाहतीची चांगली भरभराट झालेली आहे.

अयोध्येंत देवळें आणि मूर्ती अनेक आहेत; पण राजवाड्यांत गोविंदाचें किंवा विष्णूचें जें देऊळ आहे, त्यांतील मूर्ति असामान्य आहे. ही मूर्ति आहे काळ्या फत्तराची; पण काळ्या रंगांत गडद हिरव्या रंगाची छटा असल्यानें तिची शोभा विशेष वाढली आहे; रसिक भक्तजनांनीं श्रीकृष्णाला श्यामसुंदर कल्पून कोणतें कलानिधान साधलें आहे याची कल्पना ही मूर्ति पाहातांच येते.

हें देऊळ बघायला आम्ही गेलों. त्या वेळीं दुपारचे अकरा—बारा वाजण्याचा सुमार असेल. देवळाचे सेवक ब्राह्मण आरतीसाठीं गोळा झाले होते.

**सत्यं ज्ञानमनन्तं नित्यमनाकाशं परमाकाशम् ।**

हें स्तोत्र अतिशय गोड, सुस्वर आवाजांत आणि मधुर आलापांसह म्हटलें जात होतें. राजवाड्यांत प्रत्येक विभागावर त्या त्या विभागाची पाटी लावलेली आहे; आणि हीं सारीं नांवें संस्कृतांत आहेत, तिकडे माझें लक्ष गेल्याशिवाय राहिलें नाहीं.

अयोध्येंत हनुमानगढीवरील हनुमानाचें दर्शन हेंच मुख्य आहे. तेथें यात्रेकरूंची गर्दी जास्तींत जास्त असते. कोणी नारळ घेऊन येतो, तर कोणी पेढे. शिवाय कोणी हनुमानाला पंख्यानें वाराहि घालीत असतो. अेका मोठ्या पंख्याच्या दोरीचा शेवट देवळाबाहेर सोडला आहे. ज्याची श्रद्धा असेल त्यानें वारा घालावा आणि धन्य व्हावें. पवनकुमाराच्या डोक्यावर पंखा चालणें योग्य कीं अयोग्य याचाच विचार करण्यांत मी गुंतलों होतों. बुवांबरोबर चर्चा करावी अशी स्थिति नव्हती. ते तर भक्तिवेडे झाले होते. त्यांनीं आणलेला नैवेद्य हनुमानाला दाखविला गेला तेव्हां तर त्यांच्या नेत्रांतून धन्यतेच्या अश्रूंचा प्रवाह वाहूं लागला. ते तर धन्य झालेच, पण त्यांच्या या भक्तीचें दर्शन घेऊन मीहि धन्य झालों !

गढीवरून अुतरून रामजन्माचें स्थान आणि अशींच अितर रामायण-प्रसिद्ध स्थानें पाहायला आम्ही गेलों. आज हीं सर्व स्थानें मुसलमान बंधूंच्या वेडेपणाला बळी पडलीं असल्याचें मला तेथें समजलें. आजचीं तीं स्थानें त्यांच्या प्राचीन स्थितीची थोडीशी कल्पना करून देण्यासारखींसुद्धां राहिलेलीं नाहींत.

श्रीभैरव जसा काशीचा कोतवाल, तसा श्रीमत्तगजेंद्र अयोध्यापुरीचा कोतवाल आहे. त्याची कथा किंवा माहात्म्य मला येथें मिळालें नाहीं. दर्शन घेणें वगैरे पुरें करून आम्ही अेका ब्राह्मणाकडे जेवायला गेलों; पण त्याच्या घरची स्वच्छता पाहूनच आमचें पोट भरलें ! घरांतल्या अंगणांत अेक वीत लांब आणि अेक वीत रुंद अेक दगडी पाटा पडला होता. आम्ही तेथें गेलों त्या वेळीं म्हणजे भर मध्याह्नीं ब्राह्मणाची मुलगी त्या दगडावर बसून दांतण करीत होती. थोड्या वेळानें अेका लहान मुलानें जवळच प्रातर्विधि आटोपला. आअीनें मुलाला त्याच पाट्यावर बसवून स्वच्छ केलें, आणि तें पाणी सुकून जाण्यापूर्वीच तो धुऊन त्याच्यावर खटाची चटणी वाटली ! घरांत कपडे आणि भांडीं यांनीं बंड पुकारलें होतें ! चुलींतून धूर आणि ब्राह्मणांच्या तोंडांतून शिव्या निघत होत्या ! अखेर त्याच्या तेथें आवडलें तेवढें खाल्लें, योग्य तेवढीच दक्षिणा दिली आणि आम्हीं अयोध्या सोडली.

अयोध्येंत सरकारी कचेऱ्या वगैरे कांहीं नाहींत. कारण, जवळच फैजाबाद शहर हें जिल्ह्याचें ठिकाण आहे. सर्व प्रतिष्ठित लोक तेथेंच राहतात. अयोध्येंतील वस्ती मुख्यत्वेंकरून यात्रेकरू, त्यांच्यावर गुजराण करणारे पंड्ये, आणि साधू लोक यांची आहे. साधू म्हणजे विशेषतः नंगे बैरागी. हे लोक मोठे कर्मकांडी असतात. आपल्या हातानें रांधून खातात आणि सारा दिवस चिलीम ओढीत असतात. कमरेला लंगोटी आणि गळ्यांत लांकडाच्या मोठमोठ्या मण्यांची माळ घालतात. सारा दिवस रामजीच्या गोष्टी बोलतात, तुलसीरामायणांतील दोहे व चौपाया बेसूर आवाजांत गातात आणि बसतात तेथें शांतीचा व संगीताचा खूनच करतात! तरी या लोकांजवळून पुष्कळ गोष्टी ग्रहण करण्यासारख्या असतात. हे लोक फार स्वच्छ राहतात, बव्हंशीं धट्टेकट्टे असतात. जातील तेथें कामचलाअू लहानसें देअूळ अुभें करतात, लोकांना अुपदेश करतात आणि संध्याकाळच्या आरतीच्या वेळीं तालबद्ध घंटा वाजवितात. सामान्यतः हे लोक भांडखोर असत नाहींत, पण तंट्याचें वेड अेकदां का त्यांच्या डोक्यांत शिरलें कीं दोन खुनांपेक्षां कमीनें ते थांबत नाहींत. हे लोक पोलिसांना फार भितात. दोन पक्ष भांडतील वाटेल तेवढे; पण पोलीस आले कीं चट्कन् अेक होअून गेल्यासारखे दाखवितील. हे साधू म्हणजे जिचा आपण अुपयोग करूं शकत नाहीं किंवा जिला अुजळाहि देअूं शकत नाहीं अशी ही हिंदुस्थानची अेक पुराणी संस्था आहे.

गुजराथेंत जो स्वामीनारायण संप्रदाय अितका मोठा पसरला आहे, त्याचे आद्यगुरु श्रीसहजानन्द स्वामी अयोध्येहूनच गुजराथेंत गेले होते.

तीन वर्षांनंतर पुनः अेकदां मी अयोध्येला गेलों होतों. तेव्हांसुद्धां पूर्वीअितकीच प्रसन्नता अनुभविली होती. मोक्षदायिका सप्तपुरींमध्यें आपल्या लोकांनीं अयोध्येला प्रथम स्थान दिलें आहे :

**अयोध्या मथुरा माया काशी काञ्ची अवन्तिका ।**
**पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥**

---

# आल्मोड्याकडे : : १

रामकृष्ण परमहंसांनीं म्हटलें आहे कीं, ‘ज्याला मोक्षाचा रस्ता धरायचा असेल, त्यानें लहान लहान, किरकोळ व निर्दोष वासना असतील त्या तृप्त करून टाकाव्यात आणि मग मोठ्या वासनांच्या बरोबर झगडण्यासाठीं कंबर कसून तयार व्हावें.’ आम्ही अेक प्रकारें मोक्षाच्या पंथाला लागलों होतों. आम्हां दोघांनाहि अैहिक प्रवृत्ति आणि त्या प्रवृत्तीच्या विविध अुपाधी यांची शिसारी आली होती. तरी माझ्या मनांत त्रिस्थळी यात्रा आणि रामकृष्ण मिशनचे पुण्यपुरुष व मुख्य मठ यांचें दर्शन घेण्याची लालसा राहिली होती. बुवांना अयोध्यादर्शनाचा ध्यास होता. या बाबती तृप्त होतांच आम्ही दोघे पावसाळ्यानंतरच्या ढगांप्रमाणें हलके होअून हिमालयाकडे जाण्यासाठीं निघालों. संकल्पपूर्तींत गयेंतील श्राद्धासारखा आनंद असतो. तो आनंद लाभतांच अयोध्येंत शेवटच्या रात्रीं आम्हीं दोघांनीं योगनिद्रेचा अनुभव घेतला. कसलीहि वासना नव्हती, कीं कसलाहि विचार डोकावत नव्हता. मग स्वप्नें तरी कोठून पडणार ? सकाळीं अुठतांच नवींच माणसें झालों असल्यासारखें वाटूं लागलें. आजपर्यंत आम्ही जगांतल्या माणसांसारखींच माणसें होतों. अितर यात्रेकरूंप्रमाणें आम्हीहि यात्रा करीत होतों. यानंतर हिमालयाचें चित्र दृष्टीपुढें तरंगूं लागलें.

आगगाडींत बसलों. गर्दी कमालीची होती. लोकांना जागेसाठीं झगडतांना पाहून मीं मनांत म्हटलें, ‘जरा धीर धरा बाबांनो ! आमचा हा अखेरचा प्रवास आहे. पुनः तुम्हांला अडचण करायला आम्ही येणार नाहीं.’ पण लोकांना माझ्या मनांतले विचार कसे कळणार ? दरवर्षी माझ्याप्रमाणें असे किती लोक या दुनियेंतून राजीनामा देअून वैराग्यखंडांत निघून जात असतील, कोण जाणे ! चालत्या जगाला त्याचा कांहीं हर्ष-शोक नाहीं, कीं कांहीं लाभालाभ नाहीं; पण जाणाऱ्या माणसाच्या मनाला मात्र तें केवढें मोठें पाअूल टाकलेंसें वाटतें ! वृद्ध टॉल्स्टॉय जेव्हां घर सोडून शेवटचे बाहेर पडले, तेव्हां त्यांच्या मनांत काय विचार आले असतील बरें !

अुत्तर हिंदुस्थानांत रेल्वे झाल्याला पाअुणशें वर्षें सहज झालीं असतील. तरीसुद्धां अजून लोक रेल्वेला सरावलेले नाहींत; गाडीचा 'टाअीम' संभाळण्यासाठीं ते पांच-पांच सहा-सहा तास अगोदर स्टेशनवर येअून बसतात; तिकिटाच्या खिडकीपुढें पाहिला नंबर मिळविण्यासाठीं तेथें अुभ्या राहिलेल्या पोलिसाला लांच देअून आजूबाजूच्या स्त्री-पुरुष प्रवाशांना धक्का मारून पुढें जाण्याचा हक्क विकत घेतात. स्टेशनांत गाडी आल्यानंतर अुतरणारे अुतारू अुतरून जाअीपर्यंत तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांना रेल्वेच्या फलाटावर जाअूं देत नाहींत, हें अजून त्यांच्या डोक्यांतच येत नाहीं ! मग अुतरणाऱ्या तशाच चढणाऱ्या प्रवाशांना ही गोष्ट किती सोयीची आहे, याची जाणीव त्यांना कोठून होणार ? वेटिंग शेडचें दार अुघडण्याच्या अगोदरच कठड्यावर चढून फलाटावर अुडी मारण्याचा प्रयत्न अेकाददुसरा करीतच असणार. आणि गाडींत ? गाडींत जबरदस्त लोक दिवसाढवळ्यासुद्धां लांब पाय करून निजणार; बसलेले लोक शक्य तितकी जागा अडवून ठेवण्यासाठीं मांडी ताणून पायाच्या नसांना कसरत देणार; डब्याचें दार आंत अुघडत असेल तर दारांतच सामान रचणार; आणि बेदरकार रेल्वेकडून जे कष्ट होतात त्यांत भर टाकणार.

अशा गाडींतून प्रवास करावयाचा हीच अेक मोठी तपश्चर्या. गाडींत प्रवेश होअीपर्यंत डार्विनच्या जीवनकलहाच्या अेकूण अेक सिद्धान्तांची पुनरावृत्ति होअून जाते; पण गाडी चालूं लागली, कीं प्रिन्स क्रोपोट्किन्चें राज्य सुरू होतें ! मग अुभे असणाऱ्यांना बसायला जागा मिळते; तहानलेल्या माणसाला जातगोत अनुकूल असेल तर प्यायला पाणीहि मिळतें; पानसुपारी, बिडीकाडी आणि दोहे यांचा लाभ तर ठरलेलाच ! स्टेशन लवकर येणार नसलें तर गप्पागोष्टी चालायच्या. बहुतकरून मेघराजाची अवकृपा आणि दुष्काळांतील दुर्दशेच्याच गोष्टी कानावर यायच्या. प्रख्यात दरोडे-खोरांच्या साहस–पराक्रमाच्या गोष्टींत तर साऱ्यांनाच सारखी गोडी. आमच्या डब्यांत अेकजण मुरादाबादकडच्या कोणा एका दरोडेखोराची गोष्ट सांगत होता; आणि दरोडेखोरांविषयीं सहानुभूति बाळगून सगळेजण ती अैकत होते. दरोडेखोर म्हणजे मनुष्यसमाजाचे शत्रू. त्यांच्या नांवानेंच माणसाचा

थरकांप होतो. तरीसुद्धां लोकांना दरोडेखोरांविषयीं अितकी सहानुभूति कां वाटत असावी हाच प्रश्न त्या दिवशीं माझ्या मनांत घोळत होता. जसजसें दरोडेखोर-पुराण पुढें चाललें, तसतसें माझ्या प्रश्नाचें अुत्तर मला मिळत गेलें. दरोडेखोरांतसुद्धां खानदानीचे अंश असतात; माणुसकी असणारे दरोडेखोर गरिबांना सतावत नाहींत. स्त्रियांवर हात टाकीत नाहींत, अंधाऱ्या रात्रीं अेकादी बाअी अेकटी जात असेल तर भल्या भावाप्रमाणें ते तिला पोंचवायला जातात; आजाऱ्यांना औषधपाणी करण्यांत मदत करतात; सत्यनारायणाची कथा सांगणाऱ्या ब्राह्मणांना ते मोकळ्या हातानें दक्षिणा देतात; आणि प्रजेला हैराण करणाऱ्या पोलिसांशीं कायमचें वैर बांधतात. कोर्टकचेरींत जाणाऱ्या, खोटे दस्तअैवज करणाऱ्या, दुष्काळांतसुद्धां सूटसवलत न देणाऱ्या, दामदुपटीवर हिशेब करून शेतें पचनीं पाडणाऱ्या, दुष्काळांत चांगला भाव मिळेल या आशेनें आज धान्य विकण्याचें नाकारणाऱ्या, अशा लोकांनाच दरोडेखोर विशेष त्रास देतात, अशी आम प्रजेची कल्पना असते. त्यामुळें त्यांच्याविषयीं थोडी सहानुभूति वाटणें हें स्वाभाविक आहे. प्रजेला न्याय व कायदा, नागरिक हक्क आणि कर्तव्यें यांसंबंधीं कांहीं ज्ञान नसतें. क्वचितच मिळणारें सुख आणि पांचवीला पुजलेलें दु:ख अेवढेंच ती जाणते.

दरोडेखोराची गोष्ट संपली तेव्हां एका बैराग्यानें आपल्या पूर्वजन्माच्या कर्मांचा वेदान्त सुरू केला. ‘ संसार असार आहे, काया झूट आहे, अेक रामनाम सत् आहे, आणि बुवा—बैराग्यांना दिलेली रोटी-लंगोटी सत्य आहे, बाकी सारें माया—जंजाळ आहे; जसें मागील जन्मीं केलें असेल तसें या जन्मीं मिळणार, त्यांत आपलें कांहीं चालणार नाहीं, हें त्याच्या वेदान्ताचें सार. मीहि साधु व्हायलाच निघालों होतों. मनांत विचार आला ‘ काय असल्या लोकांच्या जमातींत मिसळायला मी जात आहें ? असल्या वेदान्तानें का मला मोक्ष आणि हिंदुस्थानला स्वराज्य मिळायचें आहे ? ’

अितक्यांत बरेली स्टेशन आलें. येथें आम्हांला कांहीं तास काठ-गोदामच्या गाडीची वाट पाहायची होती. या स्टेशनवर प्रवाशांच्या भोळसटपणाचा अेक सुंदर नमुना बघायला मिळाला. अेका म्हाताऱ्याला गाझियाबादकडे जायचें होतें. त्याची बायको आणि दोन मुलें त्याला

७५०२९ १७९३१७९ ७५९

पोंचवायला आली होती. आचाऱ्याच्या पंच्यासारख्या धोतराचा कांसोटा मारलेला एक नोकरहि त्याच्याबरोबर आला होता. म्हाताऱ्यानें स्टेशनावर आपली अेक चौरस पासोडी अंथरली, तिच्यावर दोन-चार धोतरें, अेक रूमरू डगला, अेक लोटा, अंथरापांघरायचे दोन-चार कपडे, अेक पानदान, वगैरे वगैरे पुष्कळ वस्तूंचा ढीग केला. मग पासोडीचे समोरासमोरचे दोन शेवट अेकत्र करून त्यांची गांठ मारली. दुसरे दोन शेवट कांहीं केल्या हातीं येअीनात. अखेर नोकराच्या मदतीनें ते हट्टी शेवट अेकदांचे अेकत्र झाले आणि गांठोड्याला चौरस गोल आकार मिळाला. कित्येक पुराणें पृथ्वी चौरस आहे म्हणून सांगतात, तें कदाचित् अशा गांठोड्याचा आकार पाहूनच असेल. या सर्वसंग्रह—गांठोड्यावर ध्वजा किंवा पताका म्हणून म्हाताऱ्यानें अेका कोपऱ्यांत आपला प्रौढ हुक्का खोंचून ठेवला. गांठोड्यांत हुक्का आपला मौन धारण करूनच बसला होता; पण त्याचा रुबाब पाहतांच हा बोलत असेल तेव्हां भल्या भल्या हुक्काबहाद्दरांचें हृदय डोलायला लावण्याची वाचासिद्धि याच्यांत आहे असें स्पष्ट दिसत होतें. थोड्या वेळांत म्हाताऱ्याची गाडी आली, तेव्हां गांठोडें डोक्यावर घेअून तो अेका डब्याकडे धांवत सुटला. गाडीचीं दारें किती मोठीं असतात याचा अंदाज काढण्याची कला ‘ सतयुगा ’ पासून आतांपर्यंत कोणीच शोधून काढली नव्हती; तेव्हां कांहीं केल्या गांठोडें आंत जाअीचना. म्हातारा जोर करून गांठोडें आंत ढकलूं लागला; पण अितक्यांत आंतल्या अेका प्रवाशाला आपल्या हक्काची जाणीव अुत्पन्न झाली. त्यानें गांठोडें बाहेर फेंकण्याचा प्रयत्न सुरू केला. अिंद्र आणि विश्वामित्र यांच्या ओढाताणींत दुर्दशा झालेल्या त्रिशंकूसारखी बिचाऱ्या गांठोड्याची अवस्था झाली. गांठोडें कोलांटी घेअून अधोमुख झालें. हुक्क्यावरची चिलीम खालीं पडून शतधा विदीर्ण झाली. त्याबरोबर म्हाताऱ्याचा नोकर वीरभद्राच्या आवेशानें धांवून आला आणि त्याच्या मदतीनें गांठोडें आणि म्हातारा दोघे डब्याच्या आंत प्रविष्ट झाले. नोकरानें शिव्यांची गर्जना सुरू ठेवली आणि म्हातारा चिलमीच्या अभावीं गरीब गायीसारख्या दिसणाऱ्या हुक्क्याची कींव करीत अेका कोपऱ्यांत जाअून बसला.

या अुपाख्यानाची गोडी पोट भरून चाखली तरीहि आमच्या गाडीची येण्याची वेळ होअीना. तेव्हां आम्ही खूप कंटाळलों. अखेर बुवांनीं स्वयंपाक करण्याचा ठराव आणला. स्टेशनवर कुठें स्वयंपाक करतां येणार हें मला सुचेना; पण बुवा पडले पुरुषार्थी. ते कुठून तरी अेक नवें कोरें मडकें घेअून आले, स्टेशनजवळ अेका झाडाखालीं तीन दगड मांडले, आणि लांकडाच्या शोधार्थ गेले. वेळ फार लागला, तरी लांकडें पुष्कळ आलीं. दुसऱ्या खेपेला जाअून खिचडीचें सामान घेअून आले. अितक्यांत अेक मोठ्या पोटाचा आणि बारीक डोळ्यांचा पोलिस तेथें आला; आणि येत होती तेवढी सभ्य भाषा वापरून तो म्हणाला कीं, ‘ तुम्हांला या ठिकाणीं रांधतां येणार नाहीं. ’ कारण ती जागा रेल्वे कंपनीची होती आणि रेल्वे कंपनींत आमच्या वडिलांची कांहीं भागीदारी नव्हती ! मला असल्या प्रसंगाचा अनुभव नसल्यामुळें मी संतापलों; पण आमचे बुवा कुठल्याहि प्रकारें हारण्यासारखे नव्हते; परंतु या हुज्जतींत गाडीची वेळ झाल्यामुळें आणलेल्या शिधयाचा आणि मिळालेल्या शिव्यांचा वारसा अेका बैराग्याकडे देअून आम्ही गाडींत बसलों. बैराग्यानेंहि बुवांना आशीर्वाद देतांना सांगितलें, ‘ तुम कुछ फिकर मत करो. अुस सालेको मैं ठीक करूंगा. ’

गाडींत अुकाडा असा कांहीं होत होता, कीं गाडींत आमचीच खिचडी शिजत होती. अेक साधु हिमालयाची यात्रा करून आला होता, त्याच्याकडून जितकी माहिती काढतां येअील तितकी काढण्यांतच आम्हीं वेळ काढला. तो सांगूं लागला कीं, ‘ हिमालयांत अेक प्रकारची माशी असते, ती पायाच्या पिंढरीला चावली, कीं असा कांहीं मोठा फोड अुटतो आणि आग होते कीं, अेक पाअूलहि पुढें टाकवत नाहीं. दोन-दोन तीन-तीन दिवस माणूस घायाळ होअून पडतो. या साधूच्या हातांत तेजवलची अेक काठी होती. या काठीच्या अद्‌भुत गुणधर्मांचीहि त्यानें आम्हांला ओळख करून दिली. ‘ या काठीचें जर बरोबर पालन करण्यांत आलें, तर हिला हातांत ठेवणाऱ्या माणसाला रात्रीं अंधारांतसुद्‌धां दिसतें. ’ मीं विचारलें, ‘ काठीचें पालन करायचें तें कसें काय ? ’ तो म्हणाला, ‘ काठीच्या सालींत जे हे डोळे डोळे दिसतात ते नेहमीं साफ ठेवायचे. काटी जमिनीला कधीं

टेकायची नाहीं. रात्रीं निजण्याच्या वेळीं अेखाद्या अुंच ठिकाणीं ती ठेवून द्यायची, आणि बहिर्दिशेला जाअून आल्यावर हातपाय धुतल्याशिवाय काठीला शिवायचें नाहीं. तसेंच या काठीनें साप, विंचूसुद्धां मारायचा नाहीं. अितके नियम पाळले म्हणजे काठीचे नियम पाळले म्हणायचे आणि तसें झालें तरच काठी आपले अद्भुत गुण प्रकट करते. '

जन्मभर मुसाफरी करणाऱ्या आणि रोज रोज नवा अनुभव चाखणाऱ्या या साधूंत अितका भ्रम राहिलेला पाहून मला वाटलें, हिंदुधर्माची शक्ति अशी फुकट जात आहे. समाजावर बोजा होअून पडलेल्या या साधू लोकांचा नायनाट तरी केला पाहिजे अेक, किंवा चांगल्या विचारवान लोकांनीं या बुवा–बैराग्यांच्या जमातींत मिसळून दमादमानें त्यांना सुधारलें तरी पाहिजे. या दोन मार्गांपैकीं कोणता मार्ग शक्य आहे, कोणता अशक्य आहे, हें कोण सांगू शकेल ? बरेलीहून जसजसे दूर जाअूं लागलों तसतशी गर्दी कमी कमी होत गेली आणि आम्हांला मोकळेपणाचा–जागेच्या तसाच विचाराच्या मोकळेपणाचा–आनंद मिळूं लागला.

---

# नगाधिराज : : १०

आपल्या जन्मभूमीचें स्मरण, जन्मभूमीचा विरह आणि जन्मभूमीला परत जाण्याची अिच्छा मनुष्यमात्रांत नित्य जागृत असते. हिंदुस्थानचें महान् सार्वभौमत्व मिळालें आणि अमृतासारखा मधुर आंबा खायला मिळाला, तरीसुद्धां बाबराला मध्य आशियांतील त्याचीं टरबुजें वारंवार आठवत होतीं; आणि जिवंत असतांना जन्मभूमीचें दर्शन आपल्या भाग्यांत नसलें तरीहि मेल्यानंतर आपलीं हाडें तरी त्या जन्मभूमींतच जाअून पडावीं, अशी त्याची अिच्छा होती. हिंदुस्थानांत येअून नबाबी थाटानें राहणाऱ्या अिंग्रजालासुद्धां सहा महिन्यांची रजा घेअून स्वदेशाला जाअून स्वतःच्या झोंपडींत राहून आल्याशिवाय चैन पडत नाहीं. अशाच प्रकारची कांहींशी अुत्कंठा

हिंदु लोकांच्या मनांत हिमालयाविषयीं वास करते. अितिहासकार अुत्तर ध्रुव प्रदेशाला आर्यांचें मूलस्थान म्हणून खुशाल कल्पोत, भाषाशास्त्री हा मान मध्य आशियाला खुशाल देवोत, देशाभिमानी लोक हिंदुस्थान हीच आर्यांची आद्यभूमि म्हणून खुशाल सिद्ध करोत, परंतु राष्ट्रहृदयांत वसत असलेल्या प्रेरणेला जर कांहीं अैतिहासिक महत्त्व असेल, तर हिमालय हाच आपलें आर्यांचें आद्यस्थान आहे. राजा असो कीं रंक असो, वृद्ध असो कीं तरुण असो, स्त्री असो कीं पुरुष असो, प्रत्येकाला वाटतें कीं आयुष्यांत जास्त नाहीं तरी निदान अेकदां हिमालयाचें दर्शन घ्यावें, हिमालयाच्या अमृतजलाचा आस्वाद घ्यावा, हिमालयाच्या अेकाद्या विशाल शिलेवर बसून क्षणभर अीश्वराचें ध्यान करावें. आयुष्यांत करायचीं तेवढीं सर्व कार्यें अुरकून टाकलीं, अिंद्रियांची सर्व शक्ति क्षीण होअून गेली, जीर्ण देह आणि बाकी राहिलेलें आयुष्य भाररूप वाटायला लागलें म्हणजे मग या जगद्रूपी परक्या घरांत पडून न राहतां स्वगृहीं जाअूनच मरावें अशा अुद्देशानें कितीअेक हिंदु लोक अन्नपाण्याचा त्याग करून देह पडेपर्यंत, हिमालयांत अीशान्य दिशेकडे चालत राहतात. आपल्या शास्त्रकारांनीं हाच मार्ग लिहून ठेवला आहे. अेकाद्या राजाचें राजपद गेलें कीं चालला तो हिमालयांत, भर्तृहरीसारख्याच्या चित्तांत कितीहि वैराग्य अुत्पन्न झालेलें असलें, तरी त्याचाहि हिमालयाविषयींचा अनुराग अणुमात्रहि कमी व्हायचा नाहीं, अुलट तो अधिकाधिक वाढत जाअील. अेकाद्या व्यापाऱ्याला दिवाळें काढण्याची वेळ आली, अेकाद्या सौदागराचें सर्वस्व ‘समुद्रास्तृप्यन्तु’ झालें. अेकाद्याची बायको कुलटा निघाली, अेकाद्याची प्रजा अुधळली, अेकाद्याच्या माथ्यावर राजकीय किंवा सामाजिक संकट येअून पडलें, अेकाद्याला स्वतःचा अधःपात झाल्यामुळें समाजांत तोंड दाखवायला जागा अुरली नाहीं—कसलीहि परिस्थिति असो, आस्तिक हिंदु आत्महत्या करायचा नाहीं. परम दयाळू महादेवावर त्याची जितकी श्रद्धा, तितकीच हिमालयावरील त्याची श्रद्धा अढळ असते. पशुपतिनाथाप्रमाणेंच हिमालयसुद्धां अशरण—शरण आहे. राष्ट्रोद्धाराचें चिंतन चंद्रगुप्तानें हिमालयांत जाअूनच केलें होतें. समर्थ रामदासस्वामींनाहि राष्ट्रोद्धार करण्याची शक्ति बजरंगबली रामदूताकडून

हिमालयांतच प्राप्त झाली होती. हिंदु धर्माचें रहस्य अनायासें प्रकट होओील असें पृथ्वीच्या पाठीवर अेकादें स्थान असेल तर तें हिमालय हेंच आहे. श्रीवेदव्यासांनीं आपला ग्रंथ हिमालयाच्या मांडीवर बसून रचला होता. श्रीमत् शंकराचार्यांनीं आपली विश्वविख्यात प्रस्थानत्रयी हिमालयांतच लिहून काढली होती, आणि स्वामी विवेकानंद व स्वामी रामतीर्थ यांनींहि सनातन धर्माचीं तत्त्वें आधुनिक युगाला कशा रीतीनें लागूं करावीं याचा विचार हिमालयांतच केला होता.* हिमालय—आर्यांचें हें आद्यस्थान, तपस्व्यांची ही तपोभूमि—हा पुरुषार्थी लोकांना चिंतन करण्याचें अेकान्तस्थान, थकल्या भागलेल्यांचा विसावा, निराश झालेल्यांचें सान्त्वन, धर्माचें माहेर, मुमूर्षु जनांची अंतिम दिशा, साधकांचें आजोळ, महादेवाचें धाम आणि अवधूताची पथारी आहे. माणसांनाच काय, पशु-पक्ष्यांनासुद्धां हिमालयाचा केवढा तरी आधार आहे. सागराला मिळणाऱ्या अनेक नद्यांचा तो पिता आहे. त्याच सागरांतून अुद्भवलेल्या ढगांचें तो तीर्थस्थान आहे. कविकुलगुरूंनीं या ‘ देवतात्मा नगाधिराजा ’ला पृथ्वीचा मानदंड म्हटलें आहे, तें अनेक अर्थांनीं यथार्थ आहे. हिमालय हा भूलोकींचा स्वर्ग व यक्षकिन्नरांचें वसतिस्थान आहे. जगांतील सर्व दुःखांना सामावून घेअील अितका तो विशाल आहे; सर्व चिंताग्नीचें शमन करील अितका तो थंड आहे; कुबेरालाहि आश्रय देण्याअितका तो धनाढ्य आहे, आणि मोक्षाची शिडी बनूं शकेल अितका तो अुंच आहे. अगदीं लहानपणा-पासून आपण हिमालयाचें नांव अैकत आलों आहों. बालकथा, बालगीतें, प्रवास किंवा यात्रावर्णन, अितिहास अथवा पुराण, वाटेल तेथें पाहा, सर्वत्र अंतिम आश्रय आपला हिमालयासंबंधींच मिळायचा. लहानपणापासून जें आदर्शरमणीय स्थान आपल्या कल्पनासृष्टींत खेळत असेल, तें हिमालयापैकींच अेकादें कल्पिलेलें असायचें.

अहो, या हिमालयानें काय काय पाहिलें नाहीं? पृथ्वीवरील असंख्य धरणीकंप आणि आकाशांतील हजारों धूमकेतू डोळ्यांची पापणीसुद्धां न

---

* गांधीजींनीं आपला गीतेचा अनुवाद-अनासक्तियोग-सुद्धां हिमालयांतच पुरा केला, याचें येथें स्मरण झाल्याशिवाय राहात नाहीं.

हालवितां यानें बघितले आहेत. महादेवाचें लग्न यानेंच लावून दिलें आहे. सतीच्या विहाराचें व कुमारसंभवाचें यानेंच अपत्यवात्सल्यानें कौतुक केलें आहे. रघुकुलांतील भगीरथापर्यंतच्या अनेक पिढ्यांनीं केलेल्या कठिण तपश्चर्यांचा तो साक्षी आहे. पांडवांची महायात्रा यानेंच सफळ केली आहे; पण या जुन्या गोष्टी कशाला ? सत्तावन सालच्या पराक्रमांत हार खाल्ल्यामुळें हताश आणि फरारी झालेल्या वीरांना आणि मुत्सद्द्यांना हिमालयाचाच आसरा मिळाला आहे. भूस्तरशास्त्राच्या दृष्टीनें पाहायचें असेल, प्राणि-शास्त्राच्या दृष्टीनें विचार करायचा असेल, ऐतिहासिक दृष्टीनें शोध घ्यायचा असेल, भव्यतेचें जर तुम्हांला दर्शन घ्यायचें असेल, धर्मतत्त्वें उकलण्याचा जर तुम्हांला प्रयत्न करावयाचा असेल, तर हिमालयांतच तुमचें समाधान होईल; कारण कीं, आर्यावर्तांतील एकूण एक युगांतील पुरुषार्थ हिमालयाला माहीत आहे.

हिमालयाला जाण्याची इच्छा पहिल्याप्रथम माझ्या मनांत केव्हां उत्पन्न झाली हें सांगणें कठिण आहे. कदाचित् माझ्या जन्माबरोबरच तिचाहि जन्म झाला असेल. कदाचित् वर सांगितल्याप्रमाणें, ही वंश-परंपरागत राष्ट्रीय भावना असेल. प्रवासाचा विचार येतांच घर सोडून आपण परदेशीं जातों आहोंत, अशी भावना मनांत येते. हिमालयांत जाण्याचा विचार ज्या ज्या वेळीं माझ्या मनांत येई, त्या त्या वेळीं मी स्वदेशीं जाणार आहें, नव्हे स्वगृहीं जाणार आहें, अशीच भावना प्रबलपणें माझ्या मनांत उठे आणि मनांतल्या मनांत मला गुदगुल्या होत. अजूनसुद्धां कोणी हिमालयाची गोष्ट काढली, कीं सासरीं राहणाऱ्या सुनेला माहेराची गोष्ट काढतांच जितका आनंद होतो, तितका आनंद मला झाल्यावांचून राहत नाहीं ! मुलगी माहेराहून दूर पडली असली म्हणजे तिला सतत माहेराचाच ध्यास लागतो. या ध्यासाचा परिणाम असा होतो कीं, माहेराचें प्रत्यक्ष चित्र एका बाजूला राहून ती आपल्या मनांत एक वेगळेंच प्रेमचित्र निर्माण करते. तिच्या स्वतःपुरतें हें प्रेमचित्रच खरें असतें. ध्यासाचा—चिंतनाचा गुणच असा आहे कीं, जी वस्तु जशी असली पाहिजे अशी इच्छा असते, ती वस्तु तशी आहेच अशी भावना होत जाते. जगांत यथातथ्य ज्ञान कोणाला

होत असेल तें होवो, पण ज्याला आपण अनुभवाचें प्रत्यक्ष ज्ञान म्हणतों, त्यावरसुद्धां आपल्या अिंद्रियांचा रंग चढलेला असतोच; तें केवळ—ज्ञान असत नाहीं. प्रेमचित्रांत अिंद्रियांचा रंग असत नाहीं, हृदयाचा रंग असतो, आदर्शभावनांचा रंग असतो, आणि म्हणून तें चित्र आपल्या जीवाला विशेष जवळचें आणि विशेष रूपाचें सत्य वाटतें. तर्कवादी या चित्राला खुशाल खोटें म्हणूं देत; संसाराचा अनुभव आणि संसाराचें रहस्य सारें तर्काच्या चाळणीमधून चाळणें शक्य नसतें. तर्काला वाटतें, कीं मीं ठरवून दिलेली व्यवस्था जगानें मानलीच पाहिजे; जें माझ्या गळीं अुतरत नाहीं तें सत्य असूंच शकणार नाहीं. अस्तु.

आतां यानंतर मी हिमालयाचीं जीं शब्दचित्रें देणार आहें, तीं प्रेमचित्रेंच असणार. ज्या वस्तूवर प्रेम बसलें, त्या वस्तूचा प्रेमरहित विचार होणें शक्यच नाहीं. म्हणून माझ्याकडून प्रेमचित्र सोडून अितर भलत्या वस्तूची कोणी कां अपेक्षा राखावी ?

---

# भीमताळ : : ११

हिमालयाचे पांच विभाग कल्पिलेले आहेत. काश्मीर, जालंधर, गढवाल ( अुत्तराखंड ), कुमाअू ( कूर्मांचल ), आणि नेपाळ. अुत्तराखंड परमपवित्र मानलें जातें. गंगोत्री, जम्नोत्री, केदारनाथ, बदरीनारायण, पंचप्रयाग आणि पांच केदारनाथ; अुत्तरकाशी, ज्योतिर्मठ आणि तुंगनाथ अित्यादि प्रख्यात तीर्थस्थानें याच प्रदेशांत येतात. संतमहंत तपश्चर्येसाठीं हाच भाग पसंत करीत असत; पण असें म्हणतात कीं, यात्रेचे मार्ग व साधनें सुगम झाल्यामुळें तिकडे यात्रेकरू अलीकडे फार जातात, त्यामुळें चांगल्या चांगल्या साधूंनीं अुत्तराखंडाचा जवळ जवळ त्याग केला आहे. त्यांच्यापैकीं पुष्कळजण गुप्तपणें कुमाअूंत जाऊन राहतात. कुमाअू प्रांत रमणीय व

फलद्रूप आहे. याच प्रांतांत स्वामी विवेकानंदांचा मायावती मठ वसला आहे.

मायावती आल्मोड्याहून पन्नास मैल दूर असेल. नेहमीं प्रवृत्तींत पडलेल्या आपल्यासारख्या लोकांना चोवीस तास निवृत्ति मिळाली, तर ती पचणार नाहीं. कदाचित् याच अुद्देशानें स्वामी विवेकानन्दांनीं मायावतीला अेक छापखाना ठेवला आणि तेथून हिंदुस्थानाला जागा करण्यासाठीं किंवा जागा झालेल्या हिंदुस्थानचा संदेश दुनियेला पोंचविण्यासाठीं 'प्रबुद्ध भारत' हें मासिक ते मद्रासहून मायावतीला घेअून गेले. तेथें अेक आध्यात्मिक पाठशाला स्थापन करण्याचा त्यांचा विचार होता. आल्मोड्याला जाण्याला रेल्वेनें काठगोदामापर्यंत जावें लागतें. तेथून ३७ मैलांवर आल्मोडा आहे. आमच्यापूर्वींच आमचे मित्र स्वामी आनंद येथें येअून राहिले होते.

बरेली जंक्शनपर्यंत लोकांची खूप गर्दी होती. मग गर्दी कमी होअूं लागली. हलद्वानी स्टेशनवर सगळे अुतारू अुतरून गेले. काठगोदाम शेवटचें स्टेशन—टर्मिनस—आहे. तेथें तर फारच थोडे लोक शिल्लक राहिले होते; त्यामुळें अुदासवाणें वाटत होतें. कोण जाणें कशामुळें, माझ्या मनांत 'Burial of Sir John Moore' ही कविता घोळूं लागली. मीं म्हटलें, 'बुवा, पांडवांनीं जेव्हां स्वर्गारोहण केलें, तेव्हां त्यांनाहि असेंच वाटलें असेल नाहीं? गर्दी तर मागें राहिली आणि आपण अेकटे हिमालयावर चढत आहों. पांडवांचेंच काय, प्रत्येक जीवाचें असेंच होतें. माणूस स्नेह्यांचा समूह आणि अिंद्रियकलाप अेकामागून अेक सोडीत जातो आणि शेवटीं धर्मकर्म तेवढें बरोबर घेअून तो यमघाट चढतो.'

पण ही अुदासीनता क्षणजीवी होती. आम्ही दोनअेक मैल गेलों असूं तोंच हिमालयाची आमच्यावर छाप पडूं लागली. जवळच रामगंगा वाहत होती. रामगंगा म्हणाली, 'बच्चा, हे तुझे लौकिक विचार सोडून दे. येथें कित्येक झाडें अुगवतात, सुकतात आणि कुजून जातात; कितीअेक दगड तयार होतात आणि फुटून जातात; टेकड्या तुटून पडतात आणि गांवेंच्या गांवें दरींत गडप होतात, पण येथें कोणी हंसत नाहीं कीं रडतहि नाहीं. येथें

समृद्धि आहे, अुधळेपणा आहे, बेफिकिरी आहे. येथें जो पस्तावा किंवा चिंता करतो तो पापी. ’

रामगंगा असा अुपदेश न करती तरीहि माझी अुदासीनता अुडून गेली असती. कारण आजूबाजूच्या झाडांवर वनस्पतींचीं असंख्य बाळें फुललीं होतीं. त्यांचा सुगंध अुन्मादकारी होता, पण विलासप्रेरक नव्हता. आम्ही पुढें चाललों. पहाड चढूं लागलों. जसजसें वर जावें, तसतशी पहाडाची शोभा व निसर्गाची भव्यता वाढत जात होती. लहान मुलें समुद्रकिनाऱ्यावर जातात, तेव्हां तिथल्या चांदीसारख्या शिंपा पाहून सगळ्याच्या सगळ्या आपल्या खिशांत भरून घ्याव्या असें त्यांना होतें, पण अर्धाअेक तास फिरल्यावर असंख्य शिंपा पाहूनच तीं तृप्त होतात आणि मग खिशांत भरलेल्या शिंपासुद्धां तीं फेकून देतात; फार तर आठवणीसाठीं अेकादी शिंप ठेवली तर ठेवली. पांच मैल चढल्यानंतर असा अेक सुंदर पहाड लागला, त्याच्या तुटलेल्या बगलेंत निरनिराळ्या रंगांचे असे कांहीं मजेचे थर होते, आणि आमचा रस्ता असा कांहीं वेडावांकडा होता (ज्यामुळें पहाडाची सुंदरता सर्व बाजूंनीं आम्हांला पाहायला मिळत होती) कीं, मला वाटलें या पहाडाला महाराष्ट्रांत घेअून गेलों तर किती चांगलें ! दुसऱ्याच क्षणीं मनांत विचार आला, राजा काय आपल्याच महालांतील सुंदर वाटणारी अेकादी वस्तु अेका खोलींतून काढून दुसऱ्या खोलींत घेअून जातो ? सर्व खोल्या राजाच्याच आणि जी वस्तु ज्या ठिकाणीं ठेवली असेल त्याच ठिकाणीं ती यथायोग्य आहे. महाराष्ट्रांतील लोकांना जर या सुंदरतेचा अुपभोग घ्यायचा असेल, तर त्यांनीं तो येथें येअून घ्यावा. आपले लोक पैसा मिळवण्यासाठीं किंवा अशाच सांसारिक हेतूनें थोडेंफार स्थलान्तर करतात. सृष्टीची शोभा पाहायला किंवा देवदर्शन घ्यायला बाहेर पडत नाहींत. त्यांना तो स्वछंद वाटतो. देवदर्शन घेणें हें काय आपलें कर्तव्य नाहीं ? चार धामांची यात्रा करण्यांत पुण्याची सीमा आहे असें ठरविणारे आपले ऋषीमुनी खरे देशभक्त होते. आज आपल्यांत देशाभिमान असेल, पण देशभक्ति फार कमी आहे. अुन्मादानें मी बोललों ‘ बा पहाडा, तूं खुशाल अिथेंच राहा. तुला मी त्रास देणार नाहीं. माझ्या महाराष्ट्रीय बंधूंनाच अिकडे पाठवीन. ते येतील तेव्हां

तुझ्या या अमृतजलानें आणि सुगंधी वायूनें त्यांचा असाच सत्कार कर. हा घे माझा प्रणाम ! '

दुपार होण्याच्या अगोदर आम्हांला भीमतालला पोंचायचें होतें. म्हणून पहाडाच्या अेका दरींत मोडून पडलेली लोखंड गाळण्याची अेक भट्टी कोणीं केव्हां बांधली होती याचा तपास करण्याची दरकार आम्हीं केली नाहीं.

हिमालयांतील डोंगर फार विचित्र आहेत. समोर अेकादा गगनस्पर्शी डोंगर दिसावा आणि आपल्याला वाटावें कीं, याच्यावर जाअून आपण पोंचलों कीं तेथून अुतरण लागेल. जवळ जवळ वर जाअीपर्यंत अशीच भावना राहते, पण वर जाअून पाहावें तों काय ? दुसऱ्या अेका प्रचंड डोंगराच्या पायथ्याशींच आपण आहों ! हरे राम ! हा डोंगरहि परत चढावा लागणार ! फारसें थकलों नसूं तर दुसऱ्याच क्षणीं विचार येतो कीं, ठीक आहे; अधिक अुंच गेलों तर अधिक दूरवर पाहतां येअील, निसर्गाची विशालता दृष्टीस पडेल, आणि आजच आपलें नशीब अुघडलें तर वेळीं बर्फाचेंहि दर्शन होअील. डोक्यावर बर्फाचा किरीट धारण करून वानप्रस्थ अवस्थेंत ध्यान करण्यासाठीं बसलेल्या नगाधिराजाचें दर्शन घेण्याची लालसा आतां अनिवार झाली होती; पण त्या दिवशीं बर्फाचें दर्शन घडण्याचें आमच्या नशिबांत नव्हतें; दुसरा डोंगर कसाबसा चढलों तों तिसरा आपला हजर ! आतां मात्र आमचा धीर सुटला. प्रत्येक डोंगर म्हणजे काय स्वर्गारोहणाची अेक अेक पायरी आहे ? अून वाढलें, आम्हीं तापलों आणि निसर्गानें रुद्रावतार धारण केला. अखेर आम्ही भीमतालला येअून पोंचलों.

मीं खरींखुरीं किंवा काल्पनिक सुंदर सुंदर सरोवरें पाहिलीं नव्हतीं असें नाहीं. सर वॉल्टर स्कॉटच्या 'सरोविहारिणी' ( Lady of the Lake ) काव्यामध्यें तर अेका सुंदर सरोवराचें अुठावदार शब्दचित्रहि पाहिलें होतें. पण भीमतालचें प्रत्यक्ष दर्शन अलौकिक होतें. या प्रदेशाचें प्राचीन नांव 'षष्ठिखात' असें आहे. कारण आसपास लहान-मोठीं मिळून साठ सरोवरें आहेत. भीमताल व नैनिताल हीं दोनच सुविख्यात आहेत. त्यांतलें नैनिताल भीमतालहून बारा-पंधरा मैलांवर आहे. नैनिताल हल्लीं

युरोपियन शहर बनलें आहे. भीमताल हें अतिशय अुंच अशा डोंगराच्या पठारावर तीन पहाडांमध्यें अेक खड्डा झाल्यामुळें बनलें आहे. त्यामुळें तें खूप खोल आहे. पाणी स्फटिकासारखें निर्मळ. सरोवराचा आकार अेकाद्या वांकड्यातिकड्या त्रिकोणासारखा. आणि निसर्गानें या सरोवराची सौंदर्यपूर्ति करण्यासाठीं सरोवराच्या मध्यभागीं अेक लहानसें द्वीप अुत्पन्न केलें आहे. सरोवराच्या कांठीं आम्ही पोंचलों आणि आम्हांला असा कांहीं थंड वारा मिळाला कीं, अेका क्षणांत आमचा सर्व ताप व थकवा अुतरून गेला. सरोवराचा कांठ जरा अडचणीचा होता. कांठावर जिकडे तिकडे दगड पसरलेले होते. आणि हा खडा कांठ अुतरून पाण्यापर्यंत जाणें सोपें नव्हतें. तरी अितकें सुंदर पाणी सोडून जाण्याचा कोणाचा मगदूर ! हिंमत करून मी आपला अुतरलों आणि पाण्यांत पडलों. अर्रर्र ! हें काय पाणी कीं हजारों विंचू ? मला वाटलें कीं, माझ्या बारीक शरीराचा घेरसुद्धां पाण्याच्या थंडपणानें आखडून दोन तीन तसू कमी झाला असेल ! जीव बचावण्यासाठीं मी जोरानें हातपाय झाडले आणि नंतरचा आनंद काय वर्णावा ? काठावर बसलेले बुवा अुशीर झाल्यामुळें जरा रागावले नसते, तर कांठाला यायचें मला सुचलेंहि नसतें. मनांत आलें, बाणभट्टानें वर्णन केलेलें अच्छोद सरोवर काय असेंच असेल ? मी कादम्बरीमय झालों. त्या बेटाच्या पाठीमागून नौकाविहार करीत करीत कादम्बरी किंवा महाश्वेता आतां बाहेर पडेल अशा कल्पनातरंगांत मी होतों ! अितक्यांत खरेंच बेटामागून अेक सफेत नौका आली ! पण हाय हाय ! गेलें-माझें सारें काव्य विलयाला गेलें ! बोटीत तर हातांत मासे मारण्याचा चाबूक घेअून दोन सोल्जर बसले होते ! मी वाल्मीकि असतों तर या झक ( झक—झष—मासा ) मारणाऱ्या अरसिक गोऱ्यांना दारुण शाप दिला असतां. काव्यगगनांतून खालीं अुतरतांच जाणीव झाली कीं, पोटांत कडकडून भूक लागली आहे. कसाबसा स्वयंपाक केला. पोट भरून जेवलों, डोळाभर झोंप घेतली, हातपाय ताणून थकवा अुतरला, रामसिंहाला अुठवून त्याच्या डोक्यावर सामान दिलें आणि रामगडाकडे निघालों. अशा रीतीनें अर्ध्या दिवसांत हिमालयांतील चौदा मैलांचा प्रवास पुरा झाला.

# सच्चित्सुख तो तूं परब्रह्म केवळ : : १२

भीमतालहून पुढें निघालों. रस्ता सपाट होता. चिरपरिचित सपाट भूमि पाहून आम्ही जोरानें चालूं लागलों. डाव्या बाजूला दूर राहुट्यांची रांग दिसत होती. आजारी सोल्जर त्या ठिकाणीं राहातात, असें तपास करतां समजलें. डोंगराच्या माथ्यावर शेवटीं पोंचलों आहोंत असें वाटून अपार आनंद झाला.

पण अेकाच दिवसांत जणुं सारेच धडे शिकवून टाकावयाचें असावे त्याप्रमाणें, हिमालयानें आमच्या अभिमानावर पुनः आघात केला. अरेबियन नाअिट्समध्यें किंवा पंचतंत्रांत अेका गोष्टींतून दुसरी गोष्ट फुटते, त्याप्रमाणें या पर्वतशिखरावर मांड ठोकून बसलेला अेक नवाच डोंगर अुपस्थित झाला. चार मजुरांच्या खांद्यांवरील आरामखुर्चीवर अेकादा अमीर बसला असावा, त्याच गंभीर भव्यतेनें आणि आपल्या महत्तेचें परिपूर्ण भान असावें अशा स्वाभाविकपणें तो पहाड विराजमान् झाला होता. तो जर उभा राहिला असता तर ? तर मला वाटतें आकाशाचा चांदवा फाटलाच असता !

अेवढा मोठा पहाड चढायचा असल्यामुळें आमच्याजवळच्या सामानासुमानाचा बोजा आम्ही मजुरावर सोंपविला, अभिमानाचा भार पायथ्याशींच ठेवला, आणि अगदीं ढगासारखे हलके होअून आम्ही चढूं लागलों. चढ चढ असे थेट संध्याकाळपर्यंत आम्ही चढतच राहिलों.

वाटेंत अेक प्रकारचीं फुलें अुमलत होतीं. आकारानें सदाफुलीच्या फुलासारखीं आणि रंगानें चांगल्या खरपूस तापलेल्या दुधावरच्या सायीसारखीं पिवळट होतीं. सुवासाचा मधुरपणा तर काय सांगावा ? सुवास गुलाबासारखा; पण गुलाबाअितका अुग्र नाहीं. हीं लज्जाविनयसंपन्न फुलें बघून मी प्रसन्न झालों. माझा अध्वखेद नाहींसा झाला. अशा सुंदर आतिथ्यशील फुलांचें नांव समजून घेतल्याशिवाय माझ्यानें कसें राहवेल ? पण रस्त्यांत कोणी माणूसच भेटेना. मजूर आपला आपल्या मजुरधर्माला स्मरून मागेंच राहिला होता. त्याची वाट पाहण्याअितका वेळ नव्हता, आणि नांव समजल्याशिवाय पुढें जाण्याची

हिम्मत होत नव्हती. अितक्यांत डोंगराच्या ‘ पगदंडी ’वरून कोणी पहाडी मनुष्य अुतरत येत असतांना दिसला. पगदंडी म्हणजे पाअूलवाट. हिमालयांतील पाअूलवाट अितकी अवघड असते, कीं अननुभवी माणसाची कंबरच मोडून जायची. या पहाडी मनुष्याला मीं हिंदींत—किंवा खरें म्हटलें तर माझ्या मतानें त्या वेळीं हिंदीसारख्या वाटणाऱ्या भाषेंत—फुलासंबंधीं कित्येक प्रश्न विचारले. त्यानें पहाडी हिंदींत अुत्तर दिलें. पण मला नाहीं वाटत, माझे प्रश्न त्याला समजले असतील. मला तर त्याच्या उत्तरांतील ब्रह्माक्षरहि समजलें नाहीं; पण संभाषणांतून ( त्याला सं—भाषण म्हणावें कीं नाहीं हें मला कळत नाहीं ) फुलाचें नांव मात्र मला सांपडलें. असीरियाच्या शरशीर्ष लिपींतील शिलालेख अेकाद्या विद्वानानें वाचून त्याचा अर्थ लावावा, तितक्याच प्रयासानें मीं समजून घेतलें कीं, फुलाचें नांव ‘ कूजो ’ आहे. मला वाटतें पहाडी भाषेंत हा शब्द मोठा ललित समजला जात असेल. पण मला स्वतःला या नांवाविषयीं बिलकुल मोह अुत्पन्न झाला नाहीं !

आतां दूरवर क्षितिज दिसूं लागलें. तेथें पुष्कळ दाट ढग जमले होते. ढगांवर शुभ्र संगमरवरी दगडाच्या पर्वतशिखरासारखें कांहीं तरी दिसत होतें. पायथ्याचा भाग धुक्यानें झांकून गेला असल्यामुळें हे कोरीव ढग आकाशांत अुडणारे मैनाक पर्वताचें पिल्लू असावें तसे दिसत होते. दुसऱ्या दिवशीं मला समजलें, कीं तें पवित्र नन्दादेवीचें शिखर होतें.

थोडें अुतरून आम्ही रामगडाला येअून पोंचलों. तेथें अेक लहानशी धर्मशाळा होती. अथवा धर्मशाळा कसची ? पांच फूट अुंचीची आणि अेक-अेका लहान दरवाजाखेरीज कुठेंहि अेकादें भोंकसुद्धां आढळणार नाहीं, अशी खोल्यांची अेक रांगच म्हणाना ! गाढवेंसुद्धां त्यांत राहायला खुशीनें कबूल होणार नाहींत ! वाण्यांकडून डाळ—तांदूळ व बटाटे विकत घेतले होते. वाण्यानें दोन-तीन भांडींहि दिलीं. आम्हीं मनांत म्हटलें, ‘ किती भला हा वाणीदादा ! स्वयंपाक करायला भांडींसुद्धां देतो अं ! ’ मागाहून समजलें कीं पहाडांत हा रिवाजच आहे मुळीं. तांदळापिठाची जी तो किंमत घेतो, त्यांतच भांड्यांचें भाडेंहि धरून घेतो. तरी पण हा तिथला रिवाज चांगला

आहे यांत शंका नाहीं. कसेंबसें रांधून अर्धेमुर्धें खाल्लें; कारण आमचा स्वयंपाक बरोबर जमला नव्हता, आणि निजण्याचा मनसुबा केला.

धर्मशाळेची सूरत पाहून बाहेर अुघड्यांतच निजण्याचा आम्हीं विचार केला आणि पथारी टाकली. अितक्यांत हिमालय म्हणतो, ‘ हं, हा घ्या नवा धडा. ’ अशी कांहीं कडक थंडी वाजायला लागली—कीं मंत्रमुग्ध साप जसा आपणहून टोपलींत जाअून बसतो, तसे आम्ही आपापली पथारी घेअून आतां खूबसूरत वाटणाऱ्या त्या खोलीच्या आंत घुसलों. खोलीला अेकसुद्धां खिडकी न ठेवण्यांत धर्मशाळा बांधणाऱ्या कारागिरानें मयासुरापेक्षांसुद्धां अधिक कौशल्य वापरलें आहे, आमची आतां खात्री झाली !

सारा दिवसभर चालचाल केलें होतें. पहिल्या प्रथमच अितका वीस मैल लांबीचा प्रवास झाला होता. रात्रीं पोटांतहि नीट भरती झाली नव्हती. आणि थंडी म्हणजे मी म्हणत होती. त्यामुळें पुष्कळ विनवणी करूनदेखील झोंप जवळ फिरकेना.

निद्रादेवी येअीना म्हणतांना तिच्या नित्यवैरिणी—चिंता आणि कल्पना हजर झाल्या. मी विचार करूं लागलों. घरदार सोडून, समाजाची सेवा करण्याचें सोडून, पुस्तकें वाचण्याचें सोडून, वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याचें सोडून, मी कशासाठीं बरें अिकडे आलों ? अीश्वरानें मला ज्या स्थानीं ठेवलें तें स्वाभाविक स्थान सोडून या अजाणत्या मुलखांत मी कां आलों ? माझ्यांत वैराग्य अुत्पन्न झालें होतें व हिमालय हें वैराग्याचें माहेरघर आहे, म्हणून का येथें आलों असेन ? हिमालयांत जर वैराग्य असतें, तर त्या गोऱ्या लोकांनीं भीमतालांत जाअून मासे कां मारले असते ? रामगडचा वाणी गिऱ्हाअिकाकडून जास्तींत जास्त फायदा काढण्यासाठीं कां धडपडला असता ? खालीं मैदानांत जसे लोक राहतात तसेच लोक या पहाडावरहि आहेत. तेथेंहि बायको आपल्या नवऱ्याशीं भांडते. येथील पोस्टमास्तरदेखील मुलगा आपलें सांगितलेलें अैकत नाहीं अशी तक्रार करतो, आणि लोक ढोरांकडून त्यांच्या शक्तीबाहेर कामें करून घेतात. हां, पहाडांत व्यापार वाढलेला नाहीं, रेल्वे आलेली नाहीं, वस्ती दाट

नाहीं, आणि या कारणांमुळें समाजांत जी विशिष्ट घाण शिरते ती मात्र येथें शिरलेली नाहीं, अेवढी गोष्ट खरी !

या परक्या मुलुखांत माझी भाषा कोणाला कळत नाहीं, मला कोणी ओळखीत नाहीं, आप्तअिष्ट कोणी भेटायचा नाहीं, ज्या वैराग्याकरितां मी आलों त्याचें नांवसुद्‌धां येथें मिळायचें नाहीं. या जाणिवेनें मनांत अस्वस्थता वाटूं लागली आणि बाहेर थंडी झोंबत असतांनासुद्‌धां अेक कांबळें पांघरून मी बाहेर गेलों. हिमालयाच्या प्रवासांत सुअीनें शिवलेला कांहींहि कपडा वापरायचा नाहीं, असा माझा निश्चय होता. दिवसा धोतर, अुपरणें व कानाचें रक्षण करण्याकरितां मफलर अितकेंच मी वापरीत असें. रात्रीं खालीं अंथरायला अेक चटअी आणि कांबळें बाळगीत असें. आणि पांघरायला पासोडी जांभळ्या रंगाचा अेक रेशमी कद घेत असें.

बाहेर आलों त्या वेळीं आकाश निरभ्र होतें, नक्षत्रें अद्‌भुत कांतीनें चमकत होतीं. मी हिमालयांत येण्यापूर्वी नवसारींत असतांना माझ्या अेका रसिक मित्रानें ताऱ्यांच्याबरोबर माझी ओळख करून दिली होती. तारे माझे दोस्त बनले होते. पूर्णिमेच्या चंद्रालाहि न भिणाऱ्या अशा सर्व ताऱ्यांना मी ओळखत होतों. त्यांच्याकडे मीं पाहिलें. ते म्हणाले, "बाबा, भितोस कां ? हा कसला रे परका मुलूख ? काय, येथें तुझे कोणी आप्तअिष्ट नाहींत ? पाहा, आम्ही अितके सगळे तुझे दोस्त येथेंसुद्‌धां जसेच्या तसे तुझ्याबरोबरच आहोंत. आणखी दोन घटका दम धरशील तर अितरहि त्या पहाडामागून आत्तां वर येतील. काय, तूं आम्हांला विसरलास ? तुझ्या आणि आमच्या जन्मदात्याला काय विसरून गेलास ? कुठें गेला तुझा प्रणव मंत्र ? कुठें गेला तुझा गीतापाठ ?

**'मन अेव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ॥'**
**'न कश्चित् कस्यचिन्मित्रं न कश्चित्कस्यचिद्रिपुः ॥'**
**'आत्मैव ह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः ॥'**

"हें सारें तूंच सांगत होतास ना ? आजच सकाळीं त्या नदीनें तुला काय सांगितलें होतें ? तो पहाड पाहून तुझ्या मनांत काय विचार आले होते ! त्या

'कूजो' फुलांच्या विश्वसेवेचा तुझ्यावर कांहींच का परिणाम झाला नाहीं ? नंदादेवीचें दर्शन काय वायां गेलें ? सोडून दे हें क्षुद्र हृदयदौर्बल्य. टाकून दे तो मनाचा अुद्‌वेग !" हिमालयांतहि वैराग्य आढळायचें नाहीं ही माझी अश्रद्‌धा अुडून गेली. बाह्य सृष्टि व अंतःसृष्टीमध्यें तादात्म्य निर्माण झालें; मी शांत झालों आणि आंत जाअून सुखानें निजलों.

सकाळीं अुठून पुढें निघालों. आज आम्हांला अुतरायचें होतें. जितकें चढलों होतों तितकेंच अुतरावें लागलें. रोमन लोकांना आपलें साम्राज्य गमावतांनासुद्‌धां अितकें दुःख झालें नसेल ! किती कष्टानें चढलों होतों तरी शेवटीं उतरावें लागलेंच. हिमालयांत चालण्याचा अेक नवा अनुभव मिळाला. वर चढतांना थकवा वाटतो खरा; पण तो थकवा क्षणिक असतो; पण सरळ अुतार अुतरतांना जे आयास पडतात, त्यानें मात्र माणसाचे सांधेन् सांधे ढिले होअून जातात. असा अुतरण्याचा अनुभव मिळतांच मीं म्हटलें, 'स्वर्गापर्यंत चढून जायचें असलें तरी हरकत नाहीं; पण हे विधात्या असा अुतार अुतरण्याची शिक्षा मात्र **शिरसि मा लिख, मा लिख, मा लिख।**'

अिकडचा प्रदेशसुद्‌धां फार रमणीय होता. आपल्या अिकडील सुरूच्या झाडासारख्या चीड व देवदाराच्या भव्य वृक्षांचा घेरावा अनुपम छाया विस्तारीत होता; पण खरी गंमत तर खालीं पडून सुकून गेलेल्या सुअी किंवा सळअीसारख्या पानांवरून जेव्हां पाय घसरत असत तेव्हां वाटे. हंसावें कीं रडावें हेंच समजत नसे.

या प्रदेशांत थोडी शेतीहि होत असलेली दिसली, कारण वाटेंत अेक लहानसें गांव लागलें. तेथें दोन-चार शेतकरी धान्याला वारा देत होते. स्वाभाविक वारा नांवालासुद्‌धां नव्हता. म्हणून दोघेजण अेक पासोडी जोरानें हालवून वारा घालीत होते.

वाटेंत चीडाचीं मोठीं मोठीं फुलें पडलेलीं दिसलीं. या फुलांचें वर्णन करणें अशक्य आहे. फूल विस्तारानें नारळापेक्षां मोठें असतें. पाकळ्या बाभळीच्या लांकडापेक्षांहि कठीण असतात. तरी हें फूल आकारानें फार

सुंदर असतें. एका देंठाच्या डोक्यामधून बोटाअेवढाल्या असंख्य पाकळ्यांचें जणुं काय अेक कारंजेंच फुटलेलें असतें; पण रंगाचें कीं वासाचें नांव नाहीं. लांकडाचाच रंग आणि लांकडाचाच वास ! देवदार आणि चीड यांसारखे वृक्ष हिमालयालाच शोभायचे. निसर्गाचें विशाल वैभव पाहून मी तर दिङ्मूढच झालों. आजवरच्या क्षुद्र जीवनाची दया वाटूं लागली. मी गाअूं लागलों :

**रामा दयाघना क्षमा करुनि मज पाहीं,**
**रामा दयाघना० ॥**
**कोठिल कोण मी न जाणिला हा पत्ता ।**
**आजवरि अज्ञानें मिरविली विद्वत्ता ।**
**देहात्मत्वाची स्थिति झाली अुन्मत्ता ।**
**येअुनि जन्मा रे व्यर्थ शिणविली आअी ।**
**हेंचि मनिं खाअी—**
**रामा दयाघना० ॥**

खरेंच, जीवन व्यर्थ घालवून मीं आअीला माझ्या भारानें शिणविलें होतें. जननीलाच नव्हे, जन्मभूमीलासुद्धां. माझ्या गतायुष्याबद्दल मनांत तिरस्कार अुपजला. अज्ञानामुळें मी विद्वत्तेची प्रौढी मिरवीत होतों; स्वतः अंधकारांत राहात असून लोकांपुढें प्रकाशाच्या गोष्टी करीत होतों ! मीं भजन पुढें चालविलें :

**करुणासागरा ! राघवा रघुराजा !**
**विषयीं पांगळा नका करूं जीव माझा**
**भुलुनि प्रपंचा रे, भ्रमुनि भ्रमुनि ठायींठायीं,**
**हरुनि वय जाअी—**
**रामा दयाघना० ॥**

भजनांत लय लागला. मी अुंच स्वरांत ललकारत होतों. पुढें कडवें आलें :

**सच्चित्सुख तो तूं परब्रह्म केवळ,**
**सच्चित्सुख तो तूं परब्रह्म केवळ,**

समोरच्या पहाडानें अेकाअेकी गर्जना केली :

**सच्चित्सुख तो तूं परब्रह्म केवळ.**

हिमालयाची ती मेघगंभीर गर्जना मला तरी अशरीरिणी वाणी वाटली. खरोखर, मी सच्चित्सुखात्मक परब्रह्म आहें ही वास्तव गोष्ट मी विसरून जातों, म्हणूनच मी पामर बनतों. पहा, हा धीरगंभीर हिमालय कशी सच्चित्सुखाची समाधि अनुभवतो आहे ! पहा तें समोरचें बर्फ. त्याला अुन्हाळा सारखा अन् हिंवाळाहि सारखा. हें विशाल आकाश पहा. किती शांत आणि अलिप्त ! काय, याहून मी वेगळा आहें ?

अद्वैताच्या मस्तींत मी धुंद झालों आणि पीअुडा केव्हां आलें तें मला कळलेंहि नाहीं. पीअुडाचें पाणी फार वाखाणलें जातें. क्षयरोगी येथील पाणी पिण्यासाठीं मुद्दाम नेतात. पीअुडा येथें आम्ही स्वयंपाक करून पोटभर खाल्लें, थोडा आराम केला आणि पुढें निघालों. आणखी परत आला अुतार ! माझ्या गुडघ्यांत कळा येअू लागल्यामुळें वेदना व्हायला लागल्या, आणि त्यामुळें मी देहधारी आहें ही वृत्ति फिरून जागृत झाली. हळूहळू आसपासची सुंदरता मी पुनः न्याहाळूं लागलों.

हिमालयांतील शेती पाहण्यासारखी असते. पसरट टेकडी असेल तेथें शिखरापासून पायथ्यापर्यंत दोन-दोन चार-चार हात रुंद पायऱ्यासारखे वाफे बनवितात आणि त्यांत हातानें अुकरून धान्य पेरतात. नदीला बांधलेला घाट जसा दिसतो, तसा या शेतांचा देखावा शोभतो. विशारद नांवाच्या कोणा बंगाली गृहस्थानें आसपास पुष्कळ जमीन खरेदी केली आहे आणि तिच्यांत सफरचंद, पीच, ॲप्रिकॉट, अक्रोड वगैरे निरनिराळ्या जातींचीं फळें तो काढतो. या धनलोभ्यानें रस्त्यावर अेक 'विशारद–हॉटेल'हि अुघडलें आहे.

जेथें अुतार संपला तेथें एक झुलता पूल लागला. त्या पुलाला लोधियाचा पूल म्हणतात. पुलाखालचे दगड पहाण्यालायक आहेत. नदीच्या प्रवाहानें घासून गेलेल्या दगडांचा आकार मोठा मजेचा दिसत होता. पाण्यांत जेथें भोंवरा होत असेल, तेथें तळचे सुटे दगडसुद्धां गोल गोल घुसळले जाअून तळच्या दगडांत जे खोल खोल खड्डे करतात त्यांचा देखावा मनोवेधक असतो.

या पुलाखालीं मला अेक साप दिसला. त्याची नोंद येथें अेवढ्याचसाठीं करीत आहे कीं, हिमालयाच्या घनदाट जंगलांत आणि भिन्न भिन्न

प्रदेशांत मीं जो दोन तीन हजार मैलांचा प्रवास केला, त्या प्रवासांत फक्त दोनच साप माझ्या पाहण्यांत आले, अेक येथें आणि दुसरा गंगोत्रिजवळ.

आतां पुनः चढण आली. दूरवर अेक पहाडी शहर दिसूं लागलें. तें आल्मोडा कीं मुक्तेसर याचा मला निश्चय करतां येईना. संध्याकाळ होअूं लागली आणि अखेर आम्ही आल्मोड्यानजीक येअून टेपलों. तेथें अेक चुंगी-घर होतें. चुंगीघर म्हणजे जकातीचें नाकें. येथेंच अेक गाडीरस्ता आम्ही बघितला. हिमालयांत गाडीरस्ता ही सुधारणेची परिसीमा म्हटली जाते. आपल्याअिकडे अेकाद्या बादशाही संगमरवरी फरशीचा रस्ता असला तर त्या रस्त्यासंबंधीं लोक ज्या अुत्साहाने आणि आदरानें बोलतात, तितक्याच अुत्साहानें आणि अदबीनें पहाडी लोक या 'कार्ट रोड' संबंधीं बोलतात! शेजारींच मुसलमानांचें कबरस्थान होतें. पहाडाच्या वन्य शोभेंत या पांढऱ्या पांढऱ्या कबरी अप्रिय वाटत नव्हत्या. मुसलमान लोक बहुतकरून निसर्गशोभा बिघडवीत नाहींत. संध्याकाळच्या वेळीं या कबरी अेकाद्या धवळ्या गायींचा कळप चरून येअून निवांतपणें रवंथ करीत बसला असावा, तशा दिसत होत्या.

सदतीस मैलांचा प्रवास सहीसलामत केला, पण शेवटीं आम्ही वाट चुकलों, आल्मोड्याला अर्धी प्रदक्षिणा घातली. रस्ता सोडून लोकांचीं आंगणें तुडवून, कित्येक अुकिरडे ओलांडून शेवटीं सात वाजतां आम्ही बाजारांत पोंचलों. बाजारचे रस्ते फरशीचे आहेत. तेथें हिल् बॉअीज स्कूल कुठें आहे याचा तपास काढीत काढीत स्वामी आनंदांच्या घराजवळ येअून पोंचलों. ते घरीं नव्हते. कुठें तरी फिरायला गेले असावे. हरखदेव नांवाचा अेक मुलगा घरांतून बाहेर आला. त्यानें आमचा सत्कार केला आणि तो म्हणाला, "या, आंत या, या खाटेवर बसा; मी स्वामींचा शिष्य आहें. ते बाहेर गेले आहेत, आत्तां येतील. त्यांनीं सांगितलें होतें कीं, काकाजी यायचे आहेत; तुमच्या-पैकीं काकाजी कोण?" थोड्या वेळानें स्वामी आले. बडोद्यांत स्वामींना पाहिलें होतें तसे ते नव्हते. लांबच लांब दाढी, लांबच लांब शेंडी, त्यावर अेक फिक्या भगव्या रंगाची मफलर आणि लांब पांढरी शुभ्र कफनी घातलेली अेक मूर्ति लोखंडी टोंक असलेली अेक लांब काठी हातांत घेअून माझ्यापुढें येअून अुभी राहिली. आम्ही प्रेमपूर्वक भेटलों. बुवा तर प्रेमानें रडूं लागले. मीं

पाहिलें कीं, स्वामींना आतां मराठींत अस्खलितपणें बोलतां येत नव्हतें. प्रत्येक वाक्यांत मध्यें मध्यें येणाऱ्या हिंदी शब्दांना मागें सारतांना त्यांना श्रम पडत होते.

रात्रीं आम्हीं काय खाल्लें, किती वाजेपर्यंत बोलत बसलों आणि केव्हां निजलों तें मला बिलकुल आठवत नाहीं. अेवढें मात्र स्मरतें कीं त्या काळीं स्वामी पुरश्चरण करीत होते म्हणून दुधावरच राहात असत. ते दुसरें कांहींहि खात नव्हते; अितकेंच नव्हे, तर पाणीसुद्धां पीत नव्हते. आम्हांला अशी झोंप आली कीं जणुं निर्विकल्प समाधीच.

---

## आल्मोडा : : १२

आल्मोडा हे हिमालयाच्या अेका शाखेवर बांधलेलें माणसांचें घरटें आहे. आल्मोड्याची हवा आरोग्यासाठीं फार प्रख्यात आहे. दूरदूरचे क्षयरोगी अेप्रिल ते ऑक्टोबरच्या दरम्यान येथें येअून राहातात. चीडच्या झुपकेदार आणि अुंच अुंच झाडांच्या जंगलामधून सूं सूं करीत येणाऱ्या सुगंधी वाऱ्याचें ते सेवन करतात व राणीनौला नांवाच्या अेका झऱ्याचें पाणी पितात. या ऋतूंत वाटेल त्या रस्त्यानें फिरायला जा, या आजारी लोकांचें अेकादें टोळकें जगण्याच्या अिच्छेनें मोठ्या कष्टाने दम टाकीत आणि पोटांत प्राण भरीत असलेलें नजरेस पडायचें. राजयक्ष्म्याची ही फिकी प्रजा आणि आजूबाजूची लावण्यवती सृष्टि यांच्यांतील तफावत परवशता व स्वतंत्रता यांच्यामधील भेदाअितकी दिसे. हें शहर जिल्ह्याचें तसेंच कुमाअू परगण्याचे मुख्य ठिकाण आहे. येथें ब्रिटिश न्यायकचेरी आहे, छावणी आहे. पाद्र्यांच्या तर्फे चाललेलें अेक कॉलेजहि आहे. हे लोक एक मोठी खिस्ती वसाहत करून राहिलेले आहेत. येथून सदतीस मैलांवर नैनीताल नांवाची अेक गंधर्वनगरी असल्यामुळे आल्मोडा गोऱ्यांची वसाहत होण्यापासून बचावलें आहे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं अुठून आम्ही फिरायला गेलों. अुन्हाळ्याचे

दिवस होते. तरीहि आपल्या अिकडच्या हिंवाळ्यापेक्षांसुद्‌धां तिकडे अधिक थंडी होती. आसपासच्या प्रत्येक दरींत पांढरे पांढरे ढग आळशासारखे निजले होते. वर आकाश निरभ्र होतें. अुत्तरेकडे नंदादेवीचें शिखर सूर्याच्या तरुण किरणांच्या योगानें सुवर्णमंदिराप्रमाणें झळकत होतें; जेथें सूर्यकिरण अजून पोंचले नव्हते त्या ठिकाणची अरुणसदृश रक्तिमा अुषेलाहि लाजविण्याजोगी होती. हिमालयाच्या घरीं शिखरांचें दारिद्र्य नाहीं, तरीहि नंदादेवीचें सौंदर्य असें कांहीं आहे, कीं हिमालयालासुद्‌धां त्याबद्‌दल अभिमान वाटत असावा असें वाटतें. आणि म्हणूनच या शिखराची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठीं अेकाद्या अनुचराप्रमाणें नंदाकोटाचें शिखर त्याच्याजवळच अुभें आहे. नंदादेवीचें वर्णन मीं काय करावें ? पूर्वमन्वन्तराच्या मार्कण्डेय ऋषींनीं या देवीचें जें वर्णन केलें आहे, तेंच येथें देणें पुरेसें नाहीं काय ?

**कनकोत्तम कान्तिस्सा सुकान्तिकनकाम्बरा ।**
**देवी कनकवर्णाभा कनकोत्तमभूषणा ।।**

या देवीच्या अुपासनेवर ऋषींची अितकी श्रद्‌धा आहे कीं, ऋषी म्हणतात :

**नन्दा भगवती नाम या भविष्यात नन्दजा ।**
**सा स्तुता पूजिता ध्याता वशीकुर्याज्जगत्त्रयम् ।।**

आम्हांला नंदादेवीच्या दिशेकडेच फिरायला जाणें अुचित वाटलें. हिमालयांत ठिकठिकाणीं देवींचा वास आहे. शाअीदेवी, धूरादेवी, सितोलीदेवी, आणि पाताळदेवी या चार देवी आल्मोड्याच्या चारी दिशांचें रक्षण करतात. हिंदु समाजनेत्यांची दृष्टि कांहीं अद्‌भुत आहे. जीवनाच्या दरेक अंगाशीं ते कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें धर्माचा संबंध जोडून देतात ! आल्मोडा शहर स्वतंत्र राखावयाचें असेल तर आसपासची अुंचवट्याचीं हीं चार स्थानें सुरक्षित राखा म्हणजे,

**सैषा प्रसन्ना वरदा नृणां भवति मुक्तये ।**

आणि या ऋषीवचनाचा अनुभव लोकांना सर्वकाळीं आला आहे. शत्रू चढाअी करून आला म्हणजे सर्व जवानमर्द घराबाहेर पडून या चारी

देवळांच्या ठिकाणीं अेकत्र होत, आणि हीं चारीं स्थानें हातांत आहेत तोंवर बिशाद काय शत्रूची, कीं ते आल्मोड्याच्या चीड किंवा देवदाराच्या काडी-रूपी केसालाहि धक्का लावतील ?

आम्ही अस्कोटच्या रस्त्यानें चीडचें जंगल पाहायला गेलों. मध्यें अेका लहान टेकडीवर तुरुंग दिसला. स्वामींनीं मला सांगितलें कीं, बंगालचे सुप्रसिद्ध पुढारी अश्विनीकुमार दत्त यांना याच तुरुंगांत टेवण्यांत आलें होतें. चीडचें जंगल संपवून आम्ही अखेर बलढौटी नामक डोंगरावर आलों. या स्थानालाच अेके काळीं अिंग्रज सरकारनें ‘ सिमला ’ बनविण्याचा विचार केला होता. स्वामी विवेकानन्द अमेरिकेला जाअून परत आले तेव्हां त्यांनीं याच ठिकाणीं अद्वैताश्रमाची स्थापना करण्याचें ठरविलें होतें; पण ज्या दिवशीं त्यांनीं या स्थानाची सरकारकडे मागणी केली त्याच दिवशीं तिथल्या कमिशनरनें ते स्थान पाद्र्यांना देअून टाकलें असें मीं अैकलें ! बाटविलेल्या पहाडी लोकांची येथें वसाहत आहे. हरखदेव म्हणाला, “ काकाजी, देखिये अिन पादडियोंकी चालाकी ! जब यहाँ के लोगोंका अीसाअी बना लेते हैं, तब अुनको दूसरे प्रांत में ले जाते हैं, और दूसरे प्रांत के बिटलाये हुअे लोगोंको यहाँ लाकर रखते हैं, ताकि समाज के साथ अुनका नाता टूट जाय और लोगोंमें भी अिन पादडिओंके खिलाफ द्वेष पैदा न हो. हमारे प्रांत में से कितने लोग अीसाअी हो गये अिसका पता हमें नहीं लगता, और दूसरे प्रांत के लोगोंको अीसाअी बने हुअे देखकर अुस प्रांतके लिये भी हम में नफरत पैदा होती है ! ” हरखदेवाची ही चाणाक्ष टीका अैकून मला मोठी गंमत वाटली. तेथून आम्ही खालीं पाताळदेवीच्या बाजूला अुतरलों. साडेसात वाजायला आले होते आणि आम्ही जेव्हां अुतरत होतों, तेव्हां दरींत झोपाळलेले ढग शाळेंत जाणाऱ्या मुलाप्रमाणें डोळे चोळीत चोळीत अुत्तरेकडील हिमप्रदेशाच्या शाळेकडे जाअूं लागले होते. पाताळदेवीचें स्थान साधूंना राहाण्यासाठीं विशेष अनुकूल आहे. येथे पुष्कळ अेकान्त आहे. पाण्याचा सुंदर झरा आहे व काळीज थिजवून टाकणाऱ्या पहाडी झंझावातापासून हें स्थान सुरक्षित आहे. पहाडाच्या या बाजूला येथेंच अेक अेकाकी वृक्ष आहे, आणि तो अितका मोठा आहे कीं दूरदूरच्या

पहाडांवरूनहि तो दिसतो. सिंहगडावर तानाजीच्या खिंडीला जें महत्त्व आहे, तेंच येथें या पाताळदेवीच्या स्थानाला आहे. पाताळदेवीहून चढत चढत आम्ही स्वस्थानीं परत आलों. मला भूक अशी कांहीं सपाटून लागली होती, कीं कोंवळे कोंवळे दगड वेंचून खाल्ले असते तर तेसुद्धां पचून गेले असते याविषयीं मला शंका नव्हती.

घरीं नेपाळी भिस्त्यानें पाणी तयार ठेवलें होतें. तें घेअून आम्हीं स्नान केलें. सारा थकवा अुतरला आणि पुनः आणखी दहा मैल चालूं अितका अुत्साह वाटूं लागला. आम्हीं नित्यपाठ पुरा केला. अितक्यांत हरखदेव खायचें घेअून आला. त्यांत ' ओगल ' नांवाच्या अेका जंगली त्रियांच्या पिठाचा शिराहि होता. दुपारीं आम्ही हिल बॉअीज स्कूलचे चालक हरिराम पांडे वकील यांना भेटायला गेलों. हरिराम पांडे अेक सात्त्विक आणि संस्कारी गृहस्थ आहेत. सामान्य आदरसत्काराचीं प्रश्नोत्तरें झाल्यानंतर हिल स्कूलनें सरकारी ग्रँट घ्यावी कीं न घ्यावी याविषयीं त्यांनीं मला सल्ला विचारला. मीं सांगितलें, ' ग्रँट मुळींच न घेण्यांत शहाणपणा आहे. अेवढ्याशा मदतीखातर आपण आपली स्वतंत्रता गमावतों; आणि अिन्स्पेक्टरला खूष करण्याची वृत्ति अेकदां आपल्यांत शिरली कीं प्रजाहित कशांत आहे याचा विचारहि मग राहात नाहीं. सरकारचें धोरण तर स्पष्ट आहे. Your money, our control ! ' पांडे साहेबांना हें शेवटचें सूत्र बरेंच आवडलें आणि त्यांनीं ग्रँट न घेण्याचा निश्चय केला. मग त्यांनीं अत्यंत विनयपूर्वक मला विचारलें, ' आपण, मंडळी साधू होअून फिरतां, त्याअैवजीं समाजसेवा केलीत तर काय वाअीट ? साधू लोकांनीं निष्कारण अिकडेतिकडे फिरून समाजाला भाररूप कां व्हावें ? ' त्यांना काय माहीत, कीं समाजसेवेचें भूत त्यांच्याहून अधिक मला लागलें होतें, आणि त्यांतून सुटण्यासाठींच मी अिकडे हिमालयांत आलों होतों ! समाजसेवा करायलासुद्धां अधिकार लागतो. आज अनधिकारी लोक समाजसेवेचें कार्य हातीं धरून समाजांत जो घोटाळा अुत्पन्न करतात, तें त्यांनीं सोडून दिलें, तरीसुद्धां ती समाजाची मोठ्यांत मोठी सेवा होअील. युरोपांतल्याप्रमाणें आपल्या अिकडेसुद्धां समाजसेवेला धंद्याचें रूप येअील कीं काय अशी भीति वाटते. विलायतेंत अेके काळीं बॅरिस्टर हा अेक मोठा समाजसेवक होता. तोच आज अशिलांचें रक्त शोषून पिणाऱ्या जळूसारखा

होऊन बसला आहे. मीं वकीलसाहेबांना म्हटलें, ' आपण समाजसेवा करीत आहांत त्यांत आपल्याला असा अनुभव आला नाहीं का, कीं कित्येक फुकटचे लोक जर मध्येंच निष्कारण गडबड न करतील तर आपलें काम कमी मेहनतीनें आणि अधिक चांगलें होअील ? ' त्यांनीं अुत्तर दिलें ' अहो, हा अनुभव पदोपदीं येत असतो. सारी शक्ति अशा नालायक लोकांचा विरोध हाणून पाडण्यांतच खर्च होते; आणि शेवटीं माणूस निराशावादी बनतो. ' मीं म्हटलें, ' तर मग या बाबतींत आम्ही लोक तुम्हांला अभयदान देतों, हें काय कमी आहे ? आत्मोन्नति आणि समाजसेवा यांच्यांत विरोध नाहीं; तरी पण असा काल्पनिक विरोध आहे असें मान्य करून मी सांगतों कीं, आत्मोन्नति साधणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य आहे. समाजसेवेसंबंधीं तसें म्हणतां येणार नाहीं. समाज-सेवेंत फारच कुशलता लागते. ती अेक प्रकारचीं कसरत आहे. आपलेंहि पतन होणार नाहीं आणि समाजहि निष्प्राण आणि परावलंबी बनणार नाहीं, हा आदर्श सांभाळूनच समाजसेवा करणें योग्य. नाहीं तर धर्म करतां अधर्माची भर व्हायची. ' पांडेजी कांहीं बोलले नाहींत. कदाचित् त्यांचें समाधानहि झालें असेल. आल्मोड्याच्या हवेसंबंधीं बोलतांना ते म्हणाले, " तुमच्या ' मैदानां ' तील लोकांना सांगा कीं, क्षयरोग नाहींसा करण्यासाठीं येथें यायचें असेल; तर रोगाची सुरुवात असतांनाच येथें येण्यांत लाभ आहे. पुष्कळ लोक शेवटच्या घटकेला येथें येतात आणि अिथली तीक्ष्ण हवा न सोसल्यानें निष्कारण मृत्युमुखीं पडतात. अेवढा माझा संदेश जरूर ' देशां ' तील लोकांना पोंचवा. " पुस्तकांचा मला कंटाळा आला होता; तरीसुद्धां त्यांच्यायेथील ' शब्द कल्पद्रुमा ' च्या मोठमोठ्या भागांवर माझी लोभी नजर ठरल्यावांचून राहिली नाहीं.

परत येतांना आशाबाबू नांवाच्या अेका बंगाली गृहस्थाच्या येथें आम्ही गेलों. ते स्वतः ब्राह्मतानुयायी ( प्रार्थनासमाजी ) होते. त्यांच्याबरोबर वेदान्त, तंत्र, शक्तिपूजा आणि ब्राह्मधर्म यांवर खूप चर्चा झाली; आणि संध्याकाळ होतांच आम्ही ' ग्रॅनाअीट ' टेकडीवर गेलों. तेथून चहूंबाजूंचा देखावा भव्य आणि मनोहर वाटत होता. नन्दादेवीनें संध्याकाळचें पीतवस्त्र धारण केलें होतें; आणि ती संध्येला आशीर्वाद देअून निरोप देत होती. चांदण्या चमकूं

लागल्या; आकाशगंगेंत हंस स्नान करीत होता. पुष्कळ देवहि जलविहार करीत होते. त्यांच्या दर्शनानें पावन होऊन हळूहळू आम्ही खालीं आलों.

घरीं भिस्ती भक्तिभावपूर्वक स्वामींच्याजवळ गीता शिकण्याची वाट पाहात होता. सकाळचा नोकर संध्याकाळीं प्रिय शिष्य झालेला पाहून मला हर्षाचा उमाळा आला. थोड्या वेळानें श्रद्धाधन दरजी साओजीहि आला. या माणसानें जुगारींत आपल्या आयुष्याचें मातेरें केलें होतें. स्वामींच्या सहवासामुळें त्याच्यांत उपरतीचा उदय होऊं लागला होता. मी स्वामींना म्हटलें, " आज ' अपिचेत्सुदुराचारो ' या श्लोकावर प्रवचन करा."

**अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥**

या श्लोकाचें रहस्य स्वामींनीं हिंदींत जेव्हां समजावून दिलें, तेव्हां साओजीचा कंठ दाटला. तो म्हणाला, ' नहीं सामीजी, हम अभी शुद्ध नहीं हुअे । हमको अबभी कभी कभी मोह होता है, पाप हमारे दिलमें घुस आता है। ' माझ्या मनांत विचार आला, ' आपले धर्मोपदेशक दक्षिणेच्या मागें मरत असतात. अशा गरीब लोकांना धर्माची खैरात कोण करील ? आश्वासनाचा बोल कोण अैकवील ? पतितांना अस्पृश्य समजून आपले धर्मोपदेशक स्वतः अलिप्त अस्पृश्य बनले आहेत आणि त्यांनीं हिंदुधर्माचें पतितपावनत्व बुडवून टाकलें आहे. गुहक आणि शबरीला आपले म्हणणाऱ्या रामचंद्राची हीं भरतभूमि राहिली नाहीं. ' अशा विचारांत मी पथारीवर पडलों. बाहेर सूं सूं करीत वाहणारा वारा माझ्या विचाराशीं ताल धरीत होता.

---

## खाकीबावा : : १४

हिमालयांत जाऊन आलेल्या माणसाला सर्वजण अेकच प्रश्न विचारतात, ' तिथें तुम्हांला कोणी साधू–महात्मे भेटले काय ? ' लोक काय समजतात तें मला कळत नाहीं. लोकांना असें का वाटतें कीं, हिमालयांत

झाडांच्याऐवजीं साधू लोकांचेंच जंगल अुगवतें ! मी जसा हिमालयांत गेलों होतों तसेंच पुष्कळ साधू हिमालयांत जातात. जसा तो हॉटेलवाला विशारद तेथें जाअून राहिला आहे, तसे कित्येक साधूहि हिमालयांत जाअून राहतात खरे; पण लोकांना असले साधू नको असतात. तसे साधू तर त्यांच्या घरींदेखील भिक्षा मागायला येतात. त्यांना हवे असतात त्रिकाळज्ञानी, चमत्कार करून दाखविणारे आणि कांहींहि न खातां जगणारे महात्मे ! ज्यांच्या पायां पडतांच मोक्ष मिळेल, किंवा किमयेची अेकादी अजब युक्ति, किंवा कांहीं नसलें तर शेवटीं अेकाद्या रोगावर जडीबुट्टी तरी अनायासें मिळेल ! राजकारणाची गोडी असणारे लोक विचारतात, ' हिंदुस्थानचें भविष्य काय आहे याविषयीं हिमालयांतील साधूंच्याकडून तुम्हांला कांहीं कळलें आहे का ? '

अशा सगळ्या प्रश्नांचें अुत्तर मी एकाच वाक्यांत देअून टाकतों. मी साधूंच्या शोधार्थ हिमालयांत गेलोंच नव्हतों. अुपदेश म्हणून जें कांहीं मला मिळालें होतें, तेवढेंच मला पुरेसें होतें. माझी साधना मलाच करायची होती. परान्न खाअून कोणाचें आश्रित राहणें हें जसें लज्जास्पद आहे. तशीच अेकाद्या साधूंच्या तपश्चर्येमधून भीक मागून अेकादा तुकडा आपल्याला मिळावा आणि त्यावर आपण सुखी व्हावें अशी अिच्छादेखील आध्यात्मिक कंगाली दाखविते. साधूंच्या दर्शनानें आपलें हृदय पवित्र व्हावें, त्यांचें वैराग्य आपल्यांत अुत्पन्न व्हावें, त्यांची अीश्वरावरील निष्ठा आपल्यांत जागावी आणि त्यांच्याअितकीच तपश्चर्या करण्याचें आपल्यांत निश्चयबळ यावें, अशी अिच्छा धरणें योग्य आहे; पण त्यांचा प्रसाद म्हणून आपल्याला कांहीं तरी मिळावें आणि अनायासें, विनाश्रम आपण सुखी व्हावें अशी अिच्छा धरण्यांत पामरताच आहे. तसें पाहिलें तर बाजारांतून भाजी घ्यायच्या वेळीं तोल पुरा झाल्यावर ' दोन-चार बटाटे किंवा मिरच्या वर टाक ' म्हणून मागणारे, देशसेवेविषयीं सामान्य शिपायाची योग्यता असतांना ' माझ्या या सेवेंतून राष्ट्राला स्वातंत्र्य मिळणार असेल तरच मी माझें बलिदान करीन, नाहीं तर नाहीं ' असें म्हणणारे, अिंग्रज लोकांना मागून मागून हैराण करून स्वराज्य मिळवूं अशी अुमेद धरणारे, त्याचप्रमाणें महात्म्यांचा चरणस्पर्श किंवा वस्त्रस्पर्श करून अथवा त्यांचें अुष्टें खाअून त्यांच्या तपश्चर्येचा थोडासा अंश विजेप्रमाणें आपल्यांत सहज यावा

असें अिच्छिणारे, सारे रंक आहेत. मेहनत केल्यावांचून मोक्ष मिळता, तर त्या मोक्षाची किंमत काय ? आणि त्याला मोक्ष तरी कसा म्हणावा ?

साधूंच्याविषयीं आपल्या लोकांत फारच विचित्र समजुती असलेल्या दिसतात. कित्येकांना साधू म्हणजे अेकादी जिवती-जागती जडीबुट्टी अथवा मंत्र असें वाटतें; आणि कित्येकांना ते दुनियेला झुलविणारे, ढोंग करणारे आणि 'फुकटचे खाअून मशीद जवळ करणारे' आळशी ठक वाटतात. कारण काय, तर म्हणे ते कसलीहि समाजसेवा करीत नाहींत, किंवा द्रव्योपार्जनहि करीत नाहींत. अेका राष्ट्रभक्तानें माझ्याजवळ आपली अेक अिच्छा प्रकट केली होती कीं, या साऱ्या साधूंना पकडून त्यांची अेक फौज तयार करावी आणि त्यांना कवायत शिकवून अिंग्रजांशीं लढायला लावावें. साधूंची संख्या बावन्न लाख आहे हें आज हिंदुस्थानांत सर्वांना माहीत झालें आहे, आणि अर्थशास्त्र जाणणाऱ्या आमच्या विद्वान लोकांनीं राष्ट्राच्या शक्तीचा अितका अपव्यय कां म्हणून सहन करावा ? म्हणून या बावन्न लाख साधूंचें काय करावें याच अेका चिंतेनें कित्येक देशहितचिंतक कृश होत आहेत ! संसार असार आहे, त्यांत 'अेक रोटी और दो लंगोटी' चीच गरज ठेवून निर्लेप राहा, आणि हरिनाम घ्या किंवा आत्मचिंतन करा असें म्हणणाऱ्या साधूंना खाकी पोशाख चढवून, त्यांच्या हातांत बंदूक व संगीन देअून आणि कमरपट्ट्याला प्राणघातक दारूगोळ्यांचीं काडतुसें बांधून 'लेफ्ट राअिट लेफ्ट' करीत चालायला लावलें आहे, हें दृश्य हिंदुधर्माचा विजयच दाखवील, नाहीं ?

आजचे साधू आदर्श आहेत असे कोणीच म्हणणार नाहीं. खाकीबाबा नेहमीं म्हणत, 'जैसा जुग वैसा जोगी.' जोगी कांहीं अस्मानांतून अुतरत नाहींत किंवा जमिनींतूनहि अुगवत नाहींत. त्या त्या काळच्या समाजांतूनच ते अुत्पन्न होतात. आपलेच दोष समकालीन साधूंच्यांत अुतरलेले पाहून सांसारिक लोकांना अितकें आश्चर्य कां वाटावें बरें ? साधुवर्गाला सुधारायचें असेल, तर प्रथम समाजालाच सुधारावें लागेल, म्हणजेच प्रत्येकानें स्वतःचें स्वतःलाच सुधारावें लागेल. आपण समजतों कीं सगळे साधू

सारखेच. पण त्यांच्यांत मिसळून कोणी त्यांना तपासलें आहे काय? कित्येक साधूलोकांत तुम्हां संसारी लोकांपेक्षां अधिक खानदानी, अधिक भूतदया, अधिक अुद्यमशीलता असते. त्यांना जितकें दुनियेचें प्रत्यक्ष ज्ञान असतें, तितकें ज्ञान मिळवायला तुमच्या सगळ्या लायब्र्‌या तुम्हीं पालथ्या घातल्या तरी पुरें नाहीं होणार !

अेके दिवशीं सकाळीं आम्ही लवकर अुठून 'ग्रॅनाअीट' टेकडीवर फिरायला गेलों होतों आणि तिथल्या अेका देवदार वृक्षाखालीं बसून अिमर्सनच्या 'सर्कल्स' वर गप्पा मारीत होतों. अितक्यांत अुजव्या बाजूला दूर ढगांनी घेरलेला अेक लहानसा कोट दिसला. मीं स्वामींना विचारलें, 'तें लहान घेटासारखें काय दिसतें आहे? अेकादें देअूळ किंवा साधूंचा आखाडा तर नव्हे?' स्वामी म्हणाले, 'हाच तो खाकीबाबांचा खगमरा कोट. आपण दुपारीं तेथें जाअूं. खाकीबाबा अेक दिव्य पुरुष आहेत. मी पुष्कळ वेळां त्यांच्याकडे जातों. अेकादशीच्या दिवशीं रात्रभर त्यांच्याकडे भजन चालतें. तेथें अेक बंगाली साधु येतो. तो जितका भक्त आहे, तितकाच अप्रतिम गाणारा आहे.'

ठरल्याप्रमाणें दुपारीं आम्ही खाकीबाबांच्या दर्शनाला गेलों. आल्मोड्याच्या पाअूलवाटेवरून अुतरून अेका नौला-(झऱ्या)-पाशीं आम्ही गेलों. त्याचें साखरेसारखें गोड पाणी प्यालों, आणि खगमरा टेकडी चढून 'जगह' मध्यें गेलों. वैराग्यांचें टाअुन प्लॅनिंग पाहाण्यालायक असतें. शहरांतील परस्परांच्या फॅशनचें शेळ्या-मेंढ्यांप्रमाणें अनुकरण करणाऱ्यांसारखे ते अंधानुगामी नसतात. त्यांच्या मठीच्या रचनेंत हेतु असतो. तिचा प्रत्येक भाग साभिप्राय बांधलेला असतो. सर्व रचना अुपयुक्त, प्रमाणबद्ध आणि काव्यमय असते. अैषआरामाची सोय नसतांहि अिमारतींत किती सुंदरता आणतां येते, त्याचें जणुं तेथें अेक प्रदर्शनच असतें.

खाकीबाबा स्वतः जेथें राहात होते, ती अेक अष्टकोनी झोंपडी होती. वर लांकडाच्या लांब लांब फळ्यांचें छप्पर होतें. तें वरच्या बाजूला बर्फ आणि पाअूस यांनीं, आणि आंतल्या बाजूला धुमीच्या धुरानें विवर्ण बनलें

होतें. मध्यें अेक मोठी धुमी धुमसत होती. धुमींत लोखंडाचे दोन-चार चिमटे आणि अेक-दोन त्रिशूळ खुपसून ठेवले होते. जवळच लांकडाची अेक लांब, रुंद आणि जाड फळी होती. तिच्यावर खाकीबावांची भव्य मूर्ति विराजमान झाली होती. आसपास पहाडी लोकांचा शिष्यवृंद बसला होता. धुमीजवळ अेका लोट्यांत पाणी गरम होत होतें. आम्ही आंत गेलों, खालीं वांकून बावांना नमस्कार केला आणि बसलों.

बावांनीं आमचा अत्यंत प्रेमभरानें सत्कार केला. स्वामींनीं त्यांना आमची दोघांची ओळख करून दिली. मी बेळगांवचा आहें असें कळतांच ते अेकदम म्हणाले, 'तुम्ही बेळगांवचे कीं शहापूरचे?' मी चकित झालों. बेळगांव आणि शहापूर जवळ जवळ वसलीं आहेत. दोन्हींमध्यें पुऱ्या अेक मैलाचेंहि अंतर नाहीं. तर मग हिमालयांतल्या या साधूला बेळगांव आणि शहापुरामधल्या भेदाचीसुद्धां माहिती आहे तर! मीं सांगितलें, 'मी शहापूरचा.' खाकीबावा म्हणाले, 'तुमचे शहापूर तर सांगली हद्दींतलें. तें ब्रिटिश राज्यांत नाहीं. तुमच्या तेथें मारवाडी लोकांनीं बालाजीचें मंदिर बांधायला काढलें होतें तें पुरें झालें का?' मीं तिकडची सर्व हकिकत सांगितली. मग मीं काय काय केलें, कुठें कुठें फिरलों हें सर्व त्यांनीं विचारून घेतलें. मी कांहीं कमी फिरलों नव्हतों; तरीसुद्धां ज्या ज्या गांवाचें किंवा शहराचें नांव घ्यावें तिथलेच जणुं स्वतः रहिवासी असावे, अशा रीतीनें तिथली बारीकसारीक माहिती ते सांगत आणि स्वतः विचारीत.'

त्यानंतर आमच्या बुवांची पाळी आली. बुवा रामदासी संप्रदायाचे होते. त्यांचा मठ, त्यांचा संप्रदाय हें सर्व त्यांनीं विचारलें. अेका घटकेंत आम्हीं पाहिलें कीं खाकीबावांचें हिंदुस्थानच्या भूगोलाचें आणि धार्मिक अितिहासाचें ज्ञान 'अिंपीरिअल गॅझेटियर्स'च्या पेक्षां अधिक आहे; आणि हें सारें शाळेंत किंवा कॉलेजांत न जातां, 'रॉयल अेशियाटिक सोसायटी'चा मेंबर न होतां मिळविलेलें होतें. आमचें स्वतःचें ज्ञान जवळ जवळ संपुष्टांत आलेलें पाहून त्यांनीं अधिक प्रश्न विचारून आम्हांला लज्जित करण्याचें सोडून दिलें.

नंतर आम्हीं म्हटलें, ‘आम्हांला गंगोत्तरी, जम्नोत्तरी, केदार, बदरी वगैरेची यात्रा करावयाची आहे. स्वामींना कैलासाला जायचें आहे.’ तेव्हां त्यांनीं हिमालयाच्या सर्व तीर्थस्थानांचें वर्णन सुरू केलें! आम्ही गोंधळांत पडलेलें पाहून त्यांनीं जवळ पडलेली अेक फळी हातांत घेतली आणि पांढऱ्या मातीचा खडू घेअून चट्दिशी कामचलाअू नकाशा काढला. त्यांत बदरीनारायणाला जाण्याचे चार रस्ते दाखविले होते. ते म्हणाले, ‘जास्तींत जास्त रेल्वेचा प्रवास करून कमींत कमी पायीं प्रवास करावयाचा असेल, तर हा रस्ता आहे. खाण्यापिण्याची सोय पाहिजे असेल, तर हा रस्ता आहे; लवकर जायचें असेल; तर हा तिसरा रस्ता आहे. पण या रस्त्यानें तुम्हांला पुरेशी चिल्लर जवळ ठेवावी लागेल. तुमच्या ‘नोटा’ तिथें नाहीं चालायच्या, आणि गरीब लोकांच्याजवळ पुरती चिल्लरहि मिळायची नाहीं.’ चवथा रस्ता त्यांनीं ‘आपला रस्ता’ म्हणून सांगितला. त्यांत जंगलें आणि सृष्टिशोभा हीं जास्तींत जास्त होतीं. हा रस्ता अगदीं निर्मनुष्य होता आणि मनुष्यवस्ती असणाऱ्या अशा दोन ठिकाणांमध्यें कमींत कमी चाळीस चाळीस मैलांचें अंतर होतें.

मीं विचारलें, ‘महाराज आपण बदरीनारायणाला केव्हां गेलां होतां?’ त्यांनीं सांगितलें, ‘सर्व मिळून सतरा वेळां गेलों आहें!’ आमच्या स्वामींना कैलासाला जायचें होतें. तेव्हां मीं बावांना विचारलें, ‘आपण कैलासालाहि जाअून आलां असाल?’ ते म्हणाले, ‘आठ वेळां!’ आणि जणुं त्या रस्त्याचें सगळें दृश्य डोळ्यांसमोर अुभें असावें, तसें ते वर्णन करूं लागले. कैलासच्या वाटेवर राहिलेल्या मोरपंखीबाबा नांवाच्या दरवर्षीं कैलासची यात्रा करणाऱ्या अेका साधूचें वर्णन मग सुरू झालें.

पुढें आम्हीं आजूबाजूच्या प्रदेशांत राहाणाऱ्या सोमबारगिरीबाबांसारख्या दुसऱ्या सत्पुरुषांच्याविषयीं विचारलें. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांचें हवापाणी, तिथलें अन्न, लोकांचे रीतिरिवाज आणि स्वभाव यांविषयीं आपला अनुभव, हें सर्व त्यांनीं सांगितलें. गुजरातच्या धर्मश्रद्धेची त्यांनीं पुष्कळ तारीफ केली; महाराष्ट्राचें आतिथ्य त्यांना विशेष पसंत पडलें होतें. बंगालमधील घाणेरडेपणा आणि तेथें तलावांच्या स्वच्छतेकडे केलें जाणारें दुर्लक्ष यांविषयीं

त्यांनीं तक्रार केली. रामेश्वराकडील देवळांच्या व्यवस्थेंत काय काय अुणीवा आहेत, त्याविषयीं ते बोलले.

मग त्यांनीं आम्हांला चहा घेण्याचा आग्रह केला. हिमालयांतला चहा म्हणजे लिप्टनचा चहा नव्हे; हा तेथल्या तेथेंच उगवलेला असतो आणि तिकडची चहा करण्याची पद्धतहि निराळीच आहे. हिमालयांतील कडक थंडींत हा चहा म्हणजे मोठीच अुपयोगी वस्तु आहे, असें तेथील लोक सांगतात. आम्हीं चहा घेण्याचें नाकारलें; तेव्हां त्यांनीं जवळच्याच अेका टोपलींतले पेढे आम्हांला द्यायला एका सेवकाला सांगितलें. मीं म्हटलें, 'मी साखर खात नाहीं!' ते म्हणाले, 'माझी साखर देशी असते. मी दरवर्षीं कानपुराहून खास साखर मागवून ठेवीत असतों.' (मला मागाहून समजलें कीं खाकीबावांच्या येथें वापरली जाणारी साखर पीलीभितच्या राजा ललिताप्रसादकडून दरवर्षीं खास पाठविलेली आणि गुमास्त्यांच्या खुद्द देखरेखीखालीं कानपूरच्या कारखान्यांत तयार झालेली असे, आणि पोतीं भरून लादून तीं दरसाल अेकाच खेपेंत पहाडावर पोंचवून देण्यांत येत असत.) मीं म्हटलें, 'सहा वर्षेपर्यंत साखरच न खाण्याचें माझें व्रत आहे, तेव्हां माफ करा.' पण बावा काय असे सोडतात थोडेच? लगेच मला खारका आणि बदाम देण्यांत आले आणि फिरून गोष्टी सुरू झाल्या.

बावांनीं लोट्यांतून गरम पाणी प्यायला घेतलें, पण पिण्यापूर्वीं त्याचे दोन-चार थेंब प्रथम अग्नीला अर्पण केले. मला त्याचें थोडेसें नवल वाटलें. तेव्हां स्वामींनीं मला सांगितलें, 'खाकीबावा जें कांहीं खातात किंवा पितात तें प्रथम अग्नीला अर्पण करतात.' खाकीबावा म्हणाले, "आपण तर दिवसांतून अेकच वेळ अेक बाटी बनवून घेत असतों. आज दुपारीं ते पुनः अुद्यां दुपारीं." मीं मनांत म्हटलें, 'तर मग हे पेढे, हे बदाम अन् खारका सारें आमच्यासारख्या अतिथि मंडळींसाठींच वाटतें? धन्य आहे या साधूची! खाकीबावांच्या कमरेला मुंज गवताची अेक दोरी आणि अेक वीत रुंद कौपीन होती. सगळें शरीर भस्मचर्चित होतें. दाढीमिशांचे लांब लांब केस धुमी तापून तापून लाल होअून गेले होते.

यानंतर आजच्या साधूंच्या धर्मोपदेशाविषयीं गोष्टी चालल्या. अिंग्रजी शिकलेले कित्येकजण साधू होतात. ते अिंग्रजींत पुस्तकें लिहितात, व्याख्यानें देत फिरतात, समाजसेवेचे धडे शिकवितात, हें पाहून खाकीबावांची हंसतां हंसतां पुरेवाट होत होती.

ते तडफेनें बोलले, ‘ तुम्ही अिंग्रजी शिकलेले साधू गरिबांची काय सेवा करतां ? दुःखी-कष्टी जीवांना काय सहानुभूति दाखवितां ? ’ अेवढें म्हणून अेकदम समोरच्या धर्मशाळेवर आपली शून्य दृष्टि स्थिर करून स्वगत बोलावें तसें अुद्वेगानें ते बोलले,

‘ साले सुसरे लेक्चरबाजी करते हैं ! अुसमें भी और कोअी विवेकानन्द बननेकी ताकद नहीं । खाली ट्रान्सलेशन करते हैं ! भगवानका नाम लो, कुछ तप करो, बन सके तो भूखेको अन्नदान दो, और अपना काम करो। ये क्या खाली लगाअी है ? ’

स्वामींनीं विचारलें, ‘ आपण या वर्षी बदरीनारायणाला जाणार आहांत का ? ’ त्यांनीं मोठ्या मोठ्या चिरा पडलेले आपल्या पायांचे तळवे दाखविले नि म्हणाले, ‘ अीश्वरानें मला ही सजा दिली आहे. हा बच्चा यात्रेचा भारी शोकी झाला आहे, तेव्हां याला अेके ठिकाणीं बसवून ठेवला पाहिजे, असें समजून अीश्वरानेंच माझ्या पायांची अशी दशा करून टाकली आहे. आतां मला जायचें झालें तर गोणपाटाचे जोडे वापरावे लागतील ! ’

खगमरांत राहून खाकीबावा जी मुकी समाजसेवा करीत असत, त्याची किंमत कोण करूं शकेल ? आजाऱ्यांना ते औषध देत, व्यवहारकुशल आणि निःस्पृह असल्यामुळें, गोंधळलेल्या संसारी जनांना ते सल्ला देत. तहानेल्या-भुकेल्यांचें खगमरांत नेहमीं समाधान होत असे. कोर्टकचेऱ्यांत न तुटणारे भावाभावांचे तंटे त्यांच्या अुपदेशानें तुटत. ते स्वतः योगमार्गी होते आणि शेवटच्या घटकेला पद्मासन घालून प्राण ब्रह्मांडाला पोंचविण्याची त्यांची अभिलाषा होती. दुनियेच्या गडबडींतून ते निवृत्त झाले होते, तरीहि या निवृत्तींतच त्यांनीं सात्त्विक प्रवृत्ति अुभी केली होती. आणि अशा सात्त्विक प्रवृत्तींत असूनहि कमलपत्राप्रमाणें अलिप्त राहण्याचा अद्‌भुत योग त्यांनीं साध्य केला होता.

धर्मांची चर्चा करणाऱ्या आमच्या आधुनिक विद्वानांनीं, मुत्सद्द्यांनीं, समाजसेवकांनीं, अर्थशास्त्रज्ञांनीं साधूंच्यावर टीका करण्यापूर्वीं पूर्वग्रहशून्य निर्मळ वृत्तीनें त्यांच्या जीवनाचा अभ्यास केला पाहिजे. अितर कांहीं नसलें तरी या देशांत कशा रीतीनें राहिलें असतां आरोग्य अुत्तम रीतीनें सांभाळतां येतें, हें दाखविण्याची त्यांची सेवा देशाला आजहि अितकी आदर्शरूप आहे, कीं साधूंच्यावर खर्च होणाऱ्या पैशांचें सार्थक म्हणतां येअील. संसारांत राहून लोकांच्या अधम वृत्तीला पोषण देअून धन मिळविणारे आणि मरायच्या वेळेला प्राण आणि वीर्य नसलेल्या मुलांची फौज मागें ठेवून जाणारे लोक काय समाजाचे हितकारी, आणि साधू लोक मात्र ' अैतखाअू ' ? हा न्याय अजब खरा !

तुमच्या समाजसेवेच्या संस्था पाहा. त्या किती खर्चाळ असतात ! केव्हां केव्हां त्यांच्या व्यवस्थापकांना किती जबरदस्त पगार द्यावा लागतो ! त्यांचे रिपोर्ट आकर्षक करण्यापायींसुद्धां पैशांचा आणि सत्याचा किती व्यय करावा लागतो ! आणि तरीहि पैशाची घालमेलदेखील त्यांपैकीं किती प्रकरणांत होते हें पाहण्यासारखें आहे. अुलट, साधूंच्या मार्फत चालणाऱ्या संस्था बिन-नांवाच्या असतात; त्यांचे रिपोर्ट कधीं बाहेर पडत नाहींत, त्यांचे ' लाअिफ मेंबर ' आणि ' पेट्रन ' असत नाहींत; तरीसुद्धां बव्हंशीं सर्व खर्च काटकसर करूनच करण्यांत येतो, आणि त्यांतील पैन् पै कारणीं लागते.

हिंदुस्थानचें अप्रतिम लोक-साहित्य या साधूंच्या कृपेनेंच जिवंत राहिलें आहे आणि भविष्यकाळींहि राहणार आहे. धार्मिक संस्कृति टिकविण्याला, वाढविण्याला, पसरविण्याला आणि सुधारण्याला जगांत अितकी सुधारलेली, स्वस्त आणि खात्रीलायक व्यवस्था अितर कोठेंहि मिळणार नाहीं.

अैतिहासिक आणि भौगोलिक पुरावे देअून पुस्तकें लिहिणाऱ्या विद्वानांनीं हिंदुस्थानची राष्ट्रीय अेकता सप्रमाण सिद्ध केली असली, तरी ती राष्ट्रीय अेकता अुत्पन्न करण्याचें श्रेय मात्र साधूंनाच आहे. जुन्या काळीं प्रत्येक प्रजाहितदक्ष राजा अेकादा महान् साधु आपल्या राजधानींत आला आहे म्हणतांच त्याच्या दर्शनाला जाअी आणि दूरदूरच्या देशांत काय चाललें आहे, लोकांची काय स्थिति आहे, अित्यादीविषयींची पुरी माहिती

त्याच्याकडून मिळवी आणि तो साधूहि राजाची राजधानी सोडण्याच्या वेळीं राजाला आशीर्वाद द्यायला म्हणून जाऊन त्याच्या राज्यांत आपण जें कांहीं पाहिलें असेल तें साफ सांगून टाकी. अशा रीतीनें दीन, रंक प्रजेच्यासुद्धां तक्रारी अशा निःस्वार्थी वकिलामार्फत राजाकडे पोंचत असत. राजाच्या अंमलदारांवर हा अेक मोठा अंकुश राहात असे; आणि कीर्तीची चाड राखणारा प्रत्येक राजासुद्धां साधूच्या धर्मबुद्धीला पसंत पडेल आणि संतोष होईल अशीच राज्यव्यवस्था ठेवण्याची काळजी घेअी.

साधू जेव्हां खेडेगांवांतून फिरत, तेव्हां ग्रामदेवतेच्या देवळांत किंवा अेकाद्या झाडाखालीं आपली धुमी टाकीत. तेथें त्यांच्याकडून गांवच्या पोरांना गोष्टींच्या द्वारा लोकजीवनाचें आणि भूगोलाचें ज्ञान मिळे; व्यापाऱ्यांना व्यापाराची माहिती मिळे; शूर-वीरांना आपल्या बहाद्दुरीची कदर कोठें होअू शकेल तें समजे; गांवांतील आजीबाअींच्या वैद्यकीय ज्ञानांत भर पडे; दुःखी जनांचे रोग नाहींसे होत; आणि पुष्कळ वेळां गांवांतील जुन्या देवळाचा किंवा धर्मशाळेचा जीर्णोद्धारदेखील होअी. फुलपांखरूं जसें अेका फुलावरून दुसऱ्या फुलावर बसून झाडांना सुफलित करतें, तसें साधूलोक अेका देशामधून दुसऱ्या देशांत विचरून संस्कृतीची देवघेव करणारे वणिग्जन बनतात आणि देशोदेशीं संस्कृतीच्या पेठा अुघडतात. समाजांतील उच्च आणि संस्कारी वर्गाचे लोक गृहलोलुप झाले, संयमाचा स्वाद त्यांच्यांतून लुप्त झाला, आणि त्यामुळें साधुवर्गांतूनसुद्धां चांगले लोक कमी झाले. समाज आळशी, विषयासक्त आणि लोभी बनला; साधूंची कदर न करतां धर्माचें पुण्य खिशांत पडावें अेवढ्याच हेतूनें साधूंचें पालन होअूं लागलें; त्यामुळें त्या वर्गाचेंहि समाजाअितकेंच पतन झालें. आणि आज आपण परक्यांची टीका अैकून त्या वर्गाचा नाश करायला तयार झालों आहों.

अशा प्रकारें आपल्या संस्कृतीची प्रत्येक अुच्च व अुदात्त संस्था प्राणाच्या अभावीं प्रथम आपण कुजूं दिली आणि आज तिला सुधारण्या-अैवजीं तिचा नाश करून आपण असंस्कारी, असंघटित अवस्थेला चिकटूं पाहात आहों. ग्रीस, रोम, अिजिप्त वगैरे राष्ट्रें मरून गेलीं, अेकटें हिंदुस्थान

तेवढें जिवंत राहिलें आहे, असें अभिमानपूर्वक सांगणाऱ्या आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, हिंदुस्थान जिवंत आहे याचा अर्थ, हिंदुस्थान अजून आपल्या जुन्या, तथापि ताज्या ( पुराण* ) संस्कृतीमधून अुत्पन्न झालेल्या संस्था टिकवूं आणि सुधारूं लागलें आहे. या संस्था मोडून टाकल्या, कीं सनातनी हिंदुस्थानानें कबरस्थानांत प्रवेश केलाच म्हणून समजावा.

अशाच तऱ्हेच्या विचारांची डोक्यांत घनचक्कर चालल्यामुळें खगमरा टेकडीवरून आम्ही परत केव्हां फिरलों, वाटेंत लाला बदरीशांनीं काय विचारलें, पोस्टमास्तरांच्या बरोबर दुसरे कोण कोण होते, अिकडे माझें बिलकुल लक्ष गेलें नाहीं. हिमालयाची हवा ध्यानाला अनुकूल आहे; पण त्या ध्यानाचा भंग करणाऱ्या दोन गोष्टी येथें मोठ्या जोरकस आहेत. अेक थंडी आणि दुसरी भूक. दोघींनीं माझ्यावर सारखाच हल्ला चढविल्यामुळें दोघींपासून अेकदमच स्वतःचें रक्षण करण्यासाठीं आम्ही पळत पळत आमच्या स्वयंपाकघरांत प्रवेश केला.

---

# पदमबोरी : : १५

साधूलोकांतसुद्धां जीवनाचे दोन आदर्श असतात. लेक्चरबाजीबद्दल आम्हांला ठपका देणारे खाकीबावा गरिबांना अन्नदान देअून, आजाऱ्यांना औषध देअून आणि अितर अनेक रीतींनें समाजसेवा करीत होते. कित्येक साधू या दोन्ही प्रवृत्तींनादेखील अुपाधिरूप मानतात. साधूनें फक्त आत्मनिष्ठच राहिलें पाहिजे, परोपकारासाठींसुद्धां त्यानें कसल्याहि प्रकारचा परिग्रह करूं नये, असा यांचा आग्रह असतो. त्यांचें सूत्र आहे कीं,

---

* पुरा अपि नवं = पुराणम् ।

धर्मार्थं यस्य वित्तेहा वरं तस्य निरीहता ।
प्रक्षालनात् हि पंकस्य दूरात् अस्पर्शनं वरम् ॥

( वित्त मिळवा आणि दान करा, त्यापेक्षां वित्ताला शिवूंच नये, हें अधिक चांगलें. चिखलांत हात बुडवून धुवून टाकण्यापेक्षां चिखलापासून दूर राहावें हें काय वाअीट ? )

अशा तऱ्हेच्या लोकांत समाजाविषयीं अुदासीनता किंवा दयेचा अभाव असतो असें नाहीं. ते म्हणतात, ' प्रवृत्तीला तुम्ही बरोबर ओळखीत नाहीं. प्रवृत्ति मात्र बंधक आहे; आणि त्यांतहि ती जितकी सात्त्विक तितकी अधिक बंधनकारक. कारण तिचा बंध बंधनासारखा वाटतच नाहीं, आणि लवकर सुटतहि नाहीं. प्रवृत्तीच्याच साधनांनीं तुम्ही दुनियेचें कसें काय कल्याण करणार ? फक्त अुपदेश करायला न जाण्यांतसुद्धां दयेचा अभाव नाहीं. तुमचा अुपदेश पुष्कळ अंशीं निष्फळ जातो, ही गोष्ट प्रवृत्तींत फसलेल्या तुम्हांला दिसत नाहीं. ज्या माणसाला तुमच्या अुपदेशाची जरूर असेल तो आपण होअून तुमच्याकडे येअील, अशी अीश्वरी योजना आहे. तुम्हीं अुपदेश करण्यासाठीं फिरावें किंवा समाजसेवेचा धंदा घेअून बसावें यांत विश्वाची अनादि कालापासून यथातथ रचना करणाऱ्या प्रभूविषयीं किती अश्रद्धा आहे हें तुम्हांला कसें दिसत नाहीं ? प्रसंगवशात् जो अुपदेश करावा लागेल अथवा ज्या कोणाची सेवा करावी लागेल, तेवढी अुत्तम करून मोकळें व्हावें. त्रिगुणांच्या पाशांत तुम्ही असाल तोंवर स्नेह, दया वगैरे सात्त्विक गुण अंगीं बाणण्यासाठीं तुम्ही कांहीं दिवस समाजसेवा करा हवी तर; पण तें साधन आहे, चित्तशुद्धीचा अुपाय आहे; पण त्याच्या योगानें मोहांतून मुक्ति मिळणार नाहीं, अितकें मात्र लक्षांत ठेवा. '

अशा वृत्तीच्या अेका साधूचें दर्शन महद्भाग्यानें आम्हांला झालें. तो प्रसंग आतां देतों.

आल्मोड्याला आम्ही जवळ जवळ पंधरा अेक दिवस राहिलों. पंधरा दिवसांत पुष्कळ पाहिलें, कित्येक सज्जन भेटले, त्यांच्याबरोबर आणि निसर्गाबरोबरहि गप्पागोष्टी केल्या. स्वामी विवेकानन्द येथें ज्यांच्याकडे राहात होते त्यांना भेटून त्यांच्याकडून स्वामीजींच्याविषयीं पुष्कळ माहिती मिळविली. पण तें सारें येथें लिहिणें शक्य नाहीं.

' साधु चलता भला, ' आणि प्रवासवर्णनसुद्धां चट्चट् पुढें चाललें नाहीं, तर कंटाळा यायचा. आम्हांलाहि अुत्तरा-खंडाची यात्रा करायला निघण्याची घाअी होती. तेव्हां अनुकूल समय पाहून आम्ही आल्मोड्याहून निघालों. आल्मोड्याहून परत काठगोदाम, तेथून रेल्वेंत बसून हरद्वार आणि तेथून अुत्तराखंडाची यात्रा; असा क्रम आम्हीं आंखला होता. परत जातांना मुक्तेसरवरून जावें असा आमचा विचार होता. कारण मुक्तेसराजवळ सोमबारगिरीबाबा म्हणून अेक साधु राहात होते; त्यांचें दर्शन घेण्याची मनीषा होती.

सोमबारगिरी ज्या ठिकाणीं राहात असत त्याला पदमबोरी म्हणतात. हें स्थान सर्व दृष्टींनीं काव्यमय आहे. तिन्ही बाजूंना तीन मोठे मोठे पहाड आणि मधून अेक लहानशी नदी वाहात आहे. हे तीन पहाड अितके कांहीं अुंच आणि जवळ जवळ आहेत, कीं नदीच्या कांठीं बसून वर पाहिलें तर आकाशाची विशालता नष्ट होअून तें अेक त्रिकोणाकृति छत असावें असें भासतें !

आम्ही संध्याकाळच्या वेळीं पदमबोरीला जाअून पोंचलों. वाटेंत तो भटक्या मुलगा हरखदेव, गीता शिकणारा भिस्ती, भले वकीलसाहेब हरीराम पांडे, म्हातारा बदरीशा, सद्गदित झालेले साअींजी दरजी आणि म्हातारपणीं झालेल्या पुत्रप्राप्तीच्या आनंदानें वेडावून गेलेला पोस्टमास्तर-या सर्वांविषयीं आम्ही बोलत होतों. अितक्यांत आमचा घोडेवाला ( आमचें सामान अेका घोड्यावर लादलें होतें ) म्हणाला, ' त्या नदीच्या पलीकडे लहान देअूळ दिसतें तेथेंच महाराज राहातात. ' आम्ही प्रथम धर्मशाळेंत गेलों, तेथें सारें सामान व्यवस्थित लावलें आणि बाबाजींच्या दर्शनाला गेलों.

ज्याला दर्शन घ्यायला जायचें असेल, त्यानें हातपाय धुअून शुद्ध व्हावें, असा बाबाजींचा नियम होता; पण ते स्वतः नदीपार राहात असल्या-मुळें हा नियम सहज पाळला जात असे. नदीच्या प्रवाहामध्येंच अेक मोठा फत्तर होता. त्याच्यावर आम्ही हातपाय धुअून बसलों, संध्यावंदन थोडक्यांत आटोपलें आणि पुढें निघालों. पलीकडचा कांठ चढून बाबाजींचें दर्शन

घ्यायला गेलों. बाबाजी तर निसर्गाचीच मूर्ति होते. अेका लंगोटीखेरीज त्यांच्या शरिरावर कांहींच नव्हतें. डोक्यावरच्या केंसांच्या जटा झाल्या होत्या आणि त्यांच्या लहान लहान बटा डोक्यावर आणि कपाळावर खेळत होत्या. हातांत अेक चिलीम होती.

आम्ही गेल्याबरोबर त्यांना भक्तिपूर्वक नमस्कार केला. त्यांनींहि तितक्याच नम्रतेनें अुलट नमस्कार केला आणि देवळाच्या कुंपणाची भिंत होती तिच्यावर आपण जाअून बसले व आम्हांला जवळ येअून बसायला सांगितलें; पण आमच्यानें समान आसनावर कसें बसवणार ? आम्ही खालीं अेक पायरी होती तिच्यावर जाअून बसलों. बाबाजींना हा भेदभाव सहन झाला नाहीं. ते लगेच पायरीवर येअून बसले. आम्ही खालीं अेक चटअी होती तिच्यावर जाअून बसलों. तरीहि बाबाजी हरतात थोडेच ? ते थेट जमिनीवर जाअून बसले ! आतां काय करावें ? आम्हीं चटअी काढून टाकली, तेव्हां बाबाजी म्हणतात, ' प्रभु, मी तर तुमच्यांत अीश्वर पाहात आहें. मी सकाळपासून तुमची वाट पाहात आहें. ब्रह्मा, विष्णु, महेश-- तुम्ही मला दर्शन द्यायला आलां आहां. '

सोमवारगिरींची आमच्याशीं ओळख तर नव्हतीच. आम्ही येणार आहोंत अशी बातमीहि त्यांना कोणी दिली नव्हती. तरी पण सकाळपासूनच ते जवळ बसलेल्या लोकांना सांगत होते कीं, ' आज मला भेटायला कित्येक-जण येणार आहेत, त्यांची मी वाट पाहातों आहें. आणि दुपारपासून ते आपलें स्थान सोडून वारंवार अुठून दूरवर नजर टाकीत आणि निराश झाल्यासारखे पुनः आपल्या जागेवर येअून बसत, असें तिथल्या अेका शेतकऱ्यानें सांगितलें. निराशा झाली तरी ते म्हणत, ' आज ते आलेच पाहिजेत. ' आम्हीं म्हटलें, ' महाराज, आमचा घोडेवाला जरा अुशीरां तयार झाला; नाहीं तर आम्ही येथें केव्हांच पोंचून गेलों असतों. ' मग यात्रेच्या गोष्टी सुरू झाल्या. त्यांनीं स्वतः पुष्कळ यात्रा केली होती, तेव्हां खाकीबावांप्रमाणें हेहि जिवतेजागते विश्वकोश होते. वाटेल त्या प्रांताविषयीं गोष्ट काढा, कीं तपशीलवार वर्णन करायचे. भाषा अर्थात् शुद्ध हिंदी असल्यामुळें हे साधू मूळचे कुठले रहिवाशी याचा कोणाला अदमास नाहीं लागायचा.

तरीसुद्धां खाकीबाबा आणि सोमबारगिरीबाबा यांच्यामध्यें अुत्तर-दक्षिण ध्रुवाअितकें अंतर होतें. दोघे अेकच वेळ खात. लंगोटीखेरीज अितर वस्त्रांची दरकार त्यांना नसे. तरीहि दोघांचें जीवन आणि जीवनाचे आदर्श यांमध्यें फार फरक होता. खाकीबाबा आपला मठ बांधून राहिले होते, तर सोमबारगिरीबाबा फार दिवस अेके ठिकाणीं राहातच नसत. ते म्हणत, ‘ अेकाच ठिकाणीं राहिल्यानें तें स्थान आणि तिथली परिस्थिति यांच्या-विषयीं अेक प्रकारची आसक्ति अुत्पन्न होते. ’ खाकीबाबा अनेक प्रकार-च्या वनस्पती आपल्याजवळ ठेवीत. अतिथि, अभ्यागत, प्रवासी यांना खाअू घालीत, जेवायला घालीत, तर सोमबारगिरीबाबा पक्के अपरिग्रही होते—कांहीं घ्यायचे नाहींत, कांहीं द्यायचे नाहींत. त्यांचें मत असें होतें कीं, ही प्रवृत्ति त्यांच्यासारख्या विरक्त पुरुषांसाठीं नाहीं. खाकीबाबांकडे आम्ही गेलों होतों, तेव्हां त्यांनीं आम्हांला अगोदर मिठाअी दिली होती; पण मी साखर खात नाहीं म्हणतांना सुका मेवा दिला होता. येथें सोमबारगिरी-बाबांनीं आपल्या बाटीमधून अेक अेक तुकडा काढून आम्हांला दिला. अितकें पवित्र अन्न खाण्याचें भाग्य नेहमीं आम्हांला कोठून लाभणार ? त्याचा स्वाद कांहीं औरच होता. खरोखर, अितकी स्वादिष्ट रोटी मीं दुसरीकडे कोठेंहि खाल्लेली नाहीं. सोमबारगिरीबाबांनीं त्याच दिवशीं सकाळीं आसपासच्या दोन-चार खेड्यांत जाअून तिथल्या निष्पाप शेतकऱ्यांकडून भिक्षा मागून ताजी कणीक आणली होती. त्यांत शुद्ध तूप आणि शुद्ध पाणी ओतून जंगलांतल्या लांकडांवर बाबाजींनीं खुद्द आपल्या हातानें बनविलेली ती बाटी—तिच्या पवित्रतेचें आणि तिच्या गोडीचें वर्णन कोण करूं शकेल ? आपल्याच आहारांतील भाग काढून अतिथीला देणें ही सोमबारगिरीबाबांची वृत्ति आणि अतिथीला अनुकूल साधनें संग्रहांत ठेवणें ही खाकीबाबांची वृत्ति. खाकीबाबा स्वदेशी साखरेची गोणी खास कारखान्यांतून मागवीत; तर आम्हीं सोमबारगिरीबाबांजवळ पोंचलों तेव्हां लुच्चेगिरी करून परदेशी साखर वापरल्याबद्दल अेका हलवायाची ते खूप खरडपट्टी काढीत होते.

आम्ही जेव्हां खाकीबाबांच्यासंबंधीं गोष्ट काढली तेव्हां त्यांचें नांव अैकतांच सोमबारगिरीबाबांनीं त्यांच्या नांवाला श्रद्धापूर्वक नमस्कार केला

आणि म्हणाले, ‘ ते अेक साधु आहेत, तपस्वी आहेत, पुष्कळ लोककल्याण करतात.’ आणि मग बोलले, ‘ हां, ते तर राजयोगी आहेत, पुष्कळ प्रवृत्तींत पडतात. मी पडलों निःसंगी माणूस. हें माझें व्याघ्रचर्म आणि हा कमंडलु अितकाच माझा परिग्रह आहे. या ठिकाणीं लोक जास्ती भेटायला येअूं लागले तर अिथूनहि पळ काढूं. हा परिग्रहसुद्धां फेंकून द्यावा असें मनांत येतें ! ’ त्यानंतर त्यांनीं आपल्या ओळखीच्या अनेक साधूंविषयीं सांगितलें, त्यांच्या कार्यपद्धतीची ओळख करून दिली. आणि अशा रीतीनें अप्रत्यक्ष-पणें त्यांनों साधूंतहि भिन्न भिन्न आदर्श कसे असतात, हें दाखवून दिलें.

मीं त्यांना विचारलें, “ आपण लोकांना धर्मोपदेश करतां. मीसुद्धां शाळेंत काम करतों, त्या वेळीं मुलांना ‘ धार्मिक शिक्षण ’ देतों. फरक अितकाच कीं, मी वाचलेल्या गोष्टी सांगतों आणि आपण अनुभवाच्या सांगतां. मला कांहीं तरी सूचना द्या.”

ते म्हणाले, ‘ मला माहीत आहे कीं, तुम्ही मुलांना भगवद्गीता शिकवितां आणि तिचा अर्थ समजावून देतां. त्यांत श्रेय नाहीं. भगवद्गीता जो निवृत्तिधर्म शिकविते त्या धर्माला मोठे झालेलेसुद्धां लायक नसतात; मग मुलें कोठून असणार ? ‘ कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ” यासारखे, किंवा

**कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।**
**अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥**

यासारखे श्लोक मुलांना तुम्ही कसें समजावून देणार ? मुलांच्यापुढें निष्काम कर्माच्या गोष्टी करण्यापूर्वीं तुम्ही सकाम कर्तव्यकर्माची त्यांना चांगली तालीम द्या. तुमच्या वेदान्तानें अनधिकारी मुलें नालायक बनतात, त्यांची संकल्पशक्ति नष्ट होअून जाते, ठरविलेलें पार पाडण्याची शक्ति त्यांच्यांत राहात नाहीं, आणि तीं दिवसभर फुकट बकबकच करीत राहतात. गीतेचा अुपदेश फक्त लायक माणसांनाच करावा.’

ही तर मला अेक नवी दिशा मिळाली. मी पुष्कळ विचार करूं लागलों. मीं विचारलें, “ तर मग मुलांना गीता शिकवूंच नये काय ? ” ते म्हणाले, ‘ छे, छे, माझें तसें म्हणणें नाहीं. मुलांनीं गीतेचे श्लोक जरूर पाठ

करावें. त्यांना निवृत्ति धर्माची दीक्षा देऊं नका अितकेंच मला सांगायचें आहे. '

त्यानंतर अुत्तराखंडाच्या यात्रेसंबंधीं आम्हीं त्यांना खूप विचारून घेतलें. जसजशा गोष्टी वाढत चालल्या तसतशी हे बाबाजी किती अधिकारी पुरुष आहेत, याची जाणीव होत गेली. रात्रीं बराच वेळपर्यंत आम्ही तेथें बसलों आणि शेवटीं वंदन करून परत धर्मशाळेंत आलों. धर्मशाळेंत अितकी कांहीं गर्दी झाली होती कीं आम्ही आमची पथारी पहिल्यानेंच पसरून ठेवली नसती, तर आम्हांला निजण्यापुरतीसुद्धां जागा मिळाली नसती.

सकाळीं लवकर अुठलों आणि पुनः महाराजांचें दर्शन करून निरोप घ्यावा म्हणून त्यांच्याकडे गेलों. बाबाजी ध्यानविसर्जन करून अुठत होते, अितक्यांत आम्ही जाअून पोंचलों. अिकडच्या तिकडच्या गोष्टी करीत होतों, अेवढ्यांत तेथें अेक मुंगुस आलें. बाबाजी म्हणाले, ' भगवद्दर्शन आहे हें ! ' पुढें बाबाजींनीं आम्हांला चहा दिला. मीं म्हटलें, ' मी चहा पीत नाहीं. ' त्यांनीं अुत्तर दिलें, ' हा कांहीं तुमच्या मुलुखांतला चहा नव्हे. हा हिमालयांतला चहा आहे. यांत साखर नाहीं कीं दूध नाहीं. हा थोडा घेतलांत तर प्रवासांतसुद्धां तुम्हांला फायदा होअील. ' अेका बदामाचे तीन तुकडे करून प्रसाद म्हणून त्यांनीं प्रत्येकाला चहांतून अेक अेक तुकडा दिला. दुसरी एक विचित्र वनस्पति ( भांग नव्हे ! ) त्यांनीं चहांत घातली. आम्ही श्रद्धापूर्वक प्रसाद म्हणून तो चहा पिअून टाकला; महाराजांना नमस्कार केला आणि परवानगी मागितली. त्यांनीं प्रेमानें खांद्यावर हात ठेवला आणि म्हटलें, ' सर्वत्र परमात्मा आहे.'

---

## गोवध : : १६

पदमबोरीहून मुक्तेसर.. केवढा फरक ! अुन्नति आणि अवनति ! मागें म्हटल्याप्रमाणें पदमबोरी तीन पहाडांमध्यें अेका पार्वती नदीच्या कांठीं

असलेलें महादेवाचें स्थान आहे. तेथून आम्हांला मुक्तेसरला चढून जायचें होतें. मुक्तेसर कांहीं नाहीं तरी सात हजार फूट अुंचीवर आहे. त्याला मुक्तेसर कां म्हणत असतील याविषयीं आमच्यांत चर्चा झाली. मीं म्हटलें, 'मुक्तीश्वर किंवा मुक्तिकेश्वरावरून हें नांव पडलें असावें.' बुवा म्हणाले, 'तेथें मोत्यांसारखा तलाव असेल, त्यावरून मोतीसर हें नांव पडलें असेल किंवा मौक्तिकेश्वरहि असेल.' आमच्याबरोबर आल्मोड्याचे भटजी होते ते म्हणाले, 'पुष्कळ वेळां नांवें आपलीं साधींच असतात; मग तुमच्यासारखे शास्त्री भाषाकोविद् त्याच नांवांना कांहीं तरी सुंदर रूप देतात.'

मूळ नांव काय होतें तें आपल्याला माहीत नाहीं. येथें तलाव नाहीं, मुक्तेसर महादेव मात्र आहे; तो थेट पर्वताच्या टोंकाला आहे; तेथें भैरव घाटीहि आहे. पदमबोरीहून मुक्तेसरपर्यंत चढायचें म्हणजे पृथ्वीवरून स्वर्गांत जाण्यासारखें आहे. मुक्तेसरचें निसर्ग–दृश्य स्वर्गीय आहे असें म्हटलें तर त्यांत अत्युक्ति तर नाहींच; अुलट अल्पोक्ति मात्र असण्याचा संभव आहे. पण–हल्लीं हिमालयांतसुद्धा 'पण' म्हणण्याचा प्रसंग येत आहे–हें अुत्तुंग स्थान आज नरकाहूनहि अधिक वाईट होअून बसलें आहे! खालीं स्वर्ग आणि वर नरक याला अलंकारशास्त्री कोणता अलंकार म्हणतील?

मुक्तेसर येथें सरकारी बॅक्टेरिऑलॉजिकल डिपार्टमेंट आहे. या खात्यामध्यें भयंकर गोवध चालतो. याचें कारण काय? युरोपियन लष्कराला गोमांस पुरविण्यासाठीं? नाहीं. हिंदुस्थानच्या गरीब गाअी-बैलांवर, क्रूर माणसांचा आहार होण्याव्यतिरिक्त निरनिराळ्या प्रकारच्या रोगांवरील औषध होण्याचेंहि कर्तव्य येअून पडलें आहे! युरोपिअन लोकांना दिसलें कीं, आपले कित्येक घोडे 'रिंडर पेस्ट' नांवाच्या रोगानें मरतात. त्यावर त्यांना बैलाचें रक्त शोषून घेअून त्याची लस तयार करून आपल्या घोड्यांच्या शरिरांत ती घालायची हा अुपाय सांपडला; आणि असे पशू हिंदुस्थानांतच मिळणार! मीं तेथें अेकाकडून अैकलें कीं, सुरुवातीच्या सोळा वर्षांमध्यें सगळ्या जगाला 'रिंडर पेस्ट'ची लस पुरविण्यासाठीं चाळीस हजार बैलांचें रक्त शोषून घेण्यांत आलें होतें! ही रक्त काढण्याची क्रिया अतिशय घातकी असते. बैलाला खाअू घालून चांगलें पुष्ट करतात.

मग अेक नस कापून तिच्यांतून अेक-दोन बालद्या ( बकेट ) रक्त काढून घेतात, मग मलमपट्टी करून जनावराला बरें करतात. थोड्या दिवसांनंतर पुनः पहिल्यासारखें रक्त काढून घेतात. तिसऱ्या खेपेला सर्वच रक्त शोषून घेण्यांत येतें. कारण त्या वेळीं जनावर अितकें निःसत्त्व झालेलें असतें कीं चौथ्या खेपेला त्याच्या शरीरांत औषधासाठीं अुपयोगी पडण्याजोगें रक्ताचें टिपूसहि राहात नाहीं !

मुक्तेसरला आम्ही संध्याकाळीं पोंचलों होतों. तेथें अेका सज्जन गृहस्थाच्या येथें विश्रांति घेतली. भोजनाचा प्रबंध त्यानें अतिशय भक्तिपूर्वक सुंदर प्रकारें केला होता; पण तांदूळ बिलकुल शिजलेच नव्हते ! बोलतां बोलतां असें समजलें कीं, पहाडी लोक असेच तांदूळ पसंत करतात. आम्हांला पहाडी भूक लागली नसती तर अितके तांदूळ चावून पचविण्याची मेहेनत व्यायचें दांतां-पोटांनीं नाकारलेंच असतें. भुज्जी ( भाजी ) फार चवदार झाली होती. त्या सद्‌गृहस्थांच्या दिवाणखान्यांत चहूं बाजूंला भिंतीचा खालचा भाग लाकडाचा होता आणि तोसुद्‌धां तक्क्याप्रमाणें तिरका. या थंड प्रदेशांस भिंतीला टेकून बसायचें असेल, तर अशी कांहीं तरी सोय करणें जरूरीचें असतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तें जंतुशास्त्रखातें पाहायला गेलों. आमचें यजमान आम्हांला सर्व समजावून देत होते. मी तें सारें शून्यमनस्क होअून अैकत होतों. माझ्या दृष्टीसमोर फक्त गोहत्त्येचें कल्पनाचित्रच अुभें होत होतें. त्याच आवारांत अेका टेकडीवर अेक बुरूज होता त्याच्यावर अेक मोठी घंटा टांगलेली होती. मीं विचारलें, ‘ ही कशासाठीं आहे ? ’ त्यांनीं सांगितलें, ‘ जंगलांत आग लागली, कांहीं अपघात झाला अथवा दुसरें कांहीं संकट आलें, तर ही घंटा वाजवायची, म्हणजे लोक जमा होतात. ’ जेथें चाळीस हजार गोकुळांचा संहार होतो त्या ठिकाणीं आणखी दुसऱ्या संकटाची काय जरूरी आहे ? मला वाटलें, या बुरुजावर चढावें आणि ती घंटा वाजवून बावीस कोटी हिंदूंना या ठिकाणीं गोळा करावें; आणि त्यांनीं नाहीं अैकलें, तर हिमालयांत अदृश्यरूपानें विचरणाऱ्या तेहतीस कोटी देवांच्या कानांवर गोमातेचा आर्त नाद घालावा !

हा वेडा विचार मनांत चालला होता, अेवढ्यांत आम्हीं मुक्तेश्वर महादेवापाशीं जाअून पोंचलों. तेथें मात्र मनाला थोडा विरंगुळा मिळाला खरा. मुक्तेश्वर महादेवाजवळ भैरव घाटीचें स्थान आहे. जेथें पहाडावर सर्वांत अुंच शिखर आणि खालीं अेकदम कडा तुटलेला असेल अशा जागेला 'भैरव घाटी' म्हणतात. पूर्वीच्या काळीं आणि आजसुद्धां भैरव संप्रदायी लोक अशा ठिकाणीं कित्येक वेळां भैरवाचा जप करीत करीत वरून खालीं झेप टाकतात. अशा प्रकारें आत्महत्या करण्यांत पाप नाहीं, अुलट मोक्ष आहे असें ते मानतात. असें मानणें हल्लींच्या कायद्याप्रमाणें चुकीचें असेल कदाचित्, पण मानसशास्त्रज्ञांना याच्यामागें असलेलें तत्त्व सहज समजण्याजोगें आहे. संसारांत सर्व बाजूंनीं निराशा झाल्याकारणानें भ्याड बनून माणूस आत्महत्या करतो ती, आणि निसर्गाचें विशाल, अुच्च, अुदात्त व रौद्र सौंदर्य पाहून तदाकार होअून निसर्गांत लीन होअून जावें अशी अिच्छा व्हावी, निसर्गाशीं कोणत्याहि प्रकारचा दुजाभाव सहन न व्हावा, असें वाटून माणूस या क्षुद्र देहाचें बंधन विसरून जातो, आणि अनंतत्वाशीं सात्म्य होण्यासाठीं अुडी घेतो ती, या दोन वस्तू अगदीं भिन्न आहेत. मग दोहोंचा परिणाम अेकच असेना का ! प्रत्येक प्रकारच्या विनाशाला 'मरण' या अेकाच नांवानें आपण संबोधतों; पण ती वस्तु एकच नसते. कित्येक वेळां मरण हा जीवनरूपी नाटकाचा विष्कंभक असतो, तर कित्येक वेळां तें नाटकाचें भरतवाक्य—जीवनाचें साफल्य—असतें.

मनुष्याची आशा दुरंत म्हटली जाते. खरोखरच मनुष्याच्या आशेला मर्यादा नाहीं. मनुष्याची प्रत्येक आशा सफळ करण्याची शक्ति जीवनांत नाहीं. जीवनाच्या विपुल समृद्धीलाहि मर्यादा असते, निदान मनुष्याच्या आशेपुढें जीवन दरिद्री ठरतें; पण मरणाची समृद्धि मात्र सर्व आशेला तृप्त करील अितकी असते. जेथें जीवन थकून जातें, तेथें मरण यशस्वी होतें. जीवन असंख्य वेळां माणसाला निराश करतें; मरणापाशीं निराशा अशी नसतेच.

भैरव घाटीवर आम्ही चढलों, तेथें सुद्धां गोवधाचा विचार डोक्यांतून गेला नव्हता. बिचारे बैल फुकट मरून जातात. अेक प्रकारें पाहतां हा बैलांचा

आत्मयज्ञ स्वात्मार्पणाची पराकाष्ठा सुचवीत होता. हिंदुस्थानच्या जनावरांनीं मरावें आणि सगळ्या दुनियेंतील घोडे, खेंचरें अित्यादि अनेकानेक प्रकारचे प्राणी प्लेगमधून वांचावे हें कांहीं लहानसहान पुण्य नव्हे ! पण हें स्वच्छेनें केलेलें बलिदान आहे थोडेंच ! आज माझा हिंदुस्थानहि अमर्याद आत्मबलिदान करीत आहे; हिंदुस्थानच्या जीवावर ब्रिटिश साम्राज्य टिकलेलें आहे; हिंदुस्थान स्वत: मरून असंख्य लोकांना जगवीत आहे; पण त्याचें पुण्य हिंदुस्थानला लाभत नाहीं. दुर्बलता आणि अज्ञान यांच्यामुळें झालेला त्याग काय कामाचा ? न च तत्प्रेत्य नो अिह ।

बुवांनीं भैरवाच्या लहानशा देवळांतील घंटिका वाजविली आणि परत फिरण्याची आम्हांला सूचना मिळाली.

---

# धर्मशाळेंतील ऋषिकुल ? : : १७

मुक्तेसराहून काठगोदामच्या जुन्या रस्त्यावर आम्ही आलों. भीमतालचें पुनः दर्शन घेतलें आणि हिमालयाचा पहाड अुतरून पुन्हां मानवी सृष्टींत आलों. वाटेंत पूर्वपरिचित ठिकाणें पाहून निराळाच भाव मनांत अुत्पन्न होत होता. आल्मोड्याला जात होतों त्या वेळीं हिमालयाचें तें प्रथमदर्शन होतें. अेवढी विशालता आणि अुत्तुंगता पहिल्याप्रथमच आम्हीं पाहिली होती. परत येतांना हें सर्व परिचितसें वाटत होतें, तरी त्याची गोडी कमी झाली नव्हती. पहिली गोडी अपूर्वतेची होती; या वेळची गोडी परिचयाची होती. जातांना ज्या ज्या झऱ्यांनीं आणि झाडांनीं आमचा सत्कार केला होता, त्यांना फिरून भेटतांना कृतज्ञतेचा अुमाळा आल्याशिवाय कसा राहील ? परिचित झाडांना मी भेटलों, परिचित झऱ्यांचें स्वाभाविक तृषेनें नव्हे, तर प्रेमतृषेनें पान केलें. जातांना ज्या ज्या पुलांवर बसून आम्हीं थकवा काढून टाकला होता, ते पूल पुनः येतांच त्यांच्यावर अेक-दोन मिनिटें न बसलों तर कृतघ्नतेच्या दोषाला पात्र होअूं असेंच वाटे.

वाटेंत स्वामींच्याबरोबर संस्कृत साहित्यावर विवेचन सुरू झालें. मीं म्हटलें, "या गगनचुंबित झाडांच्या झुंडीच्या झुंडी पाहून मला बाणभट्टाच्या साहित्यशैलीचें स्मरण होतें. प्रत्येक ठिकाणीं अपूर्वता आणि अुदात्तता आहे; पण ती गजबजून गेल्यानें आपलें सौंदर्य लपविण्यांतच ती खर्च होअून जाते." मग संस्कृत कवि आणि राजाश्रय हा प्रश्न निघाला. कालिदास राजाश्रयी कवि होता, तर भवभूति लोकाश्रयी कवि झाला. कालिदास पुष्पक विमानांत बसून किंवा मेघाचें वाहन करून विहंगमदृष्टया भारताचें अवलोकन करतो, तर भवभूति वल्कलधारी राम, लक्ष्मण आणि जनकतनया यांच्याबरोबर दण्डकारण्य आणि पंचवटीच्या अरण्यांतून मार्ग काढीत काढीत हळूहळू पायानें चालतो! दोघांच्या शैलींत हाच भेद आहे. भवभूतीची शैली रामकुमाराप्रमाणें 'धीरोद्धता नमयतीव गतिर्धरित्रीम्' तर कालिदासाची वर्णनशैली शकुंतलेच्या भावाप्रमाणें 'न विवृतो मदनो न च संवृतः' सारखी आहे. वनश्री पाहून संस्कृत कवींची आठवण झाली आणि त्यांत लोकाश्रयाचा विचार करतांना राजाश्रयाची निंद्य रीतीनें निंदा करणाऱ्या बिल्हणाची आठवण झाली; पण त्याच क्षणीं स्मरण झालें कीं, संसारापासून विरक्त झालेल्या साधकांना संसृतीचा असला काव्यरस शोभत नाहीं. दुपार झाली होती, सूर्यनारायणानें अेक डोळा जास्ती अुघडला होता. बुवा म्हणाले, 'पिपासितैः काव्यरसो न पीयते।' खालीं दरींत रामगंगा प्रचंड गर्जना करीत धांवत होती, पण शारदीय मेघाप्रमाणें तिचें पाणी आम्हांला दुष्प्राप्य होतें. स्वामी म्हणाले, 'या जंगलाची शोभा पाहून तुला बाणभट्टाच्या कादंबरीचें स्मरण होतें. पण मला तर या रामगंगेच्या डरकाळ्या अैकून मुंबअीच्या कुलाबा स्टेशनांतल्या दहा-वीस अेंजिनांचा गोंगाट आठवतो!'

अेंजिनचें नांव निघालें आणि लगेच स्मरण झालें कीं, निसर्गाची सृष्टि सोडून मानवी सृष्टींत आपण आतां जात आहों. तेव्हां अग्निरथाची वेळ सांभाळली नाहीं, तर चालणार नाहीं. कनवटीचें घड्याळ काढून मीं पाहिलें आणि बुवांना म्हटलें, 'बुवा, धांवा, नाहीं तर आपण वेळेवर काठगोदामला पोंचूं शकणार नाहीं!' तिघेहि पळत सुटलों आणि अगदीं

स्टेशनाच्या जवळ पोंचतों न पोंचतों अितक्यांत आगगाडी ‘ कुअुअुअुअू ’ करीत हंसत हंसत आमच्या पुढून निघून गेली ! थोडक्यांत आमची ट्रेन चुकली. गाडी गेली त्याचें अेवढें वाटलें नाहीं, पण आमची खोटी होअूं नये यासाठीं पुढें धांवत गेलेला आमचा कुली निराश झालेला पाहून आम्हांला दुःख झालें. तरी आम्ही हंसूं लागलों आणि तो कुली म्हणाला, ‘ चला बाबांनो, दिवस अजून पुष्कळ आहे. अिथें बसायचें त्यापेक्षां हलद्वानीला जाअून रात्र तेथेंच काढूं या.’ हलद्वानी काठगोदामहून पहिलें स्टेशन, व्यापाराचें अेक लहानसें ठिकाण आहे. तेथपर्यंत चालत गेलों, तेथें जेवणबिवण केलें आणि स्वप्नसृष्टीवर विराजमान झालों.

स्वप्नसृष्टींत जाण्यापूर्वीं कल्पनासृष्टींत जाण्यासारखा अेक प्रसंग घडला. आम्ही धर्मशाळेंत जागा मिळवून स्वयंपाक करीत होतों. धर्मशाळा म्हणजे विविध जनसमाज. तेथें तिरखंडाच्या गोष्टी चालायच्या. तेथें बैरागी यायचे, व्यापारी यायचे, सरकारी अंमलदार यायचे, जुना जमाना पालटला आहे याची ज्यांना बिलकुल दखल नाहीं असे जुने जमीनदार घोड्यावर जुनें जीन कसून प्रवास करीत यायचे, जुना जमाना या नांवाचें कांहीं होतें कीं नव्हतें याची ज्यांना जाणीवहि नाहीं असे तरणेबांडहि यायचे, भिकारी यायचे आणि भिकाऱ्यांपेक्षां वाअीट असे पोलिसहि यायचे. अशा अनेक प्रकारच्या लोकांशीं नित्य प्रसंग पडल्यामुळें ज्यांचा रुबाब आंबलेल्या दह्यासारखा झाला आहे असे दुकानदार दहीं विकायला जवळ बसलेले असायचेच. धर्मशाळेंत संध्याकाळीं सहा वाजल्यापासून आठ वाजेपर्यंत बहुतेक मारामारीच चालते ! प्रवासी परस्परांबरोबर किंवा आपल्या कुलीबरोबर, गिऱ्हाअिकें दुकानदारांबरोबर, दुकानदाराची बायको आपल्या मुलांबरोबर, पोलिस भिकाऱ्यांच्याबरोबर आणि कुत्रीं परस्परांबरोबर आठ वाजेपर्यंत भांडून घेतात ! आठ वाजतां प्रथम क्षुधा शांत होते, मग चुली शांत होतात; बहुतकरून दिवेहि शांत होतात; ( कारण अेका पैशांत पणती, वात आणि तेल देणाऱ्या दुकानदाराजवळ आठ वाजेपर्यंतचेंच बजेट असतें ) आणि मग विरोध शांत होअून गप्पागोष्टी

सुरू होतात. आठ वाजल्यानंतर अेकदां तह झाला, कीं मग कोणी कोणाबरोबर भांडायचें नाहीं, असा धर्मशाळेचा आंतरराष्ट्रीय कायदा असतो.

लागलीच प्रवाशाप्रवाशांमध्यें संवाद सुरू होतो. वैरागी लोक देश-देशान्तराच्या हकिकती आणि त्याबरोबर आपली टीकाटिप्पणी येथें रुजू करतात. जेथें मुलें असतील तेथें बिरबल–बादशहा यायचेच. बायका नेहमीं यात्रेच्याच गोष्टी बोलायच्या. हिंदुस्थानच्या वाटेल त्या प्रांतांतील स्त्रिया अितर वाटेल त्या प्रांतांतील स्त्रियांबरोबर धर्मशाळेंत गप्पागोष्टी करूं शकतात. भाषेची अडचण सुशिक्षित लोकांनाच असते ! स्त्रिया म्हणजे जुनें जग. तिथले विचार, भावना, समजुती, रिवाज आणि आदर्श सारें अेक. मग गप्पा मारतांना अडचण कशाची ? दोन अिंग्रज भेटले म्हणजे आजची हवा कशी काय आहे याविषयीं बोलतात, तशा स्त्रिया भेटल्या, कीं तुला मुलें किती आहेत, मुलींचीं कुठें कुठें लग्नें झालीं आहेत, मुलींना सुख आहे कीं दुःख, घरच्या म्हातारीनें यात्रा केली कीं नाहीं वगैरे गोष्टीच चालायच्या. दुकानदाराची बायको त्यांत मिसळून आपल्या दुःखाची कहाणी पांच हजार सहाशें बाराव्यांदा अश्रूंसहित आणि कांहींहि संक्षेप न करतां जशीच्या तशीच सांगायची आणि पुष्कळ वेळां हें वर्णन फुकट जात नाहीं. मायाळू प्रवासी–वाअीट दुकानदारानें फसविलेले हे प्रवासी–दुकानदाराच्या बायकोचें दुःख पाहून, त्याचप्रमाणें ती सुद्धां आपल्या-अितकाच दुकानदाराचा द्वेष करते या गोष्टीचें समाधान मानून तिला कांहीं तरी देअून संतुष्ट करून निरोप घेतात ! दुकानदारांचाहि प्रत्येक प्रांताविषयीं अभिप्राय बनलेला असणारच; तो वैराग्यांच्याअितक्याच मोकळेपणानें ते सांगतात; कारण पीनल कोडांतील अेकहि कलम बुवा-बैराग्यांना आणि दुकानदारांना लागूं नसतें !

देशी संस्थानांतले रहिवासी धर्मशाळेंत आले कीं संस्थानांच्या तारतम्याची चर्चा सुरू होते, आणि दरबारांत चालणाऱ्या आंतल्या खटपटीचें नि लटपटीचें रहस्य फक्त ‘ तुम्हांला ’च ते सांगतात. वाटेल त्या माणसापुढें आपल्या दरबारची किंवदन्ती बोलून टाकण्याअितके ते बेअिमान नसतात; पण ‘ तुम्ही ’ तर खानदानी गृहस्थ ! ‘ तुमच्या ’पुढें अशा गोष्टी सांगायला हरकत कसली ?

आमच्या वांट्याला अेक देशाभिमानी, सनातन धर्माभिमानी व्यापारी आले. हस्तिनापुराकडे त्यांचें अेक गुरुकुल होतें. छेः छेः, गुरुकुल नव्हे, ऋषिकुल. गुरुकुल आर्यसमाजी लोकांचें असतें. म्हणून सनातन्यांचें ऋषिकुलच असणार ! वैष्णवांचें आचार्यकुल. वैरागी असतील तर मुनिमण्डल किंवा साधू—आश्रम आणि भटजी महाराजांची संस्था असेल तर ती पंडाकुमार महाविद्यालय ! पण हें सगळें ज्ञान मला हरिद्वारला गेल्यानंतर झालें. हस्तिनापूरचे व्यापारी म्हणाले, “ गेल्या वर्षींच आमचें ऋषिकुल स्थापलें आहे; पण अजून आम्हांला कोणी अध्यापक मिळालेला नाहीं; अेक ब्राह्मण हल्लीं काम चालवतो आहे; पण मुलें त्याला पुरून अुरतील अशीं आहेत. तुमच्यासारखा अेकादा ‘ अिंग्लिश अेज्युकेटेड ’ साधु तिथें आला तर लोकांवर छाप पडेल आणि प्रचाराला गेलों तर फंडहि चांगला जमा होअील. तुम्ही आलांत तर आम्हांला रोज तुमच्या दर्शनाचा लाभ होअील. ‘ भवबंध कट जाय ’ आणि वेडे आर्यसमाजी अुंदरानें आलें खाल्ल्याप्रमाणें गप्प बसतील. आम्हीं ऋषिकुल अेवढ्याकरितांच काढलें. आमच्या येथें दोन आर्यसमाजी प्रचारक आले होते. त्यांनीं सनातन धर्माची निंदा सुरू केली. आमच्याकडे त्यांना अुत्तर देअील असा कोणी पंडित नव्हता, तेव्हां आम्ही अर्जंट तार करून हरद्वारहून तीन सनातनी अुपदेशक मागविले आणि असें कांहीं लढविले, कीं विचारूं नका ! तीन दिवस शास्त्रार्थ झाला ! ” मीं मध्येंच विचारलें, “ कोणत्या मुद्द्यावर ? ” ते म्हणाले, “ अहो, तुमच्या शास्त्रांतलें आम्हांला काय कळतें ? आम्ही थोडेच संस्कृत शिकलों आहों ? पण शेवटीं आर्यसमाजीच गप्प बसले आणि आमची जित झाली; विरुद्ध बाजूचे अुगीचच म्हाणायला लागले, कीं जित आमचीच झाली; पण तुम्हीच सांगा, त्यांची जित झाली असती, तर त्यांचे पंडित मुकाट्यानें बसले असते का ? ”

या महा द्वंद्वयुद्धाचें वर्णन मीं अुदासीनतेनें अैकलें हें पाहून त्यांचा थोडासा विरस झाला. त्यांनीं विचारलें, आपण आर्यसमाजी तर नाहीं ना ? ’ मीं म्हटलें, ‘ नाहीं; मी चांगला कट्टर सनातनी आहें. ’ ते म्हणाले, ‘ तर मग तुम्ही जरूर हस्तिनापुराला या. आम्ही तुम्हांला सुरेखशी कुटी बांधून देअूं. तुमच्यासाठीं खास आचारी ठेवूं; अिंग्रजी वर्तमानपत्रें मागवूं. तुमच्या व्याख्यानाचा आम्हांला लाभ मिळेल. ’ मीं म्हटलें, ‘ दुसरा कांहीं संकल्प

नसता तर कदाचित् मी आलों असतों खरा; पण मला अुत्तराखंडाची यात्रा करायची आहे आणि मग पुरश्चरण करायचें आहे. '

माझे सगळे विचार त्यांना सांगण्याची मला कशी हिंमत होणार? आणि सांगितले तरी त्यांना समजले असते थोडेच ?

दुसऱ्या दिवशीं ' रेल ' मध्यें बसलों आणि निघालों. हिमालयाच्या प्रवासानंतर रेल्वेचा प्रवास केवळ नीरसच नव्हे, तर असह्य होतो. अेक अेक वावराच्या अंतरानें चालणारे आम्ही तिघेजण अर्ध्या बांकावर आंखडून बसलों होतों ! वृक्षाच्या घर्षणध्वनीअैवजीं डब्याच्या आंत प्रवाशांचा कोलाहल अैकूं येत होता ! बरेलीवरून आम्ही लकसरला गेलों आणि गाडी बदलून मध्यरात्रीं हरिद्वारला पोंचलों.

---

## रामकृष्ण सेवाश्रम : : १८

यात्रा केल्यानें पुण्य मिळतें खरें; पण तें वाटेल तशी यात्रा करून नाहीं मिळत. पायीं चालून यात्रा करतो त्याला शेंकडा शंभर टक्के पुण्य मिळतें; माणसाच्या खांद्यावर किंवा पालखींत बसून जातो त्याला चतकर पुण्य; पशूचें वाहन करून जो यात्रेला निघतो त्याचें पुण्य जवळ जवळ नसल्यासारखें; आणि ( आजच्या स्थितींत आणखी अेक कलम जोडलें पाहिजे कीं ) आगगाडींत किंवा मोटारींत बसून यात्रेला जातो त्याला पुण्याअैवजीं पापच लागतें. रेल्वेच्या प्रवासांत कसलीहि अुच्च किंवा धार्मिक भावना वाढीस लागत नाहीं. आज तर रेल्वेचा प्रवास म्हणजे स्वाभिमानाचा नाश. पैसे देअून अेक लेबल घेतलें, कीं तें धारण करून पार्सलासारखें डब्यांत जाअून बसायचें. मुक्कामावर निर्जीव पार्सलें बाहेर फेंकून देतात, आणि आपण आपल्या पायांनीं बाहेर पडतों अेवढाच फरक ! गाडींत बसल्या बसल्या आपण भविष्यकालाकडे जात नाहीं, तर बाहेरचें जग निसासा टाकीत भूतकालाकडे धांवत जात असतें.

दोन माणसांनीं भाग्यवशात् जवळ यावें आणि त्यांच्यांत सद्भाव, प्रेमभाव अुत्पन्न न व्हावा या स्थितीला नरकच म्हटलें पाहिजे. तीर्थस्थानापर्यंत आगगाडी घेअून जाणें हें असुरांचें काम आहे. आगगाडीनें बसून मिळणारें यात्रेचें पुण्य हें गयासुरानें दिलेल्या मोक्षाप्रमाणें आहे. गुजरातनें डाकोर आणि सिद्धपूर तर भ्रष्ट केलेंच आहे; आतां पश्चिमधाम श्रीद्वारकेला भ्रष्ट करण्याचे प्रयास सुरू झाले आहेत ! खरोखरच हें कलियुग आहे. रवीन्द्रनाथ म्हणतात, कलियुग म्हणजे कळ ( यंत्र ) युग. ”

हरिद्वार हे खरोखर गंगाद्वार आहे. भागीरथी गंगा गंगोत्रीमधून निघाली, तेथून महादेवाच्या जटेंत म्हणजेच हिमालयाच्या जंगलांत ती सांपडली. अनेक डोंगरांमधून किंवा टेकड्यांमधून कसाबसा रस्ता काढून ती पुढें सरकते. तिकिट घ्यायच्या निरुंद वाटेंतून लोक पसार होतात त्या वेळीं जशी गर्दी आणि अडचण होते, तशीच अडचण पहाडांत गंगेला होते. अेकादी जंगी मिरवणूक अरुंद गल्लींतून मोठ्या मैदानावर येते आणि मग जसे लोक मोकळेपणानें ‘हुश्श’ करीत अनेक दिशांनीं विखुरतात, तीच दशा हरिद्वारजवळ श्रीगंगाजीची झाली आहे. गोठ्यांतून सुटलेलीं वांसरें स्वतंत्रतेचा अनुभव घेण्याकरितांच जशीं अिकडे तिकडे धांवतात, तशी हरिद्वारहून गंगा नदी अनेक प्रवाहांनीं धांवते, आणि प्रत्येक प्रवाहाचा अुल्हाससुद्धां बालवृत्तीच दाखवितो. नीलधारा कांहींशी गंभीर आहे खरी; पण लहान मुलें आजोबाची पगडी घालून हातांत काठी घेअून मोठ्या गंभीरपणें चालतात, तशीच ही कृत्रिम गंभीरता आहे. नीलधारेला आपली गंभीरता सांभाळतां येत नाहीं. हरिद्वार हें पहाड सोडून मैदानांत जाण्याचें गंगेचें जसें प्रथमद्वार आहे, तसेंच तें प्रवाशांना हिमालयाची यात्रा सुरू करतांना पायथा सोडून पहाडांत प्रवेश करण्याचेंहि द्वार आहे. अुत्तराखंडाची यात्रा येथूनच सुरू झाली असें समजतात. हरिद्वारपर्यंत रेल्वे आहे, तरीहि त्या मानानें हें तीर्थ पुष्कळ स्वच्छ आहे. त्याचें अेक कारण येथील म्युनिसिपालिटीचें कायम अुत्पन्न हें असेल कदाचित्, पण मुख्य कारण म्हणजे हरिद्वार हें साधूंचें स्थान आहे. बैरागी आणि संन्याशी यांच्यांत अितर दोष वाटेल तितके असले तरी ते शारीरिक स्वच्छता पुष्कळ पाळतात यांत शंका नाहीं.

आम्ही रात्रीं दोन वाजतां हरिद्वारला पोंचलों. कोणाची ओळख नव्हती आणि अेकाद्या पंड्याचे पाहुणे होण्याचीहि अिच्छा नव्हती. तेव्हां आम्हीं अगोदरच पत्र लिहून हरिद्वारच्याजवळ कनखल येथें असलेल्या रामकृष्ण सेवाश्रमांत अुतरण्याची व्यवस्था केली होती. रात्रीं दोन वाजतां स्टेशनापासून आश्रमापर्यंत आम्हांला रस्ता कोण दाखविणार? आम्ही अेक कुली केला. त्याला चार आणे द्यायचे कबूल केले आणि अंधारांत निघालों. आम्ही आपसांत बोलतांना अिंग्रजी शब्द वापरीत असलेले अैकून तो कुली म्हणतो, 'Oh! Sir, you are gentleman, I knows English, Sir. I am gentleman coolie, Sir. I have ten years live in Dehradun, Sir.' आम्ही हंसूं लागलों. त्याचा अिंग्रजी वाक्प्रवाह चालला असतांनासुद्धां आम्ही त्याच्याशीं हिंदींतच बोलण्याची अरसिकता किंवा असभ्यता दाखविली! तरी पण आम्हांला अिंग्रजी समजतें ही गोष्ट आतां कशी गुप्त राहाणार? तो आपला अिंग्रजींतच बोलायचा!

सेवाश्रमाजवळ पोंचलों तेव्हां आमचा 'जन्टलमन् कुली' म्हणाला, 'Give me four anna bit, Sir. Copper is very heavy, Sir.' स्वामी लगेच म्हणाले, 'Oh, I see. But certainly it is not heavier than the luggage you brought!'

रात्रीं अडीच वाजतां कुणाला अुठवायचें? आश्रमाच्या अेका रुग्णालयाच्या ओट्यावर आम्ही निजलों. सकाळीं कोणी अुठण्यापूर्वीं चोरासारखें अिकडे तिकडे फिरुन शौचाला जाअून आलों, तोंड धुतलें आणि मठपति स्वामी कल्याणानन्दांना भेटायला गेलों. त्यांनीं प्रेमानें आमचें स्वागत केलें आणि आम्हांला आमचें सामान ठेवण्यासाठीं अेक खोली दाखविली.

स्वामी विवेकानन्द सगळ्या भारतवर्षांत आणि नंतर सगळ्या जगभर फिरुन आले, तेव्हां त्यांना सुचलें कीं या नव्या युगांत साधूंच्यासाठीं नव्या अुपासनेची जरूरी आहे. जिवत्याजागत्या पण भुकेल्या, तहानेल्या, दीन, अपंग किंवा रोगी नारायणाची सेवा करणें हाच आज मोक्षाचा अुत्तम मार्ग आहे आणि तोहि दयाभावानें नव्हे, तर सेवाभावानें; कोणावर अुपकार करण्यासाठीं नव्हे, तर सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल अुपकृत भावनेनें.

स्वामीजींच्या गुरुबंधूंनीं व शिष्यांनीं बनारस, प्रयाग, पुरी, हरिद्वार, मायावती, वृंदावन अित्यादि तीर्थस्थानीं रुग्णालयें किंवा सेवाश्रम स्थापन केले आहेत.

कनखल हरिद्वारचा सेवाश्रम ब्रह्मदेवाच्या सृष्टीप्रमाणें शून्यामधून निर्माण झाला आहे. मायावतीच्या स्वामी स्वरूपानंदांनीं कोठून तरी दोनशें रुपये गोळा केले होते. ते घेअून स्वामी कल्याणानन्द हरिद्वारला आले. त्यांना हिंदी येत नव्हतें, कीं वैद्यकीचेंहि ज्ञान नव्हतें. सरस्वतीचाहि कृपाप्रसाद नसल्यामुळें अजूनसुद्धां ते मुखदुर्बल तर आहेतच. पण त्यांची श्रद्धा अढळ होती. अेक देवदारी पेटी घेअून तिच्यांत कांहीं होमिओपॅथिक औषधें ठेवून अेका झोंपडींत त्यांनीं आपला ' धंदा ' सुरू केला. हळूहळू धंद्यांत बरकत आली. कोणा अेका मारवाड्यानें दहा हजारांची अेक अिमारत बांधून दिली. कल्याणानन्दांनीं वैद्यकीचा अभ्यास केला. त्यांच्या हाताला यश आलें आणि काम निर्वेधपणें चाललें. निश्चयानन्द नावांचे अेक महाराष्ट्रीय संन्यासी त्यांच्या मदतीला आहेत. ते स्वामी विवेकानन्दांचे शिष्य. म्हैसूरच्या बाजूचे मूळचे असल्यानें त्यांना मराठी चांगलेसें बोलतां येत नसलें तरी बंगाली चांगलें येतें. हे गृहस्थसुद्धां मितभाषीच. सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम कर कर करतील, थकवा नांवाची वस्तु त्यांना माहीतच नाहीं ! दहा-पांच प्रश्नांचीं अुत्तरें द्यायचीं असलीं तर मात्र ते थकतात ! त्यांच्या गुरुजींनीं त्यांच्यासाठीं नांव यथार्थ शोधून काढलें आहे.

सेवाश्रमांत शेंकडों रोगी—साधू तसेच गृहस्थ—रोज येतात. त्यांच्यापैकीं जे फार आजारी असतील, त्यांना रुग्णालयांत ठेवून घेतात. क्षयरोग्यांसाठीं स्वतंत्रच अिमारत आहे. धनवान् लोक वाटेल तितकी फी देत असले तरी कल्याणानन्दजी गरीबांना सोडून धनवानांच्या येथें जात नाहींत. आम्ही सेवाश्रमांत गेलों त्या वेळीं रामकृष्ण मिशनचे प्रमुख व श्रीरामकृष्ण परमहंसांचे प्रिय शिष्य स्वामी ब्रह्मानन्द तेथें आले होते. त्यांना ' राखल राजा ' किंवा ' राजा महाराज 'हि म्हणतात. त्यांच्या दर्शनाचा अपूर्व लाभ झाला. दुसरे साधु काशीच्या अद्वैताश्रमाचे मठपति स्वामी शिवानन्दजी. स्वामी विवेकानन्दांनीं त्यांचें नांव ' महापुरुष ' ठेवलें होतें. त्यांच्याकडून रामकृष्ण

परमहंस आणि स्वामी विवेकानन्द यांच्याविषयीं आणि त्यांच्या संघा-( मिशन )-विषयीं पुष्कळ हकीकत अकायला मिळाली. कॉलेजांत असतांना स्वामी विवेकानन्दांचे लेख वाचूनच माझा नास्तिकतेचा ज्वर आणि संशयवादाचा गर्व अुतरला होता; रामकृष्ण परमहंसांना या युगाचे अवतारी पुरुष म्हणून मी मानूं लागलों होतों. अशा स्थितींत रामकृष्ण परमहंसांच्या प्रत्यक्ष सहवासांत आलेल्या पुण्यपुरुषांचें दर्शन माझ्या बाबतींत अतिशय परिणामकारी व्हावें यांत काय आश्चर्य ? स्वामी ब्रह्मानन्दांपाशीं मीं अेकान्त समय मागून घेतला. त्यांच्याकडून पुष्कळ आश्वासन मिळालें. रामकृष्ण मिशनमध्यें मी सामील झालों नाहीं, तरी ते मला आपला मानूं लागले. मलाहि भटक्याला घर मिळाल्यासारखें झालें. हिमालयाची यात्रा करण्याचा माझा संकल्प मीं स्वामी ब्रह्मानन्दांना सांगितला. त्यांनीं आशीर्वाद दिला आणि आम्ही यात्रेच्या तयारीला लागलों.

---

# तयारी : : १९

आम्हांला बदरीनारायणाची यात्रा करायची होती. हरिद्वारहून बदरीनारायण किती दूर आहे, कोणत्या रस्त्यानें जायचें, वाटेंत किती 'पडाव' ( मुक्काम ) येतात, बरोबर काय काय ठेवलें पाहिजे, सामान वाहायला कुली कोठून मिळतात, ते काय घेतात, रस्त्यांत पाहाण्यासारखें काय काय आहे, हें सर्व आम्हांला समजून घ्यायचें होतें. कनखलजवळ सरकारनें अेक बांध घालून गंगा नदीचा प्रवाह अडविला आहे. येथूनच गंगा नदीचा प्रख्यात कालवा कानपुरापर्यंत जातो. रुडकीजवळ सोलाना नांवाची अेक नदी या कालव्याला आडवी येते; पण अेंजिनिअर लोकांनीं सोलाना नदीवर अेक जंगी पूल बांधून सगळा कालवा या पुलावरून पुढें नेला आहे. पण या भगीरथ ( अेंजिनिअरिंग ) कामाचें वर्णन येथें करीत बसत नाहीं.

कनखलजवळच्या बांधापलीकडे अेका बेटांत ‘ दाम्पार ’ आश्रम आहे. तिथल्या स्वामी केशवानन्दांकडून थोडी मदत मिळण्यासारखी असल्यामुळें आम्ही तेथें गेलों. तेथें केशवानन्द भेटले नाहींत, पण झाडींत पिंपळाच्या पारावर बसलेले अेक संन्यासी भेटले. त्यांच्या शरीराची रचना आणि अंगकांति पाहून ते ‘ सुखवस्तु ’ म्हणजे खाअूनपिअून सुखी असावेत असें स्पष्ट दिसत होतें. ते पारावर आरामानें बसले होते. आपलें लांब अुपरणें गुडघे आणि कंबर यांच्या भोंवतीं गुंडाळून त्यांनीं आपल्या शरीराची ‘ रॉकिंग अीझी चेअर ’ (झुलती आरामखुर्ची) केली होती ! या आसनावर बसून तासन्‌तास गप्पा मारल्या तरी माणसाला थकवा यायचा नाहीं, ही याची फलश्रुति आहे. त्यांच्याकडून आम्हांला माहिती कांहीं फारशी मिळाली नाहीं; पण रस्ता बिकट आहे, जाणें कठीण आहे, गेलेले बहुतेक परत येतच नाहींत, अशी त्यांनीं पुष्कळ भीति दाखविली आणि आम्हांला यात्रेचा विचार सोडून देण्याचा पोक्त सल्ला दिला ! तरीहि आमचा निश्चय कायम राहिलेला पाहून त्यांनीं आपला रोख बदलला आणि अेक अुर्दू शेर (दोह्यासारखी कविता) म्हणून दाखविला; त्याचा अर्थ अितकाच होता कीं चंग बांधून अेकादें काम हातीं घेतलेंत, कीं मग मरण आलें तरी सोडूं नका.

हा बहुमोल सल्ला दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून आम्ही परत फिरलों आणि हरिद्‌वारच्या बाजाराचा रस्ता धरला. कोट, सदरा वगैरे वस्तूंचा तर मीं त्याग केलाच होता. शिवलेली वस्तु मला चालण्यासारखी नव्हती. पांघरायला पुरेसें नव्हतें म्हणून अेक कानपुरी शाल आणि दोन मफलर खरेदी केले, आणि अेक पातळसा तवा, अल्युमिनियमची अेक पातेली, झांकणी, अेक बशी, पितळेचा अेक मोठा लोटा आणि अेक लहानसें ताट अितक्या वस्तू खरेदी केल्या. (यात्रेहून परतायच्या वेळीं याच बाजारांत बुरणुसाच्या दोन ‘ घूघ्या ’ चांगल्या मिळाल्या त्या आम्हीं घेतल्या होत्या. ‘ घूघी ’ म्हणजे डोक्यापासून गुडघ्यापर्यंत शरीर झांकेल अशी अिरल्यासारखी बुरणुसाची लांब कुंची. ही शिवलेली नसते.) अितक्यांत मला सुचलें कीं, पावसाळ्याचे दिवस आहेत, आपल्याजवळ अेकादें मेणकापड असलें तर बरें. माझा हा विचार पुष्कळच अुपकारक ठरला. कपडे, अंथरूण सारें बांधून

टाकून त्यावर मेणकापड गुंडाळलें, कीं वाटेल तितका पाऊस पडला असला आणि वाटेल तितके भिजलों असलों तरी रात्रीं आपली आम्हांला अगदीं कोरडी पथारी मिळत असे. क्विनाअिनची बाटली माझ्याजवळ होतीच. मेणबत्त्या, आगपेटी, साबू, पुरेशी चिल्लर आणि बुवांच्यासाठीं अेक भरीव चिव्याची लांब लाठी अितकें आम्हीं बरोबर घेतलें आणि यात्रेकरितां सज्ज झालों.

हरिद्वाराच्या बाहेर भीमगोडाजवळ कुली लोकांचा अड्डा असतो, असें आम्हांला कळलें म्हणून तेथें जाअून कुलींचीहि व्यवस्था केली आणि अेक दिवस हरिद्वार आणि कनखल पाहण्यांत काढून यात्रेचें प्रस्थान ठेवलें. आम्हांला यात्रेला निघण्याची घाअी होती, पण वाचकांना अैकण्याची घाअी नसणारच. ते मला हरिद्वारचें आणि कनखलचें जरा तपशीलवार वर्णन दिल्याखेरीज सोडणार नाहींत. तेव्हां प्रथम त्यासंबंधीं स्वस्थपणें सांगितलें पाहिजे.

---

## गंगाद्वार : : २०

हरिद्वार, कनखल आणि ज्वालापूर या तीन वस्ती मिळून अेक समष्टि होते. हरिद्वार म्हणजे यात्रेकरूंचें नगर, ज्वालापूर पंड्ये लोकांचें धाम, आणि कनखल संन्याशांचें कायमचें शिबिर असें म्हणतां येअील. तिन्ही जवळ जवळ असूनहि वेगवेगळीं आहेत. तिन्ही ठिकाणीं मिश्र वस्ती आहे. तिन्ही ठिकाणीं मोठमोठ्या धर्मशाळा आहेत, सदावर्तें आहेत, आणि विद्यालयेंहि आहेत. तिन्हींत कनखल आणि हरिद्वार हीं दोन जुनीं आहेत आणि पुराणांत दोन्हींचें माहात्म्य पुष्कळ वर्णन केलें आहे. कनखलपासून थोडें दूर नदीपलीकडे आर्यसमाजी लोकांचें प्रख्यात गुरुकुल* आहे; हरिद्वार ते ज्वालापूर या रस्त्यावर सनातन्यांचें ऋषिकुल आहे; आणि खुद्द ज्वालापुरांत ऋषिकुलासारख्या सनातनी 'ढंगाचें'

---

* महापुरानें सारें गुरुकुल वाहून गेल्यामुळें आज ही संस्था गंगेच्या अलीकडच्या तीरावर कनखल येथें आली आहे.

पण आर्यसमाजी मताचें ज्वालापूर महाविद्यालय आहे. तिन्ही संस्थांचा अुद्देश आपापल्या मताप्रमाणें स्वधर्माचा अुद्धार करणारे कट्टे धर्मप्रेमी आणि धर्मोपदेशक तयार करणें हा आहे. तिन्हींना वाटतें कीं, परिणामकारक धर्मोपदेश करण्यासाठीं अिंग्रजी भाषा आणि लौकिक विद्या यांचें परिपूर्ण ज्ञान असलें पाहिजे. ज्या वेळीं मी पहिल्या प्रथम या तिन्ही संस्था पाहून आलों, त्या वेळीं माझ्यावर अशी छाप पडली कीं, तिन्ही संस्थांमध्यें संस्थापक किंवा अध्यापक यांच्यापेक्षां विद्यार्थ्यांच्यांत धार्मिक कडवेपणा कमी आहे, आणि मताग्रहापेक्षां स्वदेशप्रेम अधिक आहे. आर्यधर्मापेक्षां किंवा हिंदुधर्मापेक्षां राष्ट्रधर्माचे संस्कार त्यांच्यावर थोडे अधिक आहेत. प्रवासी म्हणून माझ्यावर झालेली पहिली छापच मी या ठिकाणीं देत आहें. त्यानंतर म्हणजे यात्रा पुरी केल्यानंतर या तिन्ही संस्थांबरोबर माझा परिचय वाढला. त्यांच्याविषयीं सांगण्यासारखें पुष्कळ आहे; पण तें यात्रा-वर्णनांत येतां कामा नये.

अेका संस्थेकडे माझें लक्ष विशेष वेधलें; आणि ती म्हणजे मुनिमंडल-आश्रम. ही संस्था हरद्वार स्टेशन व ऋषिकुल यांच्या मध्यावर आहे. मुनिमंडल-आश्रम हा विद्यालय नाहीं तर अेक प्रकारचें धर्मतत्त्व-संशोधन-मंदिर आहे. येथील धर्मग्रंथ-भांडार सुरेख आहे; अेकान्तांत बसून धर्मचिंतन आणि अध्ययन करणाऱ्या माणसाला पुष्कळ अुपयोगी पडेल, असें तें आहे. या संस्थेंत हरिवंशाची अेक मोठी पोथी आहे. पोथीच्या प्रत्येक पानावर अेक किंवा अधिक सुंदर चित्रें, त्यांच्या आजूबाजूला तऱ्हतऱ्हेच्या सोनेरी वेलबुट्ट्या, अक्षर मोत्याच्या दाण्यासारखें, चित्रकाम जयपुरी पद्धतीचें आणि अत्यंत मनोहर. प्रत्येक चित्राच्या खालीं त्याचा परिचय दिला आहे. तो मात्र मराठी भाषेंत आहे, पण तिची लिपि मराठी पद्धतीची नाहीं. यावरून मला वाटतें कीं हा अपूर्व ग्रंथ कोणा मराठी सरदाराने जयपुरी कारागिराकडून तयार करवून घेतला असावा. मीं बडोद्याचे, जयपुरचे, त्याचप्रमाणें बांकीपूरच्या खुदाबक्ष लायब्ररींतील चित्रसंग्रह पाहिले आहेत. तरीहि या हरिवंशांत दिलेलीं चित्रें आणि विविध प्रसंग पाहून मला अपूर्व आनंद झाला.

हिंदी कारागिरीच्या अव्वल दर्जाच्या वस्तू कुठें कुठें पडल्या असतील, कुठें कुठें कुजत असतील, आणि त्यांपैकीं किती हद्दपारी भोगीत असतील,

याचा विचार मनांत येतांच मन अुद्विग्न झालें. किती तरी ग्रंथ लंडनच्या म्युझियममध्यें किंवा बर्लिन म्युझियममध्यें गेले आहेत, किती तरी चित्रें आणि मूर्ती बोस्टन म्युझियममध्यें आज विराजत आहेत. आपली अशी विटंबना होत असलेली पाहून भारतकला मुक्त कंठानें रडत असेल असा विचार मनांत आला आणि त्याच क्षणीं तोंडांतून केशवसुतांची पुढील ओळ बाहेर पडली :

**‘ देवा रे ! ’ मग ती स्फुंदे**
**‘ अेवढा तरी लाभूं दे. ’**

तिथले साधु लायब्ररेरियन मला विचारूं लागले, ‘ काय म्हणालां ! ’ मीं म्हटलें, ‘ कुछ नहीं स्वामीजी, मैं यही चाहता हूँ कि अैसे रत्न देशके देश में ही रहें । यशोदा जैसी कृष्णका जतन करती थी वैसेही आज अिस हरिवंश का जतन होना चाहिये । ’

या साऱ्या झाल्या थोड्याफार आधुनिक पद्धतीच्या संस्था. जुन्या पद्धतीचे साधूंचे आखाडे, त्यांचे वाडे आणि गुंफा तर येथें हव्या तितक्या आहेत. शीख धर्मशाळा, अुदासी पंथाच्या अिमारती, शांकरपंथाचे दशनामी मठ अशा क्षेत्रांत असायचेच. अहल्याबाअीचें अन्नक्षेत्र पाहायला मी मुद्दाम गेलों होतों. अहल्याबाअी म्हणजे महाराष्ट्राची धर्मश्रद्धा, महाराष्ट्राचें दान-नैपुण्य. अहल्याबाअी म्हणजे महाराष्ट्राची नारीप्रतिष्ठा. या पुण्यश्लोक राणीनें प्रजेचें मातृवत् पालन केलें, वैराग्यसाधनेंत आयुष्य घालविलें, कुशलतेनें राज्याचें रक्षण केलें. आणि आसेतु-हिमाचल तीर्थातीर्थांच्या ठिकाणीं अन्नक्षेत्र स्थापून आपली कीर्ति अजरामर केली. आजसुद्धां अहल्याबाअीच्या नांवानें काशीहून गंगाजलाची कावड भरून रोज रामेश्वराला जात असते. पण यांतली अेकहि गोष्ट अहल्याबाअीनें स्वत:साठीं केली नाहीं. अेका ब्राह्मणानें अहल्या-बाअीच्या स्तुतीचा अेक सुरेख ग्रंथ लिहून अहल्याबाअीला दाखविला. त्या साध्वीनें ब्राह्मणाला दक्षिणा देअून तो ग्रंथ घेतला आणि पाण्यांत बुडवून टाकला !

बुवांनीं मला विचारलें, ‘ हरद्वारांत अहल्याबाअीचें अन्नक्षेत्र आहे असें तुम्हांला कुणीं सांगितलें ? ’ मीं म्हटलें, ‘ हें कुणी सांगायची जरूरच

नाहीं. मला वाटायलाच लागलें कीं, येथें अहल्याबाअीचें अन्नक्षेत्र असलेंच पाहिजे.' मला लहानपणच्या गोष्टी आठवल्या. मीं बुवांना म्हटलें, ' मी लहान होतों तेव्हां गोकर्ण- महाबळेश्वराला गेलों होतों. तेथेंसुद्धां अहल्याबाअीचें अेक अन्नछत्र होतें. आम्ही त्याच्याजवळच अुतरलों होतों. दुपारीं बारा वाजतां अेक भुकेला प्रवासी अन्नक्षेत्रांत आला. काढून ठेवलेलें सोवळें पुनः नेसून या अतिथीला जेवायला घालण्याअितकी श्रद्धा तिथल्या व्यवस्थापकांत नव्हती, म्हणून त्यानें माझ्याकडून जेवायला घालण्याची सोय केली. मी आठ वर्षांचासुद्धां त्या वेळीं नसेन. माझी मुंजहि झाली नव्हती. तेव्हां मी आपला अष्टौप्रहर सोंवळाच ! मीं लगेच कपडे काढले आणि अन्नक्षेत्रांतल्या स्वयंपाकघरांत जाअून अेक पान वाढून आणून अतिथीच्या पुढें ठेवलें आणि पुनः कपडे घालून आअीपाशीं गेलों. मीं आअीला विचारलें, ' हें देअूळ कोणाचें ग ? ' आअीनें अुत्तरादाखल अहल्याबाअीविषयींचें अेक लांब गाणें गाअून दाखविलें. त्या दिवसापासून मी अहल्याबाअीला पूजीत आलों आहें. अहल्याबाअी जातीनें धनगर होती; पण आज गोकर्णांत कट्टे ब्राह्मण अहल्याबाअीच्या मूर्तीची पूजा करतात. '

अरे, पण हरद्वारची गोष्ट सोडून मी गोकर्णांत कुठें अुतरलों ? यात्रा करणारा मनुष्य जसें नेहमीं स्थानान्तर करतो, तशी त्याला विषयान्तर करण्याचीहि संवय असते ! प्रवासी हा गोष्टीवेल्हाळ असायचाच ! हरद्वारच्या वाटेल त्या मठांत तुम्ही जा, तेथें तुम्हांला देशदेशान्तराच्या गोष्टी सांगणारे संन्यासी भेटतील. ज्वालापुरांत कुठलाहि प्रवास न करतां साऱ्या हिंदुस्थानच्या गोष्टी सांगणारे पंड्ये लोक तुम्हांला भेटतील. फरक अितकाच कीं संन्यासी तुमच्याबरोबर निरक्षेप वृत्तीनें बोलतील, तर पंड्ये लोक तुम्ही अर्थसंपन्न असाल तरच तुमच्याशीं बोलतील. मात्र त्यांचें बोलणें अर्थसंपन्न असतेंच असें मानण्याचें कारण नाहीं.

संध्याकाळीं अून कमी झालें कीं गंगेच्या कांठीं घाटावर हजारों-लाखों यात्रेकरू गोळा होतात. मुंबअींत चौपाटीवर जशी गर्दी होते, तशी हरद्वारांत ' हरी की पायरी ' पाशीं लोकांची गर्दी होते. ठिकठिकाणीं साधुसंत आणि धर्मप्रचारक व्याख्यानें देतात, भजन—कीर्तन करतात. फेरीवाले व्यापार

करतात आणि बायका, भिक्षेकरी-साधूंच्याकडून होणारी पीडा सहन करूनसुद्धां, आपली प्रसन्नता सांभाळून गंगेच्या प्रवाहांत दीपदान करतात.

दीपदान हें मुग्ध स्त्रीसंसाराचें अेक अनुपम काव्य आहे. असंख्य जीव जीवनस्रोतावर सुखदुःखांच्या लाटा ओलांडून काव्यपवनाच्या लहरीप्रमाणें अितस्ततः नाचत जातात. कित्येक सुरवातीलाच बुडून जातात, कित्येक कसलाहि अनुभव न घेतां पलीकडच्या कांठाला पोंचतात, कित्येक जोडी जोडी करून जातात, कित्येक आपली लहानशी होडीच अुधळेपणानें जाळून टाकतात, आणि अशा रीतीनें दोन क्षण दीप्ति दाखवून लुप्त होअून जातात! कित्येकजण आपल्या सौम्य तेजाच्या आसपास विवक्षित स्नेहाचा संग्रह ठेवून पुष्कळ दूरवर सहीसलामत जातात आणि अितरांचे दिशादर्शक बनतात. दीपदान हें याचेंच अेक प्रतीक आहे. अेकीकडून असंख्य दीपांची निशृंखल रांग भाग्यस्रोतांत वाहात जाते, आणि दुसरीकडे देवळांतील असंख्य घंटांचा तालबद्ध झंकार वातावरणाला भेदून वर अनंताच्या अुदरांत प्रवेश करतो, आणि गंगामैया अेकमेकांबरोबर भांडून भांडून गुळगुळीत, सुरूप व अहिंसक बनलेल्या गोट्यांशीं खेळंत खेळत हंसत हंसत हें सर्व पाहाते आणि अैकते. काय हें काव्यमय दृश्य! आकाशांत नक्षत्रेंसुद्धां क्षणभर स्तब्ध राहून ही सर्व शोभा न्याहाळतात. आपलें सनातन संगीत बंद ठेवून तारे हा घंटानाद अैकत असतील आणि आपलें दिव्य नर्तन थांबवून दीपमाळेची ती शोभा पाहात असतील. गंगामाअी आपल्या कंठरवानें सांगत असेल कीं, ‘ हिंदुस्थानांत वसलेली देशदेशान्तरांतील अपत्यें माझ्या प्रिय गोट्यांप्रमाणें सहिष्णु आणि अहिंसक होअून अेकत्र नांदतील असें सिद्ध करणारी मी भारताची संस्कृति आहें. ’

चंद्रमा अस्तास गेला आणि आम्हीं गंगेच्या कांठाकांठानें कनखलला येअून पोंचलों. वाटेंत गवताच्या चटयांच्या बनविलेल्या किती तरी झोंपड्या आम्हीं पाहिल्या. या झोंपड्यांची रचना, त्यांचा साधेपणा, सुंदरता आणि टापटीप पाहून मी खूष झालों. साधूंच्यामध्यें घराविषयींची अभिरुचि अुच्च दर्जाची असते आणि आपल्या झोंपड्यांच्या आसपासची स्वच्छताहि ते अतिशय चिकाटीनें राखतात. आधुनिक तिटकारा सोडून देअून तुम्ही

त्यांच्यांत मिसळाल, तर त्यांच्यांत किती तरी खानदानी, बहुश्रुतता व तितिक्षा तुम्हांला दिसेल. साधू लोकांत जशी अेक खोटी कल्पना असते कीं हॅट, स्टॉकिंग आणि चष्मा घातलेले लोक नास्तिक आणि धर्मभ्रष्ट असतात, तसें सुधारलेल्या लोकांनाहि वाटतें कीं, प्रत्येक भगव्या कंथेच्या आंत अेक रिकामटेकड्या, लुच्चा आणि आळशी पाखंडी असतो. बाह्य आकाराची पूजा जशी अज्ञान सुचविते, तसा बाह्य आकारावरून मनांत सांचू दिलेला तिरस्कारहि तितकेंच अज्ञान दाखवितो.

हरद्वारांत सुद्धां अिंग्रजी बोलतां येणाऱ्या साधूंची प्रतिष्ठा जास्त आहे, हें पाहून मला वाअीट तर वाटलेंच; पण आम्हांला अिंग्रजी बोलणाऱ्या साधूपेक्षां आमचा बोजा अुचलणाऱ्या कुलीचीच चिंता अधिक होती; म्हणून कनखलहून दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याची चौकशी करायला आम्ही भीमगोडाकडे गेलों.

---

# प्रस्थान : : २१

हरद्वारहून गंगेच्या कांठाकांठानें गंगोत्रीच्या शोधार्थ अगदीं पहिला यात्रेकरू केव्हां निघाला असेल, याचा अितिहास आपल्याला मिळूं शकेल काय? गंगोत्री, जम्नोत्री, केदार, बद्री, अमरनाथ, खोजरनाथ, मानस सरोवर, राकसताल, अमरकंटक, महाबळेश्वर हीं सारीं तीर्थें नदीचें मूळ शोधण्याच्या नैसर्गिक जिज्ञासेचेंच फळ आहे, असें मला वाटतें. अुत्तरध्रुवाकडे राहाणारी आर्य प्रजा अुष्णता देणारा सूर्य कोठून अुगवतो व कोठें मावळतो हें शोधण्यासाठीं जशी बाहेर पडली असावी आणि चारी खंडांत पसरली असावी, तशीच हिंदुस्थानचीं संतानें नदीचें मूळ शोधतां शोधतां आपल्या ढोरांना बरोबर घेअून किंवा अेकअेकटींच फिरलीं असलीं, तर त्यांत आश्चर्य नाहीं.

यात्रेचा अुद्देश धार्मिक असण्याव्यतिरिक्त लष्करीहि असूं शकतो असें अेकवेळ मीं सांगितलें आहे. लष्करी दृष्टीनें आसपासच्या प्रदेशांत रक्षण करण्याला समर्थ असें अेकादें अुंच स्थान किंवा असंख्य लोकांच्या अुपयोगी पडेल असा जलाशय अेकाद्या लायक किंवा नालायक राजाच्या हातांत असण्यापेक्षां धर्मनिष्ठ प्रजेच्या श्रद्धेचें केंद्र बनला तर सुरक्षित अधिक असें आपल्या आद्य पुरुषांना वाटलें असेल आणि 'धर्मो रक्षति रक्षितः' या सूत्राचें त्या ठिकाणीं प्रत्यक्ष प्रमाण मिळत असेल. केदार आणि बदरी म्हणजे तिब्बतशीं होणाऱ्या व्यापाराचा नेतिघाटकडील रस्ता. हा रस्ता वर्षांतून आठ-नअू महिने बर्फानें झांकलेला असल्यामुळें बंदच असतो. आणि फक्त पावसाळ्याच्या दिवसांत अुघडा असतो. त्याच दिवसांत शांतिमय व्यापार किंवा अशांतिमय चढाअी होअूं शकते. या चार महिन्यांतच जर हजारों यात्रेकरू या रस्त्यानें ये-जा करतील तर स्वाभाविकरीत्या त्या रस्त्याचें रक्षणहि होअील आणि व्यापारहि सहज वाढेल. कैलास आणि मानस सरोवराचेंहि असेंच आहे. लेपु घाट आणि अूंटाधुरा घाट मानस सरोवर व राकसताल यांच्यामधून निघून ग्यानिमा आणि गडतोकसारख्या तिब्बती व्यापाराच्या केंद्रांकडे आपल्याला घेअून जातो. मानस सरोवर आणि कैलासला जाणारा माणूस तेथेंच कैलासवासी झाला नाहीं, तर यात्रेच्या पुण्याबरोबर तिब्बतचे बहुमोल गालिचे आणि अितर वस्तू अवश्य घेअून येअील.

कोड्याबरोबर त्याचें अुत्तरहि दिलेलें असलें, तर जसा प्रयत्नाचा आनंद नाहींसा होतो, तसेंच यात्रेकरूंचें झालें आहे. आज हिमालयाच्या यात्रेंतसुद्धां यात्रेच्या वाटा पुष्कळ अंशीं सोप्या झाल्या आहेत. जुन्या काळीं गंगोत्रीच्या किंवा बदरीनारायणाची यात्रा करणारे लोक आपली मालमत्ता आपल्या मुलांसुलींना वांटून टाकीत, सगळ्या आप्तेष्टांना भेटून त्यांचा निरोप घेत, आणि लढाअीला निघालेल्या शिपायाप्रमाणें मरणाचें आमंत्रण स्वीकारूनच प्रस्थान करीत. त्यांना मरण आलें नाहीं तर तो त्यांचा दोष नाहीं; ती मृत्यूची बेदरकारी म्हणायची! आज बदरीनारायण येथेंसुद्धां यात्रेच्या दिवसांत तार पाठवितां येते आणि मनी ऑर्डरनें पैसे मागवितां येतात.

गंगोत्री-जम्नोत्रीकडे अितकी सोय नाहीं. म्हणूनच त्या ठिकाणीं अजून पुण्यांश शिल्लक राहिला आहे.

* * *

भीमगोडाहून थोडेसें पुढें जातांच आम्हांला कुलींचें ठिकाण सांपडलें. आम्हांला अेकच कुली पाहिजे होता. पण दोन मिळाले. ते म्हणाले,'तुमचा बोजा अेका कुलीपुरता आहे, पण आम्ही दोघे तो घेअूं. तुम्ही आम्हांला अेकाचीच मजुरी द्या म्हणजे झालें!' त्यांना आमची भाषा समजत नव्हती म्हणून स्वामी मराठींत म्हणाले, 'काका, ठीक आहे. याच लोकांना आपण घेअूं. आपल्याला अेकाअैवजीं दोन कुली मिळतात. वाटेंत दोघांना चांगलें खायला घालूं म्हणजे प्राणी खूष राहातील. आपण प्रत्येक मुक्कामाच्या दिवशीं त्यांना खिचडी देअूं. या लोकांना खिचडी म्हणजे शिरापुरीपेक्षांहि जास्त राजविलासी भोजन वाटतें.' आम्ही आमचा बोजा कैरासिंग आणि बादरू यांच्या डोक्यांवर दिला आणि निघालों. चराति चरतो भगः!

---

# हृषीकेशाच्या वाटेवर : : २२

जंगलांतून अेकादी नागीण जावी तशी रेल्वे डाव्या बाजूला भरगच्च झाडींतून निघून डेहराडूनकडे जात होती. जोंपर्यंत ही रेल्वेलाअीन दिसत होती, तोंपर्यंत आपण पवित्र यात्रा करायला निघालों आहोंत असा भाव मनांत येअीना. पण आमच्या रस्त्यानें थोड्याच वेळांत रेल्वेलाअीनशीं असहकार केला आणि अेका सुंदर पुलावरून जाअून तो जंगलांत घुसला. आम्हांला निघतांना थोडासा अुशीर झाला होता, त्यामुळें सत्यनारायणाला पोंचण्यापूर्वीं जवळ जवळ दुपार होअून गेली होती.

येथील देअूळ चांगलें आहे. मंदिरांतील लक्ष्मीनारायणाच्या पांढऱ्या संगमरवरी दगडाच्या मूर्ती प्रेमभाव अुत्पन्न करण्यासारख्या आकर्षक

आहेत. पुजारीबुवा दक्षिणेच्या आशेनें आमच्याकडे टक लावून पाहत होते. लक्ष्मीपति सत्यनारायणापेक्षां आमचें वदनसरोज काय आकर्षक होतें? बिलकुल नाहीं; पण देवळांत अुभ्या असलेल्या संगमरवरी लक्ष्मीपेक्षां आमच्या खिशांत असलेली रौप्यलक्ष्मी त्यांना जास्त आकर्षक वाटत होती! आम्हीं आडावर जाअून हात-पाय धुतले आणि देवळांत जरा विसांवा घेण्यासाठीं जाअून बसलों. तेथें चिरपरिचित गायन स्फुरलें :

**आजिचा सुदीन रे! सुदीन!**
**आमुचा अुदयला भाग्याचा**
**आमुचा अुदयला भाग्याचा**
**आमुचा अुदयला भाग्याचा**

**लक्ष्मीनारायण पाहिला**
**दयाघन देव वैकुंठींचा**
**दयाघन देव वैकुंठींचा**
**दयाघन देव वैकुंठींचा**

लोकगीताच्या रागांत तारस्वरानें गाणाऱ्या माझ्यासारख्या संगीत-शत्रूचा साद अैकून कित्येक लोक तेथें गोळा झाले! माझी तार तुटली आणि लाजेनें फजीत पावलेला चेहरा घेअून मी बाहेर झटकलों.

तेथून जरा पुढें गेलों, तेथें अेक लहानसा झरा वाहात होता आणि आजूबाजूच्या झाडींत कित्येक लोक पाकक्रिया सिद्ध करीत होते. आम्हींहि अेक पाकानुकूल स्थान शोधून काढलें आणि चुल्लिकेची अुपासना सुरू केली. रांधण्याचा मक्ता बुवांनीं घेतलेला, कारण ते 'स्वयं'पाकी होते आणि त्यांत आणखी दक्षिणी देशस्थ कडकडीत ब्राह्मण. स्वामींच्या किंवा माझ्या हातचें त्यांना चालायचें नाहीं. तेव्हां आम्हांला कायमची अेक मोठी मोकळीक मिळाली होती. स्वामी लांकूडफांट्याची व्यवस्था करीत, मी चूल पेटवून तयार करून देअी; जरूर पडली तर बाजारहाट करण्याचें कामहि स्वामींचेंच. प्रत्येक मुक्कामाला सामान सोडायचें आणि पुनः बांधायचें या कौशल्यांत मी सर्वांत प्रवीण. (या कामांतहि कौशल्य असतें.)

आणि बुवा स्वयंपाक करीत, तोंपर्यंत आम्ही दोघे त्यांना कांहीं तरी सुरेख वाचून दाखवीत असूं.

स्वामींच्याजवळ थोरोचे निबंध होते, त्यांतुन त्यांनीं आज नैसर्गिक माणसाचें वर्णन वाचण्यासाठीं पसंत केलें होतें. माझी अेक हात रुंदीची गवती चटअी घेअून दगडावर पसरून स्वामी तीवर विराजमान झाले. गवताची चटअी जंगलांतील दगडावर काय टिकणार? स्वामींनीं नैसर्गिक माणूस बनून माझ्या लाडक्या चटअीशीं क्रूरता दाखविलेली पाहून मी चिडलों. मीं त्यांना अुठायला सांगितलें; पण जे स्वामी असतात ते काय सांगितलेलें अैकतात? मी चांगलाच चिडलों होतों. मी त्यांचा पाय धरून ओढायचा विचार करीत होतों! अितक्यांत अेक खुळ्यासारखा माणूस आमच्याजवळ आला. त्यानें जवळच्या झऱ्याचें पाणी घेअून आमचे पाय भिजविले, आणि 'अद्य मे सफलं जन्म अद्य मे सफलाः क्रियाः' म्हणूं लागला. स्वामींनीं त्याला कांहीं तरी देअून घालविलें आणि आम्ही जेवायला बसलों. बुवा वाढीत तेव्हां आअीप्रमाणें प्रेमानें वाढीत. आम्ही जेवलों, थोडा विसांवा घेतला आणि पुढें निघालों.

रस्त्यानें कैरासिंगानें गंभीरतेनें आम्हांला सांगितलें, 'याच वेगानें चाललांत तर आम्हांला जमायचें नाहीं. अशा रीतीनें तर चार महिन्यांतहि प्रवास संपणार नाहीं. मजुरीचे सर्व पैसे खाण्यापिण्यांतच खर्च होतील. मग घराकडे वर्षाची कमाअी काय घेअून जावी?' त्या बिचाऱ्यांना काय माहीत कीं थोड्याच दिवसांत आमची गति अितकी वाढायची होती, कीं आमच्यामागें पळतां पळतां नाकीं नअू येतील! संध्याकाळ होतांच आम्ही ऋषीकेश येथें बाबा काली-कमलीवाल्यांच्या धर्मशाळेंत जाअून पोंचलों.

---

## साधूंचें माहेर : : २३

कोणा निराश झालेल्या व्यापाऱ्याला अेका संन्याशानें आशीर्वाद आणि अुत्साह देअून पुनः धंद्यांत घातलें. व्यापाऱ्याचें भाग्य धंद्यांत

अुघडलें. व्यापाऱ्यानें देअूं केलेली कृतज्ञतेची भेट स्वीकारण्याचें संन्याशानें नाकारलें आणि सांगितलें, ‘ तुला पैसा खर्च करायचा असेल, तर हिमालयाच्या यात्रेकरूंचें दुःख दूर करून त्यांची सर्व सोय करून देण्यांत तो खर्च कर. ’ व्यापाऱ्यानें हृषीकेशहून बदरीनारायणापर्यंत यात्रेकरूंसाठीं मोठमोठ्या सोयी निर्माण केल्या. संन्याशानें त्या सर्वांवर देखरेख ठेवण्याचें आपल्या माथ्यावर घेतलें. संन्यासी स्वतः अितका विरक्त, कीं आपल्या देखरेखीखालच्या कोणत्याहि अन्नक्षेत्रांत जेवायचें, तर तत्पूर्वी अमुक अितक्या घागरी पाणी आणून छत्राच्या हौदांत भरल्याखेरीज तो राहायचा नाहीं ! या संन्याशानें ‘ पक्षपातरहित अनुभवप्रकाश ’ नांवाचा अेक ग्रंथहि लिहिला आहे. संन्याशाची कफनी काळ्या कांबळ्याची बनविलेली होती, म्हणून त्याचें नांव ‘ बाबा काली-कमलीवाले ’ असें पडलें होतें.

संध्याकाळीं आम्ही हृषीकेशला गेलों, ते या काली-कमलीवाल्यांच्या धर्मशाळेंतच. महाराष्ट्रांतहि धर्मशाळा असतात; पण तेथें अिमारत सांभाळण्या-व्यतिरिक्त रखवालदाराला कांहीं फारसें काम नसतें. पंजाबकडे धर्मशाळा ही संस्थाच निराळ्या प्रकारची आहे. शीख लोकांचे ग्रंथसाहेब ज्या ठिकाणीं ठेवतात आणि वाचतात, त्याला तिकडे ‘ धर्मशाळा ’ म्हणतात. मुळांत हाच अर्थ बरोबर आहे. अशा गुरुद्वारांत किंवा धर्मशाळेंत यात्रेकरू आणि अतिथि आले तर सुखानें राहूं शकतात. धर्मशाळेचे साधू किंवा व्यवस्थापक त्यांच्या सुखसोयींकडे विशेष लक्ष देतात.

या आतिथ्याचें प्रमाण आपली समजूत किंवा अपेक्षा असते त्यापेक्षां अधिक असल्यामुळें पहिल्या अनुभवाला मी चांगलाच गोंधळलों. आम्ही धर्मशाळेंत जातांच जणुं आमंत्रित पाहुणे असल्याप्रमाणें आमचें प्रसन्नवदनानें स्वागत झालें. अुजव्या बाजूच्या माडीवर आम्हांला अेक खोली देण्यांत आली. अेक माणूस येअून तेथें दिवा लावून गेला. दुसऱ्यानें येअून विचारलें, ‘ काय काय भांडीं लागतील ? ’ आमची घेण्याची तयारी असती तर आम्हांला शिधाहि मिळाला असता. अशा प्रकारच्या स्वागताची कल्पनाहि नसल्यामुळें मी गोंधळून अेका कोपऱ्यांत जाअून बसलों. स्वामींना अनोळखी समाजांत चांगलें मिसळतां येतें. बुवांना आणि मला हिंदी येत

नव्हतें हीहि आम्हांला अेक अडचण होती. तेव्हां फिरण्यासवरण्याचें काम सहजच स्वामींकडे आलें. आमचे म्होरके तेच झाले. सगळ्या यात्रेंत त्यांनीं हें काम योग्यतापूर्वक बजावलें. कांहीं कांहीं वेळेला त्यांच्या अुत्साहातिरेका-मुळें आम्हांला सहनहि करावें लागत असे; तरी पण अेकंदरींत त्यांच्या पुढारीपणामुळें आमची सोय आणि शांति पुष्कळ सांभाळली जात असे.

बुवांनीं स्वयंपाक केला. लांकडाच्या धुरानें चांगलाच सासूपणा गाजविल्यामुळें मुक्या सुनेप्रमाणें बुवांनीं पुष्कळ रडून घेतलें होतें ! आम्ही तिथे जेवलों. जेव्हां मुख्य व्यवस्थापक संन्यासी आम्हांला कुशल प्रश्न आणि काय पाहिजे-नको विचारायला आले, तेव्हां त्यांना अुत्तर द्यायचें मुखत्यार-पत्र स्वामींना देअून मी स्वस्थपणें झोंपलों. धर्मशाळेंत अितके कांहीं यात्रेकरू गोळा झाले होते, कीं तिसऱ्या वर्गाच्या मुशाफरखान्याअितकीच तेथें गडबड होती. तेव्हां आजूबाजूला फिरण्याची किंवा निरीक्षण करण्याची अेवढीशी सुद्‌धां अिच्छा झाली नाहीं.

सकाळीं अुठल्याबरोबर स्वामींनीं रात्रीं मिळविलेली किती तरी माहिती आमच्यापुढें वाढली. येथें अितक्या धर्मशाळा आहेत, अितकीं अन्नछत्रें आहेत, जवळच ‘ झाडी ’ नांवाचें बोरीचें बन आहे, त्यांत साधू झोंपड्या बांधून राहातात, पंजाबी धर्मशाळेचें अुत्पन्न पुष्कळ आहे, वगैरे सगळें त्यांनीं सांगितलें. अुठून शौचाला जाअून आलों तों हातपाय धुण्यासाठीं पाणी घालायलासुद्‌धां अेक माणूस अुभा ! यात्रेकरूंची अितकी बरदास्त चांगली नव्हे, असें त्या वेळीं मला वाटलें होतें. तें माझें मत आजहि कायम आहे.

आपल्या काव्यांत, पुराणांत किंवा हल्लींच्या कादंबऱ्यांत शौचविधीचा अुल्लेख कोठेंहि येत नाहीं. स्मृतिवचनांच्या बाहेर जणुं काय या वस्तूला स्थानच नाहीं ! या धर्मशाळेच्या आसपासदेखील या आवश्यक विधीसाठीं अेकादी खास जागा किंवा सोय केलेली नव्हती. बाकी सगळ्या सोयी वाजवी-पेक्षां जास्ती; पण ही नैसर्गिक गरज मात्र निसर्गावरच सोडून दिलेली ! तेव्हां मीं मनांत विचार केला, मी जर संन्यासी झालों आणि माझ्या आशीर्वादानें जर अेकादा निराश झालेला व्यापारी कोट्यधीश झाला तर त्याला पुण्याअीचा मार्ग म्हणून मी असेंच सुचवीन कीं, तूं नवीन धर्मशाळा बांधूं नकोस;

हिंदुस्थानांत जेथें जेथें धर्मशाळा असतील तेथें तेथें शौचविधीसाठीं आदर्श-स्थानें बांध. असें केल्यानें तूं तर स्वर्गाला जाशीलच; पण देशाच्या लाखों यात्रेकरूंना सकाळच्या नरकांतून वांचविशील !' मला बनारसच्या तैलिंग स्वामींची आठवण झाली.

हृषीकेशच्या भूमीवर रामचंद्राचा भाऊ भरत याची मालकी दिसते. साधूंना झोंपडी बांधायची असेल तर भरत-मंदिराच्या व्यवस्थापकाची परवानगी घ्यावी लागते. भरताचें दर्शन घेऊन आम्ही रस्त्याला लागलों.

कोणत्याहि ठिकाणीं पुष्कळ वेळां गेलें तर प्रथमदर्शनाचें कौमार्य नष्ट होतें. पण काली-कमलीवाल्यांच्या धर्मशाळेंत त्यानंतर अनेक वेळां मी गेलों आहें. तरीसुद्धां पहिल्या दिवसाचें स्मरण आज तितकेंच ताजें आणि नवीन आहे.

अेकीकडे पहाडांतील झाडी आणि दुसरीकडे गंगेचें पात्र अशी शोभा पाहात पाहात आम्ही निघालों. तों डाव्या बाजूला धनराजगिरींचा वाडा आला. याचें ठेवलेलें नांव ' कैलास कीर्ति आश्रम ' असें आहे; पण तो ' धनराज-गिरींची कोठी म्हणूनच ओळखला जातो. विद्वान् संन्याशांचें हें वेदान्ताचें कॉलेज आहे, असें सांगितलें असतां त्याची पुरती कल्पना येअील. अत्यंत प्राचीन काळापासून संन्याशांनीं हा गंगातट ध्यान-अध्ययनाकरितां पसंत केला आहे. येथें अन्नछत्रें स्थापन होण्यापूर्वीं साधू लोक सकाळची साधना पुरी करून अकरा मैल चालून भिक्षेसाठीं हरद्वारला जात; आणि तेथून तितकेच मैल परत येअून पुनः आपल्या गुहेंत प्रवेश करीत. त्यांचे हे हाल पाहून हृषीकेश येथें अन्नछत्राची स्थापना झाली आणि तेथून भाजीभाकरी वगैरे झाडींत फिरून साधूंच्याकडे पोंचविण्यांत येअूं लागलें. नंतर साधूंनींच अन्नछत्रांत येअून भिक्षा घेअून जावी अशी व्यवस्था झाली. कित्येक अन्नछत्रांत ठरलेल्या प्रमाणांतच अन्न दिलें जातें. तर कित्येकांत साधू मागतील तितकें. साधू लोक आजारी असतील अगर बंगाली असतील तर त्यांना भात मिळतो. इतर पोटभरू साधू दोहोंपैकीं अेका वर्गांत शिरून भात मिळवितात, दुसऱ्या अन्नछत्रांत जाअून डाळरोटी

मिळवितात आणि गंगेच्या कांठीं बसून त्यावर यथेच्छ ताव मारतात. रोटीच्या किनारीवर हक्क अर्थात गंगेंतील माशांचा.

हृषीकेश येथील झाडींत साधू सुंदर झोंपड्या बांधतात. जंगलांतून गवत आणतात; त्यापैकीं थोड्या गवताचे दोर बनवितात. लांकडासाठीं दूर जावें लागतच नाहीं. गंगेमध्यें गुळगुळीत झालेलीं किती तरी लांकडें वाहात येतात. त्यांनाच वेठीला धरलें कीं झालें काम. अेका दिवसांत अेक झोंपडी तयार. दहा-वीस झोंपड्यांच्या मध्यभागीं अेक व्याख्यानमंडपहि बांधलेला असतो. त्यांत अेकाद्या विद्‌वान आचार्यांनीं बसून रोज संध्याकाळीं प्रस्थानत्रयींचें विवरण करावें आणि लहान-मोठ्या साधूंच्या समाजानें 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या'चा सिद्‌धान्त अनेक प्रकारें समजून घ्यावा. या ठिकाणीं सारें चर्वितचर्वणच चालतें असें नाहीं. नव्या नव्या शंका अुत्पन्न झाल्या कीं त्यांना अुत्तर म्हणून नवे नवे युक्तिवाद पुढें येतात. कित्येक अर्धदग्धांचा पाश्चात्य विचारांचा बेढब समन्वय करण्याचाहि येथें प्रयत्न चालतो. कुंभमेळा आला कीं त्या वेळीं अशा नव्या विचारवृद्‌धीचा विनिमय व्हायचा आणि शास्त्रार्थांत गोडी वाढायची. अशा रीतीनें आपल्या साधूंनीं आपलें अध्यात्मशास्त्र जिवतें, जागतें आणि गाजतें राखलें आहे.

असें सांगतात कीं, अेक वेळ औरंगजेब आपलें सैन्य घेअून या अध्यात्म विद्यापीठावर चाल करून आला. साधूंनीं आपल्या झोपड्या जाळून टाकल्या आणि जंगलांतील अनेक खेड्यांत ते पसार झाले. सैनिक त्यांच्यामागें कोठवर धांवणार? औरंगजेब फजीत होअून परत गेला आणि तीनच दिवसांत हें विद्यापीठ 'यथापूर्वम्' पुनः जमलें. जे अपरिग्रहव्रत पाळतात, ते परतंत्र किंवा पराभूत कसे होणार?

येथून पुढें गेल्यावर रामाश्रम लागला. ही लहानशी संस्था स्वामी रामतीर्थांच्या स्मरणार्थ आग्र्याच्या लाला बैजनाथांनीं अुभी केली आहे आणि तींत त्यांनीं आपली अेक लहानशी लायब्ररी ठेवली आहे. लाला बैजनाथ हिंदुधर्माचे खोल अभ्यासी. 'प्राचीन आणि अर्वाचीन हिंदुधर्म' हें त्यांचें अिंग्रजी पुस्तक मीं वाचलें होतें. लालाजी आश्रमांत आहेत असें समजतांच त्यांना भेटण्याची अिच्छा झाली. त्यांच्याशीं झालेल्या संभाषणावरून

माझ्यावर अशी छाप पडली, कीं रामतीर्थांच्या घडणांत आपलाहि थोडासा हात किंवा हिस्सा आहे, अशी कांहीं तरी जाणीव या रामतीर्थांच्या भक्ताच्या मनांत आहे. आणि ही गोष्ट खरीहि असेल. त्यांनीं आम्हांला जेवणाचें आमंत्रण दिलें. आम्ही जेवलों. त्यांना आवडेल कीं नाहीं याचा विचार न करतां त्यांच्या दिवाणखान्यांत थोडेसें निजलों. नंतर बोललों आणि पुढें निघालों.

हल्लींचे साधू शास्त्राध्ययन करीत नाहींत, जीवनांतील रिकामपण नासून टाकतात, त्यांना जर शिक्षण दिलें तर धर्माची मोठी सेवा होईल, देशाचा सर्वांगीण अुद्धार होअील, अशा प्रकारचा ध्यास लालाजींच्या मनांत होता. म्हणून शिकलेल्या विरक्त युवकांचा संग्रह करून अशा आश्रमांत नवे नवे ‘ स्वामी रामतीर्थ ’ तयार करण्यासाठीं ते तळमळत होते. आमच्याकडे कांहींशा लोभी दृष्टीनें ते पाहात होते, ही गोष्ट माझ्यापासून लपून राहिली नाहीं; पण आम्ही कोठेंहि मुक्काम करायला आलोंच नव्हतों. आम्ही आपले चालण्याच्या तंद्रींत होतों. पुष्कळ वर्षांनंतर याच लाला बैजनाथांना मी आग्र्याला भेटलों होतों. तेव्हांसुद्धां त्यांनीं मला अकबराच्या प्रख्यात कबरेच्या रस्त्यावर यमुनाकांठीं स्वतः अेक निवृत्तिस्थान बांधलें आहे तें दाखवून तेथें आम्हीं निवास करावा असें प्रलोभन दाखविलें होते. या निवासस्थानाची रचना फार मजेची होती. अेका टेकडीच्या माथ्यावर अेक खोली बांधली होती. ती पुस्तकालय म्हणून अुपयोगांत यावयाची होती. या खोलीच्या खालीं टेकडीच्या पोटांत दुसरी अेक खोली होती. या खोलींत यमुनेवरून येणारा थंड वारा नेहमीं मिळत असे. प्रकाशहि त्याच वाटेनें येत असे. ही खोली ध्यानाकरितां होती. जवळच अेक स्वयंपाक्याची खोली व्हायची होती. या ठिकाणीं राहून संस्कृत आणि अिंग्रजी धर्मग्रंथांचें खोल अध्ययन करावें आणि देशोदेशीं धर्माचा प्रचार करावा ही त्यांची सूचना होती.

आम्ही रामाश्रमांतून बाहेर पडलों तोंच अुजव्या बाजूला खडकाच्या तळाशीं वाहणाऱ्या गंगेच्या कांठीं बांबूंचा ताफा तयार करीत असलेले सुतार मला दिसले. लगेच मला रात्रींच्या हालांची आठवण झाली, मीं अेका

सुताराकडे जाअून म्हटलें, ' भल्या गृहस्था, या वांबूपैकीं अेक वितीची फुंकणी मला काढून देशील का ? ' त्यानें दोन दिल्या, आणि बुवांना चूल पेटवायची फार मोठी सोय झाली. या वेणूधमनीनें सगळ्या प्रवासांत अिंधन प्रदीप्त करण्याचें आमचें काम केलें. शेवटीं बुवांच्या चुकीनें अेक अर्धी जळून गेली आणि अुरलेली कोणाच्या पायाखालीं सांपडून चिंबून गेली ! जळक्या फुंकणीचें शेवटीं काय झालें आठवत नाहीं. अशी कळकाची फुंकणी बरोबर असावी हें मला सुचलें, तेव्हां बुवांजवळ आणि स्वामींजवळ माझ्या सूचक बुद्धीची प्रतिष्ठा चांगलीच वाढली, आणि आतांपर्यंत तिच्यांत वाढच होत गेली आहे.

येथून आम्ही लक्ष्मणझूल्याला पोंचलों. हृषीकेशहून लक्ष्मणझूल्यापर्यंत राम, भरत, शत्रुघ्न आणि लक्ष्मण अशीं चार देवळें आहेत. राममंदिराच्या आसपास बाजार आहे आणि समोर लहानसा त्रिवेणी संगम आहे. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें भरत हा अिथल्या सर्व भूमीचा मालक आहे. शत्रुघ्नापुढें टेहरी दरबारामार्फत यात्रेकरू व मजूर यांच्यामध्यें करार लिहिला जातो आणि लक्ष्मण गंगापार होणाऱ्या यात्रेकरूंवर नजर ठेवतो.

कुलीबरोबर होणारा करार ही अेक महत्त्वाची गोष्ट आहे. टेहरी संस्थानांत शिक्षणाचा विस्तृत प्रचार झालेला नाहीं. हे रानटी कुली यात्रेकरूंचें जडजोखीम डोक्यावर घेअून भयानक अरण्यांतून पसार होतात; त्यांच्यावर राज्याचा अंकुश आवश्यक आहे. आणि धूर्त जगतामधून येणारे व पापाचें प्रायश्चित्त घेण्यासाठीं यात्रा करीत असतांना सुद्धां आपल्या संवयी न सोडणारे यात्रेकरू बिचाऱ्या मजुरांना फसविणारच नाहींत, अशी खात्री नाहीं; म्हणूनयेथील मजूर लेखी कराराशिवाय अेक पाअूलहि चालत नाहींत. गंगोत्री, जम्नोत्री, तसेंच केदार, बदरी या चार स्थानांची यात्रा करून यात्रेकरू रामनगर, आल्मोडा किंवा काठगोदामाला जातात. पण मजूर तेथपर्यंत जात नाहींत. टेहरी संस्थानची हद्द बदरीनारायणाहून परत येतांना मिलचौडी अथवा गणअी नांवाचें स्थान आहे तेथें संपते. तेव्हां टेहरीचे मजूर परराज्यांत न्याय मिळणार नाहीं या भीतीन पुढें जात नाहींत. मिलचौडी येथें नवे मजूर करण्याखेरीज गत्यंतर नसतें.

लक्ष्मणझूल्याचा हल्लींचा पूल लोखंडाच्या दोरीचा आणि सळयांचा बनविलेला झुलता आहे. दानशूर शेठ सूरजमल यांनीं तो बांधला आणि त्याच्यावर यात्रेकरूंकडून कर घेऊं नये असा नियम केला. पूर्वीं गंगा ओलांडण्यासाठीं येथें शिंक्यांचा पूल होता. अेका शिंक्यावरून दुसऱ्या शिंक्यावर असें जातांना जीवाची जोखीम तर होतीच, पण खालीं खोलांत जोरानें वाहाणाऱ्या गंगेकडे पाहातांना चक्कर येऊन धोका नसतांनासुद्धां माणूस खालीं पडायचा! टक लावून प्रवाहाकडे पाहतांना असेंच वाटतें कीं, पूल महावेगानें प्रवाहाच्या अुलट्या दिशेला धांवत आहे! आगगाडींत बसल्यावर झाडें पळतांना दिसतात तशाच प्रकारचा हा परिणाम आहे. कलकत्त्याच्या दानशूर शेटजींनीं हा सुरक्षित पूल बांधून मोठेंच पुण्य मिळविलें यांत शंका नाहीं; पण यात्रेची जोखीम जशी कमी झाली, तसें त्याबरोबर यात्रेकरूंचें पुण्यहि कमी झालें हें आपण विसरतां कामा नये. जोंपर्यंत शिंक्यांच्या पुलावरून जलसमाधि मिळण्याची पुरीपुरी धास्ती होती, तोंपर्यंत पलीकडल्या तीरावरील प्रदेशाचें स्वर्गाश्रम हें नांव अन्वर्थक होतें. आतां काय, धर्मराजाचाच नव्हे, तर अेकादा गांवठी कुत्रासुद्धां या पुलावरून स्वर्गाला जाऊं शकतो!

लक्ष्मणझूल्याजवळ गंगेची शोभा कांहीं औरच आहे. समोरासमोर अुंच खडक आणि मधून स्वच्छ निळें पाणी बंधनमुक्त झाल्याच्या आनंदानें धांवत आहे, आणि आजूबाजूच्या अुंच पहाडावरील लहान-मोठीं झाडें हें दृश्य पाहात आहेत; अशा वेळीं कोण कोणाची शोभा वाढवीत आहे हें सांगणें कठीण होऊन जातें.

कित्येक ठिकाणांचे संस्कार कांहीं अद्‌भुत असतात. जितक्या वेळां मी लक्ष्मणझूल्याच्या पुलावरून पसार झालों आहें, तितक्या वेळां सृष्टि चैतन्यमय आहे, अंतरात्म्यानेंच हे तऱ्हतऱ्हेचे आकार धारण केले आहेत आणि हजारों आणि लाखों वर्षांपासून गंगेचें पाणी वाहात असतांनासुद्धां जसा त्याला अंत नाहीं, तसाच अंतरात्म्याच्या विभूतींनाहि अंत नाहीं, हा विचार अचूक मनांत आला आहे. नदीचें पाणी आणि त्यांत खेळणारे मासे, झाडांचीं पानें आणि त्यांत गाणारे पक्षी, कुरणांतील गवत आणि त्यावर

चरणारीं जनावरें आणि या सर्वांचा द्रोह करीत असतांनादेखील परम पित्याचा वारसा मिळवूं अिच्छिणारा माणूस, हीं सारीं अेकच आहेत; द्रोह आणि पाप ही माया आहे; अभेद आणि प्रेम हेंच सत्य आहे, अशा प्रकारचे विचार कोण जाणें कशामुळें, पुलावर जेव्हां जेव्हां मीं पाअूल ठेवलें आहे तेव्हां तेव्हां मनांत आले आहेत आणि बुवांबरोबर त्यांची चर्चा केली आहे.

हिमालयाची सर्व यात्रा पूर्ण केल्यानंतर या झूल्याच्या शेजारींच स्वर्गाश्रमाच्या भूमीवर बुवा आणि मी राहिलों होतों. त्या वेळीं अैकलें होतें कीं, येथून खालीं अेक-दोन मैलांवर पुष्कळ वर्षांपूर्वी अेक साधु राहात असे आणि तो 'सोऽहम्'चा जप करीत असे. अेके दिवशीं अेका भुकेल्या वाघानें त्याच्यावर झडप घातली तरीहि त्याचें 'सोऽहम्' चाललेंच होतें! 'सोऽहम्' म्हणजे अभेद. या साधूला मरायच्या वेळींसुद्धां वाघाबद्दल भीति किंवा क्रोध वाटला नाहीं. याच ठिकाणीं अति प्राचीन काळीं आपले धार्मिक ग्रंथ लिहिले गेल्याची दंतकथाहि मीं अैकली होती. पण ही कथा भगवान् व्यासां-विषयीं होतीं, कीं आद्य शंकराचार्यांविषयीं त्याचें आज मला स्मरण नाहीं.

या ठिकाणीं बोरीचीं झाडें पुष्कळ आहेत, आणि जवळच जीं भाताचीं शेतें आहेत तीं आजूबाजूच्या साऱ्या मुलुखांत प्रख्यात आहेत. या तपोवनांतील 'बासमती चावल'चा भात खायला अमीर आणि फकीरच काय, पण देव आणि पितरहि लांचावतील!

---

# नवे नवे अनुभव : : २४

डोक्यांत प्रवासाचीं चित्रें असंख्य भरलेलीं आहेत, पण या चित्रांच्या खालीं किंवा मागें स्थळकाळ लिहून ठेवलेले नाहींत; तेव्हां त्यांचा क्रमबद्ध चित्रसंग्रह (आल्बम) तयार होत नाहीं आणि धास्ती वाटते कीं, अेका

ठिकाणचें वर्णन दुसऱ्या ठिकाणाला चिकटवितों कीं काय ? तेव्हां जेवढें स्पष्ट आठवत असेल तेवढ्यालाच चिकटून राहावें हा अुपाय आपला बरा. कल्पनेचे रंग वाटेल तसे भरतां येतात, पण मूळ रेखाचित्र यथादृष्ट असेल तरच तें खरें प्रवासवर्णन म्हणतां येअील. स्वामींची लेखमाला वाचतों तेव्हां पुसून चाललेलीं स्मरणें ताजीं होण्याऐवजीं अधिक घोटाळ्यांत मात्र सांपडतात.

ही स्थिति अनुभवतांना अेक नवाच विचार मनांत आला, कीं जो प्रवास आम्हीं बरोबर केला आहे, त्याचें वर्णन वाचूनसुद्‌धां जर त्या वेळची चित्रें दृष्टीपुढें यथार्थपणें अुभीं राहात नाहींत, तर ज्यांनीं हा प्रवास केला नाहीं, त्यांना कोरड्या शब्दाचें वर्णन देअून कितीशी कल्पना मला देतां येणार ? सारें वर्णनच जर शब्दजाल झालें तर त्यांतून मिळणारा आनंद सृष्टीचा आनंद नव्हे, तर शब्दांचाच आनंद होअील आणि शब्दांचा आनंद हा कांहीं शुद्‌ध किंवा अुच्च आनंद म्हणतां येणार नाहीं. अेकाद्याला गुदगुल्या करून हंसवावें तशीच ही प्रवृत्ति आहे. त्यांतून खरी वस्तु कितीशी मिळणार ?

पण असे विचार बोलणाऱ्याला आणि अैकणाऱ्याला दोघांनाहि विषण्ण करतात; म्हणून शहाण्या माणसानें असे विचार आपल्याजवळच ठेवावेत. जसें खासगी दुःख लोकांत जाअून रडूं नये, तशी निर्मोह दशाहि जाहीर करूं नये. म्हणून हें सर्व येथें सोडून देअून आपण प्रवासाला निघूं.

लक्ष्मणझूल्यापर्यंत आम्ही सुधारलेल्या जगांत होतों. झूला ओलांडला, अुजव्या बाजूचा स्वर्गाश्रमाकडचा रस्ता टाकला, आणि आम्ही वनांत प्रवेश केला. येथून रस्ता खूप वर-खालीं होअूं लागला. जंगलांतील कित्येक जनावरें जशीं भीति न बाळगतां कांहीं कांहीं वेळेला जवळ येतात, तशी झाडें आणि वेल पुष्कळ जवळ जवळ येअूं लागले, आणि आम्हांलाहि वाटलें कीं आपण आतां आरण्यक आहों. यानंतर झंपानांत बसणारे लोक आजूबाजूच्या दृश्याहून निराळे आणि चमत्कारिक दिसूं लागले. झंपान ही अेक प्रकारची पालखी असते. ती अुचलणारे भोअी चौरस आकारांत चालत नाहींत, तर अेकामागून अेक असे चौघेजण रांगेनें चालतात; कारण अरुंद रस्त्याच्या अवघड पायवाटेवरून जायचें असेल, तेव्हां दोघेजण

शेजारीं शेजारीं अुभेच राहूं शकणार नाहींत. अेका बाजूला असलेल्या अुंच पहाडाशीं टक्कर झाली तर चारी भोअी, त्यांचें तें झंपान, आणि झंपानांत बसलेलें जिवंत ओझें सर्वच दुसऱ्या बाजूच्या खोल दरींत पडून स्वर्गाला जायचें !

करंडींत बसणारे लोक अितके बेडौल वाटत नाहींत. पाणी प्यायच्या अुभट पेल्याच्या आकाराच्या, जंगली वेताच्या अेका मोठ्या करंडींत आपलें सामान अर्ध्यापर्यंत भरून यात्रेकरू त्यावर बसतो. पाय बाहेर सोडतां यावेत अेवढ्यासाठीं करंडीच्या वरच्या कांठाला काप ठेवलेले असतात. आणि खालीं लटकून पाय थकून जाअूं नयेत म्हणून त्या करंडीला अेक कामचलाअू पावटणें बांधलेलें असतें. अेक मजूर अशी करंडी आपल्या पाठीवर खांद्यांशीं बांधून टाकतो; म्हणजे जाकीट घातल्यावर हात सुटे राहातात तसे मजुराचे हात सुटे राहातात. करंडीचा बोजा अेकट्या खांद्यांनाच अुचलावा लागूं नये यासाठीं तिचा अेक पट्टा मजुराच्या डोक्यावरून घेतलेला असतो, आणि मजूर चालत नसेल तेव्हां खांद्याला आणि डोक्याला आराम मिळावा यासाठीं T च्या आकाराची–कुबडीच्या आकाराची–काठी तो बरोबर बाळगतो. करंडीच्या बुडाला ती कुबडी ठेवून दिली कीं झाला मजूर बोजांतून मोकळा. अशा रीतीनें अेका मजुराच्या डोक्यावरून अेक माणूस जान आणि माल यांसह जातो ! त्याचें तोंड मात्र मागच्या बाजूला ! सुरवातीला हें सर्व रूप हंसण्याजोगें, पण पाहून पाहून संवय झाल्यावर या मुलखांत हेंच योग्य आहे, अशी खात्री पटते. मुक्कामावर मजूरलोक परस्परांत बोलतात तेव्हां आपण किती मणाची ‘ लाश ’ ( प्रेत ) अुचलतों आहों, याचा अुल्लेख केल्याशिवाय राहात नाहींत. आपल्या मजुरानें आपल्याविषयीं आपल्या देखत ‘ लाश ’ शब्दाचा अुपयोग केला नाहीं म्हणजे अिकडील मर्यादा सांभाळली, असा अिकडचा कायदा आहे.

यात्रेकरूंच्या भर सीझनच्या सुरुवातीलाच आम्ही निघालों होतों, यामुळें रस्ते विजन असे नव्हतेच. मुंग्यांच्या रांगेप्रमाणें आम्ही लोक होतों. आमच्याबरोबर नगर किंवा वऱ्हाडकडचा अेक गृहस्थ झंपानांत बसून जात होता. त्याच्याबरोबर आश्रितांचा परिवारहि कांहीं कमी नव्हता. मागाहून

समजलें, कीं तो दोन बायकांचा धनी आहे, तरीहि संतान नाहीं म्हणून बदरीनारायणाच्या दर्शनाला जात आहे.

झंपानांत बसणाऱ्या लोकांत दोन प्रकारची मुद्रा दिसते. कित्येक स्वतःला चालतां येत नाहीं, आणि जिवंत असतांनाच माणसाच्या खांद्यावर बसावें लागत आहे, याची लाज तोंडावर ठेवून जातात; तर दुसऱ्या कोटींतले लोक 'आम्ही पायीं चालायला दरिद्री थोडेच आहोंत?' अशा रुबाबांत बसून आपलें कल्पना-दारिद्र्य प्रकट करतात!

आमचा प्रवासी या दुसऱ्या कोटींतला होता. तो झंपानांत कोंबड्या-प्रमाणें छाती काढून बसला होता, आणि अुंटाप्रमाणें अिकडे तिकडे पाहात होता. त्याची बायको जलदी जलदीनें त्याच्या मागें चालत होती. त्याला तें सहन झालें नाहीं. बादशहाच्या रुबाबानें त्यानें हुकूम सोडला, 'पुढें गेलीस तर काय बिघडेल? चट्टीला पोंचून स्वैंपाकाला सुरवात कर. अेवढ्यांत आम्ही येतों.' आजसुद्धां त्या बिचारीचा त्या वेळचा संभ्रम माझ्या डोळ्यां-समोर दिसत आहे. आकारानें कांहींशी ठेंगणी, भरीव बांध्याची, हिरवी साडी, कपाळावर कुंकू जुन्या पद्धतीचें मोठें, नाकांत मोठी नथ, कुरळे केस थोडेसे अुडत आहेत आणि थोडेसे घामानें कपाळाला चिकटले आहेत, अशी ती सती हिमालयाच्या रस्त्यावर, चढण असो कीं अुतार असो, दम टाकीत चालली आहे. घटकेंत मागें पाहाते, घटकेंत आमच्यासमोर आपली फजिती होते कीं काय हें तपासते, आणि डोकें खालीं करून पुनः पुढें चालूं लागते! जणुं काय हिंदु समाजाची विटंबना प्रायश्चित्त करायला जात असावी! अरबस्थानांतील किंवा मध्य आशियांतील जंगली पुरुषांना नारीप्रतिष्ठा काय आहे हें समजतच नाहीं. वादळ होत असेल तेव्हां स्वतः तंबूंत बसतात आणि तंबू अुडून जाअू नये म्हणून आपल्या स्त्रियांना तंबूच्या दोऱ्या धरून बाहेर बसायला सांगतात! अशीं वर्णनें वाचून आपल्याला त्या लोकांची कींव येते. पण आपल्या अिकडे जवानमर्द स्वतः आराम भोगीत जेव्हां बायकांकडून वाटेल तशी मेहेनत-मजुरी करून घेतात, तेव्हां मात्र आपण तें सर्व मुकाट्यानें सहन करतों.

ही बायको त्याची पहिली बायको. तिला मुलें झालीं नाहींत म्हणून त्यानें दुसरें लग्न केलें होतें. तेव्हां ही बायको नावडती मोलकरीणच कीं नाहीं? तिनें जलदीनें पुढें जाअून पोंचलें पाहिजे, आणि अनोळखी मुलुखांत स्वैंपाकासाठीं जागा मिळवून चट्टीवाल्याकडून भांडींकुंडीं मागून घेअून स्वैंपाकाची तयारी केली पाहिजे. अेक दिवस काय झालें कुणास ठाअूक चट्टींत आम्ही जेवीत होतों, अितक्यांत त्या नरपशूचें पित्त खवळलें. तो आपल्या बायकोवर संतापला. बिचारीनें हात जोडले; पण त्यानें तिच्या डोक्यावर तडाखा मारलाच! ती पडली. मग काय विचारतां बिचारीच्या पाठीवर त्यानें आपल्या पायाची खाज जिरविली! बरोबरचे आश्रित पानावर बसून हें सारें टकमक पाहात होते. मारून मारून तो नंदीबैल थकला कीं भुकेनें व्याकुळ झाला कोणास ठाअूक? पण तो मात्र पोट भरून जेवला आणि तिच्याकडे बघून म्हणतो, 'जेव आतां स्वस्थ बसून!' हुंदके देत देत बिचारीनें खाल्लें आणि सगळ्यांचीं अुष्टीं भांडीं अुचलून घासायला घेअून गेली.

आर्य कुटुंबांतील भांडणांत बाहेरच्या माणसानें पडूं नये म्हणून आम्हीं तें सर्व सहन केलें. आज मला आमच्या या भ्याडपणाबद्दल तिरस्कार वाटतो. पण त्या वेळीं मनांत विचार आला, हाच का आपला आर्यधर्म? मनूनें जेव्हां 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते' लिहिलें, तेव्हां याच प्रकारची पूजा तो समजला असेल? पति हें पत्नीचें दैवत आहे, आणि पत्नी काय पतीची गुलाम आहे—ढोर आहे? अेकाद्या सनातनी शास्त्र्याला विचारलें, तर यावर सुद्धां तो शास्त्राधार अवश्य काढून दाखवील! मनुष्य हा देवांचा पशु आहे असें अुपनिषदांत लिहिलें आहे. पति हा देव, तेव्हां पत्नी त्याचें ढोरच झाली कीं नाहीं? अुपनिषत्कालीन ऋषींनीं जर हें तर्कशास्त्र अैकलें, तर आपल्या निर्दोष काव्याचा त्यांना असंख्य वेळां पस्तावा होअील. पतीची सेवा करणें हा पत्नीचा धर्म आहे असा अेकांगी धर्म जरी घटकाभर मानला तरी सेवा आणि तीहि अशा प्रकारें घेण्याचा पतीचा हक्क आहे असें मात्र कोठेंहि लिहिलेलें नाहीं.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, आपला धर्म हा आर्य आदर्श आणि अनार्य वृत्ति यांचें मिश्रण बनून झाला आहे; आणि हीन वृत्तीच्या संस्कृतिज्ञ

तार्किकांनीं धर्माला शुद्ध राखण्याऐवजीं प्रत्येक रिवाजाचा बचाव करण्याचच कर्तव्य आपल्या माथ्यावर घेतलें आहे ! व्याकरणकार ज्याप्रमाणें 'छंदसि बहुलम्' म्हणून चालवून घेतात, त्याप्रमाणें ज्ञातिभिन्न अशा आपल्या समाजानें 'कोणी कोणाच्या कामांत ढवळाढवळ करूं नये' असें ठरविलें आहे; आणि यामुळें नामर्द जबरदस्तांचें मात्र फावलें आहे. शास्त्री लोकांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं धर्माचें शुद्ध स्वरूप जर कायम राखलें नाहीं, तर सगळ्या धर्माची फजिती होते, जीवन विकृत बनतें, आणि परधर्मीयांना वाव मिळतो. जेव्हां जेव्हां हिंदुधर्मावर परधर्मीयांनीं सरशी केली आहे, तेव्हां तेव्हां त्याच्या मुळाशीं आपल्या लोकांचें रूढीदास्य आणि गाफिलपणाच राहिलेला आहे. विरोध करण्याच्या बाबतींत आपण नेहमीं भ्याड. सहन करण्यांतील बहादुरी जर आपण विरोध करतांना दाखविली, तर आपलीं सारीं दुःखें टळतील.

असा विचार करीत आम्ही जेवून अुठलों आणि विसांवा न घेतां पुढें चाललों. अेक-दोन दिवसांच्या अनुभवानें आम्हांला चट्टींत अुशीरां पोंचून चालणार नाहीं, असें दिसून आलें होतें. ज्याप्रमाणें स्टीमरमध्यें हजीर तो वजीर, जेवढी जागा अडवून ठेवावी तेवढी त्याची, त्याचप्रमाणें या चट्टीच्या बाबतींतहि असतें. चट्टी म्हणजे काय ? यात्रेकरूंच्यासाठीं जंगलांतल्या दुकानदारांनीं बांधलेलीं कामचलाअू दुकानें. येथें जमिनीची ओल गेलेली नसायची; भिंती अुंच असायला पाहिजेत असा येथें कायदा नाहीं; छपरावर गवत किंवा झाडाचीं पानें; आणि ही सर्व कामगिरी पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटची नसल्यामुळें पहाडांत जशी जागा मिळेल तसा दुकानाचा आकार ! अशा तऱ्हेचें स्थापत्य शहरी डोळ्यांना सुरवातीला आवडणार नाहीं कदाचित्; पण जंगलाच्या संपूर्ण शोभेंत मिसळून जायला याच्यापेक्षां वेगळी पद्धति नाहींच कामाची.

घरांत अेका कोपऱ्यांत दुकानदार आपला माल व्यवस्थित लावून ठेवतो. माल म्हणजे काय काय असेल ? गव्हाचें पीठ, मीठ, मिरची, तूप, बटाटे, आणि दुकान मोठें असलें तर डाळ, तांदूळ. दुकान लहान असो, मोठें असो, त्यांत तंबाखू असायचीच; पण ती आपल्या अिकडे असते तसली नव्हे. हिमालयांत तंबाखू पिकतच नाहीं; त्यामुळें गुळांत तयार केलेली गुडाखू सर्वत्र

विकली जाते. दुसऱ्या अेका पोत्यांत स्वैंपाकाचीं भांडीं असतात; यात्रेकरूंची त्यायोगें फार मोठी सोय होते. यात्रेकरूंनीं आपापलीं भांडीं डोक्यावर घेअून यात्रा करायची म्हटलें, तर माणसापेक्षां भांड्यांचेंच पुण्य वाढायचें आणि या पुण्याअीच्या भाराखालीं यात्रेकरू अकालीं स्वर्ग गांठावयाचा !

हिमालयांतील शेतकऱ्याच्या स्वैंपाकांत अजब स्वावलंबन असतें. त्याच्याजवळ बोहऱ्याच्या टोपीसारखी अेक मोठी लोखंडाची तपेली किंवा तसराळें असतें. त्यांत तो कणिक बांधतो आणि दगडावर ठेवून देतो. मग तीन धोंड्यांच्या चुलींत विस्तव पेटवून तिच्यावर त्याच तसराळ्यांत रोट्या भाजून घेतो; या साऱ्या रोट्या हातरुमालावर ठेवून पुनः त्याच तसराळ्यांत भाजी करून घेतो; तसराळें लोखंडाचें असतें त्यामुळें भाजी कसलीहि असली तरी ती आपली अेकाच रंगाची होते ! आतां आणखी काय पाहिजे ! भाजीरोटी पोटभर खाअून तसराळें घासलें कीं पाणी प्यायलाहि तेंच भांडें ! जेवून दुपारीं जरा वामकुक्षि केली, कीं तेंच तसराळें डोक्यावर ठेवून त्यावर फेट्यासारखें तो कांहीं तरी बांधतो, म्हणजे आंब्याच्या कोयीअेवढ्या गारा जरी आकाशांतून पडल्या तरी आपलें शिर सलामत ! अितकी सूचक बुद्‌धि आणि युक्ति यांच्यांत असूनसुद्‌धां शहरी लोक म्हणतात, कीं पहाडी लोक म्हणजे जंगली ! होय, ते जंगली आहेतच ! जंगलांत राहातात ते पंगू नसतात, आणि पंगूपणा हा तर सुधारणेचा पाया—नव्हे, शिखरसुद्‌धां ! असंख्य साधनांवांचून ज्याचें काम चालूं शकत नाहीं तो सुधारलेला, आणि कमींत कमी साधनांनीं काम चालविण्याची अक्कल ज्याच्यांत आहे तो जंगली, ही व्याख्या खरीच नाहीं काय ?

आम्ही जलदीनें चालून सर्वांच्या अगोदर मुक्कामाला पोंचून सर्वांत चांगली चट्टी शोधून काढीत असूं आणि स्वच्छ चूल जमवून स्वैंपाकाला सुरवात करीत असूं. येथें ‘ आम्ही ’ म्हणजे स्वामी. कारण त्यांची चाल म्हणजे घोड्याची चाल; दुसरा नंबर बुवांचा. मी नेहमीं सर्वांत शेवटीं पोंचावयाचा; कारण माझ्या माथीं सर्वांपेक्षां जास्त जबाबदारी. रस्त्यांत जितकीं झाडें दिसतील त्यांना कुशल प्रश्न विचारलेच पाहिजेत. फळ, फूल, पक्षी—जें कांहीं नजरेला भेटेल तें मला बोलावी. कोणीच नसलें तर निदान

आकाशांतले ढग तर असायचेच. आणि त्या वेळीं मला हातांत माळ घेअून जप करण्याचीहि संवय होती. तेव्हां जगत् आणि जगदंबा यांच्यामध्यें माझें लक्ष असें कांहीं वांटलें जाअी, कीं मी आपला अचूक तिसराच पोंचायचा! पोंचल्यावर मी अुठायचा नाहीं. बसल्या बसल्या सर्व काम करायचें. सामान बांधायचें, सोडायचें, व्यवस्थित लावून ठेवायचें, हें सर्व काम माझें. लांकडें ओलीं असलीं तर बुवांची चूलहि मीच पेटवून द्यायचा. जेवण झाल्यावर भांडींहिं मीच घासायचा. मीं घासलेलीं भांडीं पाहून पहाडी दुकानदार खूप खूष होअून जात. स्वामींच्या पायांत आणि वाणींत असामान्य जोर, तेव्हां संचार आणि शिरकाव सर्वत्र व्हायचा. अशा रीतीनें आमचा संघ चालत असे. आम्हीं जलद चालण्याचा निश्चय केल्यामुळें त्या दोन गायींच्या बलिवर्दांच्या संगतींतून मात्र आम्ही सुटलों.

आमचा प्रवास जसजसा वाढत चालला, तसतशी आमची भूकहि वाढली. अेक पातेलें भरून डाळ बनवावी आणि ती तिघांनीं अेकमेकांच्या तोंडाकडे पाहत पाहत खाअून टाकावी! मग रात्रीच्या दोन-चार रोट्या ठेवून सकाळीं गुळाबरोबर खात असूं. पाहतां पाहतां आमचे गाल गाजरासारखे लाल दिसायला लागले. वजन बापडें कसचें वाढणार? रोजच्या २०–३० मैल चालीशीं वजनाचा मेळ बसायचा नाहीं, तें आपलें वाट पाहतच बसलेलें असायचें, कीं विसांवा केव्हां मिळेल आणि मी केव्हां वाढेन! आम्हीं जेवढा म्हणून विसांवा घेतला, तेवढा अशा रीतीनें आम्हांला पुष्कळ फायदेशीर झाला.

---

# देवप्रयाग : : २५

रेल्वेच्या प्रवासांत बोगद्यांत डुबकी मारली म्हणजे जसें पांच-दहा मिनिटें अंधाराशिवाय कांहीं दिसत नाहीं. तसें जुन्या संस्मरणांत विस्मरणाचे बोगदे येतात. मुंबअीहून पुण्याला जातांना खंडाळा घाटांतील किंवा

बेळगांवाहून गोव्याला जातांना तिनअी घाटांतील लांब लांब बोगद्यांत मध्यें खिडक्या येतात, त्यांच्यामधून प्रकाश थोडासा 'हाअुक' करून नाहींसा होतो. विस्मरणांतसुद्धां अशाच रीतीनें स्मृतीचा अेक किरण—फक्त अेकच किरण—येतो आणि विस्मृतीला अधिक स्पष्ट करण्याचें तेवढें काम करतो.

ज्या दिवसाचें वर्णन मी आज लिहीत आहें, तो दिवस अशाच रीतीनें विस्मृतींत बुडून गेला आहे. महादेव चट्टीचें रूप थोडेंसुद्धां लक्षांत येत नाहीं. दुनिया नामरूपानें बनलेली आहे. त्यांतून रूप गेलें म्हणजे नामच शिल्लक राहातें. माझ्या बाबतींत महादेव चट्टी नामशेष झाली आहे.

आम्ही मुक्कामाला पोंचतांच मी स्वस्थ बसलों—नाहीं मला वाटतें, मीं अगदीं आडवा होअून निजलों. ही मला मोठी सोयीस्कर संवय होती. संधी मिळाली कीं मी पुरता आराम घेअीं. त्यामुळें सर्व शक्तीचा चालण्याच्या कामीं अुपयोग करतां येत असे. स्वामींच्या मनांत पुढें चालायचें होतें. मला निजलेला बघून विचारतात, 'काय थकलास?' मला पुढें चलावेसें वाटत होतें. मीं म्हटलें, 'अुठून आजूबाजूला फक्त हिंडायफिरायचेंच असेल तर तें आपल्याला जमायचें नाहीं; पण जर पांच-दहा मैल चालून नव्या चट्टीला जायचें असेल तर मी थोडीसुद्धां दमलों नाहीं. हा पाहा मी निघालों.' असें म्हणत म्हणत अुडी मारून मी चालावयाला लागलों.

नव्या चट्टीला पोंचलों; पण ती फार लहान निघाली. रेल्वेच्या टाअिम टेबलांत युरोपिअन लोकांच्यासाठीं जेवणाचें स्टेशन, चहाचें स्टेशन वगैरे स्टेशनें ठरलेलींच असतात. यात्रेंतसुद्धां निजण्याच्या चट्ट्या मोठ्या असतात. दररोज अमुक अितके मैल चालायचे असा यात्रेकरूंचा क्रम आंखून ठेवलेला असतो. त्याप्रमाणें मग सोयी उभ्या होतात, आणि मग तर सोयीमुळेंच प्रवासाचे पडाव ठरतात. दिवसाच्या चट्टींत आम्हीं रात्र काढली. दिवसाच्या दुकानरादाला रात्रीचे यात्रेकरू फार थोडे मिळतात, तेव्हां अशा प्रसंगीं दुकानांत सोयी कमी असल्या तरी दुकानदार यात्रेकरूंच्याकडे अधिक लक्ष देतात.

येथून आम्ही पुढें निघालों. चालतां चालतां देवप्रयागजवळ आलों. माझ्या कडोसरीला माझें घड्याळ होतें. तें वयानें माझ्यापेक्षां मोठें, समयपालनांत अभिमानी. पण मींच त्याला कितीअेक दिवस अुपवास घडविला होता; तेव्हां किती वाजले हें सूर्यनारायणालाच विचारावें लागे! रस्त्याच्या-कडेला पोस्ट ऑफिस पाहातांच स्वामींना तेथून माझें घड्याळ लावून आणायचें सुचलें. घड्याळाला जिवतें चालतें करून आम्हीं देवप्रयागांत प्रवेश केला. माझें स्मरण योग्य असेल तर माधवानन्द नांवाचा अेक बंगाली साधु येथेंच आम्हांला पहिल्या प्रथम भेटला. त्याच्यासंबंधीं लिहिण्याजोगें पुष्कळ आहे. तें यथास्थानीं येअील.

देवप्रयाग पंच प्रयागांपैकीं अेक आहे. जणुं काय पहाडी खडकावर बांधलेलें पक्ष्याचें घरटें. त्याचे दोन भाग होतात. नदीच्या या बाजूला ब्रिटिश मुलूख आहे. पलीकडे टेहरी संस्थान आहे. मध्यें केदारनाथहून आलेली अलकनन्दा पिवळ्या मातींतून वाहात जाते आणि खालीं अभ्रकाच्या अत्यंत सूक्ष्म रेतीच्या योगें चमकणारी भागीरथी गंगोत्रीहून येअून अलकनन्देला मिळते.

बुवा म्हणाले, 'आपल्या प्रवासांत अेक लोटा अवश्य पाहिजे. मोठ्या तोंडाचा असला म्हणजे आंत हात घालून स्वच्छ करतां येतो. अेकाद्या दिवशीं दूध मिळालें तर त्यांत तापवितांहि येते.' स्वामी गेले. बाजारांत आणि अेक लोटा घेअून आले. कारण जसजसे पुढें जावें तसतसे बाजार भेटायचे नाहींत. आणि भेटले तरी तेथें लोटा कोठून असणार? लोट्यांत मीं पाणी ओतून पाहिलें. तो गळका निघाला! बुवा स्वामींना म्हणाले, 'आतांच्या आतां हा परत घेअून जा आणि दुसरा घेअून या.' लोट्यांत पाणी भरून घेअून स्वामी पुनः बाजारांत गेले. दुकानदार सज्जन होता. आपल्याअिकडे दुकानदार जसे भोळ्या गिऱ्हाअिकाला धमकावतात, तसें धमकावायला तो शिकला नव्हता. त्यानें दुकानांतला दुसरा लोटा काढून दिला. न तपासतां लोटा आणल्याबद्दल स्वामींना आम्हीं ठपका दिला होता, तेव्हां या खेपेला स्वामी चूक करण्याजोगे नव्हते. त्यांनीं नव्या लोट्यांत पाणी ओतलें. पाणी झरूं लागलें! दुकानदारानें तिसरा लोटा

दिला. त्यांतूनहि गंगा वाहूं लागली ! चौथा, पांचवा, सहावा असे बिचाऱ्यानें पुष्कळ लोटे काढले. प्रत्येकाची दशा पहिल्यासारखीच ! वामनावताराच्या काळीं गळणारी झारी बंद करण्याचें सामर्थ्य अेका ब्राह्मणानें दाखविलें होतें; पण कलियुगांत सर्वच लोट्यांना गळायला लावण्याची अद्‌भुत शक्ति मात्र देवप्रयागांत स्वामी आनन्दानन्दांनींच दाखविली ! बिचारा दुकानदार घाबरला. त्याला वाटलें स्वामी कोणी जादूगार आहेत ! आपली माया काढून घ्यावी अशी काकुळतीनें तो स्वामींची विनवणी करूं लागला. स्वामीहि चांगलेच गोंधळले होते. शेवटीं लोट्यासाठीं दिलेले पैसे परत घेअून ते मुक्कामाला परत आले. मध्यकालीन लोकसाहित्यांत जादूच्या अगणित गोष्टी प्रचलित आहेत. त्यांपैकीं पुष्कळांच्या मुळांशीं असेच कांहीं प्रसंग तर नसतील ?

दुपारीं अुठून मी अेकटाच अलकनन्देच्या कांठीं जाअून बसलों. खूप खालीं अुतरावें लागत होतें. अलकनन्देची ती शांत शोभा पाहून माझें मन हरपलें आणि किती तरी वेळ तेथेंच बसून राहिलों. शेवटीं बुवा कीं स्वामी बोलवायला आले, तेव्हां जाणीव झाली कीं आपण यात्रेला आलों आहोंत आणि तिघेजण सोबती आहोंत.

स्वामी म्हणाले, ‘ चला, आपण संगमावर जाअूं. ’ पूल ओलांडून आम्ही मंदिराकडे गेलों. तेथून अुतरून संगमापर्यंत गेलों. येथें लोखंडाच्या सांखळ्या खडकांत बसविल्या आहेत. अशासाठीं कीं यात्रेकरूंनीं स्नान करून स्वर्गाचे अधिकारी व्हावें, पण स्वर्ग, गांठूं नये ! कारण भागीरथीचा प्रवाह येथें फार वेगवान आहे. ‘ गंगा-तरंग-कण-शीकर-शीतलानि ’ हा श्लोक मीं स्वामींना समजावून दिला. संध्यासमय होता. आम्ही दोघेजण भागीरथीच्या कांठीं बसलों. अेक लहानसा पक्षी पलीकडच्या कांठावर बसला होता, मधून पाण्याचा प्रवाह जोरानें वाहात होता. आम्ही दोघेजण त्या पक्ष्याकडे पाहात होतों. प्रथम तो पक्षी मान हलवी, डोकें हलवी; पण थोड्याच वेळांत निसर्गानें त्याच्यावरहि मोहनी टाकली आणि तोसुद्‌धां टक लावून पाहातच राहिला ! आमची भाषा त्याला माहीत नाहीं, त्याचें हृदय आम्हांला ठाअूक नाहीं. तरीसुद्‌धां भागीरथीनें आम्हां तिघांचें हृदय अेक करून टाकलें होतें. वर देवळांतील घंटा भक्तांना दर्शन घेण्यासाठीं आमंत्रण देत होती. आम्हांला मात्र आत्मौपम्य-द्‌वारा भगवंताचें येथेंच दर्शन होत होतें.

आम्ही पडलों माणसें; अंधारांत दिवा लावूनहि चालूं. रात्रीं घराच्या आंत निजूं; पण पलीकडच्या कांठावर बसलेला गृहस्थ अंधार पडल्यावर कशी बरें रात्र घालविणार? जड पायांनीं अथवा जड पंखांनीं तो अुठला आणि कोण जाणे अनंत आकाशांत कुठें निघून गेला! रोज आपण हजारों पक्ष्यांना पाहातों. त्यांचें जग वेगळें, आपलें जग वेगळें. त्यांच्यामध्यें आणि आपल्यामध्यें शेतांतलें धान्य आणि झाडांवरचीं फळें यांच्या वांटणीच्या बाबतींत जी तक्रार होते तेवढाच त्यांचा आपला संबंध! पण देवप्रयागांतील तो द्विजराज अजून या हृदयांत घर करून राहिला आहे! विषादाच्या वेळीं विचार येतो कीं तो पक्षी परत आला तर फिरून आम्हां तिघांचीं हृदयें अेक होअून जातील!

देवळाचा जीर्णोद्धार अमुक वेळीं अमुक माणसांनीं केला असें कांहीं लिखाण स्वामींनीं तेथें शोधून काढलें. दर्शन घेअून आम्ही परत आलों. रात्रीं त्या पक्ष्याचींच स्वप्नें पडत होतीं. तो पूर्वजन्माचा कोणी सोबती असेल, भाअ असेल किंवा प्रेमी असेल. तो फिरून दिसायचा नाहीं. तो आमच्या मानसपूजेचा अधिकारी कशामुळें बनला हें कोण सांगूं शकेल? पण जर मानसपूजेंत कांहीं शक्ति असेल तर तो परत आलाच पाहिजे. त्याची आम्हांला किती जरूर आहे हें त्याला समजेल, तर जेथें असेल तेथून अुडून तो आलाच पाहिजे.

सकाळीं अुठून आम्हीं बदरीनारायणाचा रस्ता सोडला आणि गंगोत्रीला जायचें होतें म्हणून टेहरीचा रस्ता धरला. पाय नेतील तिकडे जायचें हा आमचा शिरस्ता. अलकनन्देच्या दोन बाजूंना दोन रस्ते जातात. नदीच्या डाव्या बाजूनें किंवा अुगमाकडे जाणाऱ्या यात्रेकरूंच्या दृष्टीनें पाहातां, अुजव्या बाजूनें बदरीनारायणाचा रस्ता आहे. तेव्हां डाव्या बाजूचा रस्ता टेहरीचाच असला पाहिजे असें ठरवून आम्ही चाललों. बरेंच पुढें गेलों तोंच नदीच्या पलीकडल्या बाजूकडून अेक दिवसाची ओळख झालेले कित्येक मजूर ओरडून हांका मारून खुणा करूं लागले. स्वामींनीं ही हांक प्रथम अैकली. त्या लोकांच्या खुणांचा अर्थहि स्वामींनाच समजला. आम्हीं चुकीचा रस्ता घेतला होता. चूक समजल्यावर सुधरायला कितीसा वेळ? वर वर चढलों आणि टेहरीचा रस्ता शेवटीं आम्हांला सांपडला. रस्त्यांत

कित्येक झुडपांना नारिंगी रंगाचें आणि राओीअेवढ्या लहान लहान फळांचे घोस लागले होते. आठ-दहा दाण्यांचा अेक घोस मोठ्या हरभऱ्याअेवढा व्हायचा. दोन दाण्यांच्या मधल्या जागेंत बारीक केसासारखें कांहीं दिसे. हे दाणे तोडून मीं चाखून पाहिले. बरोबर नारिंगीच्याच रसाचा स्वाद ! मग काय विचारतां ? मी दोन्ही हातांनीं फळें तोडून खाअूं लागलों. पण विचार आला कीं मीं कांहीं जंगलांतला लुटारू नव्हे, कीं अेकूण अेक झाडांना अगदीं निष्फळ करून सोडावें ! खरा राजा करभार घेतो, त्यामुळें प्रजा निःसत्त्व होत नाहीं. मीं अेकाच झाडाजवळ अुभा न राहातां चालत राहावें आणि हाताला येतील तेवढीं फळें सहज पोटाकडे पोंचवून द्यावींत. किती तरी दिवस हा स्वाद चाखायला मिळाला.

---

# श्रीनगरला गेलों नाहीं : : २६

देवप्रयागहून आम्ही टेहरीला चाललों होतों. स्वामी, बुवा आणि मी हिमालयाच्या प्राणदायी हवेंत आनंद करीत करीत जात होतों; पण माझ्या मनांत अेक गुप्त विषाद घर करून बसला होता. मी घरांतून निघालों तो कांहीं हिमालयांतील तीर्थस्थानें फिरून येण्यासाठीं नव्हे. माझा विचार अिथल्या प्रदेशांत असलेल्या पुराणप्रसिद्ध श्रीनगरांत साधना करायला बसण्याचा होता. काश्मीरचें श्रीनगर वेगळें आणि केदारच्या रस्त्यांत लागत असलेलें हें श्रीनगर वेगळें. हें श्रीनगर सिद्धपीठ म्हटलें जातें. येथें केलेली साधना व्यर्थ जात नाहीं आणि शीघ्र फळदायी होते. देवीभागवतांत या स्थानाचें माहात्म्य पुष्कळ सांगितलें आहे. पूर्वीं येथें अेका दगडावर श्रीचक्र कोरून त्याची पूजा होत असे. असें सांगतात कीं, प्राचीन काळीं या ठिकाणीं रोज अेक नरमेध होत असे. आद्य शंकराचार्य जेव्हां श्रीनगरला आले तेव्हां मनुष्यवधाचा हा अनाचार पाहून त्यांची धर्मभावना खवळली. त्यांनीं अेक

पहार घेऊन तो श्रीचक्राचा दगड उलटविला आणि आज्ञा केली कीं, आजपासून नरमेध बंद.

प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहून आणि नितान्त रमणीय स्तोत्रें लिहून शंकराचार्यांनीं हिंदुधर्माची जी सेवा केली आहे, तिच्यापेक्षांहि ही नरमेध बंद करण्याची सेवा उच्च आहे याविषयीं कोणाला शंका आहे ? भाष्य लिहायला बुद्धिवैभव लागतें. स्तोत्रें रचायला भक्ति नसली आणि फक्त कल्पनेचा उल्लासच असला तरी चालतो; पण अत्यंत प्राचीन काळापासून चालत आलेली घातकी रूढि कडव्या समाजाच्या विरुद्ध जाऊन अेकदम बंद करायला लावावयाची यासाठीं तपस्तेज, धर्मनिष्ठा आणि हृदयसिद्धीच लागते.

जेव्हां नरमेध बंद केल्याची ही हकीकत मीं अैकली तेव्हांपासून शंकराचार्यांची ती ठेंगणी आणि स्थूल मूर्ति—भगवीं वस्त्रें, रुद्राक्षमाळा आणि भस्मविलेपनानें मंडित व 'आगलात् मुंडित' अशी—डोळ्यांपुढून हालतच नाहीं. कर्मकांडी निर्दय शाक्त चहूं बाजूंनीं हाहाःकार करीत आहेत, आणि त्यांच्यामध्यें हातांत पहार घेऊन ती संन्याशाची मूर्ति उभी आहे; अेकाहि 'कर्म' वीराला जवळ यायची हिंमत नाहीं; आणि हा ज्ञानवीर तपस्वी थरथरणाऱ्या ओठांनीं अेकेकाला अथवा सर्वांना मिळून शास्त्रार्थ करण्यासाठीं आव्हान देत आहे. पण कोणाचीहि बुद्धिप्रभा या धर्ममूर्ति, दिग्विजयी संन्याशापुढें आपलें तेज पाडूं शकत नाहीं. ब्राह्मणा भगवन्तो यो वः कामयते स मा पृच्छतु, सर्वे वा मा पृच्छत, यो वा कामयते तं वः पृच्छामि, सर्वान् वा वः पृच्छामीति । ते ह ब्राह्मणा न दधृषुः ।

श्रीनगरला जाण्यापूर्वीं 'स्वामींना भेटून घ्यावें' हा एक कोंब मूळ संकल्पाला फुटला आणि मी आल्मोड्याला गेलों. हरद्वार येथें गंगोत्रीचा संकल्प पक्का झाला आणि देवप्रयागहून फक्त अठरा मैलांवर असलेल्या श्रीनगरकडे जाण्याचें सोडून गंगोत्रीच्या वाटेनें मी निघालों. हिमालयांतील नवीं नवीं पुण्यधामें पाहायला मिळतील हा आनंद वाटत होता. पण मूळ संकल्पापासून मी दूर जात आहें ही मळमळ कांहीं केल्या जात नव्हती.

टेहरीच्या रस्त्याला चीडचे वृक्ष पुष्कळ. लांब लांब काड्यासारखीं त्यांचीं पानें जमिनीवर पडतात, तेव्हां त्यांच्यावरून चालतांना पाय सहज

निसरतात. तेथें मीं अेक सुंदर शोध लावला. पुष्कळ चालण्यानें आणि थंडीनें माझे पाय फाटत आणि त्यांना नदीचे जमिनींत पडणाऱ्या भेगांसारख्या खोल भेगा त्यांना पडत. त्यांवर जर अिलाज सांपडला नाहीं तर यात्रा पुरी कशी व्हायची ही चिंता होती. आमसोलाचें तेल थोडेंसें बरोबर घेतलें होतें, पण मला त्याचा फायदा दिसला नाहीं. अडचण आली कीं मनुष्य शोध करतो. चीडच्या झाडांतून निघणारा ताजा गोंद ( डिंक ) पायांच्या भेगांत मीं भरला आणि दुसऱ्याच दिवशीं त्याचा सुंदर परिणाम झालेला दिसला. चामडी अशी कांहीं जमून गेली, कीं जणुं कधीं फाटलीच नव्हती ! त्या दिवसापासून आगपेटी भरून चीडचा गोंद मीं बरोबर ठेवला. या गोंदांतूनच राळ बनते, आणि टर्पेन्टाअिनसुद्धां याच झाडांतून निघतें.

---

## श्रद्धाभक्तीचा स्पर्श : : २७

देवप्रयागहून सातएक मैल गेलों असूं. दुपारची वेळ होती. भुकेनें तर हक्कदाराप्रमाणें पोटांत आपलें ठाणें दिलें होतें. बुवांनीं रांधलें. जवळच्या अेका पिंपळाचीं पानें गोळा करून स्वामींनीं कीं मीं पत्रावळी बनवल्या. त्यावर शास्त्रार्थ निघाला. पिंपळाच्या पानांची पत्रावळ बनवूं नये, तिच्यावर जेवतो तो पाप करतो, असें बुवांनीं सांगितलें. मलाहि ही मर्यादा माहीत होती. पिंपळ ही प्रत्यक्ष परमात्म्याची विभूति; त्याच्या पानांची पत्रावळ करून तीं पानें अुष्टीं करायचीं यांत नास्तिकता आहे, असा बुवांनीं युक्तिवाद केला. मीं म्हटलें, ‘ पिंपळाच्या पानांच्या पत्रावळीवर गृहस्थाश्रमी असतील त्यांनीं जेवूं नये असा प्राचीन दंडक आहे. ज्यानें घर सोडलें आहे, जो विरक्त झाला आहे, तोच पिंपळाच्या पत्रावळीचा अधिकारी आहे. त्याच्या मतें तर सर्वत्र परमात्माच भरलेला आहे. अन्न ब्रह्म, पत्रावळहि ब्रह्म आणि खाणाराहि ब्रह्म. तत्र को मोहः कः शोक अेकत्वमनुपश्यतः ? ।

मतलबसिंधूच्या पद्धतीनें केलेला हा युक्तिवाद भुकेच्या मदतीनें घशाखालीं अुतरला आणि मीं व स्वामींनीं ' ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ' हा श्लोक म्हणून जेवायला सुरवात केली. स्वैंपाक करण्याचें काम बुवांचें असल्यानें ते आर्य रिवाजाला अनुसरून आम्हांला जेवायला घालून मग जेवीत. बुवा कर्मकांडी, कट्टे सनातनी. सोंवळ्याओंवळ्याचा विचार त्यांच्यापाशीं फार. स्वामींना हें समजायचेंहि नाहीं. मला तें सर्व समजे; पण मी तें पाळीत नसें. तेव्हां बुवांच्या बाबतींत स्वतंत्र जेवण करणें हाच सुरक्षित मार्ग होता. आम्हांला ते वाढून ठेवीत आणि मग जेवायला बोलावीत. आमचें जेवण झालें म्हणजे मग स्वस्थपणें आपण जेवीत. या पद्धतीनें बुवांचें मातृहृदयहि संतुष्ट होत असे. आज बुवा पिंपळाच्या पत्रावळीवर जेवायला बसले अितक्यांत आदल्या दिवशीं देवप्रयागांत भेटलेला अेक मारवाडी बनिया यात्रेकरू आम्ही बसलें होतों तेथें आला. प्रेमभावाच्या भरांत त्यानें आम्हां तिघांना चरणस्पर्श केला. बुवा अेकदम चमकले, अुलट अिकडे मारवाड्याच्या नेत्रांतून भक्तीचे आनंदाश्रू वाहात होते. बुवांची ती लांब दाढी, डोक्यावरील जटा, स्नानानें शुचिर्भूत झालेली काया, जवळ पडलेला दासबोध आणि भजनाची माळ. हें सर्व बघून मारवाड्याला वाटलें, केवढें माझें सद्भाग्य कीं अशा पावन ब्राह्मणाचें मला पुनः दर्शन झालें ! आणि बुवांना काय वाटत होतें ?

सामान्यतः बुवांच्या रूढिनिष्ठ धार्मिकतेला मी नेहमीं मान देत असें. त्यांच्यामुळें मला पुष्कळ वेळां अडचण सहन करावी लागे, पण ती सर्व मी संतोषपूर्वक सहन करी. अेक वेळ गंगेवर होडींतून प्रवास करतांना बुवांनीं मला विचारलें होतें, ' माझी तुम्हांला किती बरें अडचण होते ! मी हे सोंवळ्याओंवळ्याचे नियम सोडून देअूं का ? प्रवासांत निभावून घेअीन कसें तरी. ' मीं त्यांना म्हटलें होतें, ' छेः छेः, हें चालायचें नाहीं. ही शिवाशिव निरर्थक आहे अशी खात्री झाल्यावरच मीं ती सोडून दिली आहे. ' मार्गे शूद्रवदाचरेत् ' या वचनाप्रमाणें तुम्हांला ती सोडतां येईल, पण मला नाहीं तें आवडणार. तुमच्या अंतरात्म्याची खात्री झाली तर हे

विधिनिषेध आपोआप गळून पडतील; तोंपर्यंत ते टिकवून धरा. त्यांतच तुमचें श्रेय आहे. '

प्रवासी मारवाड्याचा ओंवळा स्पर्श झाल्याबरोबर बुवा मजकडे पाहूं लागले. अेकादा दिवस अुपाशी राहाणें बुवांना मोठेसें संकट होतें असें नाहीं. त्यांना तशी संवय होती. बिचारा मारवाडी ' चौका ' कुठें करावा याचा शोध करण्यासाठीं अिकडे तिकडे पाहूं लागला. अितक्यांत मीं बुवांना म्हटलें, ' बुवा, आज तुम्हीं वाढलेलें पान टाकणें बरें नाहीं. तुम्ही निश्चिंत होअून जेवा. तुम्हांला मारवाड्याचा स्पर्श झाला नाहीं. मूर्तिमंत श्रद्धाभक्तीचा स्पर्श झाला आहे. भक्तीपुढें कर्मकांड बाजूला ठेवलेंच पाहिजे. तुम्ही जेवायचें सोडून द्याल तर त्या भक्तहृदयावर केवढा आघात होअील याचा विचार करा, आणि संकोचानें नव्हे, तर प्रसन्न अंतःकरणानें जेवा.' बुवांच्या डोळ्यांत पाणी आलें; संकोचाचें नव्हे, तर भावनेच्या अुद्रेकाचें. जणुं देवळांतील प्रसाद चाखावा तशा भक्तिभावानें बुवांनीं भोजन केलें.

येथें फारशी विश्रांति न घेतांच आम्ही पुढें निघालों. आजूबाजूची वनशोभा तर ' प्रतिपर्वं रसावहम् ' या न्यायानें वाढतच चालली होती. चीडचीं झाडें गेलीं आणि बांझाचीं आलीं. बांझ ही ओक झाडाचीच अेक जात आहे. त्याचें लांकूड खूप मजबूत असतें. संध्याकाळ होतांच आम्ही अेका चट्टीजवळ येअून पोंचलों. दुकानाजवळ अेक सुंदर लहानसें झाड होतें तेथें मी जाअून बसलों. स्वामी जागेच्या शोधार्थ गेले. जागा मिळाली नाहीं; तेव्हां जवळच अेक झुडपाचा मंडप होता तेथें रात्र काढण्याचें आम्हीं ठरविलें. त्या मंडपांत आम्ही बसतों न बसतों तोंच आमचे दोन्ही कुली आले. दोन कुली आणि सामान यांमुळें दुकानदारांच्या दृष्टीनें आमची प्रतिष्ठा वाढली आणि त्यानें रात्रीं निजण्यासाठीं आम्हांला अेक अुत्रदार जागा दिली. स्वामींनीं स्टोव्ह पेटविला. त्या अद्भुत यक्षाला पाहायला आजूबाजूचे लोक गोळा झाले.

मंडपांत आम्ही घटकाभर बसलों त्याचा माझ्या यात्राक्रमावर मोठा परिणाम झाला. त्या मंडपांत अेक दाक्षिणी साधु बसला होता. त्यानें काश्मीरांत

असलेल्या अमरनाथाची गोष्ट काढली. तेथें निर्जन आणि निर्वन पहाडांत अेक गुहा आहे. त्या गुहेंत दर पौर्णिमेला बर्फाचें अेक शिवलिंग आपोआप बनतें आणि अमावास्येपर्यंत विरघळून जातें. या सृष्टिचमत्कारासंबंधीं त्या साधूकडून अैकल्यावर केव्हां तरी अमरनाथाला गेलें पाहिजे असा संकल्प मनांत दृढ झाला. या संकल्पाला धरून बुवांना बरोबर घेअून मी काश्मीरला कसा गेलों याचा अितिहास स्वतंत्र आहे.

काश्मीरला जाण्याचा संकल्प मनांत घोळवीत घोळवीत मी जेवलों आणि थकलेल्या हाडांना चटअी-कांबळ्याची अूब दिली. पण आमच्या दुकानदाराच्या येथें कांहीं जलसा होता. अेकादा पहाडी चारण ( भाट ) आला असावा. रात्रभर पहाडी कानांना आनंद देणारें संगीत आमच्या निद्रेला अडथळा करीत होतें. या संगीताची गति अितकी विलक्षण कीं मधून मधून स्वप्नें पडत होतीं. त्यांतसुद्धां तें प्रवेश करी !

---

# टेहरी : : २८

हिमालयांतील पहाडी लोकांचें संगीत अैकल्याचें जेव्हां जेव्हां मला स्मरण होतें, तेव्हां तेव्हां वर्ड्स्वर्थची ‘ दि सॉलिटरी रीपर ’ ही कविता मला आठवते; कारण पहिल्याच खेपेला पहाडी पोषाखाचा अेक भरदार कन्यका हातांत खुरपें घेअून गवत कापीत असलेली आणि गात असलेली मीं पाहिली आहे. हिमालयाची शुद्ध तेजस्वी हवा, दूध-गव्हाचें अन्न आणि भरपूर मजुरी; मग तोंडावरची लाली काय विचारतां ? तिचा तो विचित्र पहाडी पोषाख पाहून माझ्या तोंडून कालिदासाचें वचन निघालें, ‘ किमिवहि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् । ’ अेक अर्धचंद्रकार दरी आम्ही ओलांडीत होतों, आणि खालून तिचें गाणें चांगलें अैकूं येत होतें. वर्ड्स्वर्थच्या पुढील ओळी मला आठवल्या :

" Will no one tell me what she sings ?-
Perhaps the plaintive numbers flow
For old, unhappy, far- off things,
And battles long ago :
Or is it some more humble lay,
Familiar matters of to-day ?
Some natural sorrow, loss or pain
That has been, and may be again ? "

मलाहि वाटलें कीं या कन्यकेच्या गाण्याचा शेवट कधीं काळीं यायचाच नाहीं ! तोच तो सूर अेकसारखा चाललाच होता, आणि दूरदूरचे वृद्ध पहाड त्या सुराला प्रतिध्वनि देअून त्याला खेळवीत होते. वर्ड्स्वर्थप्रमाणें मी निश्चेष्ट होअून तेथें अुभा राहिलों नाहीं, तरी पण त्या स्वराचे झंकार हृदयांत अजून संभाळून मात्र ठेवले आहेत खरे !

पहाडी संगीतांत फारशी विविधता नसावी. अुत्तराखंडाची यात्रा संपवून बदरीनारायणाहून जेव्हां आम्ही गणअीला गेलों, तेव्हांसुद्धां रात्रभर गाणीं कानांवर पडत होतीं. त्या गाण्यांतसुद्धां अेकच अेक ओळ जणुं काय रात्रभर चालली आहे असें वाटत होतें. सामवेदाच्या काळापासून या पहाडी लोकांनीं संगीतांत फारच थोडी प्रगति केलेली दिसते. नाहींपेक्षां या अेकश्रुत संगीतांत त्यांना अितकी गोडी वाटली नसती.

दुसऱ्या दिवशीं सोळा मैलांचा प्रवास करून आम्ही टेहरीला पोंचलों. वाटेंत वनश्रीची शोभा कांहीं अपूर्व होती. पण तिचें वर्णन कसें करावें ? सुललित शब्दांचीं लांब लांब वाक्यें लिहून काढल्यानें धड लिहिणाऱ्यालाहि संतोष व्हायचा नाहीं, कीं अैकणाऱ्यालाहि कांहीं बोध व्हायचा नाहीं ! तेव्हां हा मिथ्या प्रवास सोडून देण्यांतच औचित्य आहे. अेका अुंच डोंगराच्या पायवाटेनें माकडें अुतरावींत तसें अुतरून आम्ही टेहरीला पोंचलों. पहाडी लोकांच्या मतें ही अेक मोठी सौंदर्यनगरी आहे, आणि क्लॉकटॉवर (घटिगोपुर ?) तिचा सर्वांत मोठा दागिना आहे; पण ' टेहरीच्या रस्त्यावर गाड्या चालतात ' अेवढी प्रशंसा केली म्हणजे सीमा झाली !

कडक भूक घेऊन आम्हीं टेहरींत प्रवेश केला. गेल्याबरोबर अेक शीख धर्मशाळा पाहिली. धर्मशाळा म्हणजे मुशाफरखाना नव्हे. तर धर्मग्रंथ-ग्रंथसाहेब—ठेवण्याचें, वाचण्याचें आणि श्रवण करण्याचें स्थान. मंदिर आणि मशीद या दोन्हींचे गुण या धर्मशाळेंत सामावलेले असतात. तिची व्यवस्था ठेवणाऱ्याला ग्रंथी म्हणतात. टेहरीच्या धर्मशाळेचा ग्रंथी सज्जन होता. त्यानें आम्हांला सर्व सोय करून दिली. शिधासामग्री गोळा करण्याचें काम स्वामींनीं केलें. बुवांनीं स्वैंपाक केला. श्रमविभागांत माझ्या वांट्याला फक्त अुंच घाट अुतरून भागीरथींत स्नान करून येअून जेवून घेण्याचेच परिश्रम आले होते. त्या दिवशीं मी फार थकलों होतों. टेहरीला पोस्ट ऑफिस असल्यामुळें स्वामींना किती तरी पत्रें लिहावीं लागलीं ! पोस्ट ऑफिस असल्याचें सार्थक व्हावें अेवढ्यासाठींच स्वामींनीं पुष्कळ पत्रें लिहिलीं याविषयीं माझी खात्री आहे ! त्यांचीं पत्रें मीं वाचीत नसल्यामुळें माझ्या खात्रीविषयीं साशंक होण्याचा प्रसंगच आलेला नाहीं ! बुवांनीं त्या ग्रंथीशीं शीखधर्मासंबंधीं गोष्टी काढल्या. दोघेहि समजत होते कीं, आपण हिंदींत बोलतों आहों. ग्रंथीची भाषा हिंदी नसली तरी शुद्ध पंजाबी होती. बुवांनीं मराठी व गुजराती शब्द गोळा करून त्यांना पांच-दहा हिंदी प्रत्यय लावून दिले आणि राष्ट्रीय अैक्य साधलें ! माझ्यासारखा कट्टा साधु असल्या प्रवृत्तींत कसचा पडतो ? मीं आपली दुपारच्या अुन्हाच्या मदतीनें खाशी अेक तासभर ‘ समाधि लावली.’

हिमालयांत येण्यापूर्वी भारतधर्म—महामंडळाच्या स्वामी ज्ञानानन्दांना मी भेटलों होतों. त्यांनीं टेहरीच्या अेका अंमलदार पंडितांचें नांव दिलें होतें. आम्ही त्यांना भेटायला गेलों. आम्हांला प्रवासाची माहिती मिळविण्याची अिच्छा होती, तर या पंडिताला आपलें पांडित्य प्रकट करण्याची अिच्छा होती; आणि आमचे स्वामी म्हणजे जबरदस्त जाहिरातदार ! त्या पंडिताला जेव्हां समजलें कीं मी ग्रॅज्युअेट आहे, तेव्हां त्यानें मला अुठून खुर्चीवर बसण्यास सांगितलें. स्वामींनीं लगेच सांगितलें कीं आमच्या काकांनीं सर्व धर्मग्रंथ वाचले आहेत. त्यानें मला प्रश्न केला कीं, ‘ समाधीमधून माणसाचें व्युत्थान होतें त्याचें कारण काय ? ’ मी माझ्या दुपारच्या समाधींतून व्युत्थान करूनच त्यांच्याकडे गेलों होतों; पण जाण्याचें कारण मात्र गंगोत्रीच्या

रस्त्याची माहिती विचारायची हें होतें. मी चांगलाच गोंधळलों. मीं कांहींच वाचलें नाहीं असें सांगून टाकावें तर स्वामी खोटे ठरणार, आणि कांहीं तरी अुत्तर द्यावें तर शास्त्रार्थ सुरू होणार ! तेव्हां मीं कलिविडंबन प्रकरणांत सुचविलेली युक्ति अजमावली. मीं म्हटलें, 'मीं जितकें वाचलें आहे तें सर्व अिंग्रजींत वाचलें आहे. तुम्ही अिंग्रजींत प्रश्न कराल तर सर्व विवरण बरोबर करीन.' बिचारे पंडित निराश झाले आणि मी बचावलों ! नाहीं तर माझ्या अदृष्टानें मला या शास्त्रार्थांतून व्युत्थानच करूं दिलें नसतें.

येथून आम्ही स्वामी प्रज्ञानन्द नांवाचे अेक दक्षिणी साधु राहात होते त्यांच्या दर्शनाला गेलों. असें म्हणतात, कीं हे दक्षिणी पंडित सत्तावन सालाच्या बंडांत चांगलेच सांपडले होते. तिकडून साधूच्या वेषानें हिमालयांत फिरत फिरत शेवटीं येथें येअून पोंचले होते. येथें टेहरींत अतिशय वाअीट प्रकारचा पटकीचा रोग फैलावला होता, त्या वेळीं या साधूंनीं कांहीं साधना करून आणि पंचमुखी मारुतीची स्थापना करून त्या रोगाला आश्चर्यकारक रीतीनें हटविलें. त्यामुळें राजाची त्यांच्यावर भक्ति बसली आणि स्वामीजी राजगुरु झाले. प्रखर पंडित म्हणून त्यांची कीर्ति दूरवर पसरली होती, त्यायोगें दूरदूरचे विद्यार्थी त्यांच्याकडे शंकानिवृत्तीसाठीं येत. आम्हांला कसलीच शंका नव्हती, फक्त कुतूहल होतें. तेव्हां आम्ही संध्याकाळचा थोडासा वेळ त्यांच्या येथें काढला. त्यांची कोणी अेक विधवा शिष्या तांब्याच्या पेल्यावर कोरलेल्या श्रीचक्राची पूजा करीत होती, तिकडे माझें लक्ष गेल्याशिवाय राहिलें नाहीं. त्या बाअीनें दिवा लावून आम्हांला स्वामीजींच्या-जवळ बसविलें. आम्ही स्वामींबरोबर खूप बोललों, माहिती मिळविली आणि पंचमुखी मारुतीचें व मुख्य देवळाचें दर्शन घेअून परत फिरलों.

टेहरीची मुख्य शोभा म्हणजे भागीरथीवरील तारेचा झुलता पूल ही आहे. त्या पुलाच्या या शेवटाला वड आणि पिंपळाचे पार विशेष लक्ष ओढून घेतात. प्रवासी आणि साधू लोक यांच्यासाठीं धर्मशाळेपेक्षांसुद्धां ही सावलीची जागा अधिक सोयीस्कर असते. ज्या ठिकाणीं वड आणि पिंपळाची छाया अेकत्र पडते, तें स्थान पवित्र मानलें जातें. त्या ठिकाणीं जप वगैरे विशेष साधना करावी, असें सांगितलें आहे.

वडाचें झाड हें आपल्या गृहस्थाश्रमाचा आदर्श सुचवितें. त्याच्या पारंब्या पुन: पुनः जमिनींत शिरून अेक मोठें अविभक्त कुटुंब बनवितात, तर पिंपळ दरवर्षी आपलीं सर्व पानें टाकून आणि आपल्या चामडी-वरहि पोपडे वगैरे अुगवूं न देण्यानें संन्यासधर्म सुचवितो. त्याच्या पानांची अखंड जागृतीहि संन्यासधर्माचेंच सूचन करतें. हे दोन आश्रम जेथें अेकत्र झाले असतील, तेथें हिंदुसमाजाला विशेष पावित्र्य दिसलें तर त्यांत काय आश्चर्य ?

टेहरी हें अेक प्रख्यात पहाडी संस्थान आहे. अेके काळीं या राज्याचा विस्तार आणि त्याची प्रतिष्ठा अितिहासप्रसिद्ध होती. हिमालयाच्या पलीकडील हद्दीपर्यंत अिथल्या राजांची हुकमत असे. आज मात्र केवळ जंगलाच्या अुत्पन्नाच्या बाबतींत तें प्रख्यात आहे. दुसरी ख्याति अिथल्या प्रजेच्या अज्ञानाची आणि भ्याडपणाची म्हटली तर आहे ! शिक्षणाविषयीं अिथल्या राजाच्या मनांत थोडासुद्धां अुत्साह नाहीं. तो समजतो कीं, शिक्षणामुळें प्रजेंत असंतोष पसरतो. अिंग्रजी शाळेच्या अेका शिक्षकानें ही माहिती आम्हांला दिली ! मी विचारांत पडलों, मग हा शिक्षक येथें हमाली कां करतो आहे ?

आपण राष्ट्रीय संस्थांच्यासाठीं साधनें व सोयी शोधीत असतों. पैसे असते तर अमुक केलें असतें, तमुक केलें असतें अशा गप्पा मारतो. पण या पराक्रमी पूर्वजांच्या राजवंशी वारसांकडे पाहा. त्यांच्याजवळ सर्व प्रकारच्या सोयी असतांनासुद्धां ते कशाचाहि विचारच करीत नाहींत; किंवा करतात तेव्हां वांकडाच करतात ! सत्तावन सालचा प्रयत्न फुकट गेला तेव्हां हे पंडित भगवें धारण करून घटत्व-पटत्वाच्या अन् अवच्छेदकावच्छिन्नत्वाच्या चर्चेंत बुडून गेले ! आणि राजे लोक कशाकशांत बुडून गेले याची गणती करतांनासुद्धां कंटाळा येअील. अेकवार हार झाली म्हणून काय झालें ? प्रत्येक हार ही नव्या प्रयत्नाचें खत म्हणून समजली गेली पाहिजे. पराभवांतून मिळणारें शिक्षण कमी महत्त्वाचें नसतें. विज्ञान शास्त्रज्ञांच्या सफल झालेल्या प्रयत्नांचीं वर्णनें आपण वाचतों; पण हे सफल प्रयोग करण्यापूर्वी शंभरपट निष्फळ प्रयोग त्यांनीं चिकाटीनें केलेले असतात, हें

कसें विसरून चालेल ? सहजासहजीं असंख्य पराभव जो जिरवितो तोच खरा पुण्यवान्. सत्तावन सालीं अपयश आल्याबरोबर बुद्धिमान् आणि पुरुषार्थी लोकांनीं अेकत्र येअून विचार करायला पाहिजे होता कीं आपण कां हरलों ? मधून मधून मिळविलेल्या यशावर कोणकोणत्या राष्ट्रीय दुर्गुणांमुळें पाणी पडलें ? काय आपल्या कार्यपद्धतींत कांहीं अुणीव होती ? आज समाजरचनेंत कोणता फेरफार केला पाहिजे ? नव्या प्रयत्नांत सारी प्रजा अेकदिलानें सामील होअील यासाठीं काय केलें पाहिजे ? ज्या लोकांनीं आम्हांला जिंकलें त्यांचा देश कसा आहे ? त्या देशांतील प्रजास्वभाव कसा आहे ? असा स्वभाव बाणवून घेण्यासाठीं त्या लोकांनीं काय काय केलें ? आपल्यांतसुद्धां अशीं तत्त्वें भिन्न रूपानें सुप्तावस्थेंत आहेत कीं नाहींत, हीं तत्त्वें कशीं ओळखावीं, कशीं अंगीं बाणवून घ्यावीं ?

अशा प्रकारचे विचार करण्याअैवजीं राजानें संन्यासी पंडिताला वृत्ति बांधून दिली, संन्यासी पंडितानें राजाला आशीर्वाद दिला, आणि दोघांनीं मिळून प्रजेला पंचमुखी मारुति दिला, आणि राष्ट्रीय जीवनांतील पन्नास वर्षें तशींच्या तशीं वाहूं दिलीं !

पण पूर्वजांच्या कीर्तीवरच जे जगतात ते जसे नामर्द आहेत, तसेच पूर्वजांचे दोषच्च जे पाहत बसतात तेहि नामर्द आहेत. मी हिमालयांत आलों आहें, अंतर्मुख झालों आहें, मजवर कांहीं बंधन किंवा जबाबदारी नाहीं, मीच या सर्व गोष्टींचा विचार कां करूं नये ? मला अवश्य हा विचार केलाच पाहिजे. अशा तऱ्हेचे विचार मनांत चालत होते आणि थकलेल्या गात्रांवर निद्रादेवीचें साम्राज्य पसरत होतें.

सकाळीं अुठून आम्हीं धरासूचा रस्ता धरला.

---

# बादरूचें गांव : : २९

हिमालयाची यात्रा पुरी केल्यानंतर पुनः अेक वेळा दुसऱ्या रस्त्यानें टेहरीकडे मीं आलों होतों, आणि जवळच्या मालदीवल नांवाच्या गांवांत

स्वामी रामतीर्थांच्या मठांत कांहीं महिने साधना करण्यासाठीं राहिलों होतों. त्या वेळचा अनुभव काव्यमय तर होताच, पण दोन-तीन बाबतींत तो मनोवृत्तींत कायमचें परिवर्तन करणारा झाला. ज्या यात्रेचें वर्णन येथें चाललें आहे, त्या यात्रेच्या वेळेला या गांवाविषयीं आम्हीं कांहीं अैकलें नव्हतें; पण स्मरणयात्रेंत टेहरीमागून मालदीवल आणि तिथला अत्यंत गर्दीचा अेकान्त यथाक्रमानें येतोच. हा अपूर्व अनुभव जर थोडक्यांत देतां येण्यासारखा असता तर येथेंच तो सारा दिला असता. स्मरणयात्रेंत हेंच अुचित झालें असतें; पण अत्तराची कुपी अुघडतांच जसा तिच्यांतील सुगंध अेकदम भप्‌दिशीं बाहेर पडून खोलीभर दरवळून जातो, तसेंच मालदीवलचें नांव घेतल्याबरोबर कषायमधुर स्मरणांचे असे कांहीं फवारे सुटतात, कीं अेक-दोन लेखांच्या पेल्यांत त्यांना मावविणें अशक्य नसलें तरी कठोर तर आहेच. म्हणून स्मृतीचीं कवाडें बंद करून सरळ धरासूचा रस्ता धरणेंच श्रेयस्कर.

टेहरीच्या राजाच्या तालमींत तयार झालेल्या त्या पंडित अंमलदारांनीं गंगोत्री-जम्नोत्रीकडची माहिती देतांना अेक प्रश्न छेडला : जम्नोत्रीकडील लोक शौचाला जाअून आल्यावर पाणी वापरीत नाहींत. ते असें मानतात कीं, गंगा-यमुनासारख्या पवित्र नद्यांचें—मातांचें—पाणी अपवित्र कामासाठीं वापरण्यानें अधर्म होईल. आम्ही कांहीं वेळेला स्वच्छतेसंबंधीं त्यांना अुपदेश करीत असतों; पण मनांत पुष्कळ वेळां अशी शंका अुत्पन्न होते कीं, त्यांची श्रद्‌धा अज्ञानजन्य असली तरी ती नाहींशी करण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? जम्नोत्रीकडील लोक क्वचित्‌च खोटें बोलतात. चोरी तर तेथें होतच नाहीं. कोणत्याहि घराला किंवा पेटाऱ्याला तुम्हांला कुलूप लावलेलें दिसणार नाहीं. त्यांना खोटेपणा साधतच नाहीं मुळीं. खरी गोष्ट सांगतांना ते गोंधळतील, पण खऱ्याच्या अैवजीं दुसरें कांहींहि सांगितलें तरी चालेल हें त्यांच्या स्वप्नांत-सुद्‌धां येत नाहीं. त्या अंमलदाराचे प्रत्यक्ष शब्द मला आठवत नाहींत, पण मथितार्थ आणि अतिशयोक्ति अशीच होती. तो मला विचारूं लागला, 'मग सांगा आम्हीं काय करावं ? त्या लोकांचं तें धन्य अज्ञान नाहींसं करावं आणि त्यांना आपल्यासारखं बनवावं, कीं ते आहेत तसेच त्यांना निर्बुद्‌ध आणि निर्दोष राखावं ?' मीं आवेशानें अुत्तर दिलें, 'मी अशा स्थितीचा मुळींसुद्‌धां

सेवा करणार नाहीं. शेळी खोटें बोलत नाहीं, म्हणून कांहीं ती पवित्र नाहीं; दगड बोलत नाहीं, अेवढ्याखातरच तो मुनि होत नाहीं; आणि हे मासे अखंड गंगास्नान करतात म्हणून कांहीं ते स्वर्गाला जाणार नाहींत.' तो गृहस्थ मध्येंच कांहीं तरी बोलणार होता. त्याच्या तोंडून शब्द निघण्याच्या अगोदरच मीं म्हटलें, 'हं, तें स्तोत्र मला माहीत आहे. ती केवळ कवीची कल्पना आहे. मासे ज्या स्थितींत राहातात, त्या स्थितीला तुम्ही स्वर्ग म्हणा हवें तर, पण सदाचारपालनाचें फळ म्हणून मरणानंतर जो स्वर्ग मिळावा अशी आपण इच्छा धरतों, तो स्वर्ग त्यांना गंगास्नानाच्या पुण्याअीच्या प्रतापानें नाहीं मिळायचा, तुम्ही या लोकांना ज्ञानापासून वंचित ठेवूंच नका. त्यांची जडता म्हणजे श्रद्धा नव्हे. माणसांत खोटें बोलण्याची शक्ति आहे, त्या शक्तीचा तो प्रयत्नपूर्वक त्याग करतो; आणि अंतीं खोटें बोलण्याची शक्ति असतांनासुद्धां खोटें बोलणें स्वतःच्या बाबतींत अशक्य करून ठेवतो. त्यामुळेंच तो सत्यपालनाचा आनंद आणि त्यांतून मिळणारी वाचासिद्धि आणि क्रियाफलाश्रयत्व प्राप्त करून घेतो. अज्ञान हें महापाप आहे. मनुष्यानें अज्ञानांत राहावें हें मोठें दुर्दैव आहे. अेकाद्यानें दुसऱ्याला अिरादापूर्वक अज्ञानांत ठेवणें हें महापातक आहे. अज्ञानामुळें अुत्पन्न झालेली सुरक्षितता भयानक आहे, जोखमीची आहे. जें अैकलें तें खरें मानलें ही वृत्ति म्हणजे श्रद्धा नव्हे; तो भोळसटपणा—बावळटपणा आहे.

टेहरीहून पुढें जातांना चढअुतार फार कमी होता. तेव्हां आम्ही जरा झपाट्यानें चालूं लागलों; रस्ता कसाहि असला तरी आमच्या कुलींच्या पेक्षां आमची चाल जलद असे; पण आज मी पाहतों तों आमचे कुली आमच्याहि पुढें ! या असाधारण घटनेकडे माझें लक्ष वेधलें. मीं स्वामींना म्हटलें. 'बादरू आणि कैरासिंग आज थोडे जास्ती जवान झालेले दिसतात ! आपल्याहि पुढेंच चालले आहेत.' स्वामी म्हणाले, 'आज वाटेंत या लोकांचें गांव लागणार आहे ना ? घरीं जाण्याच्या अुत्कंठेनें हे आज अितके तेज झाले आहेत.' मग स्वामींनीं या मुग्ध पहाडी लोकांच्या या वृत्तीची खूप तारीफ केली Home ! Sweet Home ! ही कविता स्वामींना आठवली. आपल्याकडे असा भाव कां नाहीं याविषयीं त्यांनीं चर्चाहि सुरू केली. मीं म्हटलें.

‘ देशाभिमान हा शब्द नवा आहे. आपण अभिमान हा दोष मानतो. त्यापेक्षां देशभक्ति हा थोडा चांगला शब्द आहे. पण आपला जुना शब्द म्हटला तर जन्मभूमिवात्सल्य ! तो किती सुंदर वाटतो ! या वात्सल्याचें कित्येक कवींनीं दुबळेपणा म्हणून वर्णन केलें आहे खरें, पण श्रीकृष्णाच्या जीवनांत गोकुळवृंदावनाविषयीं जी भावना मोठेपणीं दिसून येते ती या देशभक्तीचीच घरगुती आवृत्ति आहे. ’

मला वाटलें, जर पहिल्यानेंच कळलें असतें कीं आज बादरूचें घर लागणार आहे, तर टेहरीहूनच त्याच्या मुलांबाळांकरितां थोडीशी मिठाअी घेतली असती. स्वामींना माझी ही सूचना पसंत पडली; पण जंगलांत मिठाअी कोठून येणार ? अितक्यांत रस्त्यांत अेक धर्मशाळा लागली. तेथें मिठाअीचें अेक दुकान होतें; बादरू तेथें थांबला होता—आम्ही येथें थांबणार नाहीं अेवढीच खात्री करून घेण्यासाठीं. ‘ अजून दिवस पुष्कळ अुरला आहे. थोडेसें जलद चाललांत कीं आमचें गांव येअील. यात्रालाअिनीहून तें फारसें दूर नाहीं. ’ असें म्हणून तो काकुळती करूं लागला. स्वामींनीं मिठाअी खरेदी केली आणि हंसत हंसत ‘ आज रात्रीं तुझ्याच घरीं जेवायचें, ’ अशी त्याला खात्री दिली.

यात्रालाअीन सोडून आम्ही झपाट्यानें आमच्या कुलींच्या गांवाकडे चाललों. शबरीला किंवा विदुराला जितका आनंद व्हावा तितका आनंद आमच्या बिचाऱ्या कुलींना झाला. वाटेंत अेके ठिकाणीं मी अैकलें कीं अेका वर्षापूर्वीं येथें अेका माणसाला गवत कापतांना साप चावला आणि तो मेला. सापाचा विषय निघाला कीं तो बराच वेळ चालायचा. कांहीं ठराविक विषय मनुष्यप्रिय असतात. दरोडेखोरांचा त्रास, दुष्काळाचा अनुभव, भुतें दिसल्याचे प्रसंग हे जसे न संपणारे विषय आहेत, तशीच सापाची दुनियाहि पुष्कळ मोठी आहे. सर्पाच्या वक्रगतीनें शेतांच्या कांठाकांठानें जाणारी आमची पाअूलवाट कापीत आम्ही चाललों आणि बादरू आपल्या घरच्या गोष्टी सांगत चालला. वाटेंत शेतांमधून असलेले अुंच अुंच दगडांचे बांध पाहून मी कित्येक प्रश्न विचारले. जसजसे प्रश्न विचारावे तसतसा बादरू खुले. असें करतां करतां बादरूचें गांव नजीक आलें. मग तर त्याला

आमच्याशीं बोलण्यांतहि गोडी वाटेनाशी झाली ! संध्याकाळ झाली होती. तेव्हां शेतकरी शेतांतून घरीं जात होते. जो भेटेल त्याला बादरू आपल्या बायकांमुलांविषयीं विचारी, आप्तेष्टांची माहिती काढी. तो तर अगदीं खुळ्यासारखा झाला होता. शेवटीं आम्हीं घरापुढें खळ्यांत बसूनच स्वैंपाक केला, भक्तिभावपूर्वक आणलेलें तूप, दूध, दहीं खाल्लें, आणि जमलेल्या मंडळींबरोबर गप्पा मारीत बसलों.

कैरासिंग आणि बादरू हे कांहीं मजुरासारखे भुकेकंगाल मजूर नव्हते. बतनवाडी, गुरेंढोरें, शेती आणि सामाजिक प्रतिष्ठा त्यांच्या मानानें त्यांच्या-पाशीं चांगलीच होती. पहाडांतील लोकांच्या पाशीं नाण्यांचा दुष्काळ. तेव्हां यात्रेच्या मोसमांत अेकादा महिना हमाली करून पन्नास-पाअूणशें रुपये ते मिळवीत—अशासाठीं कीं सारें वर्ष सुखानें जावें आणि हातीं थोडा पैसा राहावा; बरचा माल वाटेल त्या भावानें विकून काढण्याची जोखीम त्यांना पत्करावी लागूं नये.

‘ आमच्या देशांत असे मोठमोठे पहाड नसतात; रस्ते कसे सरळ असतात. त्यावरून गाड्या धांवतात, ’ वगैरे गोष्टी आम्हीं सांगितल्या. गांवांतल्या म्हाताऱ्या बायका विचारायला लागल्या, ‘ अगदीं अगदीं सरळ रस्ता ? चढ-अुतार कांहींच नाहीं ? छे, छे, तर मग तुमचे पाय थकून जात असतील बाअी ! आणि तिकडे अूनहि असेल ? कसें बाबा तुम्ही चालत असाल ? ’ पण जेव्हां मीं त्यांना सांगितलें कीं आमच्या तिकडे अडीच तीन पैशाला अेक नारळ मिळतो. तेव्हां तर गांवच्या लहान-थोर सर्वांना आमच्या देशाला येण्याचा लोभ सुटला ! हिमालयांत सर्वांत लहान नारळ चार आण्यांपेक्षां कमी भावानें मिळायचा नाहीं. तो कोणी फोडायचा नाहीं; विकत घेअून देवळांत ठेवायचा; देवळांतल्या पुजाऱ्यानें पुनः तोच तो नारळ बाजारांत आणून विकायचा. अशा रीतीनें वर्षांतून असंख्य वेळां अर्पण होणें अेकाच नारळाच्या नशीबांत असतें ! नारळ फोडल्यानें आंत खोबरें मिळेलच अशीहि खात्री बाळगण्याचें कारण नाहीं !

मग घरांत पाणी भरण्यासंबंधीं गोष्टी निघाल्या. आमच्या देशांत लांब जाअून पाणी आणावें लागत नाहीं, प्रत्येक घरांत आड असतो, असें मीं

सांगितलें. त्या गांवच्या मुग्ध कन्यकांना तर आड कसला असतो याची कल्पनाच करतां येअीना ! म्हातार्‍या बायका कींव करून म्हणाल्या, ‘ तुमच्या तिकडे बायकांचें काय हे हाल ? खोलांतून पाणी खेचून बाहेर काढण्याची हिंमत तुमच्या बायकाच करूं जाणे ! आमच्या अिकडे अशी अडचण थोडीशी सुद्धां नाहीं. तळ्यांतून घागर भरून डोक्यावर घेतली कीं निघाल्या; ’ पण निघाल्या म्हणजे काय ? वेळेला खासा अर्धा मैल पहाड चढायचा किंवा अुतरायचा ! पण या लोकांच्या खिसगणतींतहि तें नाहीं. मात्र जमिनींतल्या खोलींतून दोरीच्या योगानें वीसअेक हात खोलांतलें पाणी बाहेर ओढून काढायचें म्हणजे हे भलते हाल—शिक्षाच म्हणाना !

दुसर्‍या दिवशीं सकाळींहि आम्ही त्या गांवांतच राहिलों. सकाळीं अुठून जवळचा अेक झुलता पूल पाहून आलों. त्याच्यावरून खालीं पाहातांना पूल पाण्याच्या प्रवाहांत तरंगत तरंगत वरच्या बाजूला चालला आहे असेंच वाटत होतें.

बादरू म्हणे, ‘ मी आतां अिथेंच राहणार. माझा मुलगा तुमच्याबरोबर येअील. तो चांगला मजबूत आहे. तुमच्या पुष्कळ अुपयोगी पडेल. ” त्याप्रमाणें व्यवस्था झाली; पण शेवटच्या क्षणाला या वीस-बावीस वर्षांच्या अर्भकाला ‘ परदेशी ’ पाठविण्याची त्याच्या आअीला हिंमत झाली नाहीं, आणि आमचा बादरूच पुनः कुरकुरत कुरकुरत तयार झाला.

---

# राढीच्या सीमेवर : : ३०

बादरूच्या गांवापासून धरासूपर्यंतचा रस्ता कांहीं केल्या लक्षांत येत नाहीं. बादरूचा आणि कैरासिंगाचा पाहुणचार स्वीकारला नव्हता तोंपर्यंत त्यांचा आमचा संबंध नोकर—मालक असा होता. त्यांच्या घरचें दूध-तूप चाखल्यानंतर आणि त्यांच्या आंगणांत रात्रीचा मुक्काम केल्यानंतर आमच्यामध्यें

समान भाव जागृत झाला. विश्रांतीच्या दिवसांतील खिचडीविषयीं आणि रोजच्या चणाचत्रीन्या–( गव्हाच्या लाह्या )–विषयीं घासाघीस करायचें यानंतर त्यांना कधीं आठवलें नाहीं. आम्हींदेखील त्यांच्याबरोबर जास्त जास्त बोलूं लागलों. ते केव्हां आणि काय खाल्लेप्याले याचा आम्ही तपास करूं लागलों, आणि आमचीं हृदयें थोडीशीं अधिक जवळ येअूं लागलीं. या परिचयामुळें त्यांनीं आमची सेवा कमी केली असें तर बिलकुल झालें नाहीं. अुलट, आम्ही रागावणार नाहीं या खात्रीमुळें आपली बुद्धि वापरून आमच्या सोयी शोधण्याकडेच त्यांचा कल वाढला. नोकर आणि मजूर यांच्याकडून कडकपणें काम घेण्यापेक्षां प्रेम आणि सद्भाव यांनीं काम घेतल्यानें काम सुधारतें, सेवा जास्ती मिळते. पण याहूनहि विशेष लाभ हा होतो, कीं नोकरांच्या बुद्धीला आश्वासन मिळाल्यानें ती अधिक खुलते आणि नोकरहि बुद्धिमान् प्राणी बनतात.

धरासू येथें रात्रीं मजुरामजुरांत खूप चर्चा चालली होती. बंगालकडचा अेक मोठा जमीनदार तेथें मुक्काम टाकून पडला होता. या राजाचा मुनीम आणि मजूर यांच्यामध्यें खूप घासाघीस चालली होती. किती तरी वेळ शांतीचें नांव नाहीं. मला कांहींसें आठवतें कीं येथेंच आम्हांला कित्येक गुजराथी यात्रेकरू भेटले. स्वामींनीं त्यांच्याशीं गप्पागोष्टी केल्या. हीच मंडळी पुढें आम्हांला गंगोत्रीला भेटली.

धरासूपासून जम्नोत्रीला जाण्याचा रस्ता फुटतो. तेथपर्यंत जम्नोत्रीला जायचें कीं न जायचें याविषयीं आमचा निश्चय झालेला नव्हता. शेवटीं ठरलें कीं, जायचें. या मजुरांबरोबर जास्ती मजुरीचा करार आम्हीं येथेंच केला आणि पुढें चाललों. कैरासिंग म्हणाला, ‘ आम्ही जम्नोत्रीच्या मुलुखांत क्वचित्च जातों. या राढी पहाडाच्या पलीकडचा मुलूख चांगला नाहीं. तेथें धोका फार आहे. ’

पहाडी लोकांच्या मनोदशेचें हें सूचक आहे. मोठा पहाड आडवा आला कीं तेथें दुनियेचा शेवट झाला ! पहाड ओलांडणें म्हणजे या लोकांच्या हातचा मळ. पण पलीकडची दुनिया वेगळी आणि आपली वेगळी; ते लोक वेगळे, आपण वेगळे; अशीच गांठ त्यांच्या मनांत बांधली जाते. हायस्कुलांत कूपरची कविता मीं घोकली होती. त्यांतल्या ओळी आठवल्या :

Lands intersected by a narrow firth
Abhor each other. Mountains interposed
Make enemies of nations who had else
Like kindred drops been mingled into one.

जम्नामाअीचें नांव घेअून आम्ही निघालों. माधवानन्दानेंहि सोबत करण्याचें ठरविलें. येथून अेका घोर जंगलांत आम्हीं प्रवेश केला. जिकडे पहावें तिकडे छायाच छाया ! अेकहि झाड हालत नव्हतें कीं डोलत नव्हतें ! जणुं काय ध्यानस्थ ऋषींचें सम्मेलनच ! आम्हीं अुत्साहानें पुढें चालावें. बिचारा माधवानन्द आमच्याबरोबर काय टिकणार ? तो आपला मागें राही. त्याला बंगालीखेरीज अेकहि भाषा यायची नाहीं. तेव्हां स्वामी म्हणत, ‘ अेकदां का या जंगलांत हा प्राणी चुकला, कीं वाघ-लांडग्याचा घास होअील. आपण जरा थांबून त्याची वाट पाहूं या. ’ प्रवासांत थांबण्याची कल्पना कोणाला आवडणार नाहीं ? पण मी बसण्याचें मात्र नाकारीं. नागवेताच्या माझ्या काठीवर भार देअून मी आपला अुभ्याअुभ्याच आराम घेत असें. अेकदां बसलें आणि पायांत रक्त फिरायला लागलें कीं पाय सुजायचे आणि चालणें कठीण व्हायचें. मुक्काम आला म्हणजेच बसलेलें बरें.

कोणत्याहि लढाईच्या बाबतींतहि हीच गोष्ट खरी नाहीं काय ?

माधवानन्द हळूहळू रस्ता कापायचा. मला प्रणवगर्जना सुचली. अुंच शिखरावरूनच अुंच स्वरानें मी ललकारलों : ‘ ॐ शाऽऽन्तिः शाऽऽन्तिः शाऽऽन्तिः। ’ लांबून माधवानन्दाचें अुत्तर आलें. ‘ ॐ शान्तिः शान्ति शान्तिः। ’

असें थांबण्यांत आमचा बरासचा वेळ गेला. रात्र झाली, आणि आम्ही पहाड अुतरण्याअैवजीं पहाडाच्या माथ्यावर पोंचलों होतों. अंधकार म्हणजे घनघोर. मध्येंच अेक लहानशी पाअुलवाट जवळच्या अेका गुराख्यांच्या वस्तीकडे जात होती. तिनेंहि आमचा वेळ खाल्ला. कोणती वाट मोक्षाची आणि कोणती आडमार्गाला घेअून जाणाऱ्या सिद्धीची ? आम्हीं आजूबाजूला पाहिलें, वर पाहिलें, खालीं पाहिलें, आणि प्रवाशाच्या सहजबुद्धीनें अचूक ठरविलें कीं, पाअूलवाट सोडून द्यायची. अंधारांत अीश्वरावर भार टाकूनच जायला पाहिजे. शांतीची गर्जना करीत आम्ही शिखरावर पोंचलों. अितक्यांत रजनीकान्त अुगवला आणि आसपासचा अंधार थोडा थोडा दिसूं लागला.

खायला काय मिळेल हा प्रश्न येथें मनांत येतोच कसचा? राहायला जागा मिळाली तरी अहोभाग्य! जंगलखात्याची अेक कचेरी रस्त्यांत लागतें असें आम्हीं अैकलें होतें. तिचें ध्यान करीत आम्ही चाललों; पण ती कचेरी कांहीं केल्या येअीचना. अितक्यांत रिकामटेकडे लोक गप्पा मारीत असावे असा आवाज अैकला. त्या दिशेला जाअून स्वामींनीं बातमी आणली कीं थोडेसें अुंचावर जंगलाच्या शिपायांचें अेक ठाणें आहे, तेथून हा आवाज येत आहे. आम्ही तिकडे गेलों; पण जंगलांतले हे दोन पायांचे वाघ आम्हांला जवळ ढुंकूंसुद्धां देअीनात! ते गुरगुरले, बडबडले, अंगावर आले; पण आम्ही बिलकुल डगमगलों नाहीं; अंधारांतसुद्धां स्वामींच्या वाणीच्या मोहिनीनें आपलें काम केलें आणि वाघ नरम आले. त्यांनीं आम्हांला ओट्यावरहि येअूं दिलें. मग गोष्टी सुरू झाल्या. प्रथम त्यांनीं जंगलाच्या कायद्याचा कडकपणा आणि त्याचें महत्त्व समजावून दिलें. कोणी पेटलेली बिडी फेंकली तर साऱ्या जंगलाला आग लागेल, लोकांचे जीव धोक्यांत पडतील, आणि याहूनहि जास्त म्हणजे, सरकारचें अपरंपार नुकसान होअील.

माधवानन्द आला आणि त्याची बंगाली वाग्धारा वाहूं लागली. मीं त्याला दोन-तीन वेळां सांगितलें कीं, बंगालीचें ब्रह्माक्षरहि मला समजत नाहीं. मूळ बंगालींत 'आनंद मठा'तील थोडीशी पानें मीं वाचलीं होतीं; पण बंगाल अुच्चार म्हणजे बंगाली अुच्चार! त्यांचें ज्ञान गुरुमुखानेंच व्हायचें. मीं त्याला मराठींत सांगितलें, हिंदींत सांगितलें, निष्काम कर्म म्हणून अिंग्रजींतहि सांगितलें; पण माधवानन्दाची वाग्धारा कांहीं केल्या तुटेचना! अेका कवीनें म्हटलें आहे, I sing, because I must. (राहावत नाहीं म्हणून मी गातों.) याच जातीची माधवानन्दाची प्रतिभा होती. मला समजो, न समजो; त्याची त्याला दरकारच दिसली नाहीं. माझे कान माणसाचे आहेत अेवढें त्याला पुरें होतें. श्रवणांजलिपुटपेय अशा त्याच्या वाचामृताचें त्यानें मला जबरदस्तीनें पान करविलें. मीहि हृदय कठीण करून शांत रीतीनें निष्कामबुद्धीनें सर्व कांहीं अैकत राहिलों, जणूं रेड्यावर पाअूस.

चंद्र अुगवला खरा, पण आकाश अितकेंसें चांगलें नव्हतें. त्यांतून आम्ही थकलेलों. तेव्हां कसलाहि वेडेपणा न करतां आम्हीं झोंपून टाकलें.

स्मृति दगा देत आहे; पण घरासूहून निघालेल्या दिवशींचा बहुतकरून हा अद्भुत अनुभव आलेला असला पाहिजे. रस्त्यानें जातां जातां असें अेक स्थान आलें कीं जेथें जातांच आंतून असें वाटायला लागलें कीं हें स्थान पूर्वपरिचित आहे. जणुं काय केव्हां तरी मी येथें राहिलोंच आहें. असा भाव कोठून अुत्पन्न झाला, समजत नाहीं. अनेक वेळीं याविषयीं अनेक विचार करून पाहिले, पण निर्णय होत नाहीं. अशा ठिकाणीं मी पूर्वी कधीं काळीं आलों नव्हतों, हें निश्चित. तर मग असें कशामुळें वाटलें ? हें रमणीय स्थान पाहून अेकादी अस्पष्ट कल्पना किंवा वासना त्याला भुतासारखी चिकटून बसली असेल ? कालिदासानें चट्दिशी सांगितलें असतें :

**तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वम्**
**भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि ।**

परंतु अेवढें मात्र खरें कीं, मला मागचा पुढचा कसलाहि विचार न करतां तेथेंच राहावें असें वाटायला लागलें होतें. पण मनुष्यवस्ती नसलेल्या या महारण्यांत केवळ काव्यकल्पनेच्या जोरावर राहाणें होअील ?

---

# ‘यामुन’ ऋषि : : ३१

सकाळीं अुठून आम्हीं गंगाणीचा रस्ता पकडला. बर्फाच्या दर्शनानें चित्त प्रसन्न झालेंच होतें. त्याला अप्रसन्न करणारी अेकहि वस्तु या निसर्गाच्या प्रदेशांत नव्हती. पहाडांत चढतांना जितकें सृष्टिनिरीक्षण होअू शकतें, तितकें अुतरतांना होत नाहीं अेवढी मात्र अेक अडचण होती खरी. चढतांना आपण हळूहळू चढत असतों, चारी बाजूंना पाहूं शकतों आणि शरीराला वाटेल तितका जोर करावा लागला तरीहि शरीराकडे लक्ष द्यावें लागत नाहीं. अुतरायच्या वेळीं पहाडाचा अुतारच आपल्याला घाअी करायला लावतो, आजूबाजूला पाहण्यापेक्षां पायांखालीं पाहण्याची आवश्यकता जास्ती असते, प्रत्येक पावलाबरोबर साऱ्या शरीराचा भार गुडघे

आणि घोटे यांच्यावर येऊन पडतो आणि पाय सांभाळण्याची कसरत तर अनेक रीतीनें करावी लागते. शंकराच्या तिसऱ्या डोळ्याप्रमाणें आमच्याजवळ काठीचा तिसरा पाय होता, म्हणूनच आम्ही सुरक्षित होतों.

जंगलांत पहाण्याजोगें पुष्कळ असतें. तऱ्हतऱ्हेचे वृक्ष आणि पानें, लहान-मोठ्या टेकड्यांची व्यूहरचना, आणि अुंच अुंच शिखरांची चढाओढ. पण या सर्वांपेक्षां माझें लक्ष झाडांच्या खोडांकडेच अधिक जातें. लहानपणापासून मला झाडांचीं खोडें पाहून विश्वामित्रादि ऋषींचें स्मरण होतें. तालिमबाज वैरागी मलखांबाची कसरत करीत असावे आणि त्यांच्या पायांना अनेक प्रकारें पीळ पाडावा तशा झाडांच्या डाहाळ्या पाहून मला फार आश्चर्य वाटतें. खोड आणि फांदी यांचा आकार, त्यांची साल आणि त्यांचा रंग पाहून प्रत्येक झाडाच्या स्वभावाची मी कल्पना करूं शकतों. कित्येक झाडें जणुं स्वतःच्या बाबतींतच कठोर होण्यांत जीवनाचें सार्थक झालेसें मानतात. कित्येक झाडें खाऊन-पिऊन सुखी अशा वैश्या लोकांसारखी हृष्टपुष्ट असतात. कित्येक अगदीं वांकलेल्या फांद्या असलेलीं झाडें मराठा अितिहासांतील राजारामाच्या वेळच्या वीरांप्रमाणें विपत्तीशीं असहायतेनें पण अविचलपणें झुंजत असावीं असें वाटतें. तर कित्येक सगळ्या वनाचा अितिहास शक्य तितका सांभाळण्याचें, सांठविण्याचें काम करीत असल्यासारखीं दिसतात. कित्येक झाडांची त्वचा अितकी कोमल असते कीं, शकुंतलेला तपश्चर्या करतांना पाहून दुष्यंत जसा अस्वस्थ झाला होता. तसें आपलें मन अस्वस्थ होतें; आणि कित्येक झाडांच्या ढोली ज़णुं काय मधमाश्यांना किंवा पोपटांसारख्या पक्ष्यांना आश्रय देण्यासाठीं आपलें हृदय चिरून अुघडें करीत असल्यासारख्या वाटतात ! झाडांची खरी शोभा पहावयाची असेल तर पाऊस पडल्यानंतर अून पडलें म्हणजे किंवा पक्ष्यांच्या झुंडीच्या झुंडी झाडांवर फुलांप्रमाणें गजबजतात त्या वेळीं पाहून घ्यावी. चीड झाडाच्या खोडांत दोरीच्या पिळासारख्या रेषा असतात आणि त्यामुळें या खोडाला मजबूत बनविण्याला निसर्गानें कांहीं विशेष मेहनत घेतली असावी असा भास होतो.

अशाच तऱ्हेची सर्व सुंदरता पाहत पाहत मी अुतरत होतों; अितक्यांत वरून खालीं नजर गेली आणि यमुनेचें दर्शन झालें. यमुनेला ओळखावयाला वेळ लागला नाहीं. हं, हीच ती काळी कालिंदी; जिच्या पाण्यांत मीं प्रयाग येथें स्थान केलें होतें, जिचीं कांसवें वृंदावनांत वानरांबरोबर लढतांना मीं पाहिलीं होतीं, जिच्या आरशांत ताजमहालाचें प्रतिबिंब पाहून मी आश्चर्य-चकित झालों होतों, आणि जिच्या नांवाशीं कालियामर्दनांतील चित्रें मीं लहानपणापासून जोडलीं होतीं. दुहेरी हाडाची, मजबूत बांध्याची, सोळा-सतरा वर्षांची सुंदरबाला यौवनाच्या जाणिवेच्या अभावीं धांवत अुड्या मारीत असावी आणि सांखळ्याघुंगरांच्या नादाच्या मस्तींत साऱ्या जगाला विसरून जात असावी, अशी ती तेथें दिसते. आम्ही जेव्हां पहाड अुतरून जवळ गेलों, तेव्हां तिचें निर्मळ पाणी अनेक रंगांनीं दर्शन देत होतें. घटकेंत तें निळ्या-काळ्या शाअीसारखें दिसतें, घटकेंत खडकाला थडकतें तेव्हां मोरचुदाच्या रंगाचें बनतें. लाटा खडकावर फुटून हंसूं लागतात तेव्हां तें पांढरें सफेत होतें, आणि तरीहि फिरून नीलगंभीर होण्यास त्याला वेळ लागत नाहीं. निर्मळ पाण्याच्या या लाडिकपणाच्या खेळानें तपोवृद्ध आणि महाकाय खडकांना धन्य धन्य वाटत असावेसें वाटतें. पाणी आपल्या अनेक प्रकारच्या मस्तींत नाचत होतें, तर खडक दुसऱ्या प्रकारच्या मस्तींत मग्न होते. त्यांच्या मनांत काय चालत असेल ? माझ्या मनांत काय चाललें आहे याची त्यांना जाणीव असेल काय ? थोडीशी पांढरी रेती तुडवून आम्ही यमुनेच्या तटावर जाअून बसलों. कांहीं पहाडी मुली तेथून आमच्या जवळून गेल्या. आम्ही तेथें बसून काय पहात आहों, याचें त्यांना आश्चर्य वाटलें. आमची जेथें दृष्टि पडे त्या ठिकाणीं विशेष काय आहे हें त्या पाहूं लागल्या; आणि ' अिथें तर विशेष कांहींच दिसत नाहीं ' अशा नजरेनें त्या चालत्या झाल्या. माझ्या मनांत काय चाललें आहे हें त्यांना कसें समजणार ?

त्या स्थानाला गंगाणी म्हणतात.

अेक ऋषि होता. गंगा आणि यमुना या दोन्ही लोकमातांची निर्विशेष भावानें तो भक्ति करीत असे. दोघींचें दर्शन घेतल्याशिवाय त्याचा अेकहि दिवस जात नसे. तो राहायचा आणि जेवायचा यमुनेच्या कांठीं; पण रोज

स्नानाला जायचा गंगेच्या पाण्यांत. मध्यें राक्षसासारखा राढी पर्वत पडलेला होता, त्याची त्यानें कधींहि क्षिति बाळगली नाहीं. पंधरा-वीस मैल अंतर कापायचें त्याच्या खिसगणतींतच नसे. शरीरानें चालूं दिलें तोंवर ह्या कष्टाळू ऋषीनें हा नियम पाळला. जेव्हां शरीर अगदीं क्षीण झालें तेव्हां त्यानें गंगेची स्तुति केली. गंगेला त्याची दया आली आणि यमुनेच्या कांठीं त्याच्या आश्रमाजवळ सफेत पाण्याच्या झऱ्याच्या रूपानें गंगा प्रकट झाली ! ऋषि कृतार्थ झाला. या नूतन गंगेंत स्नान करायला ऋषि किती दिवस जगला हें 'माहात्म्यां'त नमूद केलेलें नाहीं. तो झरा आम्ही पाहून आलों. हा ऋषि जणुं माझ्याच गोतराचा कोणी पूर्वज असावा अशी त्याच्याविषयीं माझ्या अंतःकरणांत भक्ति अुपजली. तो तपस्वी होता तसा तो कवीहि कांहीं कमी नव्हता. काव्य लिहितो तो कवि ही व्याख्या अव्यापीहि आहे आणि अतिव्यापीहि आहे. काव्य जगतो तो कवि हीच खरी व्याख्या. नाहीं म्हटलें तरी तीस-चाळीस वर्षें तरी त्यानें गंगेची आणि यमुनेची अुपासना जरूर केली असेल. हा नियम करतांना कशा प्रकारचे भाव त्याच्या हृदयांत अुद्भवले असतील बरें ! आणि या नियमपालनांत रोज-रोज त्याला केवढा आनंद वाटला असेल ! चारी धामांची यात्रा करून रोज नवे नवे अनुभव घेणें यांत अेक प्रकारची संस्कारिता आहे, तर तोच तो पथ दिवसांतून दोन वेळ कापायचा आणि तरीहि त्यांतून रोज नवा नवा आनंद लुटायचा यांत निराळ्या प्रकारची—पोक्त आणि खोल—संस्कारिता आहे. दिवसगतीनें त्या ऋषीला या पहाडावरच्या झाडांचीच काय, अेकूणअेक ढगांची सुद्धां ओळख झाली असेल. त्यांच्यादेखत कितीअेक बालतरु मोठे झाले असतील. त्यानें किती तरी वेळां जमुनेचें पाणी कमी-जास्त होतांना पाहिलें असेल; आणि आतां कुतूहल वाटण्याजोगी अशी कांहींच वस्तु न राहिल्यानें चित्त अंतर्मुख करण्यांत ही त्याची रोजची यात्रा त्याला अुत्तम रीतीनें मदतगार झाली असेल. अेकाग्रतेचें हें फळ आहे. सांसारिक आणि आध्यात्मिक अशा महान् महान् प्रश्नांचा अुलगडा करण्यांत अशी अेकाग्रता खडक फोडणाऱ्या सुरुंगापेक्षांहि अधिक परिणामकारी ठरते हा जगांतील सर्व तज्ज्ञांचा अनुभव आहे.

या ‘ यामुन ’ ऋषीचें ध्यान विसर्जन करून मी आजूबाजूला पाहतों तों स्वामी किंवा बुवा कोणी दिसेनात. ते थोडे दूर जाऊन अेका झोंपडींत ताजें काढलेलें लोणी खरेदी करण्यांत गुंग होते. मीहि तेथें गेलों. तो गोरस जणुं त्या ऋषीचाच प्रसाद असावा अशा भावनेनें सेवून आम्ही पुढें निघालों.

---

## राणागाम : : ३२

गंगाणी सोडून आम्हीं पुढें चाललों. रिवाजाप्रमाणें स्वामी झपाट्यानें सर्वांच्या पुढें जात, बुवा त्यांच्या पाठोपाठ, त्यांच्याबरोबर चालायची धडपड करीत आणि चढाओढीचें तत्त्व न मानतां माझ्या गतीनें सावकाश मी रस्ता कापीं. झपाटा आणि थकवा दोन्हींबरोबर माझी कमींत कमी दोस्ती. थोडेसें पुढें जातांच पहाडी विचित्र पोशाख घातलेल्या स्त्री-पुरुषांची अेक लहानशी छावणी दिसली. तें स्थायी गांव नव्हतें; तो कोणा भटक्या टोळीचा काम-चलाअू निवास होता. भटक्या टोळींतील स्त्रियांच्या पेहेरवेशांत, हावभावांत आणि डोळ्यांत अेक प्रकारचा अुग्रपणा आणि लुटारूपणा असतो. अबला किंवा ललना हें नांव त्यांना लागूच पडत नाहीं. त्यांच्या चावकी वेण्या प्रथम ध्यान खेचतात. या बाया जवळून गेल्या तर मनांत थोडी भीतीच अुपजते ! भटक्या टोळीचा विशेष गुण म्हणजे आळस. कांहीं काम करायचें असलें तर ते अचूक हस्तनैपुण्याच्या वेगानें करून टाकतील आणि पुनः आपले आळसांत बुडून जातील ! जणुं काय अीश्वरानें अितका फाजील वेळ कां अुत्पन्न केला आहे, याच्या चिंतेंतच ते पडले असावे आणि शेवटीं कंटाळून तो जांभयांनींच भरून काढीत असावे, असें दिसतें. या छावणीपासून रस्ता अेकदम थोडासा अुजव्या बाजूला जात होता, म्हणून रस्ता ठरविण्यासाठीं अुभें राहावें लागलें आणि निष्कारण या लोकांचें निरीक्षण करावें लागलें.

पुढें रस्ता फार कठीण लागला. स्वामी, बुवा आणि मी तिघे अेकत्र झालों आणि रस्ता कोणत्या बाजूला असावा याच्या विचारांत पडलों. पुढचा प्रदेश मोठमोठ्या विखुरलेल्या दगडांनीं भरलेला होता; जणुं पांच-दहा पहाडांमध्यें संकुलयुद्ध होअून गेलें आहे आणि आतां रंगभूमीवर विनाशाच्या अवशेषांव्यतिरिक्त कांहींहि राहिलेलें नाहीं ! जिकडे पाहावें तिकडे दगडच्च दगड. दूर नजर टाकतां अेका पहाडाची अेक बाजू दिसत होती, तीहि दगडांच्या ढिगांचीच बनलेली ! आम्हीं सहजच ताडलें कीं, पृथ्वीच्या पोटांत कांहीं अुत्पात झाला असावा आणि अेक पहाड भंगून येथें दगडांचा वर्षाव सुरू झाला असावा.

आतां या पहाडी रणक्षेत्रांतून रस्ता कसा काढायचा ? रणनदीसारखी यमुना मधून मधून ‘ मत जाव ’ म्हणत होती. शेवटीं स्वामींनीं अेका ठिकाणीं अेक कामचलाअू पूल शोधून काढला. प्रत्येक पहाडी मनुष्याला पूल बांधतां आलाच पाहिजे. लष्करांत कामचलाअू पूल बांधणाऱ्या कुशल लोकांची अेक स्वतंत्र तुकडीच असते. पहाडी मनुष्याच्या बाबतींत पूल बांधणें ही जीवनकला आहे. त्या पुलावरून शरीराचा तोल सांभाळून आम्ही पुढें गेलों. पुढें जातांना अेका धोंड्याखालीं दबलेला कागदाचा अेक फाटका तुकडा माझ्या हातीं लागला. त्याच्यावरचा छापलेला मजकूर पहातां सर्व्हेअरच्या कामाचे त्रिकोणमितीचे कित्येक आंकडे अेका कोष्टकांत व्यवस्थित बसविलेले दिसले. त्या कागदाला मीं त्याची जीवनकथा पुष्कळ विचारली; पण त्रिकोणमितीच्या आंकड्यांचें कोष्टक बडबडण्याव्यतिरिक्त तो कांहीं सांगेनाच ! ज्याला गणित समजत नाहीं त्याच्यापुढें काय बोलायचें असें त्याला वाटत असेल ! कोणी सरकारी अंमलदार किंवा अेकादा साहसी प्रवासी या रस्त्यानें गेला असेल, बर्फांत सांपडला असेल, किंवा वाघ-लांडग्याच्या भक्ष्यस्थानीं पडला असेल; कोणाला माहीत ? त्याचें सामान वाऱ्यानें आणि पावसानें वाहून गेलें असेल. अथवा या ठिकाणीं जो पहाड भंगला होता, त्याच्याखालीं कोणी प्रवासी दबून गेला असेल ! आणि त्याच्या कागदांपैकीं हा अेक अवशेष अुडत अुडत आकाशांत फिरला असेल, आणि अंतीं कांहींच न सुचल्यानें येथें येअून पडला असेल ! “ घडीघडीला कां अुगीच असा

अुडतो आहेस? मुकाट्यानें बैस ना अिथें," असें म्हणून अेकादा धोंडा त्याच्या छातीवर स्वार झाला असेल आणि हा कागद मग अहल्येप्रमाणें अेकाद्या अुद्धारकाची मार्गप्रतीक्षा करीत या ठिकाणीं पडून राहिला असेल! किती तरी दिवस हा कागदाचा तुकडा अिथल्या 'लँडस्लिप'ची आठवण म्हणून मीं माझ्याबरोबर बाळगला होता; पण पुढें त्याचें काय झालें कोण जाणे! हा कागदाचा तुकडा माझ्याबरोबर कांहीं बोलला असता, तर कदाचित् मीं त्याला अेकाद्या पदार्थसंग्रहालयांत पाठविलें असतें. घनघोर जंगलांत जेथें मनुष्यवस्तीचें नांवनिशाण नाहीं, जेथें पर्वताचे अुत्पात आणि जलप्रवाहाचे प्रपात यांचीच लीला पसरलेली आहे, अशा ठिकाणीं माणसाच्या मेंदूतून निघालेली त्रिकोणामिति असलेला कागदाचा तुकडा सांपडावा याचें आश्चर्य कां न वाटावें?

मोठ्या मुष्किलीनें वाट काढीत काढीत आम्ही पुढें चाललों. अितक्यांत दोन पहाडांमधून यमुना नदी गूढ भावानें येत असलेली दृष्टीस पडली. पाण्याचा रंग आणि पाण्याची शांति पाहून खात्री झाली, कीं येथें खोल डोह आहे. पुढें जायला रस्ता मिळेना. अुजव्या बाजूला खडा पहाड आणि डाव्या बाजूला पहाडाचे पाय बुडविणारें पाणी. पाण्यांत पाय भिजविल्याखेरीज पुढें जातांच येत नाहीं, अशी खात्री करून घेअून पहाडाच्या कमरेला चिकटून पाण्याच्या कांठाकांठानें पाणी कापीत आम्हीं पुढें सरकलों. पाण्यांतून असें चालायचें फारसें नव्हतें. पण पाण्यानें आमचा चांगलाच आदरसत्कार केला. पाण्याचा गारठा गुडघ्यापासून आणि कमरेपासून वर अगदीं काळजापर्यंत जाअून भिडला!

आतां चढण लागली. अंधार वाढत चालला. महामुष्किलीनें आम्ही राणागामांत पोंचलों. येथें शनैश्वर महाराजांना ग्रामदेवता म्हणून पुजतात. त्यांच्या लांकडी देवळांत आम्ही जाअून पोंचलों. असा कांहीं थकवा आला होता, कीं भयानक थंडी असूनसुद्धां पाय लांब करूनच झोंपावें असें वाटत होतें. गांवांतलीं मुलें कुतूहलानें आमचें स्वागत करीत होतीं. शहरांतलीं मुलें असलीं कीं, तीं प्रवाशाला अेकादी गोष्ट सांगण्याचा आग्रह करतात. शहराजवळच्या खेड्यांतील मुलें असलीं तर 'कुठून

आलां ? तुमच्या गांवांत अमकें काय आहे, तमकें काय आहे ? ' असे नाना प्रकारचे प्रश्न विचारतात. अिथलीं मुलें प्रवाशापाशीं ' सुअी दे, बिंदी दे ' अशीच मागणी अेकसारखी करतात. पहाडी स्त्रिया आणि मुली कपाळावर ओलें कुंकू लावून त्यावर अभ्रकाची किंवा बेगडाची चकती अथवा तारा चिकटवितात, त्याला ते लोक ' बिंदी ' म्हणतात. या बिंदीवर पहाडी मुली तुटून पडतात. हिंदुस्थानांत अेकादा प्रवासी पहाडांत गेला आणि आपल्याबरोबर सुअी, दोरा आणि बिंदी जर त्यानें बाळगली, तर कोणत्याहि गांवांत त्याचें स्वागत हें व्हायचेंच. देवळाच्या पुढच्या खोलींत आपल्या आखाड्यांत कुस्तीची जागा असते तसा अेक खड्डा होता, त्यांत आम्ही निजलों. अेक पहाडी कुत्रा गुरगुरत आमचा पहारा करीत होता. सामान्यपणें असें म्हणतां येअील कीं, पहाडांतील गायी शेळ्या-मेंढ्यांअेवढ्या लहान असतात, तर पहाडी कुत्रे वाघासारखे मोठे असतात.

मध्यरातरीं थकवा अुतरला आणि लघवी करायला मी बाहेर गेलों. समोर पर्वताचें अेक मोठें शिखर अनंतकालापासून बर्फ पांघरून निजलें होतें आणि त्याच्यावर चंद्राचा शीतल प्रकाश सोन्यानें मढविल्यासारखा चमकत होता. मध्यरातरीच्या ना शेंडा ना बुडखा अशा माझ्या कल्पनेला त्या पहाडांत महादेवाचें मस्तक दिसलें ! तें विशाल कपाळ, त्याच्या तळाशीं दोन डोळ्यांसारख्या त्या दोन दऱ्या, आणि मधलें तें चपटें नाक, आणि त्याच्या खालीं तोंडाशीं अेकरूप झालेली विचितर दिसणारी ती हनुवटी, आणि दोन कान जणुं काय रुसूनच दूर दूर बसले असावेत, आणि महादेवाचें तें मस्तक ताठ राहाण्याअैवजीं थकून आराम घेण्यासाठीं मागें ढळलें असावें असें दिसत होतें. आसपासची थंडी तर मार्शल लॉप्रमाणें देवळाच्या आंत जाण्यास फर्मावीत होती; तरीसुद्धां त्या पहाडाचें तें विशाल दृश्य कांहीं केल्या पाय अुचलूं देत नव्हतें. ज्या वेळीं चहूं बाजूंना पाणी थिजून बर्फच होअून गेलें होतें, त्या वेळीं काव्यतृषित कल्पना हें समोरचें दृश्य पीतच राहिली होती. आकाशांत बृहस्पतीचा तारा वृश्चिक राशीवर विराजमान झाला होता.

सकाळ झाली आणि गांवचे भक्तलोक लांब लांब जाड डगले घालून देवळाकडे येऊं लागले. त्यांच्याशीं चार शब्द कसेबसे बोलून आतां येथें जास्त राहाण्याची जरूर नाहीं असें जाणून आम्ही पुढें चालूं लागलों.

---

## जम्नोत्री : : ३३

पहाडांत जेव्हां धुकें असतें, तेव्हां पुष्कळ वेळां प्रवाशाला जादूचीं दृश्यें दिसतात. दह्यासारखें जाड धुकें पसरलें असलें म्हणजे मागें-पुढें अेका हातापेक्षां जास्ती क्वचित्च कांहीं दिसतें. समोरासमोर माणसें पळत आलीं तर बरोबर टक्कर होअील ! अेवढ्यांतच जर ढग विखुरले आणि सूर्याचे किरण आपला प्रताप गाजवूं शकले, तर तेंच धुकें तिथल्या तिथें वितळून जातें आणि मोटी विशाल सृष्टि अेकदम प्रकट होते. आश्चर्यमग्न होअून अिकडे तिकडे पाहूं लागावें तोंच मत्सरी ढग आकाशाचीं कवाडें बंद करून टाकतात; कीं लगेच आपण धुक्यांत मग्न होअून जातों आणि मग कांहींच दिसत नाहीं. हें अिंद्रजाल पाहाण्यांत कांहीं और मजा येते. आठवणीच्या आकाशांत जेव्हां विस्मृतीचे ढग अुठतात तेव्हां स्मरणयात्रेचेंहि असेंच होतें; प्रवासांतील अमुक संस्मरणें कुतूहलामुळें किंवा निरीक्षणामुळें वर्षांचीं पटलें भेदून ताजींच्या ताजीं दिसतात; तर मोठमोठे भूमिभाग विस्मृतीच्या धुक्यामागें पुसून अस्पष्ट होअून जातात ! राणागाम सोडलें आणि जम्नोत्रीला येअून पोंचलों. यांच्यामधला मुलूख कसा होता, त्यांत काय काय पाहिलें हें कांहींच आतां स्मृतिपथांत येण्यासारखें नाहीं. तें गेलें, सफलतापूर्वक गेलें, कायमचें गेलें. पांच-पांच दहा-दहा पावलांवर दम खाण्याला थांबावें लागत होतें, पण थोडेसें अुभें राहिलों कीं लगेच थंड वारा आम्हांला थोपटून पुनः ताजेतवानें बनवी, अेवढेंच आतां आठवतें.

विस्मृतीच्या पटलांतून बाहेर पडतांच जम्नोत्रीच्या खोऱ्यांत नदीच्या

अुजव्या बाजूचा अुंच पहाड आम्ही झपाट्यानें अुतरत आहोंत असें चित्र डोळ्यांपुढें अुभें राहातें. त्या वेळीं माझ्या आत्मकथेचीं कित्येक महत्त्वाचीं प्रकरणें मी बुवांच्यापुढें अुघडत होतों तेंहि आठवतें.

पहाडाच्या भयानक भूमींत प्रत्येक नदीला दोहों बाजूंना रखवालदार पहाड असतात; पण यमुना नदीनें जम्नोत्रीच्या आसपास जशा रखवालदारांची सोबत साधली आहे, तसे पहाड क्वचित्‌च दुसऱ्या कोणा नदीच्या नाशिबीं आले असतील. हिमालयाच्या असंख्य भव्य दृश्यांत जम्नोत्रीकडील दृश्य तिच्या शैत्यपावनत्वानें आणि भीषण गांभीर्यानें वेगळेंच पडतें. त्याचें वर्णन 'यमुनाराणी' नांवाच्या अेका लेखांत मीं थोडेसें दिलें आहे.* ज्या दृश्यानें हृदयांतील कोनाकोपरा हादरून टाकला आहे, त्याचें वर्णन अेकवार केल्यानंतर तेंच पुनः दुसऱ्या प्रकारें करणें आपल्याला आवडत नाहीं; आणि तीच वस्तु त्याच त्या रीतीनें अनेक वेळां सांगत बसणें बाजवीहि नाहीं.

पण या शीत प्रदेशांत कालिंदीच्या काठीं बसणाऱ्या असित ऋषींचें पुनः पुनः स्मरण झाल्याशिवाय राहात नाहीं. चहू बाजूंच्या पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या पर्वतांत हे असित ऋषी कसे शोभत असतील बरें! ज्यांच्या जीवनभेदी कल्पना वाढीस लावण्यासाठीं जम्नोत्रीहून अुतरतें स्थान अुपयोगी पडलें नाहीं त्या ऋषींची साधना किती अुग्र असेल! येथें राहिल्या राहिल्या त्या ऋषींनीं भूत आणि भविष्यकाळाच्या अितिहासांतील किती युगांवर नजर फेंकली असेल! मानवकल्याणाचे अनेक संकल्प त्यांनीं येथें केले असतील. त्यांचाच संस्कार आजच्या आपल्या राष्ट्रीय प्रकृतीवर सूक्ष्म रूपानें झाला असला, तरी आपल्याला तें कसें कळणार? अिथलीं गरम कुंडें पाहून त्या ऋषींनीं हें स्थान पसंत केलें असावें असें समजण्यापेक्षां त्यांनीं येथें निवास करावयाचें ठरविल्यानंतर त्यांच्या संकल्पबळाच्या योगानें विवश होअून निसर्गानें येथें अुष्ण झरे आपले निःश्वास म्हणून पाठविले असावेत, असें मानण्याकडे माझें मन अधिक झुकतें. अिथल्या पाण्याला गंधकाचा

---

* प्रस्तुत लेखकाचें 'लोकमाता' पुस्तक पाहा. (प्रकाशकः—'लोकशिक्षण' कार्यालय, पुणें).

गंधहि नाहीं. अेकादें मोठें अेंजिन चालत असावें तसें त्यांचें सूक्–सूक्–सूक् असें गायन अेकसारखें चालत राहातें.

लांबच्या प्रवास करून शेवटीं घरीं पोंचावें तितक्या आनंदानें आम्हीं तेथें रात्र काढली. तेथील गुहेंत गरमी आणि थंडी यांच्यामध्यें कूस फिरवीत फिरवीत रात्रीच्या अेकन् अेक पळाची गोडी आम्हीं चाखली. अेकहि घटका आम्हीं गाढ निद्रेंत गमावली नाहीं. अशीं स्थानें काय निसर्गानें कसलाहि हेतु मनांत न बाळगतां निर्माण केलीं असतील? आज कोणी महान् संकल्पहि करीत नाहीं कीं त्यांची साधनाहि करीत नाहीं. आज अशीं स्थानें भक्तीच्या तृप्त्यर्थ आणि काव्याच्या अुन्मादासाठीं मात्र उपयोगाचीं आहेत. साधना आपल्या जीवनांतून निघून गेली आहे, त्यामुळेंच अशीं स्थानें साधकविहीन झालीं आहेत.

---

# अुपरीकोटची चढण : : ३४

ज्या मोत्याला वेज पाडलेलें नसतें त्याची किंमत जास्त समजली जाते. शकुंतलेला पाहून दुष्यंतालासुद्धां 'अनाविद्धं रत्नम्'चें स्मरण झालें होतें. यात्रेकरूंची ये-जा अगदींच कमी असल्यानें जम्नोतरीचें तीर्थस्नान कांहींसें असेंच म्हणतां येअील. माझ्या मतें जम्नोतरीच्या यात्रेचें पुण्य सर्वांत अधिक आहे. यात्रेकरूंना बदरीनारायणापेक्षां केदारनाथाचें आकर्षण कमी, आणि गंगोतरीपेक्षां जम्नोतरीचें कमी. यांत आणखी जम्नोतरीची वाट यायला जायला अति कठीण. तेव्हां अंगचोर यात्रेकरू फारसे या बाजूला येतच नाहींत. त्यामुळें या बाजूचे रहिवासीसुद्धां कमी धूर्त, अगदीं भोळे म्हणतां येतील. येथील पंड्यांत गरिबी व याचनावृत्ति झांकण्याची लुच्चेगिरी मुळींच आढळायची नाहीं. त्यांचा आहार अगदीं साधा. कोणी आजारी पडलें तर जिरें, मिरें, लवंग किंवा सुंठ अशी कांहीं औषधि वापरली कीं झालें बरें. येथें मीं प्रथम तर्क बांधला कीं, आपण आपला स्वाद बिघडविण्यासाठीं आणि कोठ्याला जन्मभर त्रास देण्यासाठीं मसाला म्हणून ज्या वस्तू खातों, त्या

विचाऱ्या मुळांत अतिशय आजाराच्या प्रसंगीं औषध म्हणून वापरल्या जात होत्या. माणसाला दिसलें कीं, जर अपचन झालें तर तें अशा अुष्ण वनस्पतींच्या योगानें नाहींसें होअू शकतें. अितकें ज्ञान झाल्यानंतर खाण्यांत संयम ठेवील तर तो मनुष्यप्राणी कसला ? अपचन होण्यांत आपली अब्रू जाते ही गोष्ट मनुष्य विसरून गेला ! निसर्गाशीं अिमानी राहायला तो पशु थोडाच आहे ? त्याला जर पडण्याची मोकळीक आहे, तर मग पडल्यावांचून समाधान कसचें ? माणसानें फाजील खाअून त्याचबरोबर अपचनाचें औषध खाण्याचा नियम केला आणि निसर्गाचा सूड घेतला ! या औषधाची अशी चटक लागली, तेव्हां तें औषध न राहतां मसाला बनलें ! मसाला खाअूनहि जेव्हां अपचन होअू लागलें तेव्हां आतां काय करावें या चिंतेंत आतां मनुष्यजात पडली आहे ! अिकडचे पहाडी लोक अजून सुधारणेमुळें तितके बिघडलेले नाहींत. मिरें, जिरें, लवंग त्यांना अजून औषधच आहे. ( अितकें लिहिल्यावर आतां लक्षांत आलें कीं, माझी यात्रा गेल्या पिढींत झालेली. अजूनपर्यंत जम्नोत्रीजवळच्या समाजांत सुधारणा आणि प्रगति शिरली नसेल, असें कसें होअील ? )

जम्नोत्रीहून आम्ही परत राणागामला आलों आणि तेथून अुपरीकोटची चढण चढून अुत्तरकाशीकडे जाण्याचा संकल्प केला. वातावरणांत अुपरीकोट भरलें आणि अुपरीकोटचें माहात्म्य अथवा दौरात्म्य प्रत्येकाच्या तोंडून अैकायला येअूं लागलें. अेकानें हटकलें : " अहो अिकडे कुठून आलां तुम्ही ? अुपरीकोट ओलांडायचा म्हणजे काय साधें काम आहे ! ' काबुलकी लढाअी और अुपरीकोटकी चढाअी ' जो जिंकील तो शूर. " आणि पुढें अनुभवहि तसाच आला.

येथें आम्हीं रस्त्यांत पहाडी धार्मिक नाच पाहिला. पहाडी लोकांचा चेहरा हिंदी आणि चिनी ढबीच्या मिश्रणाचा असतो. त्यांच्या चेहऱ्यावर स्वास्थ्य असें दिसतच नाहीं. रडण्याची आणि हंसण्याची अेकदमच तयारी केली असल्यासारखें त्यांचें तोंड सुरकुतलेलें असतें ! थंडीमुळें त्यांना जाड लोंकरीचे कपडे घालावे लागतात, पायांत जाड जाड चढाव, त्यांच्यावर वरच्या बाजूला लोंकरीच्या जाळीचीच बेलबुट्टी. सारें ध्यान मोठें मजेदार वाटतें. हे लोक अेका देवळापुढें नाचत होते. त्यांत बुड्ढेहि होते आणि

जवानहि होते. कित्येकांनीं पहाडी पातळ दगडाचे तक्ते पाठीशीं बांधले होते आणि त्यांच्यासह ते नाचत होते. या नर्तनांत लास्यहि नव्हतें कीं तांडवहि नव्हतें. तरी पण कोणतीहि क्रिया अमुक नियमांनीं पुनः पुनः झाली म्हणजे त्यांतून कांहीं तरी भाव निर्माण व्हायचाच ! बुजलेल्या म्हशी अेकामागून अेक पळत सुटल्या म्हणजे जशी गंमत दिसते, तशीच गंमत यांत वाटत होती ! पण या नाचामागें धार्मिक भावना काय आहे याचाच मी विचार करीत होतों; आणि या दगडी फरशांचें प्रयोजन काय ? मला वाटलें कीं, अशा फ़रशा लांबून आणून, त्यांच्याबरोबर नाच करून मग त्या देवळाला अर्पण करण्यांत कांहीं विशेष पुण्य असेल. कारण या देवळाचें छप्पर फरशांच्या अशा तक्त्यांचें केलेलें होतें. फरशीचा आकार चौरस किंवा लंबचौरस करण्याचा जरासुद्धां हे लोक प्रयत्न करीत नाहींत. छपरावर त्या कशाबशा बसवून टाकतात; पण छप्पर कुठेंहि फाजील जाड किंवा बेडौल होअूं नये अेवढी कला यांच्यांत असते आणि आंत पाणी येण्याची किंवा बर्फ पडण्याची बिलकुल भीति नाहीं.

अुपरीकोटच्या चढणीच्या सुरवातीलाच पाय घसरायला लागले. कांहीं कांहीं ठिकाणीं, मनुष्य मूळचा चार पायांचा पशु आहे, याचा पुरावा द्यावा लागला ! ओल्या जमिनींतून बाहेर पडलेल्या मुळ्यांना पकडीत पकडीत आम्ही वर चढूं शकलों. आजची चढण कठीण आहे हें लक्षांत घेअून बुवांनीं आम्हांला सकाळीं नास्ता ( न्याहारी ) चांगलाच दिला होता. तो खाअून आम्ही चालूं लागलों होतों. चालूं लागलों म्हणण्यापेक्षां रागावलेल्या रुसक्या पहाडाशीं अनुनय करूं लागलों असें म्हणणेंच अधिक बरोबर होअील. आम्ही थोडेंसें पुढें गेलों आणि रिवाजाप्रमाणें आमचे कुली मागें राहिले. वर कुठेंहि मनुष्यवस्तीचें नांव कीं निशाण नाहीं. कांहीं कांहीं ठिकाणीं अशीं कांहीं सुंदर फुलें फुललीं होतीं, कीं जवळच कुठें तरी अेकाद्या ऋषीचा आश्रम असला पाहिजे अशी अपेक्षा मनांत अुत्पन्न होअी. नुसतें जंगल असलें तर अेकाच जातीचीं फुलें चहूं बाजूंना दिसतील. पण येथें तर तऱ्हेतऱ्हेच्या फुलांचे गुच्छ बनवावेत तशीं रोपेंच अुगवलेलीं दृष्टीस पडत होतीं. अिथल्या निसर्गांत अुधळेपणाबरोबर खेळकरपणाहि असेल असें कुणाला वाटेल तरी

का ? मैलच्या मैल चाललें तरी मनुष्यवस्तीचें काय, अेकाद्या माणसाचेंहि दर्शन व्हायचें नाहीं. आम्हां तिघांत रस्ता चुकण्याची कला अेकव्या बुवांनींच साध्य केली होती ! आम्हांला वाट अचूक सांपडायची, तर बुवा अचूक आडवाटेनें जाअून कुठें तरी भटकायचे ! जंगलांतून जातांनासुद्धां कोपर किंवा गुडघा झाडाला त्यांचाच थडकायचा !

शेवटीं अुपरीकोटच्या शिखरावर पोंचलों. जिकडे पाहावें तिकडे बर्फच बर्फ. पाणी नसल्यामुळें हें बर्फ फोडून थोडथोडें आम्ही खात असूं. गुलकंदांत जशी साखरेची कणी असावी, तशी या पहाडी बर्फांत बर्फाची कणी असते. बर्फ खाण्यांत मजा खूप वाटते, पण तहान भागविण्याचें काम तें करीत नाहीं.

अेवढी जबरदस्त चढण चढल्यानंतर भूक लागली तर भुकेचा काय बरें दोष ? पण खाण्याची काय व्यवस्था ? पर्वताच्या शिखरावरून वाटेल त्या दिशेला नजर फिरविली तरी बादरू किंवा कैरासिंग दृष्टीला पडेचनात. माझा धीर सुटला. मीं कुली कोठें असतील, कोठें गेले असतील, घसरून कोठें पडलेबिडले तर नसतील, अशी चर्चा सुरू केली. ते पळून गेले असतील अशी मात्र शंकासुद्धां आम्हा कोणाला आली नाहीं. पहाडी लोकांचा स्वभाव पळून जाण्याचा नसतो आणि सरकारी अंमलदारापुढें जर करार नोंदला असेल, तर कोणी पळून जाण्याची हिंमतहि करायचा नाहीं. या लोकांवर सरकारी अंमल जवळ जवळ गुलामासारखा आहे. शिखरावर अेक मोठी शिळा थोडी कलती झालेली आहे, पाअूस आला तर तिच्या बगलेखालीं थोडा आसरा मिळूं शकतो. अिकडील लोक याला गुंफा म्हणतात. पडायला झालेली भिंत जरा कलती असेल, तर तिला आपण गुंफा म्हणूं काय ? पण या पहाडावर आकाशांतील तोफखान्यापासून बचाव करण्याची आशा धरतां येण्याजोगी ही अेवढीच अेक गुंफा आहे.

या प्रदेशामध्यें या ऋतूंत ढगांचा कार्यक्रम मोठा नियमित असतो. रात्रीं जिकडेतिकडे दऱ्याखोऱ्यांत ढग निजलेले असतात. आठ-नअू वाजतां जांभया देत ते अुठतात. हळूहळू घसरत घसरत ( पण घसरून ते खालीं न जातां वर जातात तेव्हां त्यांना अुंचावत अुंचावत म्हटलें पाहिजे,

नाहीं का ? ) दरीच्या वरच्या टोंकाला पोंचतात. मग अुडावें कीं नाहीं याची पुष्कळ वेळ भवति न भवति मनांत करून शेवटीं पंख फडफडण्याचा आवाज न करतांच अुत्तरेकडे चालते होतात. सगळेच उत्तरेकडे जातात, जणुं काय सैन्य अेकत्र करण्याचा ‘ समय ’ तिकडेच ठरला आहे. तेथें सर्वजण मिळून रणनीतीची मंत्रणा जवळ जवळ तीन वाजेपर्यंत चालवितात. तीन-सव्वातीन व्हायला आले कीं झाली त्यांची दक्षिणेकडील स्वारी सुरू ! जेथें जरूर वाटेल तेथें मधून मधून थोडे थोडे ढग तुटून पडून खालच्या सृष्टीला चीत करतात. वरचे ढग जीत झाली या आनंदांत पुढें जातात. अुपरीकोट-सारख्या मोठ्या पहाडावर लहान लहान गारा पाडून कसें चालेल ? तेथें तर लिंबाअेवढ्या आणि आंब्याअेवढ्या मोठ्या गारांचाच तोफखाना चालला पाहिजे ! अिकडचे लोक त्यांना ‘ ओले ’ म्हणतात. त्यांचें नांव अैकतांच स्थानिक पहाडी मनुष्यसुद्धां थरथर कांपायला लागतो; कारण गारांचा अेक जरी गोटा कानशिलावर बसला तरी माणूस तेथल्या तेथेंच कायमचा बसायचा. आमच्या छत्र्या आम्हीं कुलींच्याजवळ देअून ठेवीत होतों. सारा दिवस भिजायचें ही अिष्टापत्तीच होती. चालून चालून अंगांत अुष्णता आली असेल तर ती थोडी तरी कमी झाली पाहिजे ना ? चालल्यानंतर पोट भरून खाअील तो आजारी कसला पडतो ? रातवासासाठीं पथारींतले कपडे मात्र कोरडे असले पाहिजेत नाहीं तर शेकोटीला शरण जायला लागायचें.

पण या पहाडावर कुली तरी छत्री अुघडण्याची हिंमत कशी करणार ? छत्रीची चाळण थोडीच करायची आहे ?

गुंफेजवळ आम्हीं पोंचलों व डोळे ताणून ताणून चहूं बाजूंना पाहिलें. आमची चर्चा संपली, पण आमच्या कुलींना आमची कांहीं दया आली नाहीं. अेकजणहि दर्शन देअीना ! तीन तर वाजायला आले होते; अितक्यांत लांबून कित्येक यात्रेकरू येत असलेले दिसले. थोड्याच वेळांत ते जवळ आले. परमेश्वर भेटल्यासारखा आम्हांला आनंद झाला. आमची अडचण पाहून त्या गरीब लोकांनीं आम्हांला पीठ, मीठ, तवा, लांकडें वगैरे थोडथोडेसें सामान दिलें आणि सांगितलें, “ स्वैंपाकांत फार वेळ लावूं नका हं आतां ‘ ओले ’ पडतील. आमची येथें थांबण्याची हिंमत नाहीं. आमचीं भांडींकुंडीं खालच्या

गांवांत आम्हांला पोंचती केलीं तरी चालेल." आमचें अुत्तर अैकण्यापुरतेसुद्धां ते थांबले नाहींत. बुवांनीं रोटले तयार केले. मीं कीं स्वामींनीं बर्फ कुटून पाणी तयार केलें. मिठाच्या साहाय्यानें अथवा खरें म्हटलें तर लांडग्यासारख्या भुकेच्या मदतीनें रोटले घशाखालीं ढकलले आणि आम्हीहि पहाड अुतरूं लागलों. आम्हांला अुशीर झाला होता. तेव्हां आम्हांला जलद जावें लागलें. पहाड अुतरायच्या वेळेला आम्ही त्रिपाद होत असूं हें मीं सांगितलेंच आहे. शरीराचा अेक पाय गळून पडला तरी चालेल, पण हातांतली काठी मोडली किंवा विसरली तर तेथें चालायचें नाहीं. खालच्या गांवाच्याजवळ आम्ही पोंचतों न पोंचतों तोंच आमचे हितकर्ते यात्रेकरू आम्हांला भेटले. आमची गति बघून ते चकितच झाले. अेकानें सांगितलें कीं त्यांच्यापैकीं अेक म्हातारी पाय घसरून पडली, अशी कांहीं गडगडत नेली कीं, सर्वांनीं तिची आशा सोडून दिली होती; पण सुदैवानें खालच्या बाजूला अेक यात्रेकरू अुभा होता त्याची नजर गेली आणि त्यानें आपली लांब काठी म्हातारीच्या अवतरणाच्या आड घातली. सध्याकाळभर सर्वांमध्यें हाच अेक गप्पांचा विषय झाला.

पहाडांत आणीबाणीच्या वेळीं ज्यांनीं आम्हांला मदत केली होती आणि आमच्यावर अितका विश्वास टाकला होता ते कांहीं अमीर लोक नव्हते. जन्मभर जेव्हां वेठ करावी तेव्हां कुठें अेका यात्रेपुरते पैसे सांठायचे. ही त्यांची यात्रा म्हणजे कांहीं सृष्टिसौंदर्य पाहाण्यासाठीं काढलेली सहल नसते, तर सगळ्या जन्माचें सार्थक करून घेण्याची ही अेकमात्र संधी असें ते समजतात. बारा बारा वर्षें वेठ करून किती तरी गरीब लोक लग्न करतात. तीस-चाळीस वर्षें पोटाला जेव्हां चिमटा घ्यावा, तेव्हां कित्येकांना राहाण्यासाठीं घर अुभें करण्याची हिंमत येते. अशाच रीतीनें परमार्थाला परम अर्थ मानणारे हे भक्त साऱ्या जन्माची कमाअी अेकत्र करून अशा यात्रेला निघतात. सहीसलामत परत घरीं पोंचले तरी काय नि वाटेंतच देव झाले तरी काय! सार्थक अेकसारखेंच! अशीं माणसें दुसऱ्या यात्रेकरूंना विनासंकोच मदत करतात, हा त्यांचा त्याग असला तरी त्यांत आश्चर्य असें कोणाला वाटत नाहीं. मनुष्याच्या हृदयांत मानवप्रेम, प्राणिप्रेम

वास करतें म्हणूनच मनुष्याचें अस्तित्व टिकलें आहे–पोलिस फौज किंवा कायदेकानून यांच्यायोगें नाहीं.

खालच्या गांवांत पोंचतों तों तेथें देऊळ आणि धर्मशाळा चिक्कार भरुन गेल्या हेत्या. आंगणांतसुद्धां लोक पडले होते. आंगणाच्या आजूबाजूला भिंत होती. भिंतीला लागून ओटा होता. तो ओटा रिकामा पाहून बुवांनीं घाओीघाओीनें आपली पथारी त्यावर पसरली. पण त्यामुळें अेक विघ्न अुभें साहिलें. गांवचे लोक अेकदम बुवांवर अुलटले. ते काय बोलतात तें आम्हांला समजेना, कारण लक्ष्यांत येओीना, कोणी शांतपणें बोलेना. बुवा आश्चर्यानें स्तंभित झाले, तर अिकडे बुवांच्या आचरणांत अपेक्षित फेरफार झाला नाहीं हें पाहून स्थानिक लोक चांगलेच चिडले ? यात्रेकरू काय चाललें आहे तें पाहत होते. शेवटीं मामला मारामारीपर्यंत येणार असें वाटूं लागलें. दिवसभराच्या श्रमानंतर थोडी कणीक मअू झाली असती तर बरेंच वाटलें असतें; थोडा पंजरीपाक अुपयोगी ठरला असता; पण तो आमच्या नशिबीं नव्हता ! त्यामुळें अेकानें आम्हांला समजावून दिलें कीं, ‘ हा ओटा म्हणजे ओटा नव्हे, पांडवांची बसायची जागा आहे ! ! ’ मीं माझ्या रीतीनें लोकांची समजूत घातली कीं, बुवांना अशा स्थितींत ओटाच काय–अिंद्रप्रस्थ–हस्तिनापूरची गादी मिळाली तरी तिचा ते लोभ धरणार नाहींत. प्रसंग काय आहे हें ओळखून मीं लगेच धर्मात्म्याचा अवतार धारण केला आणि लोकांची खरडपट्टी काढून त्यांना सांगितलें कीं, जेथें पांडवांचा वास आहे त्या ठिकाणीं अेकादि तुळस लावलेली नाहीं कीं फुलें वाहिलेलीं नाहींत, कीं त्याच्याभोंवतीं लहान लहान रोपट्यांचें कुंपणसुद्धां नाहीं ! काय बेदरकारी ही ! ’ हल्ला चढवायला आलेले गांवचे लोक माझ्या धर्मप्रवचनाच्या माऱ्यासमोर गायी-सारखे गरीब होअून आपला बचाव करूं लागले कीं, ‘ आम्ही खेडेगांवचीं माणसें, आम्हांला हें कुठून समजणार ? ’

त्या रात्रीं मी जेवलों नाहीं. सगळ्या प्रवासांत अुपाशी राहिल्याचें हेंच अेक अुदाहरण. मला स्मरण झालें कीं, हा माझ्या आओीचा श्राद्धदिन आहे. स्वामी म्हणाले, ‘ अुद्यां सकाळीं अुठल्यावर पुष्कळ चालायचें आहे. आतां खाल्लें नाहीं तर कसें चालेल ? ’ मी अुत्तरलों, ‘ अुद्यांसुद्धां अुत्तरकाशीला

पोंचल्यावरच जेवीन.' मंत्रयुक्त श्राद्ध करण्याची सोय नव्हती आणि त्यावर माझी श्रद्धाहि नव्हती. सकाळीं लवकर अुठून आम्हीं निघालों; दहा-अेक मैल चालून आम्हीं अुत्तरकाशी गांठली.

---

## अुत्तर काशी : : ३५.

गंगा नदीचा प्रवाह अुत्तरेकडून दक्षिणेला आणि नंतर बहुतेक पूर्व आणि दक्षिण दिशेलाच वाहातो, अेवढें हिंदुस्थानचा नकाशा पाहूनहि सहज समजण्याजोगें आहे. अशा या लांबच लांब प्रवाहांत कोणत्याहि ठिकाणीं जर तो दक्षिणेकडून अुत्तरेकडे गेला, तर तें अेक मोठें आश्चर्यच म्हणायचें. अशी अुत्तरवाहिनी गंगा तीन ठिकाणीं आहे. आपणां सर्वांना माहीत आहे कीं बनारसचें—काशीचें माहात्म्य त्या ठिकाणीं गंगा अुत्तरवाहिनी आहे याचमुळें आहे. याचप्रकारें हिमालयाच्या पहाडांत गंगेचा प्रवाह दक्षिणेकडून अुत्तरेकडे वाहात असलेला पाहून हें अद्भुत दृश्य आपल्या पूर्वजांना काव्यमय वाटलें. असेल, म्हणून त्यांनीं त्या ठिकाणचें नांव अुत्तरकाशी ठेवलें. अेकदां त्याला क्षेत्र म्हटल्यावर काशींत असलेल्या मुख्य मुख्य देवांची येथें स्थापना केल्यावांचून गत्यंतर आहे काय ? अुत्तरकाशींत काशीविश्वनाथ आहे, बिंदुमाधव आहे, मणिकर्णिक आहे, दत्तात्रेय आहे आणि परशुराम आहे. जितकें कांहीं काशींत आहे तें सर्व छोट्या प्रमाणांत अुत्तरकाशींत मिळालेंच पाहिजे. ( अुत्तरकाशींत वानरें नाहींत, त्याला अिलाज नाहीं. पण वनगायी पुष्कळ आहेत. )

अुत्तरकाशी दोन पहाडांच्या मधल्या अेका रुंद विशाल खोऱ्यांत वसली आहे. अुन्हाळ्यांत येथें पुष्कळ साधू राहातात; आणि कां राहाणार नाहींत ? जो गृह-स्थ आहे, घराशीं बांधला गेला आहे, तो माणूस असूनहि स्थावर होअून बसतो ! अुन्हाळा असो, हिंवाळा असो, कीं पावसाळा असो,

त्याला आपलें स्थान सोडणें शक्य होत नाहीं. निर्वाहासाठींसुद्धां त्याला अेकाच स्थानाशीं गुंतून राहावें लागतें. साधू म्हणजे अनिकेत, अनागरिक; त्यांनीं काय म्हणून बारा महिने तेरा काळ अेकाच ठिकाणीं पडून राहावें ? दिवाळीचा अुत्सव आला कीं साधू अमृतसरला जातात, हिंवाळा हृषीकेशच्या अुबदार खोल्यांत काढतात आणि अुन्हाळा आला कीं गिरि-आरोहण करून अुत्तरकाशीला जाअून पोंचतात. दुनियेंतील जास्तींत जास्त आनंद अमीर आणि फकीर यांच्यासाठींच आहे. फरक अितकाच कीं फकिराला फिकीर असत नाहीं. अुन्हाळ्यांत अुत्तरकाशीची हवा आल्हादकारक असतें. हिमालयाची प्राणदायी हवा, पहाडांतील गव्हाचा पौष्टिक खुराक, आणि गंगेचें अमृतजल. अिथले साधू चार महिन्यांत असे कांहीं लालबुंद आणि अलमस्त होतात कीं, अेकेकाचें शरीर पाहातच राहावें ! हे लोक अन्नछत्रांतील तयार अन्न खातात, आपापसांत तऱ्हेतऱ्हेची चर्चा करतात, पहाडांत मन मानेल तितकें फिरतात आणि येतां-जातां यात्रेकरूंना आशीर्वाद देतात. कांहीं किरकोळ स्वादिष्ट खाण्याची अिच्छा झाली, तर त्याची भिक्षा आसपासच्या भल्या पहाडी स्त्रियांकडून मिळाल्याशिवाय राहात नाहींच.

अुत्तर काशींत कित्येक साधू चार-पांच महिने आपलें कॉलेजहि अुघडतात. मोठमोठे संन्यासी येथें येअून राहातात. विरक्त भावानें वेदान्ताची चर्चा करतात, ज्याला श्रद्धा असेल त्याला खंतीनें शिकवितात, आणि चिरंतन शांतीचें जीवन व्यतीत करतात. अजबघराच्या जोडीला जो प्राणिसंग्रह असतो, त्यांतल्या वाघसिंहांना जसा प्रेक्षकांचा रोज अुपद्रव सहन करावा लागतो, तसा अिथल्या साधूंना यात्रेकरूंचा अुपद्रव सहन केल्याखेरीज सुटका नसते. ‘ स्वामीजी महाराज, दर्शन दो ’; ‘ स्वामीजी महाराज, कुछ अुपदेश सुनावो; ’ ‘ स्वामीजी महाराज, अेवढा सुका मेवा खा ’; ‘ स्वामीजी महाराज, या माझ्या सुनेला आशीर्वाद द्या ’; ‘स्वामीजी महाराज, या जवळच्या धर्मशाळेंत येअून थोडी भिक्षा ग्रहण करा; जेवणारे सर्वजण आपली वाट पाहत बसले आहेत, ’ वगैरे कांहीं ना कांहीं पीडा त्यांना असायचीच.

कालीकमलीवाल्यांच्या येथील धर्मशाळेंत आम्हीं दोन दिवस मुक्काम केला. धर्मशाळा थेट गंगेच्या कांठावर होती; पाण्यांत अुतरायला घाट सुरेख;

बाजार, डाकघर, सर्व कांहीं सोय या ठिकाणीं होती. नदींत सुरेख स्नान करून मी कित्येक संन्याशांबरोबर गप्पा झोडूं लागलों. बुवा प्रवासासाठीं कित्येक वस्तू खरेदी करण्याच्या व्यवस्थेला लागले, आणि स्वामींना येथें डाकघर असल्याचा अितका कांहीं आनंद झाला कीं, त्यांचें पत्रांवर पत्रें लिहिणें चालू झालें ! संध्याकाळीं अेका देवळांत अेका साधूंच्या दर्शनाला आम्ही गेलों. ते विद्वान् आणि योगी असल्याबद्दल त्यांची ख्याति होती. येथें अेका महाराष्ट्रीय दडीसंन्याशाशीं थोडीशी ओळख झाली. ते मूळचे पंढरपूरकडचे राहाणारे. त्यांनीं आमच्याशीं मराठींत बोलण्याचा पुष्कळ आनंद लुटला. येथें स्थायी राहणारे संन्यासी कसे असतात त्याची तपशीलवार माहिती द्यायला ते चुकले नाहींत. अिथल्या पहाडी भाषेंतील कांहीं निवडक शब्दांची त्यांनीं आम्हांला ओळख करून दिली. हे संन्यासी शरीरानें वाळकुटे होते, तोंडांतील किती तरी दांतांनीं राजीनामा दिला होता, तरी त्यांचा विनोद, टिंगल आणि गोष्टीवेल्हाळ स्वभाव आणि हास्यरस अुत्पन्न करण्याची हातोटी, यांतलें अेकसुद्धां त्यांनीं सोडलें नव्हतें.

अुत्तरकाशींत आराम घेअून आम्ही भटवाडीला गेलों. भटवाडीचें प्राचीन नांव भास्करपुरी. भास्कराचे भट कसे झाले हें आम्हांला कोणी समजावून सांगितलें नाहीं. अेकचाकी रथाला सात घोडे जोडून त्याला अखंड दौडविणारा सूर्यनारायण 'भट' म्हणजे बहाद्दूर वीर खराच ! भटवाडींत पाहाण्यासारचें कांहीं नव्हतें; पण आम्ही आमचे फाजील सामान येथें दुकानांत ठेवून पुढें गंगोत्रीला गेलों होतों, त्यामुळें हें स्थान लक्षांत राहिलें आहे. गंगोत्रीहून परत येतांना भटवाडीहूनच केदारनाथाकडे जाण्याला फांटा फुटतो.

भटवाडी ओलांडून पुढें गेलों आणि सृष्टीनें अेकदम नितान्त रमणीय स्वरूप धारण केलें. अुंच अुंच झाडें, त्यांच्या लांबच लांब पण खालीं नमलेल्या फांद्या, नदीचा पट, त्यांत अखंड स्नान करणारे ऋषीसमान गुंडगोळे खडक, सुगंधी हवा—जें पाहावें तें आकर्षक. मला थोडेसें आठवतें कीं, येथून सत्यनारायणाला जातांना आम्हांला अेकवार गंगा नदी ओलांडावी लागली होती. येथें जवळच अेक मोठा धबधबा आहे. त्याचें वर्णन स्वामींनीं आणि बुवांनीं माझ्यापुढें पुष्कळ केलें. चालत असतांना माझें लक्ष कुठें

चरायला गेलें होतें कुणास ठाअूक—मला तो दिसलाच नाहीं. परत येतांनाहि तो पाहिल्याचें आठवत नाहीं. स्वामींनीं या धबधब्याचें अितकें कांहीं अुत्साहपूर्वक वर्णन केलें कीं, मला असलें सुंदर दृश्य गमाविल्याबद्दल आंबट तोंड करून बसणें भाग पडलें !

सत्यनारायण येथें अेका पंड्याबरोबर थोडें बोलणें झालें. त्यानें विचारलें, ' तुम्ही कोठून आलां ? ' आम्हीं सांगितलें. ' मुंबअीहून. ' अितक्या दूर आल्यानंतर याहून सूक्ष्म स्थलनिर्देश करण्यांत कांहीं अर्थ नसतो. त्याला मुंबअी काय आणि बेळगांव काय सारखेंच ! मुंबअीचें नांव अैकतांच त्यानें विचारलें, ' वेंकटेश्वर छापखाना जेथें आहे तिकडूनच का ? ' मीं म्हटलें, ' होय, तिकडूनच. ' मुंबअींत दुसरें असें आहे काय, कीं ज्याची कीर्ति अिकडे पहाडापर्यंत पोंचावी ? ' वेंकटेश्वर छापखान्या ' च्या तिकडून मी आलों आहें हें अैकून त्यानें ताबडतोब मञ्जूपणें विचारलें. ' माझ्यासाठीं तिथून अेक शनिमाहात्म्य पाठवाल का ? ' मीं ' हो ' म्हटलें, त्याचें नांवगांव माझ्या डायरींत टिपून घेतलें आणि माझ्या स्मरणाप्रमाणें सात-आठ महिन्यांनंतर अेक शनिमाहात्म्य त्याच्या पत्त्यावर कुठूनसें पाठवून दिलें. मला आशा आहे, कीं तें माहात्म्य त्याला पोंचल्यानंतर शनि-महाराजांनीं त्याला कसलीहि पीडा केली नसेल !

सत्यनारायणाहून थोडें पुढें गेलों तों गंगनाणी नांवाची अेक चट्टी लागली. येथें अेका वृद्ध साधूची कीर्ति आम्ही अैकली, म्हणून गंगा ओलांडून पलीकडे अेक अुष्ण जलकुंड होतें तिकडे गेलों. येथील झऱ्यांमधून चुन्याचे जे सूक्ष्म कण निघत ते अेकमेकांवर चढून त्यांचें सुंदर वारूळ झालेलें मीं पाहिलें. हिमालयांतील कित्येक प्रवाहांचा हा विशेष आहे. पाण्यांत अेकादी जाड पानांची फांदी पडली कीं पाणी हळूहळू तिच्यावर परिणाम करूं लागतें. पानें जसजशीं कुजत जातील, तसतसा पाण्याचा परिणाम अधिकाधिक होत जातो. पानांचे आणि त्यांच्याबरोबरच्या त्यांच्या लांकडाचे सूक्ष्म कण जसजसे खरत जातात, तसतसे चुन्याचे सूक्ष्म कण तेथें त्याच आकाराचे चढत जातात. सहाअेक महिन्यांत त्या सगळ्या फांदीचा पुनर्जन्म होअून व वनस्पतीच्या ठिकाणीं संगमरवरी दगडासारखी

नाजूक दिसणारी पण चांगलीच मजबूत अशी फांदी तयार होअून बसते. तिची कारागिरी पाहून ग्रीसचे शिल्पकारसुद्धां मुग्ध होतील ! मूळच्या फांदीच्या रूपाखेरीज त्यांत कांहींच शिल्लक राहात नाहीं. आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास न ठेवतां पुनर्जन्म मानणाऱ्या बुद्ध भगवानांचें या पहाडी चमत्काराकडे जर लक्ष गेलें असतें, तर त्यांनीं दिव्याचा दाखला देण्याअैवजीं या खनिज-जलज फांदीचाच दाखला दिला असता. ( अेकदां लाहोरांत अेकाच्याकडे अशाच रीतीनें बनलेले अेक अक्रोडाचें फळ मीं पाहिलें होतें. पण त्यांत चुन्याअैवजीं लोखंडाची माती होती आणि त्यामुळें वजनाला हें अक्रोड फार जड लागत होतें. )

अिथल्या वृद्ध साधूंच्याकडे स्वामींचें लक्ष विशेषच गेलें. स्वामी त्यांच्याशीं बोलण्यांत गुंग झाले होते, तेवढा वेळ मी आपला तें चुन्याचें चारूळ पाहण्यांत गर्क झालों होतों. परत येतांना स्वामींनीं सांगितलें, ‘ हे साधु येथें तीस वर्षें झालीं राहात आहेत. ’ या माहितीविषयीं साशंक होण्याचें मला कांहीं कारण नव्हतें, तरी मनांत विचार आला कीं, हिमालयांत यात्रेच्या वाटेवर कित्येक साधू याच रीतीनें झोंपडी बांधून राहातात, आसपासच्या पहाडी लोकांना आपल्याविषयीं मोठमोठ्या गोष्टी पसरवून द्यायला सांगतात आणि या मेहनतीपोटीं आपल्या कमाअींत त्यांचा कांहीं हिस्साहि राखून ठेवतात; त्यांपैकींच हे साधु नसतील कशावरून ? ‘ पुलाच्या पलीकडे अुष्ण कुंडाजवळ अेक मोठे साधु आहेत, त्यांचें दर्शन घ्यायला तुम्ही अवश्य जा, ’ असा आग्रह नाहीं तर या लोकांनीं आम्हांला कां केला असता ? अेकानें तर आम्हांला येथपर्यंत सांगितलें कीं, ‘ माझे आजोबा सांगत होते, कीं त्यांच्या लहानपणीं त्यांनीं या साधूला येथें पाहिलें होतें, तेव्हांसुद्धां ते वयानें असेच्या असे दिसत होते ! ’ वर्तमानपत्रांत कित्येक प्रसंगांचीं वर्णनें जशीं कायम ठशाचीं जुळवून ठेवलेलीं असतात, त्याचप्रमाणें जंगलांत राहणाऱ्या योग्यांविषयींच्या अशा गोष्टीसुद्धां जिकडे पाहावें तिकडे अेकाच प्रकारच्या असतात. रोज नव्या नव्या गोष्टी अैकत बसण्यापेक्षां तींच तीं सर्वमान्य वर्णनें जर पुनः पुन्हां अैकायला मिळालीं तर त्यांत सोय नाहीं असें कोण म्हणेल ? रेल्वेच्या सर्व स्टेशनांची रचना जशी सारखी, तसे साधूंचे चमत्कारहि सारखेच !

तळगंगनाणीहून पुष्कळच जवळ अेक लहानसा धबधबा आहे. पाणी जोरानें पडत होतें, पण तेथें स्नान करण्याचा मोह आम्ही आवरूं शकलों नाहीं. हिंमत धरून धबधब्याखालीं पोंचतों न पोंचतों तोंच डोक्यावर पाण्याचा थपडा अेकामागून अेक पडूं लागल्या. स्वामींना त्यांच्या लहानपणचे शाळेंतील दिवस आठवले. 'नाहीं मास्तर, नाहीं मास्तर, मारूं नका मास्तर, पुनः असं नाहीं करणार—नाहीं करणार,' अशी हंसत हंसत त्यांनीं काकुळत चालविली ! त्यानंतर आमच्या बोलण्यांत त्या धबधब्याचें नांवच आम्हीं 'नाहीं—मास्तरचा धबधबा' असें ठेवून टाकलें !

येथून पुढचा प्रदेश हा गंगोत्रीचा खास प्रदेश म्हणायचा. वाटेंत अेक लांकडाचें मोठें घर दिसलें. या बाजूला सरकारी बंगले आणि खाजगी घरें लांकडांच्या फळ्यांचीं बांधलेलीं असतात आणि आंत चीडच्या डिंकाचा धुपासारखा सुगंध जिकडे तिकडे सुटलेला असतो. कारण या फळ्या चीड किंवा देवदाराचीं मोठमोठीं खोडें कापूनच तयार केलेल्या असतात.

याच प्रदेशांत मीं पहिल्याप्रथम वनगाय बघितली. वनगायीला अिकडे 'याक' किंवा 'झब्बु' म्हणतात. या वनगायींचे मालक भोटीये लोक वनगायींपेक्षां थोडेसुद्धां सुधारलेले दिसत नाहींत ! गाय पुढें जाते आणि हे भोटीये तिचे अनुयायी होअून मागून चालतात अेवढाच फरक ! वनगाय दिसायला फार सुंदर असते. तिचीं शिंगें कांहींशीं पुढें झुकलेलीं, शिंगांच्यामधून कपाळावर केसांचा झुबका लटकत असलेला, असें चित्र माझ्या दृष्टीपुढें कायमचें रेखलेलें आहे. येथें या वनगायींचें तूप फार स्वस्त मिळे. मात्र कांहीं कांहीं वेळां त्यांत त्यांचे केसहि पडलेले असल्यामुळें गरम करून गाळल्याशिवाय तें वापरायला मन घेत नाहीं. या प्रदेशांतील बटाटेसुद्धां चांगले मोठमोठे आणि स्वादिष्ट. गव्हाच्या भाकऱ्या आणि बटाट्याची भाजी हा आमचा खुराक किती तरी दिवस चालला.

# गंगोत्री : : ३६

बदरीनाथ, केदारनाथ, गंगोत्री आणि जम्नोत्री या चार धामांपैकीं पहिल्यांत बदरीनारायणाचें वैभव आकर्षण करतें, तर केदारनाथाच्या वातावरणांत मुख्यत्वें वैराग्य सांपडतें. जम्नोत्रीची भीषण—भव्यता आपल्या हृदयांत कायमचें स्थान पटकावते, तर गंगोत्री आपल्या पवित्रतेंतच पार बुडवून टाकते.

गंगोत्रीला जात असतां रस्त्यावरील अेक साप स्वामींनीं आपल्या लांब काठीनें खालीं दरींत फेंकला आणि घाबरलेला तो साप हवेंत आपलें शरीर आंखडून खालीं पडत होता, तेव्हां लहानपणीं बाजारांतून विकत आणलेल्या रबरी हिरव्या सापासारखा तो कसा दिसला, याचेच विचार माझ्या डोक्यांत चालले होते; पण गंगोत्रीला पोंचतांच हें सर्व विरघळून जाअून विचारक्षेत्रांत प्राचीन राजर्षी व महर्षी घुसूं लागले. भारतसम्राट् भगीरथ आणि धर्मसम्राट् श्रीशंकराचार्य यांचें स्मरण या ठिकाणीं झाल्यावांचून कसें राहील? पूर्व-हिंदच्या अंगवंगादि 'समतत' नांवाच्या सपाट प्रदेशावर पाण्याचा पूरच पूर करून सोडून करोडों मानवांना करोडों वर्षेंपर्यंत अन्नदान कसें करतां येअील, हा वारसाहक्कानें आलेला संकल्प मनांत घोळवीत राजा भगीरथ याच टेकड्यांवर भटकत होता आणि हिमालयांतील प्रवाहांची 'सर्व्हे' करीत होता. आज यांपैकीं किती तरी टेकड्या मातेचीं सिद्धपीठें म्हणून प्रख्यात आहेत, या सिद्धपीठांवर केलेली कोणाचीहि तपश्चर्या आजपर्यंत व्यर्थ गेली नाहीं!

आणि शंकराचार्यांनीं जेव्हां चहूं बाजूंना दिग्विजय करून दक्षिणेकडील धर्मनिष्ठ संस्कारसंपन्न ब्राह्मण कुटुंबें येथें आणून वसविलीं, तेव्हां त्यांच्या मनांत काय काय संकल्प असतील? हिमालयाच्या शिखरावरून दक्षिणेकडे आणि उत्तरेकडे, हिंदुस्थान आणि तिबेट या दोन्ही देशांत धर्मप्रवाह वाहायला लावून अद्वैताच्या जीवनसिद्धान्ताचा आणि सर्वैक्याच्या हृदयधर्माचा पूरच पूर करण्याचा त्यांनींहि या ठिकाणीं मनांत

संकल्प धरला असेल. त्यांचेच जणुं पूर्वावतार असे गौतमबुद्ध यांनीं जी धर्मप्रेरणा पसरून दिली होती, तिच्या लाटा हिमालयाच्या पलीकडे शंकराचार्यांच्या वेळीं पोंचल्याच होत्या. शंकराचार्यांना फक्त बुद्धाच्या अुपदेशाला आस्तिक्याचें पुट चढवून त्याला राष्ट्रीय बनवायचा होता. शंकराचार्यांना प्रच्छन्न बौद्ध संबोधून त्यांच्या विरोधकांनीं त्यांची निंदा केलेली नाहीं, तर त्यांच्या कार्याची परंपरा आणि महत्ताच दाखविली आहे. गंगोत्री येथें गंगामाअीचें मंदिर किती लहान आहे! जणुं अेकाद्या तपःपूत ऋषीची आद्यप्रेरणा अथवा धर्मस्फुरणच!

मला हिमालयांत शक्तिरूपिणी जगन्मातेची अुपासना करावयाची होती. येथें राहिलेल्या अेका बंगाली साधूला अुपासनेचा विधी मीं विचारला. मला स्मरण आहे त्याप्रमाणें, या साधूचें नांव श्याम-भारती कीं शामा-भारती असें कांहींसें होतें. त्यानें माझ्याकडून माझा अुद्देश समजून घेतला आणि लगेच अुत्तर दिलें, "तुम्ही कांहीं माझे शिष्य नव्हे, मी तुम्हांला हा विधी कसा दाखवूं? तुम्ही तुमच्या गुरूलाच विचारा." अशा अुत्तरांत कित्येक लोकांना सांप्रदायिक संकुचितता दिसेल. मला तसें वाटलें नाहीं. मीं पाहिलें कीं आपल्या धर्मांत गुरुपरंपरेच्या द्वारा निष्ठा आणि अेकाग्रता सांभाळून ठेवली गेली आहे. विविधता हें ज्याचें सनातन स्वरूप अशा या जगतांत स्वधर्मनिष्ठेचें तत्त्व नसेल तर अेकहि संघ काशीला पोंचायचा नाहीं. कौटुंबिक जीवनांत जशी निष्ठाच प्राणरूप, तशी धार्मिक जीवनांतहि निष्ठा महत्त्वाची कामगिरी बजावते ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें त्या संन्याशाच्या अुत्तरानें मला संतोषच झाला.

तीर्थक्षेत्रांत जातांना भुकेल्या पोटानें जावें आणि परततांना भरल्या पोटानें निघावें असा नियम आहे, आम्हीहि या नियमाचें रीतसर पालन करीत असूं.

धगधगणाऱ्या निखाऱ्यांतून चालतांना अशी माणसाची कसोटी होते, तशीच कसोटी येथें बर्फाच्या विरघळलेल्या पाण्यांत स्नान करतेवेळीं होते, तरी पण गंगोत्रीला यायचें आणि स्नानावांचून राह्यचें असें होईल कसें? कॉलेजांतील एका सोबत्यानें Bath-(स्नाना-)-ची अेक विनोदी व्याख्या

केली होती. ‘ सकलगात्रार्द्रीकरणं बाथः । ’ स्नानाचा शरीरशुद्धीशीं किंवा मलापरहरणाशीं कांहींहि संबंध नाहीं; सारें अंग भिजविलें कीं स्नान झालें ! या व्याख्येप्रमाणें आम्हीं स्नान केलें आणि पाण्यांतून जिवंत बाहेर पडलों ! अभ्रक आणि अत्यंत बारीक रेती यांमुळें पाणी गढूळ होतें. मी जेथें स्नान करीत होतों तेथें पाणी पुरतें खोल नसल्यानें डोकें भिजविण्यासाठीं मला घाओीनें पाण्यांत डुबकी मारावी लागली. मला काय माहीत कीं, माझ्या डोक्यापुढेंच अेक गोल प्राचीन खडक पाण्यांत ध्यानस्त बसला आहे ? आमचीं दोघांचीं डोकीं प्रेमानें कडकडून भेटलीं ! आवाज झाला. पण डोक्याच्या आंत वेदना पोंचविण्याअितकें चैतन्य राहिलें नव्हतें ! बधिर शरीरानें मी परत धांवत निघालों आणि धुमीपुढें हात तापवून नंतरच भिजलेले कपडे पिळूं शकलों. दुसऱ्या दिवशीं कपाळावर त्या माझ्या मित्राची लहानशी प्रकृति अुठलेली पाहून आमची भेट किती प्रेमळ होती याचें प्रदर्शन झालें !

येथें आम्ही तीन दिवस राहिलों. दुर्गासप्तशती, गीता, तुकारामाचे अभंग, रामदासांचा मनोबोध आणि अीश–कठ आदि अुपनिषदें वाचण्यांतच आमचा वेळ गेला. येथून गोमुख फक्त बारा कीं अठरा मैल आहे. तिकडे जावें कीं न जावें याविषयीं आमच्यांत भवति–न–भवति खूप झाली. थोडें अगोदर आलों असतों तर थिजलेल्या गंगेच्या पात्रावरूनच सहज गोमुखाला पोंचतां आलें असतें. गोमुखांत अजूनहि आकाशांतून गंगा पडते असें म्हणतात. तिथल्या झरमर झरमर पडणाऱ्या पावसालाच यात्रेकरू अशा रीतीनें मोठेपणा देत असावे. नाहीं तर त्या ठिकाणीं फक्त अखंड बर्फाचा पहाडी खजिनाच आहे, दुसरें कांहीं नाहीं. आम्ही पोहोंचलों तेव्हां गंगेचें पात्र वितळून रुंद झालें होतें. पंड्ये आम्हांला सांगत होते कीं, जर कांहीं कुलींना कुऱ्हाडी आणि लांकडें देअून बरोबर घेतलें तर नदीच्या कांठाकांठानें गोमुखापर्यंत जातां येईल. गंगेला येअून मिळणारे प्रवाह आडवे आले तर लांकडाचे कामचलाअू पूल तयार करून जातां येअील. परत येतांना हे ठिकाणींच असतील असें मानण्याचें कांहींच कारण नसल्यानें दुहेरी तयारी ठेवावी लागते. गंगोत्रीहून गोमुखा-पर्यंतची भूमि अितकी कांहीं पवित्र आहे, कीं यात्रेकरूंनीं तेथें मलमूत्र-विसर्जन न करतांच जाअून आलें पाहिजे अशी शंकराचार्यांची आज्ञा आहे असें पंड्यांनीं

संकल्प धरला असेल. त्यांचेच जणुं पूर्वावतार असे गौतमबुद्ध यांनीं जी धर्मप्रेरणा पसरून दिली होती, तिच्या लाटा हिमालयाच्या पलीकडे शंकराचार्यांच्या वेळीं पोंचल्याच होत्या. शंकराचार्यांना फक्त बुद्धाच्या अुपदेशाला आस्तिक्याचें पुट चढवून त्याला राष्ट्रीय बनवायचा होता. शंकराचार्यांना प्रच्छन्न बौद्ध संबोधून त्यांच्या विरोधकांनीं त्यांची निंदा केलेली नाहीं, तर त्यांच्या कार्याची परंपरा आणि महत्ताच दाखविली आहे. गंगोतरी येथें गंगामाअीचें मंदिर किती लहान आहे! जणुं अेकाद्या तपःपूत ऋषीची आद्यप्रेरणा अथवा धर्मस्फुरणच!

मला हिमालयांत शक्तिरूपिणी जगन्मातेची अुपासना करावयाची होती. येथें राहिलेल्या अेका बंगाली साधूला अुपासनेचा विधी मीं विचारला. मला स्मरण आहे त्याप्रमाणें, या साधूचें नांव शाम-भारती कीं शामा-भारती असें कांहींसें होतें. त्यानें माझ्याकडून माझा अुद्देश समजून घेतला आणि लगेच अुत्तर दिलें, “तुम्ही कांहीं माझे शिष्य नव्हे, मी तुम्हांला हा विधी कसा दाखवूं? तुम्ही तुमच्या गुरूलाच विचारा.” अशा अुत्तरांत कित्येक लोकांना सांप्रदायिक संकुचितता दिसेल. मला तसें वाटलें नाहीं. मीं पाहिलें कीं आपल्या धर्मांत गुरुपरंपरेच्या द्वारा निष्ठा आणि अेकाग्रता सांभाळून ठेवली गेली आहे. विविधता हें ज्याचें सनातन स्वरूप अशा या जगतांत स्वधर्मनिष्ठेचें तत्त्व नसेल तर अेकहि संघ काशीला पोंचायचा नाहीं. कौटुंबिक जीवनांत जशी निष्ठाच प्राणरूप, तशी धार्मिक जीवनांतहि निष्ठा महत्त्वाची कामगिरी बजावते ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें त्या संन्याशाच्या अुत्तरानें मला संतोषच झाला.

तीर्थक्षेत्रांत जातांना भुकेल्या पोटानें जावें आणि परततांना भरल्या पोटानें निघावें असा नियम आहे, आम्हीहि या नियमाचें रीतसर पालन करीत असूं.

धगधगणाऱ्या निखाऱ्यांतून चालतांना अशी माणसाची कसोटी होते, तशीच कसोटी येथें बर्फाच्या विरघळलेल्या पाण्यांत स्नान करतेवेळीं होते, तरी पण गंगोतरीला यायचें आणि स्नानावांचून राह्यचें असें होईल कसें? कॉलेजांतील एका सोबत्यानीं Bath-(स्नाना-)-ची अेक विनोदी व्याख्या

केली होती. ‘ सकलगात्रार्द्रीकरणं बाथः । ’ स्नानाचा शरीरशुद्धीशीं किंवा मलापरहरणाशीं कांहींहि संबंध नाहीं; सारें अंग भिजविलें कीं स्नान झालें ! या व्याख्येप्रमाणें आम्हीं स्नान केलें आणि पाण्यांतून जिवंत बाहेर पडलों ! अभ्रक आणि अत्यंत बारीक रेती यांमुळें पाणी गढूळ होतें. मी जेथें स्नान करीत होतों तेथें पाणी पुरतें खोल नसल्यानें डोकें भिजविण्यासाठीं मला घाअीनें पाण्यांत डुबकी मारावी लागली. मला काय माहीत कीं, माझ्या डोक्यापुढेंच अेक गोल प्राचीन खडक पाण्यांत ध्यानस्त बसला आहे ? आमचीं दोघांचीं डोकीं प्रेमानें कडकडून भेटलीं ! आवाज झाला. पण डोक्याच्या आंत वेदना पोंचविण्याअितकें चैतन्य राहिलें नव्हतें ! बधिर शरीरानें मी परत धांवत निघालों आणि धुमीपुढें हात तापवून नंतरच भिजलेले कपडे पिळूं शकलों. दुसऱ्या दिवशीं कपाळावर त्या माझ्या मित्राची लहानशी प्रकृति अुठलेली पाहून आमची भेट किती प्रेमळ होती याचें प्रदर्शन झालें !

येथें आम्ही तीन दिवस राहिलों. दुर्गासप्तशती, गीता, तुकारामाचे अभंग, रामदासांचा मनोबोध आणि अीश–कठ आदि अुपनिषदें वाचण्यांतच आमचा वेळ गेला. येथून गोमुख फक्त बारा कीं अठरा मैल आहे. तिकडे जावें कीं न जावें याविषयीं आमच्यांत भवति–न–भवति खूप झाली. थोडें अगोदर आलों असतों तर थिजलेल्या गंगेच्या पात्रावरूनच सहज गोमुखाला पोंचतां आलें असतें. गोमुखांत अजूनहि आकाशांतून गंगा पडते असें म्हणतात. तिथल्या झरमर झरमर पडणाऱ्या पावसालाच यात्रेकरू अशा रीतीनें मोठेपणा देत असावे. नाहीं तर त्या ठिकाणीं फक्त अखंड बर्फाचा पहाडी खजिनाच आहे, दुसरें कांहीं नाहीं. आम्ही पोहोंचलों तेव्हां गंगेचें पात्र वितळून रुंद झालें होतें. पंड्ये आम्हांला सांगत होते कीं, जर कांहीं कुलींना कुऱ्हाडी आणि लांकडें देअून बरोबर घेतलें तर नदीच्या कांठाकांठानें गोमुखापर्यंत जातां येईल. गंगेला येअून मिळणारे प्रवाह आडवे आले तर लांकडाचे कामचलाअू पूल तयार करून जातां येअील. परत येतांना हे ठिकाणींच असतील असें मानण्याचें कांहींच कारण नसल्यानें दुहेरी तयारी ठेवावी लागते. गंगोत्रीहून गोमुखापर्यंतची भूमि अितकी कांहीं पवित्र आहे, कीं यात्रेकरूंनीं तेथें मलमूत्र-विसर्जन न करतांच जाअून आलें पाहिजे अशी शंकराचार्योंची आज्ञा आहे असें पंड्यांनीं

आम्हांला सांगितलें. आम्ही आमच्याबरोबर शिफारसपत्र घेऊन आलों होतों त्याचा विचित्र परिणाम झाला होता. पंड्ये आम्हांला नाराज करायला भीत होते. त्याचबरोबर आमच्याकडून विशेष द्रव्यप्राप्तीची आशाहि ते ठेवूं शकत नव्हते. म्हणून, आपल्याला भरपूर अुत्साह आहे, साऱ्या सोयी करून द्यायला आपण तयार आहों, असें आम्हांला दाखवूनहि पुढें जायचें आमच्या मनानें घेअूं नये, अशा रीतीनें सर्व गोष्टी ते मांडीत होते ! 'शाकुंतलां'त सेनापति आणि विदूषक यांच्यामध्यें मृगयाप्रेमी दुष्यंताविरुद्ध झालेल्या गुप्त मसलतीचें येथें स्मरण झालें. पुष्कळ विचारांतीं स्वामींनीं पुढें जाण्याचा विचार सोडून देण्याची सूचना आणली. मला त्याबद्दल वाअीट वाटलें नाहीं. आतांपर्यंत जितकें पाहिलें होतें तेंच अितकें कांहीं भव्य, विविध आणि विशाल होतें, कीं नवें कांहीं पहाण्याचें विशेष औत्सुक्य नव्हतें. तेव्हां जायचें नक्की झालें असतें तरी सर्व प्रकारचे कष्ट आणि धोका सहन करायला मी तत्पर होतों, आणि जायला झालें नाहीं म्हणून कांहीं जीवनांतील अेक मोठी संधी गमावली असेंहि वाटलें नाहीं. मनांत कसलाहि विषाद राहिला नाहीं. शास्त्र-शुद्ध अुदासीनता माणसानें अंगीं बाणवून घेतलेली असली म्हणजे 'नैव-तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन।' ही योग्याची अवस्था स्थूलरूपानें मनुष्य अवश्य दाखवूं शकतो.

गोमुखाला गेलों नाहीं त्याचें कांहीं अेवढें वाटलें नाहीं, पण गंगोत्री सोडतांना चित्तवृत्ति स्वस्थ कशी राहणार? घर सोडून कॉलेजला (परगांवीं) जातांना आअीचा निरोप घेतेवेळीं जसें हृदय भरून येत असे तसेंच गंगोत्री सोडतांना मला झालें. या स्थानीं किती अगणित हिंदू पूर्वज भक्तिभावानें आले असतील आणि मैय्याजवळून स्थायी शांति आणि पवित्रता मिळवून परत गेले असतील! आणि कितीअेकांनीं तर येथें आल्यावर परत जाण्याचा विचारहि सोडून दिला असेल! खरोखर, गंगा ही भारतवासियांची मैय्याच आहे; तिच्या कुशींत प्रत्येक मनुष्याला जीवनाची शांति मिळते.

---

# बुढ्ढा केदार : : ३७

गंगोत्रीहून आम्हीं गंगाजळाचा लोटा भरून घेतला. पंड्यांनीं त्याला लाखेचें सील करून आम्हांला यात्रेचें सुफळ दिलें. आम्ही परतलों. वाटेंत प्रत्येक यात्रेकरूच्या हातांत गंगाजलाचा अेकेक लोटा होताच. हें पवित्र जल अनेक प्रांतांतील अनेक घरांत आणि झोपड्यांत पोंचेल; पश्चात्तापानें जळणाऱ्या कितीअेक पाप्यांना हें जल परमात्म्यानें क्षमा केल्याची शांति देअील; मृत्युशय्येवर पडलेल्या किती तरी वृद्धांना हें जल मरणकालीं शांति देअील !

आणि कित्येक साधू तर, जशी आपण नवारीनें खाट विणतों, तसें अिथलें गंगाजल सेतुबंध रामेश्वराला पोंचवून रामेश्वराची रेती गंगोत्रीला आणून पसरतात आणि अशा रीतीनें सारें भारतवर्ष धर्मबंधनानें विणून काढतात ! चार धामांची यात्रा ही आपली धार्मिक वीण आहे. देश आणि समाज अशा रीतीनें अेकमेकांत ओतप्रोत होअून जातात.

भटवाडीला परत येअून आम्हीं केदारचा रस्ता धरला. ही वाट हिमालयांतसुद्धां ' जंगली ' समजली जाते. वीस वीस मैल अेकहि माणूस कीं गांव दिसायचा नाहीं. झाडें अितकी अुंच अुंच, कीं दुपारीसुद्धां जवळ जवळ अंधारल्यासारखेंच वाटायचें. पावसानें खालची जमीन कांहींशी धुअून गेल्यामुळें झाडांच्या मुळ्यांच्या जाळ्या जमिनीवर पसरलेल्या दिसत होत्या. या मुळ्या रात्रीच्या प्रवासांत जीवच घ्यायच्या; कारण त्यांच्यांत पाय अडकला कीं माणूस ठोकरच खायचा. पण अशा जंगलांत रात्रीचा प्रवास करतो कोण ! खड्या चढतीला जर या मुळ्यांचा आसरा नसता तर कांहीं कांहीं ठिकाणीं चढणेंहि अशक्य झालें असतें. मधून मधून वाळलेल्या पानांचे ढीग जंगलाला अधिकच भयानक करीत होते. जेथें चढण अवघड नसेल आणि झाडेंहि फार नसतील अशा कांहीं कांहीं ठिकाणीं रमणीय दृश्य पाहायला मिळे. जिकडे पाहावें तिकडे रंगीबेरंगी फुलेंच फुलें. असें वाटायचें कीं अेकाद्या शोकीन गृहस्थाच्या बंगल्यांतील बगीच्यांतच आपण फिरतों आहों आणि आतां थोडें पुढें गेलों कीं बंगला आढळल्याशिवाय राहणार

नाहीं. तरी सकाळपासून संध्याकाळपर्यंत साऱ्या दिवसांत अेकादें खेडें किंवा अेकादें घर मिळायचें नाहीं कीं माणूस किंवा जनावर भेटायचें नाहीं. निर्जनता किती भयाण असते याचा अनुभव येथेंच घ्यावा. निर्जन प्रदेशांत विविध रंगांच्या फुलांनीं रंगलेले भूमिभाग अेकाद्या जादूच्या प्रदेशासारखे वाटत.

जेथें माणसाचें तोंड बघायला मिळण्याची मारामार तेथें वाट बरोबर आहे कीं नाहीं कोणाला विचारावें ? पण अडचणींतून मार्ग सुचतो. आम्हांला दिसलें कीं, या वाटेनें जाणाऱ्या यात्रेकरूंनीं आपले फाटून गेलेले जोडे वाटेंत अिकडेतिकडे फेंकले आहेत. अर्ध्या पाव तासांत असे फाटलेले जोडे जर दिसले नाहींत तर शंका यायची कीं कुठं तरी आपण रस्ता भुललों आहों. जंगलांत प्रवास करणारे लोक हातांत कुऱ्हाड घेऊन जातां जातां अुजवीकडे व डावीकडे झाडांच्या सालीवर घाव घालून ठेवतात. अशासाठीं कीं खूण ओळखून गेल्या वाटेनें परत येतां यावें. आमची युक्ति याहूनहि चांगली होती, आणि आम्हांला फक्त आमचे पूर्वयात्री ज्या वाटेनें गेले होते, त्याच वाटेनें जायचें होतें. पुढें जेव्हां आमचे जोडे साफ झिजून गेले तेव्हां स्वामींनीं अेके दिवशीं आपल्या पायांतल्या अेका जोड्याला वाटेंत रजा देअून बिनवारशी अेक चांगला जोडा त्याच्या अैवजीं अुपयोगांत आणला. दोन-चार दिवसांनीं त्याच्या मूळ जोडीचा दुसरा जोडा आपल्या जोडीदाराच्या विरहानें रुसून बसला, तेव्हां त्यालाहि हिमालयांत राहाण्याचें पुण्य देअून त्याच्याबदली वाटेंत जो दुसरा विजोड जोडा मिळाला, तो त्यांनीं पायांत चढवला. हे दोन्ही जोडे अेकाच घाटाचे किंवा अेकाच प्रांताचे असण्याचा तरी संभव कोठून ?

**यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ ।**
**समेत्य च व्यपेयातां तद्वद् भूतसमागमः ।।**

संध्याकाळीं छुवा चट्टीला आम्हीं पोंचलों. याच वाटेवर—पण कोणत्या ठिकाणीं ते आठवत नाहीं—स्वामी आणि बुवा पुढें गेले होते. मी आपला अेकटाच मागें राहिलों. अंधार पडायला लागला. आतां रस्ता कसा सांपडणार या चिंतेंत मी पडलों, तोंच कित्येक यात्रेकरू पाठीमागून आले.

अशा ठिकाणीं माणसाचें तोंड पाहायला मिळालें म्हणजे किती आनंद होतो हें ज्यानें अनुभव घेतला असेल त्यालाच समजेल. आम्ही आमच्या तत्काळ तयार केलेल्या राष्ट्रीय भाषेंत बोलत चाललों होतों. अितक्यांत अेकजण अेकदम ओरडला. 'अे भालु, भालु, भालू !' असल्या जंगलांत अस्वल कुठलें हें मी आश्चर्यानें पाहूं लागलों; सगळे किंचाळ्या फोडून भालूमागें धांवूं लागले. मी मात्र या भालूच्या दर्शनापासून वंचितच राहिलों. आमच्या चट्टींत आम्ही पोंचलों तों तेथें बुवांनीं माझ्यासाठीं गरम दूध थोडी हळद टाकून तयार ठेवलें होतें; कारण त्या दिवशीं माझा घसा साफ नव्हता, सर्दी होण्याची भीति होती. प्रवासांत असले साधे अुपचार चांगले परिणामकारक ठरतात.

गंगोत्रीहून केदारला जातांना वाटेंत वृद्ध केदार अथवा बुद्ढा केदार लागतो. मोठा अुतार अुतरून संध्याकाळीं आम्ही तेथें पोंचलों. रस्ता असा कांहीं वाअीट होता आणि पावसानें आम्हांला असें कांहीं छळलें कीं, मुक्कामाला पोंचल्यावर देवळाकडे जाण्याचें मीं तर नाकारलें. आपल्या बरोबरच्यांनीं दर्शन घेतलें तरी पुष्कळ झालें असें मीं मनाचें समाधान करून घेतलें. येथें धर्मशाळेंत अुत्तरेकडील कित्येक महाराष्ट्रीय लोक आम्हांला भेटले. अेक वृद्ध बाअी बोलण्यांत फार संस्कारी दिसली. तिनें आम्हांला पुष्कळ प्रश्न विचारले. स्वामीसारखा तरुण मुलगा आअीबापांना टाकून, आप्तेष्टांना विसरून जाअून असा वणवण भटकतो आहे, हें पाहून त्या वृद्धेचें हृदय भरून आलें आणि तिनें मुक्तकंठानें रुदन केलें. 'अरे, तुम्ही लोक किती रे निष्ठुर, तुमच्या आअीबापांना काय होत असेल, तुमच्या भाअू-बहिणींना किती अुदास वाटत असेल ! अशा जंगलांत शरीर पिळून तुम्हांला काय मिळत असेल बाबांनो !' असे अनेक प्रश्न बिचारीनें विचारले.

अेक नेहमींचा अनुभव येथेंच सांगून टाकतों. आपल्या देशांत रिकामटेकडी कुतूहलवृत्ति फार. पायीं पायीं जातांना किंवा आगगाडींत कोणाची सोबत झाली कीं अेकमेकाला सारी कूळकथा विचारल्याशिवाय चैन पडावयाचें नाहीं आणि सांगणारासुद्धां जन्माचा कोणी सोबती मिळाला असल्याप्रमाणें सर्व कांहीं विस्तारपूर्वक सांगतांना थकायचा नाहीं. माझा चष्मा बघून मी कोणी शिकलेला माणूस आहें, असें अनुमान सहज होअी. तेव्हां

लोक विचारायचे, ‘कुठवर शिकलां आहां?’ ‘कॉलेजांतलें शिक्षण पुरें केलें आहे’ अितकें सांगितलें कीं बस्स, भोग ओढवला! तुम्हीं नोकरी कां धरली नाहीं? वकिलीची तयारी कां केली नाहीं? अिंग्रजी शिकलांत तरी यात्रेवर बरी श्रद्धा आहे? वगैरे सगळें विचारायचें. मग प्रश्न यायचे, घरीं कोण कोण आहेत? ‘भाअू आहेत’ म्हटलें कीं मग प्रत्येकजण काय काय करतो याची कैफियत दिलीच पाहिजे. लग्न झालें आहे कीं नाहीं हा तर कुतूहलाचा मुख्य प्रश्न. जर सांगावें ‘नाहीं झालें’ तर विचारायचे, ‘हें वैराग्य काय लहानपणापासून अुपजलें कीं याला कांहीं विशेष कारण घडलें?’ आणि जर म्हणावें ‘लग्न झालें आहे’ तर पुढचा प्रश्न ठरलेलाच कीं, ‘बायको जिवंत आहे कीं नाहीं?’ जिवंत आहे असें खरें अुत्तर द्यावें तर अनेक अडचणींत टाकणारे प्रश्न लागोपाठ सुरू व्हायचे आणि बायको जिवंत असतांना बैरागी होण्याचा माणसाचा हक्क आहे कीं नाहीं, याचा शास्त्रार्थ बराच लांबलचक व्हायचा! रोज रोज असली घासाघीस करण्याची माझी तयारी नव्हती आणि माणसांना तुसडेपणानें तोडायचें हें प्रवासांत आपल्याला आवडत नव्हतें. तेव्हां हिंमतपूर्वक खोटें बोलण्याचेंच मीं ठरविलें. कोणी जास्ती प्रश्न विचारण्यापूर्वींच मी निसासा सोडून सांगून टाकी, ‘बायको फार चांगली होती; पण ती वारली. तेव्हां मुलांना भावांच्याकडे सोंपवून मीं असें अरण्य पत्करलें आहे.’ अशा असत्य कथनाला कायद्यांत शिक्षा नाहीं हें मला माहीत आहे, पण धर्मशास्त्र अितकी सहज माफी देअील कीं नाहीं याची मला खात्री नाहीं.

लोकांच्या या फाजील जिज्ञासेनें पीडलेला मी कोणाला कधीं फारसे प्रश्न विचारायला धजत नाहीं. कदाचित् तोहि माझ्यासारखा त्रासून खोटें बोलायचा; तें आणखी पाप माझ्या माथीं बसेल असा विचार नेहमीं माझ्या मनांत येतो. कांहीं कांहीं वेळां अेकाद्या माणसानें फार प्रश्न विचारले कीं, ‘फार झालें, आतां जास्ती विचाराल तर खोटें अुत्तर देअीन’ असें मीं त्याला अुत्तर दिलें आहे. खोटें बोलण्यापेक्षां खोटें बोलण्याची भीति दाखवावी हा चांगला अुपाय नंतर सुचला! मग खरें अुत्तर दिलें तरीहि त्या माणसाला खात्री अशी राहिलेली नसते.

रस्त्यांत भेटलेल्या बिचाऱ्या अेकाद्या यात्रेकरूनें निःस्वार्थ भावानें मानवसहज सहानुभूतीनें अेकमेकांविषयीं चौकशी केली तर त्यांत अेवढें वाअीट काय, असें कोणी जर मला विचारलें, तर माझ्यापाशीं त्याला कांहीं अुत्तर नाहीं. यात्रेकरूंना दहा-पांच प्रश्नांचीं अुत्तरें देतांना त्या वेळीं कंटाळून जाणारा मी आतां सगळ्या प्रवासाचें हें लांबच लांब वर्णन कसा लिहायला बसलों हा प्रश्न माझ्या मनांत अुभा राहतो, त्यालाहि माझ्याजवळ अुत्तर नाहीं.

साहित्य आणि जीवन यांचें थोडेंसें हाडवैर दिसतें. सेकंड क्लासांत बसलेला अेक अिंग्रज शेजारच्या माणसाशीं बोलून त्याची जीवनकथा जाणून घेण्याअैवजीं रुपये-दोन रुपये खर्चून अेकादी नवलकथा वाचण्यांत वेळ घालवील; आणि नवलकथेंत तरी शेवटीं काय, अेकादी काल्पनिक जीवनकथाच असायची. मी प्रवासवर्णन लिहितों तें माझ्या सोयीनें. कोणी प्रश्न विचारायला लागला तर मात्र मी बंधनांत सांपडतों आणि अेकच प्रश्न अनेक लोक पुनः पुनः विचारतात तेव्हां माझ्या सहनशक्तीची मर्यादा संपते. तरीहि निरक्षर समाजांत साहित्याची आणि शिक्षणाची गरज संभाषणानें भागते हें विसरतां कामा नये.

याच धर्मशाळेंत दुसऱ्या दिवशीं सकाळीं बुढ्ढ्या केदारचा अेक ब्राह्मण आम्हांला भेटायला आला. आम्ही शिकलेलों आहों असें पाहून तो आपल्या मुलाची आमच्या करवीं परीक्षा करून घेण्यासाठीं त्याला घेअून आला. मुलगा चौदा-पंधरा वर्षांचा होता. बापानें सांगितलें, ' हल्लीं याचा तर्कसंग्रह चालू आहे. ' मी कॉलेजांत अिंटरमध्यें असतांना तर्कभाषा शिकलों होतों; त्यामुळें या चौदा-पंधरा वर्षांच्या मुलाला तर्क शिकतांना पाहून मला आश्चर्य वाटलें. मीं त्याला अुगीच अेक प्रश्न विचारला. प्रश्न अैकल्याबरोबर त्या मुलानें त्या प्रश्नासंबंधींचें सर्व प्रकरण पाठ म्हणून दाखविलें ! त्यानंतर त्याच प्रकरणावरची टीकाहि घडघड म्हणून दाखविली ! अेकादा शास्त्री समजावून देत असावा तसा योग्य ठिकाणीं थांबून शब्दांचा संबंध दाखवीत असावा अशा आवाजानें तें सर्व त्यानें म्हटलें. पण बापड्याला त्यांतलें अेक ब्रह्माक्षरसुद्धां समजत नव्हतें ! मीं त्याच्या

बापाला म्हटलें, ' तर्क हा बुद्धीचा विषय आहे, व्याकरणापेक्षांसुद्धां अवघड. व्याकरणाचा भाषेशीं संबंध आहे, तर तर्क हा विचारशुद्धीचा विषय आहे. त्यांत घोकंपट्टी कशी चालणार ? ' बापानें भोळें अुत्तर दिलें, ' या वयांत घोकून ठेवलें म्हणजे मोठेपणीं मेहनत कमी आणि चूक होण्याचा संभव नाहीं. '

शिक्षणशास्त्रावर पुष्कळ विचार केला, तरीसुद्धां घोकंपट्टीची प्रथा साफ काढून टाकण्यासारखी आहे, असा निर्णय होत नाहीं. घोकंपट्टीचा दुरुपयोग फार होतो हें खरें, पण योग्य रीतीनें वापरली तर ती बुद्धीच्या विकासाच्या आड येतेच, असें नाहीं. जेव्हां छापखाने नव्हते, आणि सर्व कांहीं लिहून काढण्याचे श्रम कसे टाळावे हा मोठा प्रश्न होता, तेव्हां स्वावलंबी मनुष्य आपल्या शिक्षणाचें भांडवल ताजें आणि सज्ज ठेवण्यासाठीं पुष्कळसें पाठ करून ठेवी यांत आश्चर्य तें काय ! यांतच शक्तीचा संग्रह होता. आजसुद्धां हा लाभ टाकून देण्यासारखा नाहीं.

दुसऱ्या दिवशीं अेकादा मैल गेलों असूं तोंच आदल्या दिवसाच्या पावसानें भिजून गेलेल्या माझ्या जोड्यांनीं अेकाअेकीं हरताळ पाडला. हरताळ कसचा, राजीनामाच दिला ! मीं माझ्याबरोबर अमदाबादी जोड्यांचा अेक जादा जोड बाळगला होता. अेवढ्या सगळ्या प्रवासभर तो जोड माझ्यावर स्वार होअून चालत असे; आतां मी त्याच्यावर स्वार झालों. पण हे जोडे माझ्या लहान पायांनाहि लहान होअूं लागले; ते वापरून चालायचें म्हणजे चीन देशांतील ललनांच्याप्रमाणें पायांचे हालच. म्हणून जोड्यांना पाण्यांत भिजवून मगच ते मी वापरूं लागलों. ओलें चामडें गरीब होअून पायाचा आकार ग्रहण करी; पण जरा सुकलें कीं दुप्पट सूड अुगवी ! शंभर-सव्वाशें मैल असा त्रास झाला. माझें दुःख पाहून स्वामींनीं आपल्याजवळचे दक्षिणी जोडे मला दिले. हे लाल जोडे जंगलांत खुलून दिसत आणि यात्रेकरूंचें लक्ष वेधीत ! त्यांच्यापुढची गोल बाजू तर ठोकरीविरुद्ध रामबाण अिलाज होता. पण हिमालयाच्या रस्त्यावर हे जोडे पायांत टिकणार कसे किंवा खरें म्हणजे जोड्यांत पाय टिकणार कसे ? पायाला ते घासूं लागले आणि तळव्याला फोड आले. अेकहि जोडा घालणें शक्य नाहीं आणि अुघड्या पायांनीं

चालावें तर रस्त्यावरचे न्हाऊन धुऊन बसलेले खडे विंचवाच्या दंशासारखे आपला प्रताप दाखविल्याखेरीज राह्यचे नाहींत.

रस्ताभर पायांच्या दुःखाचें ध्यान चाललें. अशा जंगलांत विसांवा घ्यायला थांबायचें तरी कसें ? कसेंबसें पुढें चाललों; पण वाटेंत काय पाहिलें तें कांहीं ध्यानांत राहिलें नाहीं.

---

# भोट चट्टी : : ३८

अेके ठिकाणीं सकाळीं थोडेंसें चाललों आणि संध्याकाळच्या मुक्कामाची चट्टी दृष्टीस पडली. अेवढ्यांत अेक दिवस कसा काढायचा अशी मनांत शंका आली. मीं म्हटलें, ‘ अहो, तें त्या पहाडाच्या शिखरावर घरट्यासारखें दिसतें तेथें जायला कितीसा वेळ लागणार ? अेवढ्या चढतीला भिअून काय अेक दिवस घालवायचा ? ’ पण मी भ्रमांत होतों. सरळ चढतीच असती तर गोष्ट वेगळी. दम टाकीत टाकीत तेथें पोंचलों असतों. पण सगळा रस्ता करवतीच्या धारेसारखा चढ आणि अुतार करायचा होता. चढतांना दम लागायचा, अुतरतांना गुडघे भरून यायचे याचें दुःख तर होतेंच; पण जितकें चढावें तितकेंच जवळ जवळ अुतरण्याचें नशिबीं येअी, तेव्हां पुष्कळ श्रम व्यर्थ गेल्याची मानसिक वेदना सगळ्या प्रवासाला मारून टाकीत होती. माझ्या स्मरणाप्रमाणें, त्या दिवशीं आम्ही नअू टेकड्या पादाक्रान्त केल्या आणि तितक्याच दर्‍या कापल्या. शेवटीं शेवटीं तर अखेर मुक्काम येणार कीं नाहीं याचीच शंका वाटूं लागली ! मोठ्या कष्टानें वर पोंचलों. चट्टीच्या झोपडीची अुंची सरळ अुभें राहतां येअील अितकीसुद्‌धां नव्हती. जनावरें गुहेंत घुसावीं तशा प्रकारें आंत जायचें ! जमीन अगदीं ओली ओली. आमच्यापाशीं मेणकापड होतें. माझी खास गवताची चटअी होती. तेव्हां आम्ही जेमतेम रात्र काढली. अिकडच्या प्रवासांत भाजी बटाट्याचीच असायची. आज

तीहि मिळाली नाहीं. जंगलांत कित्येक लहान लहान रोपांवर अळवाच्या दांडी-सारखे दांडे अुगवले होते, पण त्यांच्या टोंकाला पानें नव्हतीं. बकरीच्या शिंगाप्रमाणें त्यांचें टोंक शंखाकृति होअी. या दांड्यांची भाजी बनवून खातांना मीं कित्येक पहाडी लोकांना बघितलें होतें. म्हणून आसपास फिरून मी असे दांडे अेक-दोन मुठी भरून निवडून आणले. बुवा खूष होतील अशी माझी खात्री होती, पण त्यांनीं तें शिजविण्याचेंच नाकारलें ! बुवा रामदासी संप्रदायाचे, दासबोधाच्या शिकवणीप्रमाणें चालणारे. त्यांनीं सांगितलें, "अनोळखी फळ किंवा भाजीपाला खाअूंच नये." आणि आपल्या निर्णयाच्या जोडीला दासबोधांतली अेक ओवी त्यांनीं म्हणून दाखविली, "फळ ओळखिल्यावीण खाअूं नये." मग काय माझें चालणार ? ते दांडे जमिनीवर चक्राकार लावून मीं पुष्कळ प्रकारच्या आकृत्या बनविल्या आणि अशा रीतीनें जिभेनें नाहीं तरी डोळ्यांनीं माझ्या पुरुषार्थाची गोडी चाखली !

अेका रात्रीं आम्ही भोट चट्टीला पोंचलों. तेथें कमालीची गर्दी होती. रात्रीं निवाऱ्याशिवाय अुघड्यांत निजावें लागणार अशी भीति होती; पण शेवटीं आम्हांला जागा मिळाली. याच ठिकाणीं दोन पहाडी माणसांचें अेक भागीचें दुकान होतें. जोडीनें व्यापार करण्याअितकी विश्वासपूर्ण अुदारता त्यांच्यांत होती; पण त्याला लागणारें गणित त्यांच्याजवळ नव्हतें. तेव्हां अेकाचा जितका माल दुकानांत येअील तितकाच दुसरा दुकानांत ठेवी; आणि अेका गिऱ्हाअिकाला माल दिला कीं हातांत येणारे पैसे त्याच क्षणीं दोघेजण सारखे सारखे वांटून घेत ! या वांटणीचा हिशेब झाला नाहीं तोंपर्यंत नव्या गिऱ्हाअिकाची दाद काय लागणार ? या दोघांपैकीं अेक होता थोडासा हुषार. हिशेबाच्या सोयीसाठीं गिऱ्हाअिकाला थोडेंसें कमी किंवा जास्ती विकत घ्यायला तो सांगे ! गिऱ्हाअिकानें अैकलें नाहीं तर त्याला कांहीं मिळायचें नाहीं आणि अडीच दुकानांच्या चट्टींत अेकजण रुसला म्हणजे मग गैरसोयीला सीमा नाहीं.

रात्र झाली आणि आकाशांत तारे चमकूं लागले. फार दिवसांनीं निरभ्र आकाशाचा आनंद मिळाला. त्या दिवशींच्या आकाशाची नीलिमा कांहीं औरच होती. अितकें स्वच्छ आणि अितकें गडद निळें आकाश

सहज पाहायला मिळत नाहीं. पुढें द्वाराहाटच्या रस्त्याला संध्याकाळीं असेंच आकाश बघायला मिळालें होतें; पण अितक्यांत मुसळधार पावसानें सगळें दृश्य बिघडवून टाकलें होतें. या ठिकाणीं मात्र नक्षत्रें निळ्या पार्श्वभूमीवर हिऱ्याप्रमाणें रात्रभर चमकत होतीं. हा आनंद अेकट्याला कसा प्यावासा वाटणार ? स्वामी आणि बुवा दोघेहि बाहेर आले. पुष्कळ वेळपर्यंत आम्ही आकाशासंबंधीच बोललों. अितक्यांत चट्टींत कांहीं आरडाओरड अैकली. स्वामींनीं जाअून तपास केला. यात्रेकरूंपैकीं कोणा मारवाड्याची म्हातारी चिडून रुसून चट्टी सोडून जंगलांत पळून गेली होती ! क्रोधापुढें विवेकाचा पराजय तर नेहमीं होतो; पण आज तर भीतीचाहि पराजय झाला होता ! त्या मारवाड्याला घरची म्हातारी गेल्याचें दुःख झालें होतें कीं घरची अब्रू गेल्याचें हें कोणाला सांगतां येणार ? दोन पिढ्यांमधल्या मतभेदाची अशी दुर्दशासुद्धां कधीं कधीं होते ! म्हातारीची चौकशी न करतां आम्ही लवकर अुठून पुढें निघालों.

केदारची वाट म्हणजे पवालीची चढण. रामचंद्राच्या सैनिकांसारखे पहाडी लोकसुद्धां या चढणीपुढें हात टेकतात. ‘ काबुलकी लढाअी और पवालीकी चढाअी ’ या म्हणींत अिथल्या लोकांनीं आपले कष्ट व्यक्त केले आहेत. म्हणींतसुद्धां स्थानिक पाठांतरें असतातच.

आम्हीं श्वास घेअून छाती फुलविली आणि नेहमींप्रमाणें ‘ अथातो धर्मजिज्ञासा ’ हा नेहमींचा मंत्र म्हणून चढायला सुरुवात केली.

---

# पवाली आणि त्रिजुगी नारायण : : ३९

वाटेंत अेके जागीं खूप पाअूस पडला होता. तेव्हां सूर्यास्ताच्या पूर्वींच अेकाद्या चट्टींत थांबण्याचा विचार आम्हीं केला होता. या चट्टींत वेतासारख्या वेलांच्या मोठमोठ्या टोपल्या तयार करून अडकवून ठेवल्या होत्या.

हीं अगदीं जंगली म्हटलीं जाणारीं माणसें जेव्हां भांडीं, टोपल्या किंवा असेंच अितर वापराचे जिन्नस तयार करतात तेव्हां त्यांत कला कोठून ओततात, याचें आश्चर्य वाटल्यावांचून राहात नाहीं. आम्ही पथाऱ्या वगैरे लावून कुठें स्वैंपाक करावा याचा विचार करीत होतों, अितक्यांत पाअूस थांबला आणि सोन्यासारखें अून्ह दृष्टीपुढें येअून थडकलें. जयद्रथवधाच्या दिवशीं अर्जुनाची जशी स्थिति झाली तशीच आमची झाली. तितकें अून्ह–अितका दिवस–शिलकींत ठेवून जर आम्ही थांबलों तर मग आमची अब्रू काय राहिली ? लगेच सामान आवरून चालायला लागलों. कुली बिचारे नेहमींच रडतराअूत; त्यांची तक्रार कोण अैकतो ?

पुष्कळशीं शक्तीचीं म्हटलीं जाणारीं कामें युक्तीचींच असतात. मजबूत पुरुष दळतांना जिथें थकून जातो, तिथें म्हाताऱ्या बायका वर्षानुवर्षें दुप्पट काम देतात. पाण्यांत पोहायला शक्ति लागते खरी, पण शक्तीपेक्षां युक्तीच अधिक अुपयोगी ठरते. पहाड चढण्याचेंसुद्धां असेंच आहे. मनुष्यानें घाअी केली नाहीं आणि श्वासाचा ताल सांभाळला तर तो सहज थकायचा नाहीं. अुंटावर बसलेल्या माणसानें जर आपलें शरीर ढिलें ठेवून अुंटाच्या गतिबरोबर ताल जमविला नाहीं तर संध्याकाळपर्यंत त्याच्या सगळ्या अंगांत कळा यायला लागतील. पहाड चढतांनासुद्धां शरीर ताठ ठेवून भागत नाहीं. गुडघे, कंबर आणि पाठ मुक्त स्थितींत ठेवायचें जमलें आणि प्रत्येक पावलाला लवचिक-पणा आणला तर सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालूनसुद्धां मनुष्य फारसा थकणार नाहीं. ही फलश्रुति ज्यांचें अंग सुटलें आहे अशा लठ्ठ माणसांसाठीं नाहीं हें येथेंच सांगून टाकलेलें बरें.

हिमालयांतील सर्वांत कठीण चढण अशा रीतीनें चढून गेल्यानंतर आमची खात्री झाली कीं ही तपश्चर्या फुकट गेली नाहीं. वर पोंचतांच जें दृश्य दिसलें तें मी जन्मभर विसरणार नाहीं. वेदकालीन ऋषींची महासभा बसली असावी अशा रीतीनें असंख्य बर्फाच्छादित शिखरांची अेक महा-परिषद् अर्धवर्तुलाकार बसलेली होती ! नाहीं म्हटलें तरी पन्नास मैलांचें दृश्य येथून दिसत होतें आणि ज्या दिशेला पाहावें तिकडे दूरवर पांढरीं पांढरीं शिखरें अनंततेचें सूचन करीत होतीं ! हें पांढरें बर्फ त्रिकालातीत असावें असें

पसरलेलें होतें. बर्फ जसजसें शिळें होत जातें तसतशी त्याच्यावर हस्तिदंताच्या पिवळटपणाची प्रतिष्ठा येते, आणि त्यावर जेव्हां कुठें कुठें नवीन पांढरें कापरासारखें बर्फ पडतें, तेव्हां तें एकाद्या म्हातारीच्या मांडीवर मूल बसलें असावें, तशी शोभा देतें.

जसजसा टक लावून हें सारें दृश्य मी पाहूं लागलों, तसतसा त्याचा अुन्माद माझ्या मेंदूंत चढूं लागला आणि सगळें दृश्य जणुं टेकड्यांचा अेक महासागर अुसळत असावा तसें वाटायला लागलें. अशी अेक जरी टेकडी आपल्या अिकडल्या सपाट प्रदेशांत येअून बसेल तर कवि आणि भाट अभिमानानें तिचें अखंड गायन करतील. पण येथें या टेकड्यांना विचारतो कोण ! जशी हिंदुस्थानच्या संतांना गणती नाहीं, तशी हिमालयांतील टेकड्यांनाहि गणती नाहीं.

अखंड हिमप्रदेश म्हणजे काळाच्या परिवर्तनाचा पराभव ! बाराहि महिने अिथली शोभा अेकच अेक असायची. पण या शोभेंतसुद्धां क्षणोक्षणीं लावण्य भरण्याचें काम सविता नारायणाचीं किरणें करतात. अेकाद्या पुण्यपुरुषाच्या सहवासानें जसा आजूबाजूचा समाज धर्मनिष्ठ झाल्याचा भास होतो, तसें सकाळचीं बालकिरणें पसरल्याबरोबर सर्वच शिखरें अनुरक्त झाल्याचें दृश्य दिसायचें. कांहीं कांहीं वेळां सर्व शिखरें भगवा रंग धारण करून दशनामी* आखाडा जमवितात.

पवालीहून झपाट्यानें अुतरून आम्ही त्रिजुगी नारायण येथें गेलों. जणुं स्वर्गांतून पाताळांत ! आणि स्वर्गाचें सगळें पुण्य जणुं धुण्यासाठींच यावें तशा अेका पावसानें येअून सर्व रस्ताभर आमच्यावर मारा चालवून आमचा अुत्साह धुअून टाकला. शेवटीं शेवटीं तर रस्ता सोडून आम्ही सरळच अुतरायला लागलों, पण त्यामुळें वेळ कांहीं वांचला नाहींच.

त्रिजुगी नारायण येथें नारायणाचें प्राचीन मंदिर आहे. त्यांत जो अग्नि आहे, तो पारश्यांच्या आतश बहेरामप्रमाणें सत्ययुगापासून आतांपर्यंत

---

* संन्याशांत गिरी, पुरी, भारती, सरस्वती, अरण्य, तीर्थ, आश्रम, वन, सागर अित्यादि अेकंदर दहा संप्रदाय असतात. त्यांना दशनामी म्हणतात.

अेकसारखा जळत आला आहे ! हिमालयाची मुलगी पार्वती हिचें देवाधिदेव महादेवाबरोबर लग्न झालें, त्या वेळीं विवाहाच्या होमासाठीं या अग्नीचें आधान केलें होतें. तेव्हांपासून आतांपर्यंत हा अग्नि बिलकुल विझलेला नाहीं !

येथें अेक साधु रात्रीं आपलें सर्वस्व लुटलें गेल्याचें सांगून मोठ्यानें रडूं आणि ओरडूं लागला. सगळी धर्मशाळा हालून गेली. तपास केल्यानंतर कळलें कीं, हें सर्व सोंगच होतें ! दुसऱ्या अेका साधूला अडचणींत आणण्या-साठीं त्यानें मध्यरात्रींच्या शांतींत हें सगळें नाटक अुभें केलें होतें ? साधु खराच !

त्रिजुगी नारायणाहून खालीं अुतरून केदारच्या मुख्य सडकेवर आम्ही पोंचलों. तेथून मंदाकिनीच्या कांठाकांठानें पुढें जाअून गौरीकुंडाला पोंचलों. येथें गरम पाण्याचे झरे आहेत.

जम्नोत्री आणि बदरीनारायणाकडे अगदीं तीर्थस्नानींच गरम पाण्याचे झरे आहेत, तर गंगोत्रीला आणि केदारनाथाला जातांना तीर्थस्नानाच्या थोडें अलीकडे रस्त्यावरच गरम पाण्याचे झरे भेटतात. गंगोत्रीचा तो गंगनाणी, आणि केदाराचा तो गौरीकुंड. गौरीकुंडाचें पाणी स्वच्छ नव्हतें, तेव्हां स्नानाचा विचार आम्ही सोडून दिला. गौरीकुंडाहून पुढचा रस्ता अवघड चढणीबद्दल प्रख्यात आहे. ही चढण चढून आम्ही केदारनाथाच्या जवळ पोंचलों. रस्त्यांतील अेक वळण मागें टाकलें आणि दूर केदारनाथाचें शिखर दिसूं लागलें. हें पवित्र दर्शन घडतांच प्रत्येक यात्रेकरूनें आपली काया जमिनीवर टाकून साष्टांग प्रणिपात केला. ‘ जय केदारनाथ की जय, जय केदारप्रभु की जय !

देवळांतल्या मूर्तीच्या दर्शनापेक्षां शिखराच्या दर्शनाचा अुमाळा कांहीं विशेष असतो.

# केदारनाथ : : ४०

केदारनाथाच्या देवळाची लोकप्रियता बदरीनारायणाच्या देवळापेक्षां अुतरती खरी. त्यामुळेंच येथील देअूळ अधिक प्राचीन आणि अधिक भव्य दिसतें. जणुं कोणी तपस्वी ध्यानस्थ बसला आहे. देवळाच्या पुढच्या भागावर ग्रीक शैलीचा छपराचा त्रिकोण (ज्याला अिंग्रजींत 'गेबल' म्हणतात) लक्ष वेधून घेतो. अिथल्या पंड्यांच्याजवळ जी शंकराचार्यांची वंशावळ आहे तिच्यावरून हें देअूळ अत्यंत प्राचीन आहे, असें सिद्ध होअूं शकेल असें टेहरीच्या हेडमास्तरांनीं सांगितल्याचें आठवतें. पण देवळाचें स्वरूप हाच प्राचीनतेचा पुरेसा पुरावा आहे. तर मग येथें ग्रीक शैली कुठून आली? कीं ग्रीक लोकांनीं येथून अुचलली? ही शैली आपली तर मानतांच येणार नाहीं. ती आपली असती तर तिचे अनेक प्राचीन नमुने अनेक रूपांनीं दिसले असते. काश्मीरांत पंदरेथान म्हणून अेक स्थान आहे. त्याच्या स्थापत्यशैलीविषयीं अशीच शंका अुत्पन्न होते. अशोकाचा राजमहाल जर अिराणी शैलीचा होता तर केदारनाथ येथें ग्रीक शैली असल्याचें आश्चर्य कसलें? आपले समर्थ पूर्वज परक्या कलेविषयीं तिरस्कार धरीत होते असें काय म्हणून समजावें? दुबळे लोक जेव्हां कांहीं अुसनें आणून वापरतात तेव्हां त्यांचें दारिद्र्यच अधिक स्पष्ट होतें, पण सबळ लोक कांहीं अुसनें घेतात तेव्हां ते घेअून ते जणुं अुपकारच करतात असें दिसतें!

केदारनाथाच्या देवळाजवळ कित्येक कुंडांत लांब लांब लंगोटीसारखे कागद पडलेले दिसले. कांहीं कागद कपड्याच्या धांदोटीवर चिकटविलेले होते. त्यांपैकीं अेक बाहेर काढून मीं पाहिला, तर ती कोणाची जन्मपत्रिका होती. तपास करतां समजलें कीं, पुष्कळ वृद्ध यात्रेकरू केदारची यात्रा करून कृतकृत्य झाल्यानंतर बरोबर आणलेल्या आपल्या जन्मपत्रिकेचें या ठिकाणीं विसर्जन करतात. ज्याच्या दर्शनाची तळमळ वर्षानुवर्षें हृदयांत चालली होती, त्या केदारनाथाचें दर्शन झालें, जीवनांतलें सगळें पाप धुअून गेलें. नवग्रहांनीं आपली छाप परत ओढून घेतली, आतां या जन्मपत्रिकेला काय विचारायचें अुरलें आहे, कीं ज्यासाठीं ही चिंधी आतां सांभाळून ठेवावी?

केदारप्रभूच्या दर्शनानंतरसुद्धां येथें आपल्या जीवनाचें विसर्जन करतां येथील अितकी माणसाची जगण्याची अिच्छा कुठें सुटली आहे? जीवन सोडवत नाहीं, तर जीवनाची प्रतिनिधि अशी जन्मपत्रिका सोडूनच लोक संतोष मानतात! पर्यायधर्मांचीसुद्धां शाबास आहे. मुलाचा बळी घेण्याअैवजीं आब्राहामकडून त्याच्या देवानें अेका बकऱ्याचा बळी घेअून संतोष मानला. गयेला जाअून कामक्रोधादि षड्रिपू सोडण्याअैवजीं अेकादी नावडती भाजी सोडूनच यात्रेकरू यात्रा सफळ करतात! स्नानाच्या त्रासांतून सुटण्यासाठीं पहाडी ब्राह्मणानें पांच पाण्याच्या थेंबांची 'पंचस्नानी' शोधून काढली! आणि आजचीं सुधारलेलीं राष्ट्रेंसुद्धां शत्रु हातीं लागला नाहीं म्हणजे त्याचा फोटो भर चव्हाट्यावर जाळून आपल्या क्रुद्ध वृत्तीचें समाधान करतात! बिचाऱ्या भगवान् मनूनें मानवजातीला प्रारंभींच सांगून ठेवलें आहे कीं, मुख्य धर्माच्या पालनाची शक्ति असूनसुद्धां जो मनुष्य पर्यायधर्मानें किंवा आपद्धर्मानें संतोष मानतो त्याला त्या क्रियेचें फळ अिहलोकींहि मिळत नाहीं आणि परलोकींहि मिळत नाहीं.

हिमालयांतील हीं आपलीं सर्व तीर्थस्थानें दहा-दहा हजार फुटांच्या अुंचीवर असूनसुद्धां चिरहिम प्रदेशाच्या पायथ्यापाशींच वसलेलीं आहेत! त्यामुळें येथें जिकडे पाहावें तिकडे अुंच अुंच पहाड दिसतात. आपण मनुष्यप्राणी दरीच्या मांडीवर अितके लहान दिसतों कीं, त्याला अर्भकाची अुपमासुद्धां शोभणार नाहीं.

केदारनाथाचें वर्णन महाभारतांत सुंदर रीतीनें केलें आहे. पांडव वनवासांत होते तेव्हां मध्यम पांडव अर्जुन अस्त्रप्राप्त्यर्थ फिरत फिरत या बाजूला आला होता. दिव्य कमळें आणण्यासाठीं जेव्हां भीम निघाला तेव्हां तोहि या ठिकाणीं आला होता. रामदासांना हनुमानाचें दर्शन झालें तेंहि याच प्रदेशांत झालें असलें पाहिजे आणि आपली जीवनयात्रा संपवून पांडव जेव्हां महाप्रस्थानाला निघाले तेव्हांसुद्धां ते तेथेंच आले होते. ते वृद्ध पांडव आणि त्यांच्याबरोबर असलेली ती मानिनी द्रौपदी याच भूमीवर विषण्ण मनानें फिरलीं असतील. जे पहाड आज मी पाहात आहें, तेच पहाड त्यांनींहि पाहिले होते हा विचारच आपल्याला पांडवकाळाशीं

नेअून जोडतो. आणि महाप्रस्थानाचें स्मरण होतांच धर्मराजाच्या त्या अिमानी कुत्र्याचें स्मरण झाल्यावांचून कसें बरें राहील ? अिंद्राच्या स्वर्गांत आजकालच्या होटेलांप्रमाणें कुत्र्यांना प्रवेश नसे. अिंद्रानें युधिष्ठिराला सांगितलें, "या मलिन जनावराला हांकलून दे, तुला आतां पुण्यलोक मिळाला आहे." धर्मराजानें सांगितलें, "पाहिजे तर मी परत जातों; पण अिमानदाराचा त्याग माझ्यानें होणार नाहीं ! 'स्वर्गसुखार्थ अकार्या न करिन सोडूनि मी सुकार्यातें ।' "

अंधार पडण्याच्या सुमारास आम्ही केदारनाथाच्या देवळांत गेलों. तेथें शंखनादाची फैर झडत होती; ती अैकून चित्तवृत्ति अेकदम अुत्तेजित झाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हांला दिसलें कीं, अिथली मूर्ति म्हणजे फक्त अेक मोठा खडबडीत पाषाणच आहे. युगानुयुगें लोटणाऱ्या यात्रेकरूंच्या अखंड धारेनें आपल्या स्नेहाळ स्पर्शानें या पाषाणाला गुळगुळीत करून सोडला आहे ही गोष्ट वेगळी. जो येअील तो शिवलिंगावर आपला देह टेकवून त्याला छातीसरशीं चेपतो.

केदारप्रभूचें दर्शन घेतल्याच्या मस्तीखेरीज यात्रेकरूंना अिथली थंडी अेक रात्रहि जिरवितां येणार नाहीं.

हजारों वर्षें झालीं, अेकच अेक श्रद्धा भारतवासीयांना दरवर्षी या ठिकाणीं घेअून येते. भारतवर्षाच्या अितिहास–पुराणांत जेवढे प्रख्यात पुरुष झाले आहेत त्यांतले कित्ती तरी याच ठिकाणीं येअून या शिवलिंगाला आलिंगन देअून धन्य धन्य झाले असतील ! असंख्य सामान्य कोटीच्या लोकांनीं या सर्वांच्या प्रणालिकेंत आपलें स्थान स्वीकारून आपलें तुच्छ जीवनसुद्धां गौरवान्वित केलें असेल. हें स्थान ज्यानें नक्की केलें आणि या ठिकाणीं आपली भक्ति ज्यानें अगदीं पहिल्या प्रथम ओतली, त्याची विभूति केवढी मोठी असेल बरें ! त्या अज्ञात भक्ताला, ऋषीला आणि भारतीय पूर्वजाला केदारनाथ प्रभूबरोबरच अखंड वंदन असो !

सकाळीं अुन्हें पडल्यानंतर अुशीरानें आम्ही मंदाकिनीवर स्नानाला गेलों. नदीच्या प्रवाहांत अितके कांहीं धोंडे होते कीं, स्नानाच्या सोयीचा

विचार करायलाच नको आणि स्नानाला लोकसुद्धां पुष्कळ आले होते, तेव्हां *अेकान्ताची जी मजा असते तीहि तेथें मिळाली नाहीं.* अेकान्ताची अिच्छा जितकी स्वाभाविक तितकीच विचित्र आहे. अेकान्तासाठीं आपण निर्जन स्थान शोधतों. मनांत म्हणतों कीं, किती निर्जन स्थान ! त्या वेळीं आपणांला जाणीवहि नसते कीं आपल्या अस्तित्वामुळेंच या स्थानाची निर्जनता नाहींशी झाली आहे ! अमुक ठिकाणीं मीं अेकट्यानेंच असावें, दुसऱ्या कोणी असूं नये, अशी अिच्छा करणें हें योग्य आहे काय ? धर्म्य आहे काय ?

आणि तरीहि धर्मात्मेच विशेषेंकरून निर्जन स्थळें शोधतात. नाहीं, अेकटे धर्मात्मेच नाहीं शोधीत; अेका साधूनें म्हटलें होतें, रोगी, योगी आणि भोगी तिघेहि शांत निर्जन स्थानें शोधतात. तर मग तिघांच्या आतुरतेंत काय कांहींसुद्धां फरक नाहीं ?

हिमालयांत अितक्या दूरवर यावें आणि ज्या क्षणीं अेकान्ताची कुठें अिच्छा व्हावी त्याच वेळीं आसपास जनसंमर्द असावा, याचें किती वाअीट वाटतें !

आतां फक्त अेक बदरीनारायणाची यात्रा राहिली. येथून बदरीनारायण फार दूर नाहीं. केदार-बदरीमध्यें फक्त अेकच मोठा पहाड आडवा आहे. पहाड ओलांडण्याची जर कांहीं सोय असेल, तर त्यांच्यांत पांच मैलांअितकेंहि अंतर नाहीं. पण हा अुंच पहाड ओलांडणेंच मुष्कील आहे. तो अखंड बर्फानें झांकलेला असतो. त्यामुळें लोकांना आलेल्या रस्त्यानें परत जाअून मोठें चक्कर घेअून अनेक डोंगरांना वळसे घालून, नअू दिवसांच्या प्रवासाच्या अंतीं बदरीनारायणाला जावें लागतें. यावरून यात्रेकरूंत म्हण पडली आहे, “नव दिन चले ढाअी कोस.” दंतकथा सांगते कीं, प्राचीन काळीं हा पहाड मध्यें नव्हता. अेकच पुजारी दोन्ही ठिकाणीं अेकाच वेळीं आरती करूं शकत असे. ही गोष्ट कितीहि रसिक असली तरी विश्वास ठेवतां येण्याजोगी नाहीं. दंतकथांच्या मागें कांहीं वेळां अैतिहासिक तत्त्व असतें, तर कांहीं वेळां केवळ लोकमानसांतील काव्य-कल्पनाच असते.

ही अडीच कोसांची गोष्ट अैकल्यावर मनांत येतें कीं, आधुनिक मनुष्याला येथें नअू दिवसांचें चक्कर फिरण्याअैवजीं खंडाळा घाटांतल्यासारखे सुरुंग-बोगदे काढायचेंच सुचायचें !

अिटालींत कीं स्वित्झर्लंडांत अशा तऱ्हेचे बोगदे पाडलेले आहेत, असें म्हणतात. बोगद्यांतून रस्ते काढले कीं विजेचे दिवे आलेच. विजेमागून होटेलेंहि यायचींच आणि त्यांच्याबरोबर धर्मविरोधी अशा अनेक गोष्टी दाखल व्हायच्या ! काश्मीरचें असेंच होअूं पाहात आहे. अेका हिमालयाला तरी आपण आधुनिकतेच्या हल्ल्यांतून वांचवूं नये काय ?

---

# अुखीमठ आणि तुंगनाथ : : ४१

सुमेरूच्या शिखराला व केदारच्या मंदिराला प्रणाम करून आम्ही परत फिरलों. तेथें सरळ रस्त्यानें नालाचट्टीपर्यंत जाअून तेथून अुखीमठाचा रस्ता धरला. हा प्रदेश मला विशेष आकर्षक वाटला; कारण अिथल्या कित्येक टेकड्या महाराष्ट्राच्या टेकड्यांसारख्या दिसल्या.

ज्याप्रमाणें आजकाल अुन्हाळ्यांत दिल्लीचे अधिकारी सिमल्याला चढून जातात, त्याप्रमाणें थंडीच्या दिवसांत केदारनाथप्रभु खालीं अुतरून अुखीमठाला येतात. हिंवाळ्यांत केदारनाथची सगळी दरी बर्फानें झांकून जाते. अुन्हाळा आला म्हणजे पुजारी लोक खोरीं-कुदळीं घेअून अुखीमठाहून केदारला जातात आणि तेथें बर्फ फोडून रस्ते मोकळे करतात. पुजारी सांगतात, कीं हिंवाळ्याच्या सुरवातीला देअूळ बंद करायच्या वेळेला आंत जो दिवा जळत राहतो, तोच अुन्हाळ्यापर्यंत टिकतो. अशा तऱ्हेच्या गोष्टी खऱ्या मानल्या नाहींत तरी सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. माणसाला काय काय प्रिय आहे, त्याची कल्पना कुठें कुठें धांवते, हें समजण्यापुरताच याचा अुपयोग असतो. अशा कल्पनांतच पुढें आलेल्या मोठमोठ्या शोधांचें मूळ असतें; म्हणून माणसाची अुमेद या दृष्टीनें अशा समजांचा लोप होअूं देतांच कामा नये.

अुखीमठ येथें मोठा बाजार आहे. काय कारणानें आठवत नाहीं, पण येथें आम्ही चार कीं आठ आणे देअून अेक नारळ घेतला होता. येथें बाजारांत कित्येक नारळ दुकानांतून देवळांत आणि देवळांतून दुकानांत असा अखंड प्रवास करीत असतात ! बाजारांत नाण्यांची अशाच तऱ्हेची यात्रा टाळण्यासाठीं जशा कागदाच्या नोटा चालविण्यांत येतात, तसें येथें देवळांतहि कागदाचे नारळ चालविले तर काय वाअीट ? नारळाप्रमाणें तो कागद आंतून सडून तरी जाणार नाहीं ?

मला आठवतें त्याप्रमाणें आमचा तो बंगाली माधवानन्द अुखीमठापर्यंतच आमच्याबरोबर होता. येथें त्याला भांग पाजणारे कोणी अितर साधू भेटले तेव्हां चांगलीच पिअून त्या नशेंतच स्वारी आम्हांला भेटायला आली होती. त्याचा चेहरा प्रसन्न दिसत नव्हता. पित्तप्रकोप झाला असावा तसे त्याचे डोळे दिसत होते. आतां आम्ही यात्रेच्या राजरस्त्यावर आलों होतों. गंगोतरी–जम्नोतरीच्या वाटेला सोयी कमी आणि धोका जास्ती; तिकडे आमची सोबत त्याला आवश्यक होती. आतां त्याला ती आवश्यकता राहिली नव्हती. आणि आमच्याबरोबर पंचवीस-पंचवीस, तीस-तीस मैलांची रोजची चाल करून तो थकला होता. आतां जास्त ताणण्याअितकी त्याच्यांत शक्ति राहिली नव्हती. तो म्हणाला, ‘ मी आतां थोडा विसांवा घेअीन. नाहीं तर प्रकृति बिघडेल अशी धास्ती वाटते. ’ आम्हीं संतोषपूर्वक त्याला रजा दिली. अिथल्या धर्मशाळेंत अेका डॉक्टरानें आम्हांला कांहीं पानें दाखविलीं. महाराष्ट्रांत ज्याला घोड्याचीं पावलें म्हणतात अशा अेका वेलाचीं ( फर्नचीं ) हीं सुकलेलीं पानें होतीं. बोटांत धरलीं कीं भुकीच व्हायची. पण तींच पानें जेव्हां त्यानें पाण्यांत टाकलीं तेव्हां थोड्या वेळांत तीं चांगलीं ताज्या पानांसारखीं हिरवींगार झालीं. त्याच डॉक्टरानें आम्हांला आग्रहपूर्वक सांगितलें कीं, येथून थोडे दूर अेक साधु राहातो; भेटायला जाअील त्याला दगडानें मारतो आणि शिव्या देतो; पण दर्शन घेअून येणाऱ्याला चमत्कार दिसल्याशिवाय राहात नाहीं. त्याला कांहीं ना कांहीं लाभ व्हायचाच. आम्हांला स्वतःला शिव्या, दगड, चमत्कार आणि लाभ यांपैकीं कशाचीच गरज नव्हती; म्हणून आम्ही दर्शनाची अिच्छा ठेवली नाहीं. आम्ही पुढें गेलों.

आतां तुंगनाथची चढण चढायची होती. आतांपर्यंत आम्ही अनेक चढणी चढून गेलों होतों, तेव्हां तुंगनाथासाठीं आम्ही तयार नव्हतों असें नाहीं. पण त्या दिवशीं हवेंत जें धुकें भरलें होतें त्याला मात्र आम्ही खरोखरच तयार नव्हतों. सकाळीं आम्ही किती तरी सुंदर चाललों; पण सुंदर पाहायला मात्र कांहींच मिळालें नाहीं. क्षीरसागरांत माशांनीं चढावें तसें आम्ही तुंगनाथ चढत होतों. मध्येंच थांबून थांबून कुठून आतां भाग्य खुलणार अशा दृष्टीनें चहूं बाजूंना आम्ही पाहात असूं. अगदीं टोंकाला पोंचलों तेथें ढग कांहींसे विखुरले. वरचा भाग स्पष्ट झाला. पण या शिखराच्या आसपास आमच्या पायाच्या खालच्या बाजूला दूरवरपर्यंत ढगच ढग पसरले होते. ढगांहूनहि अुंच जाअून ढगांवरून खालीं त्यांच्यावर दृष्टि टाकण्यांत जो आनंद वाटतो आणि गौरव अनुभवास येतो तेवढ्याखातर तरी माणसानें येथें आलें पाहिजे. सिंहगड, दार्जिलिंग, अबू अशांसारख्या ठिकाणीं अशी शोभा अनेक लोकांनीं पाहिली असेल. माणसाला त्या वेळीं वाटतें कीं, आपण पृथ्वीवर नसून ढगांवर विराजत असलेल्या गंधर्वनगरीचे रहिवासी आहोंत आणि असेच सतत अधांतरीं राहाणार. अेक वेळां अशाच दुसऱ्या प्रवासांत मी दोनप्रहरीं अेक पहाड ओलांडीत होतों आणि तेथें तळच्या धुक्यामुळें पायांखालीं दूर अेक मोठें अिंद्रधनुष्य पसरलेलें दिसत होतें; जणुं रंगीत कांठाचें अेक मोठें आसन पसरून मी बसलों आहें असे वाटे. अशा ठिकाणीं फुकटचें वैभव भोगून माणसाचें डोकें कायमचें फिरून गेलें, तर त्यांत आश्चर्य नाहीं, आणि अशीं अुदाहरणें नाहींत असेंहि नाहीं. थोडया वेळापुरतें ज्याचें माथें भडकतें तो कवि, कायमचें भडकतें तो दिवाणा! तुंगनाथहून आम्ही खालीं अुतरलों आणि वरचें वैरी धुकेंहि विखुरलें. आम्ही वर असतांनाच तें गेलें असतें तर आम्ही कांहीं त्याला शाप देणार नव्हतों! खालच्या मंगळ चट्टींतून तुंगनाथाचें शिखर फार मजेदार दिसलें. येथून आम्ही पुढें निघालों. स्वामी पुढें होते, बुवा आणि मी पुष्कळ मागें राहिलों. संध्याकाळ झाली, अंधार पडायला लागला आणि पावसानेंहि चांगलाच प्रसाद दिल्यामुळें आम्ही मागें राहिलों. स्वामींचा तपास केला. ते पुढें गेले होते. बुवा येण्याची वाट पाहून मीं अेकजणाबरोबर अंथरण्यापांघरण्याचें आणि इतर थोडेंसें सामान

पुढें गोपेश्वरला पाठविलें आणि मी थांबलों. आमच्या सगळ्या प्रवासांत या अेकाच रात्रीं आमची तिघांची संगत तुटली होती.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही जेव्हां गोपेश्वरला पोंचलों, तेव्हां स्वामी तिथल्या वृद्ध महंताबरोबर बोलत बसले होते. हा महंत मूळचा दक्षिणी, येथें येअून पहाडी बनला होता. मोडकेंतोडकें मराठीहि तो बोलायचा. ‘ रानांत ’ म्हणण्याअैवजीं ‘ राणांत ’ म्हणायचा ! त्यानें आमचें आदरातिथ्य केलें. स्वामींनीं त्याच्याशीं झालेल्या बोलण्याचा सारांश आम्हांला सांगितला. भगिनी निवेदिता येथें येअून गेल्या होत्या असें कळलें; आणि आम्ही निरोप घेअून लालसांगाकडे गेलों.

लालसांगा म्हणजे लालपूल. या गांवाचें खरें नांव चमोली आहे. पण यात्रेकरूंच्यासाठीं अलकनंदेवर जो पूल बांधला आहे त्याच्या रंगावरून या स्थळाचें नांव लालसांगा पडलें आहे. येथें बाजार, तारघर वगैरे सोयीं-व्यतिरिक्त अेक सफाखाना-( अिस्पितळ )-हि आहे. लालसांगाहून पुढील प्रवासांत फारशी गंमत नाहीं वाटत. मुंग्यांची रांग चालत असावी तशी यात्रेकरूंची रांग या ठिकाणीं पाहायला मिळते. वाटेंत गरुडचट्टी लागली, तेथें दुपारीं पुष्कळ चांगली झोंप आली; अेवढ्याचमुळें या चट्टीचें नांव लक्षांत राहिलें आहे. आदल्या रात्रीं मुष्किलीनें झोंप मिळाविली होती जर दुपारीं ही झोंप मिळाली नसती तर मी आजारीच पडलों असतों. आम्ही अितके दिवस चालत होतों कीं आतां थकवा वाटूं लागला होता. संध्याकाळीं आम्ही जोशीमठाला पोंचलों. बदरीनारायणाची ही हिंवाळ्यांतील राजधानी.

---

# बदरीधाम : : ४२

श्रीआदिशंकराचार्यांनीं दिग्विजय केल्यानंतर हिंदुधर्माला सुंदर व्यवस्था बांधून दिली. ख्रिस्तीधर्माला जसा सेंट पॉल तसे मोठ्या प्रमाणांत हिंदुधर्माला श्रीवेदव्यास आणि भगवान् शंकर. मोठमोठीं मानवखंडें सामावतील असें या

५४८२९ ८८८ ७८३१६९

विभूतींचें हृदय आणि दूरवर शतकानुशतकांपर्यंत पोंचावी अशी त्यांची दृष्टि. श्रद्धा, वाग्वैभव आणि व्यवस्था हेंच त्यांचें हाड. शंकराचार्यांनीं आपली व्यवस्था टिकावी आणि जिवंत राहावी म्हणून भारतवर्षाच्या चारी टोंकांना द्वारका, शृंगेरी, पुरी आणि ज्योतिर्मठ ( जोशीमठ ) असे चार मठ स्थापन केले. चारी ठिकाणीं या धर्मसम्राटानें ब्रह्मचारी ठेवले—जणुं अशोकाचे राजुकच ( व्हाअीसरॉय ).

अुत्तरेकडे ज्योतिर्मठ स्थापून तेथें दक्षिणेकडील धर्मनिष्ठ ब्रह्मचाऱ्यांना नेअून त्यांनीं कायम केलें. हिंदुस्थानांतून बौद्धधर्म अुत्तरेकडे तिबेट आणि चीन या देशांत गेला होता. त्याचे मंगोलियन संस्कार या देशांत येअूं नयेत यासाठीं हें अेक ठाणें मांडलें होतें म्हणावयाचें. प्राचीन संस्कृतींत व्यापाराची दृष्टि, संरक्षणाची दृष्टि आणि धर्म–दृष्टि या तिन्ही अेकत्र पुढें ठेवून ठाणीं स्थापिलीं जात.

जोशीमठांत हिंवाळ्याकरितां प्रभु बदरीनारायण स्वतः येअून राहातात. त्यामुळें येथेंहि पंड्यांची आणि यात्रेकरूंची गर्दी खूप असते. येथील कारागीर तांब्याच्या आणि चांदीच्या पत्र्यांवर बदरीनारायणाचें चित्र अुमटवून यात्रेकरूंना विकतात; कागदावर छापलेलीं चित्रेंहि ठेवतात. येथील बाजार अिकडच्या प्रदेशांत मोटाच म्हणायचा.

जोशीमठांत आम्हांला अेक मद्रासी ब्रह्मचारी भेटला. त्याला अिंग्रजींत बोलतां येत होतें. त्याच्याकडून जोशीमठाचा ब्रह्मचारी महंत आणि त्याच्या वंशावळीची पुष्कळ माहिती मिळाली. यात्रेकरूंच्या आंधळ्या दानवृत्तीमधून या महंताला फुकटचें अुत्पन्न किती आहे आणि तें कसें वापरलें जातें याविषयींहि त्यानें आम्हांला पुष्कळ सांगितलें. त्याला आंतल्या गोष्टी पुष्कळ माहीत होत्या असें त्याच्या बोलण्यावरून दिसलें. हिंदु समाजाला साधें शहाणपण शिकविण्यासाठीं आणि अनेक प्रकारची धार्मिक घाण दूर करण्यासाठीं आतां अेकादे जबरदस्त गुरु शंकराचार्य अवतीर्ण होणें अवश्य आहे. जोशीमठाच्या देवळाच्या चार कोपऱ्यांवर चार लहान लहान देवळें आहेत. त्यांच्या आंतल्या मूर्ती प्रमाणशुद्ध आणि सुंदर वाटल्या.

त्यांपैकीं अेका देवळांत शंकर आणि पार्वती भिल्लवेषांत अुभे आहेत. या मूर्ती पाहून तर मोहित झालों.

जोशीमठाहून अुतरून अलकनंदा आणि धवलगंगा यांच्या संगमावर विष्णुप्रयागला आम्ही पोंचलों. पहाडी नद्या जेव्हां अेकमेकींना भेटतात तेव्हां आनंदोन्मत्त होअून जातात. तेथें फार वेळ बसणेंसुद्धां धोक्याचें असतें. त्या मस्तींत मनुष्य स्वेच्छेनें वाहून गेला तर नवल नाहीं. पुढें दोन-तीन चट्ट्या मागें टाकून आम्ही हनुमान चट्टीला गेलों. तेथें प्राचीन काळीं अेक मोठा याग ( यज्ञ ) झाला होता; पण आम्ही तेथें न थांबतां पुढें बदरीनारायणाकडे चाललों. वाटेंत अेक नदी थिजून बर्फ होअून गेली होती. ती ओलांडणें म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. पायांखालचा बर्फ मजबूत आहे कीं पातळ आहे हें पाहण्यासाठीं आम्ही आमच्या काठीचें टोंक बर्फांत खूप जोरानें मारीत असूं. पुष्कळ वेळां नदीच्या वरच्या थराचें बर्फ झालेलें असतें आणि खालीं थंड पाणी वाहात असतें. जरा का वरचा थर फुटला आणि माणूस आंत पडला, कीं थंड पाण्याच्या प्रवाहाच्या भोंवऱ्यांत सांपडून वाहून जायचा ! मग त्याला वांचविण्याला अुपायच नाहीं. वरच्या टेकडीवरील किती तरी धोंडे गडगडत येअून बर्फाच्या पटावर पडले होते. दगडाच्या भारानें बर्फ वितळतें आणि पातळ होतें. मग अशी अेक वेळ येते, कीं बर्फाला दगडांचा भार सहन होत नाहीं. डुप्प ! कीं दगडानें जलसमाधि घेतलीच समजावी ! अशा अेक-दोन जलसमाधी पाहून आम्ही सावध झालों होतों. असें सांगतात कीं, अेका वेळीं कोणी अेक श्रीमंत मनुष्य चार भोयांच्या झंपानांत बसून जात होता, आणि खालचें बर्फ अेकाअेकीं वितळून गेलें. तें झंपान आणि पांचीजण त्या प्रवाहांत पडून थंड झाले ! त्यांच्यासाठीं बर्फाची कबर तयारच होती.

मला कांहींसें आठवतें, केदारच्या कीं बदरीनारायणाच्या रस्त्याला कुठेंसें आम्ही नदीच्या कांठाकांठानें जात होतों, आणि नदीवर बर्फाचा अेक मोठा पूल नैसर्गिक रीत्या बनला होता. खालच्या बाजूनें झुलत्या पुलासारखी बर्फाची गोल कमान झाली होती.

× × ×

झालें ! बदरीनारायणाच्या शिखराचें शेवटीं दर्शन झालें ! आनंद ! आनंद ! 'अुरसा शिरसा दृष्ट्या वचसा मनसा तथा । पद्भ्यां कराभ्यां जानुभ्याम् ।' आम्ही प्रणिपात केला. माणूस वाटेल तितका थकला असला तरी अेवढें शेवटचें अंतर कापायला काय वेळ लागतो ? फुटबॉलअितकें हलकें होअून आम्ही धांवूं लागलों. ओल्या कपड्यांनीं पुरींत प्रवेश केला; मुक्कामाला जाअून कपडे सुकविले आणि संध्याकाळची आरती आणि राजनैवेद्य पहायला गेलों. बैराग्यांची घंटा वाजविण्याची अेक विशिष्ट पद्धत असते. कंबर कसकसून दोघेजण घंटा वाजवीत असतात आणि बेताल ताल बरोबर धरतात ! हा ताल यांना कुठून सुचला याचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं. घंटानादाच्या आमंत्रणाला अुत्तर म्हणून आम्ही देवळांत गेलों. लोकांची अशी कांहीं गर्दी होती कीं, जणुं काय मोहोळावरच्या मधमाशाच ! त्या वेळीं मनांत काय वाटलें, काय काय भाव मनांत भरून आले, याची कल्पना मी स्वतः देण्यापेक्षां स्वामी आनंदांच्या भाषेंतच येथें अुतरली, तर मनाला कांहींसा संतोष होअील.

"आम्ही अुठून लगबगीनें देवळांत गेलों. प्रत्यक्ष नारायणाच्या दारीं—भगवंताच्या चरणीं—लोकांची गर्दी काय विचारावी ! सारी बदरीपुरीच येथें लोटली होती. पुरींत राहूनहि राजनैवेद्याचें दर्शन न घेणारा असा कोण अभागी प्राणी असूं शकेल ? आम्हीं कसेंबसें दर्शन घेतलें. देवळाच्या आंत दूरवर मूर्तीजवळ अनेक दिव्यांच्या मालिका झगमगत होत्या. दर्शन घेअून आम्ही सद्गदित झालों, कृतकृत्य झालों. अिष्टमित्र, संबंधी सर्वांची आठवण झाली. अनेक दिवसांपासून ज्याची तळमळ मनांत होती, ज्याच्यासाठीं महिनेच्या महिने जंगलांत नि पहाडांत भटकण्याचें आम्हीं आनंदानें पत्करलें होतें, तें शेवटीं प्राप्त झालेलें पाहून डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले ! जीवन सफळ झालें ! धन्यतेचा अनुभव घेअून नारायणाच्या दारीं त्या वेळीं किती अेक लोक कृतकृत्य होअून, पावन होअून, 'नारायणा, तुझ्या चरणीं अेकदां कायमचें स्थान दे,' 'याच क्षणीं तुझ्या द्वारीं आसरा दे,' 'तुला आतां शरण आल्यावर पुनः त्या असार पसाऱ्यांत आम्हांला ढकलूं नकोस,' 'माझा अुद्धार कर,' 'या जगांतून

मला बाहेर काढून घेअून तुझ्या चरणीं अक्षय्य शांति दे,' 'धन्य झालों नारायणा, आतां मरण दे,' अशी अनेक तऱ्हेची प्रार्थना करीत, परमेश्वराला आळवीत अुभे होते ! 'देवाचिये द्वारीं' प्रत्यक्ष नारायणासमोर अुभे राहिल्यानंतरसुद्धां या असार संसाराविषयीं कोणत्या अभागी प्राण्याला अजूनहि भ्रांति–मोह राहिला असेल ?

"मंदिराबाहेर नारायणाचा प्रसाद (भात) वाटला जात होता. पण तेथें अितकी कांहीं भयंकर गर्दी होती कीं, कांहीं केल्या आम्हांला आंत शिरकाव मिळेना ! शेवटीं अेका यात्रेकरूकडून थोडासा प्रसाद मागून घेअून आम्ही मोठ्या प्रेमानें कृतकृत्य होअून खाल्ला. येथें–नारायणाच्या दाराशीं–राजा-रंक अेक, गरीब-श्रीमंत अेक, ब्राह्मण-शूद्र अेक, पापी-पुण्यवान् अेक, सुखी-दुःखी, रोगी-कष्टी, महार-चांभार, शूद्र-अतिशूद्र, चांडाळ-पतित, अुच-नीच, काळे-गोरे, वैष्णव-शैव, संन्यासी-त्यागी, शाक्त-बैरागी, लहान-थोर, स्त्री-पुरुष-बालकें, सर्वच अेक. येथें भेद नाहीं, जात नाहीं, संप्रदाय नाहीं कीं पंथ नाहीं; येथें तुझें-माझें नाहीं, द्वैत नाहीं, द्वेष नाहीं, येथें वाद नाहींत, झगडे नाहींत; सनातनी नाहींत, समाजिस्ट नाहींत; येथें अुद्धारक नाहींत, सुधारक नाहींत; पूर्व नाहीं, पश्चिम नाहीं; येथें सर्वच अेक. कारण आज सारीं भावंडें पुन: अेकाच पित्याला भेटायला विदेशाहून परत आलीं आहेत. येथें कोणाचा दर्जा मोठा नाहीं, कोणी कस्पटाप्रमाणें नाहीं, कोणी तुच्छ नाहीं. अहंकारानें व्यर्थ फुगलेल्या लोकांचा मद येथें नारायणाच्या दाराशीं गळून पडतो. जे लहान आहेत त्यांना नारायण आपल्या हातानें वर अुचलून, पावन करून सर्वांच्या पंक्तीला बसवील. नारायणाची दृष्टि पोंचणार नाहीं अितके लहान, अितके पापी, येथें कोणी नाहीं.

**'अेक नदिया अेक नारो बहावै मैलो नीर भरो**
**जब मिल गये, तब अेक बरन भये गंगा नाम परो ॥'**

"या पतितपावनाच्या दारीं कोण पावन होणार नाहीं ? प्रत्यक्ष नारायणाची दृष्टि पडली असतांसुद्धां कोणावर अुंच-नीच, चांगलें-वाअीट पापी–पुण्यवान् या भेदाचा मळ राहील ? आणि हा अभेद, हें अद्वैत,

हें प्रेम, हा अेकात्मभाव, हा बंधुभाव, या वेळीं येथें मोटमोठ्या ज्ञान्यांपासून थेट अडाण्यापर्यंत सर्वांना समजतो. श्रीमंतापासून थेट गरीब, अशिक्षित, अडाणी यात्रेकरूपर्यंत सगळे कसलाहि संकोच न ठेवतां, मोठ्या प्रेमानें अेकमेकांकडून नारायणाचा प्रसाद मागून घेअून आणि अेकमेकांत वांटून घेअून खातात तें अुगीच नाहीं. म्हणून बोलो ‘ जय श्री बदरी विशाल की जय, ’ ‘ जय श्री बदरी विशाल की जय. ’ ”

आज मला शेवटचें श्राद्ध करायचें होतें. सिद्धपूर आणि गया या दोन ठिकाणीं वडिलांचें श्राद्ध केलें म्हणजे वडिलांची तृप्ति होते, पण बदरीनारायण येथें ब्रह्मकपालाच्या शिळेवर बसून श्राद्ध केलें म्हणजे सर्वच पूर्वज अेकदम मोक्षाला जातात. येथें श्राद्ध केल्यानंतर मनुष्यानें पुन: जर श्राद्ध केलें तर मोक्षाला गेलेले पितर पुन: नरकांत पडतात, असें शास्त्रांत स्पष्ट लिहिलें आहे! येथें श्राद्ध करून पितरांच्या ऋणांतून मनुष्य कायमचा मुक्त होतो. अनेक यात्रा करीत करीत मनुष्यानें हिमालयाची ही शेवटची यात्रा केली म्हणजे त्याचीं अैहिक सर्व बंधनें तुटलीं पाहिजेत. मग आपल्याच कुटुंबाला चिकटून राहण्याअितकी सकुंचितता त्याच्यांत राहतांच कामा नये. मानसिक आसक्ति सुटली, कीं धार्मिक ऋणहि फिटलें. श्राद्ध करायचें तें आपल्या कोमल आणि प्रेमळ स्मृतींत राहणाऱ्या पितरांचें. हृदयाची ग्रंथी सुटली म्हणजे आपले मानलेल्या सर्व आप्तसंबंधी जनांचेंहि बंधन सुटलें. पुन: ती आसक्ति परत लावायची नाहीं. जो सर्वांचा झाला, त्याला आपले आणि परके असा भेद कशासाठीं असेल? भगवंताच्या चरणीं येअूनहि जर मनुष्य ही संकुचितता ठेवील, तर मात्र तो त्याच किंमतीचा आहे. तो आणि त्याची स्मृति दोन्ही नरकाला जाणार नाहींत तर काय होअील? नरक म्हणजे संकुचितता. तुकारामांनीं म्हटलें आहे :

**आधीं होता मुक्त । स्वयें झाला बद्ध ।**
**घेअूनीयां छंद । माझें माझें ।।**

सकाळीं अुठून न्हाअून धुअून लोट्यांत तांदूळ भरून देवळांत गेलों. बदरीनारायण येथें स्नानाची अडचण नाहीं. गरम पाण्याचीं मोठीं कुंडें

आहेत. वाटेल तितक्या माणसांनीं वाटेल तितकें स्नान करावें. लोटा व तांदूळ पुजाऱ्याकडे सोंपविले. त्यानें कुंडावरील गरम चुलीवर अितर असंख्य लोट्यांबरोबर माझाहि लोटा चढविला. दर्शन घेअून परत येतों तों त्या लोट्यांत भात शिजून तयार होता. मंदिरांत नैवेद्य म्हणून पाठवून परत आलेला लोटा घेअून त्या भटजीबरोबर ब्रह्मकपालाच्या विशाल शिलेवर जाअून मीं श्राद्ध केलें. अिथल्या पंड्यांची अडचण मला माहीत होती. अेक संस्कृत सोडून अितर कोणाहि बरोबर त्यांचें वैर नव्हतें! म्हणून श्राद्धाचे मंतर माझे मीच तयार करून ठेवले होते. देवाघरीं गेलेल्या पूर्वजांचीं आणि आप्तसंबंधी जनांचीं नावेंहि लक्षांत आणून ठेवलीं होतीं. सर्वांच्या नांवानें येथें श्राद्ध केलें आणि अेका कुलधर्माची सांगतासिद्धि केल्याचें समाधान घेअून परत आलों. केवढी कृतार्थता! मी जणुं या दुनियेंत नव्हतोंच मुळीं! तिकडून सरळ परत देवळाकडे गेलों. मला घरीं जाअून जेवण करण्या-पूर्वीं नारायणाचें पुनः अेकदां दर्शन घ्यायचें होतें. दाराशीं गर्दी वाढत जात होती. अितके लोक अितकी गर्दी करून अुभे असले, अेकमेकांचे अेकमेकांना धक्के लागत असले, तरी तेथें कोणाच्या मनाचा तोल जाअील असें नव्हतें. सगळेच भक्तीच्या अुन्मादांत दंग; अेकमेकांसंबंधींचा सद्भाव अेकूण अेक डोळ्यांतून टिपकत होता.

या गर्दींत अेक मारवाडी युवती अेका लहानशा ताटांत बदाम, खडी-साखर, बेदाणा, चंदन, कापूर वगैरे अनेक पूजाद्रव्यें भरून घेअून आंत प्रवेश शोधीत होती. अितक्यांत कोणाचा तरी तिला धक्का लागला; हातां-तून ताट खालीं पडलें! ताट पडल्याबरोबर जणुं काय काळजांत तीर शिरावा तशी ती बाअी अेक क्षणभर स्तब्ध झाली. दुसऱ्याच क्षणाला ओक्साबोक्सी रडूं लागली! आणि तिला रडूं कां न यावें? तिनें खडीसाखरेचा कणन्‌कण निवडून पसंत केला नव्हता काय? प्रत्येक बदाम अुत्तम पुष्ट पाहून घेतला नव्हता काय? आपल्या हातानें चंदन आणि केशर घांसून घांसून गंध तयार केलें नव्हतें काय? बदरीनारायणाला हें सर्व अर्पण करीन या संकल्पानें हें सर्व गोळा करून आपल्या प्राणासारखें सांभाळीत येथपर्यंत ती तें घेअून आली होती. या पूजाद्रव्यामागें किती ध्यान, किती भक्ति, किती आनंद

सांठविलेला होता! धन्य होण्याच्या अेन वेळींच तें हातांतून पडून भगवन्ताच्या दारीं अितस्ततः पसरून जावें, याहून अधिक विपत्ति ती कोणती? काय तिचें दुःख! किती विलाप! माझें हृदय विरघळलें. मी जवळ गेलों. त्या बालिकेच्या भक्तीपुढें माझें मस्तक नम्र झालें! मीं तिला म्हटलें, " बहन, हा वृथा शोक कां करतां? पुजाऱ्याच्या हातानें हा नैवेद्य आंत पोंचला नाहीं अेवढ्यासाठीं? तुम्ही चुकतां. अिथला प्रत्येक दगड पवित्र आहे, पावन आहे आणि भगवंताच्या दारचे हे पायातळचे दगड! कोण जाणें किती संत, महंत, साधू, सत्पुरुषांच्या चरणस्पर्शानें ते पुनीत झाले असतील! भगवंताला त्या पुजाऱ्याच्या हातानें तुमचा नैवेद्य घ्यायचा नव्हता. तुमच्या हातानेंच तो घ्यायचा होता म्हणून असें झालें. तुमच्या भक्तीवर तुमचा विश्वास असूं द्या..." अशा प्रकारें मी पुष्कळ पुष्कळ बोललों. ती बालिका श्रद्धेच्या डोळ्यांनीं माझ्याकडे पाहातच राहिली.

खालीं विखुरलेले बदाम आणि खडीसाखर गोळा करून नारायणाचा प्रसाद म्हणून मीं तिच्या हातावर ठेवले आणि म्हटलें, " जा बाअी, आतां सुखानें घरीं जा. भगवंताच्या कृपेविषयीं मनांत बिलकुल शंका बाळगूं नको. " भोळी बाला! मीं जितकें सांगितलें, तितकें सगळें तिनें अैकून घेतलें, श्रद्धापूर्वक स्वीकारलें, डोळे पुसले आणि 'जय बदरी विशाल की जय' असें म्हणून ती तेथून निघून गेली. ती गेली, पण मला भक्तीची दीक्षा देअून गेली! नारीहृदयांत किती श्रद्धा असते, किती भक्ति असते, किती अुत्कटता असते, याचें दर्शन देअून ती गेली! बदरीनारायणाचें दर्शन मला मूर्तींत झालें, त्यापेक्षां त्या भोळ्या मारवाडी बालेंत अधिक झालें!

---

# परत फिरतांना : : ४३

बदरीनारायणाहून कित्येक यात्रेकरू वसुधारेला जातात. अुंचावरून अेक धबधबा पडतो. जे पुण्यवान् असतील त्यांच्या डोक्यावरच त्याची

धार पडते. पापी असतील तर धार बाजूला जाते, त्यांच्या डोक्यावर पडत नाहीं, असा समज आहे. वसुधारेला जायचें आम्हीं सोडून दिलें. कारण आमच्या कुलींना पुढें जाण्याची कुवत नव्हती; लवकर घर गांठण्यासाठीं ते आतां अुत्सुक झाले होते. आम्ही परत फिरलों. रस्त्यांत किती तरी लोक बदरीनारायणाचा भात अुन्हांत ठेवून सुकवीत होते. हा सुकविलेला भात ते येथून घरीं घेअून जातील. बंगाली लोक बंगालला घेअून जातील. पंजाबी पंजाबांत, मारवाडी आपल्या मरुभूमींत तो घेअून जाअून खातील आणि कट्टे कर्मकांडी महाराष्ट्रीयसुद्धां तो आपल्या घरीं घेअून जाअून सर्व आप्तेष्टांना वांटून खातील. मद्रासी—थेट रामेश्वरपर्यंतच्या मद्रासी-लोकांच्या घरीं हा भात जाअील. शाळिग्राम हा जसा दगड नव्हे, जानवें जसें सूत म्हणूं नये, तसा हा भात हें अन्न समजूं नये, हा प्रत्यक्ष प्रभूचा प्रसाद. तो आपल्या कायेला पवित्र करतो. कोणत्याहि कारणानें हा प्रसाद अपवित्र व्हायचा नाहीं. अग्नीअितकाच तो पवित्र. तो प्रसाद घेअून आम्ही परत फिरलों.

वाटेंत जिकडे तिकडे विंचवाचीं झुडपें दिसत होतीं. मराठींत या झुडपाला 'खाजकुअी' म्हणतात. कोणी त्याला 'खाजकोली' हि म्हणतात. त्याच्या पानांचा अंगाला स्पर्श झाला कीं फार खाज अुठते आणि आग होते.

तुळशीच्या झाडाला नमस्कार करणाऱ्या अेका वैष्णवभक्ताला पाहून अेका मिशनऱ्यानें तुळशीचीं पानें हातांत घेअून चोळलीं. भक्त पक्का होता. तो थोडासा पुढें गेला आणि त्यानें विंचवाच्या झाडाला साष्टांग नमस्कार केला आणि म्हटलें, 'तुळशी मातेपेक्षां आमचा हा देव मोठा आहे.' पुनः तोच प्रयोग करायला जातांच मिशनऱ्याला 'हा देव मोठा असल्याची' प्रतीति आली वगैरे गोष्टी तिथल्या अेका पहाडी मनुष्यानें हंसत हंसत सांगितल्या. अशा प्रकारचे चुटके सर्वच प्रांतांत आढळतात. मिशनरी नसला तर दुसरा कोणी परधर्मी किंवा नास्तिक त्याच्या जागीं असतो. गोष्टीला काय, कोण वाटेल तो माणूस चालतो.

आम्ही लालसांगा मागें टाकून मिलचौडीला आलों. येथें टेहरी संस्थानची हद्द संपते. कुलींचे करार येथपर्यंतचेच असतात. कैरासिंग आणि बादरू

आपलें वेतन घेऊन सद्‌गदित अंत:करणानें आम्हांला सोडून परत गेले. जातांना आम्हांला ते म्हणाले, “ तुम्ही लोक अितक्या झपाट्यानें चाललां आहांत कीं, आमचे दिवस वांचले, खाणेंखर्च वांचला; पण चालतां चालतां आमचा दम निघून गेला ! आतां घरीं जाअून खूप दूध-तूप खाअूं आणि येत्या वर्षी बोजा अुचलायच्या कामांतून विसांवा घेअूं. ” ज्या दिवशीं आम्ही मुक्काम करीत असूं त्या दिवशींच्या त्यांचा जेवणखर्च आमचेवर असे. गव्हाच्या पिठाअैवजीं त्यांना जर डाळ-तांदुळाची खिचडी दिली तर त्यांना ती मेजवानी वाटायची. खिचडी देअून दहा मैल जास्ती चालवाल तरी मग हरकत घ्यायचे नाहींत. आम्हीं अेक नवा कुली केला. तो होता गरीब माणूस; पण भोळसटपणें फार बोलायचा. साधू स्वत:विषयीं बोलायचें असेल तेव्हां जसें ‘ मी ’ म्हणण्याअैवजीं ‘ हें शरीर ’ म्हणताल, तसा आमचा हा कुली स्वत:विषयीं बोलायचें असेल तेव्हां ‘ माझा प्राण ’ म्हणूनच बोलायचा. ‘ माझा प्राण थकला आहे ’, ‘ माझ्या प्राणाला झोंप पाहिजे आहे ’, ‘ माझ्या प्राणाला अंधारांत जायची हिंमत नाहीं ’, वगैरे !

मिलचौडीहून पुढें जातांच गणअी आलें. येथें अेका दुकानाच्या मागच्या लांब व अरुंद ओसरींत आम्ही निजलों होतों. थकल्या भागल्या शरीराला झोंपेचा अेक हप्ता कसाबसा मिळाला होता, अेवढ्यांत शेजारीं गायन सुरू झालें. पुष्कळ पहाडी लोक जमले होते. आवाजावरून आम्हीं अनुमान केलें कीं कोणी मुलगा गात आहे. त्याचा आवाज चांगला होता. आलापहि मधुर होते. थोडा वेळ झोंपेंत गायनाची गोडी मिसळली आणि मी प्रसन्न झालों. पण गायन अेका कडव्यावरून पुढें हलेचना ! पुन: पुन: आपलें तेंच तें, तेंच तें कडवें ! अर्धा तास झाला, पाऊण तास झाला, तास झाला, दोन तास झाले, तरी आपलें तेंच कडवें चाललेलें ! मी कंटाळलों, पुढें त्रासलों, बेचैन झालों ! तें कडवें मेंदूंत घुसलें, डोकें फिरायला लागलें, पण गायन कांहीं केल्या थांबेचना ! तक्रार तरी कोणाजवळ करायची ? शेवटीं थकून केव्हां झोंप लागली कोण जाणें ! जें संगीत सुरवातीला गोड लागलें होतें तेंच अितकें कंटाळवाणें झालें हें पाहून विचार आला, स्वर्गींचे देव तोच तोच भोग भोगून माझ्याप्रमाणेंच

कंटाळून जात असतील आणि मरणासाठीं तळमळत असतील! तुकारामाचा अभंग आठवला :

**स्वर्गींचे अमर अिच्छिताती देवा।**
**मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां ।।**

अमरपणा म्हणजे, स्वामी दयानन्द म्हणतात त्याप्रमाणें, कधीं न संपणारी जन्मठेपेची शिक्षा! मी कांहीं स्वर्गातील देव नव्हतों कीं मृत्यूसाठीं तळमळूं! मला आपलें सकाळ झाली कीं गणअी सोडायची हेंच जरूरीचें होतें.

येथें वाटेंत चांगली कणीक मिळेना. जात्यांतील खरखर तींत मिसळलेली असायचीच; त्यामुळें माझा कोठा बिघडला. मला ताप येअूं लागला. पण येथें थांबून थोडीच निभावणी होती? ताप असो, नसो; चाललेंच पाहिजे. वाटेंत लांकडाच्या भांड्यांत जमविलेलें कच्च्या दुधाचें सुरेख दहीं मिळत असे तेंहि मी खात असें. दह्यानें माझें कांहीं नुकसान झालें नाहीं अुलट पोटांतल्या आमांशावर तें अेक रामबाण औषधच ठरलें.

---

## द्वाराहाट : : ४४

अेके दिवशीं अगदीं सांज पडल्यावर अेका पहाडाच्या पायथ्याशीं जाअून पोंचलों. वाटेंत मोठा पाअूस पडल्यानें मी भिजून चिंब झालों होतों आणि अेकाच्या घरीं कपडे सुकविण्यासाठीं म्हणून थांबलों, त्यामुळें मी मागें पडलों होतों. दुकानदार म्हणाला, ‘ तुमचे दोन सोबती पुढें द्वाराहाटाला गेले आहेत, तुम्हांला तिकडे यायला सांगून गेले आहेत. ’ दुकानदाराकडून निरोप अैकला आणि मीं आकाशाकडे पाहिलें. अितकें सुंदर आकाश क्वचितच पाहायला मिळतें. पण अंधार चढत चालला. पुढें जावें कीं न जावें याचा विचार करीत होतों. मनांत निश्चय केला कीं,

अंधारांत जाण्यापेक्षां अेक रात्र अिथें राहिलेलें बरें; पण दुसऱ्याच क्षणीं हुक्की आली कीं, नाहीं, जावें पुढें. अेका रात्रीचा अनुभव मिळेल. दुकानदाराला आश्चर्यांत टाकून मी पुढें निघालों.

परिस्थिति बदलली. पूर्णिमेची रात्र; पण ती अमावास्येची असती तरी याहून जास्त अंधार पसरवूं शकली नसती ! आकाश काळ्याभोर ढगांनीं घेरलेलें होतें. रस्ता बरोबर दिसत नव्हता ! दुपारच्या पावसानें रस्ता मधून मधून धुअूनहि गेला होता आणि लहान-मोठे खड्डे पडले होते. वाटेंत पुष्कळ वेळां पडलों, झडलों, गुडघा लचकला, अंगावर घेतलेली ओली शाल माझ्यापेक्षां कांटेरी झाडांचीच कींव करूं लागली ! तिची विनवणी करून तिला.सांवरीत सांवरीत मी पुढें चाललों. जसजसा वेळ जात चालला तसतसा पस्तावा होअूं लागला. मागें राहिलों असतों तर किती बरें झालें असतें ! पुष्कळ चालल्यावर मनांत विचार आला कीं, आलों हें अंतर जास्त, कीं पुढें राहिलें आहे तें जास्त ? मागें परतायचा विचार करावा आणि पुढें दोन फर्लांगच राहिलें असावें, तर मूर्खपणाच पदरीं यायचा. पुढें चालावें आणि पुनः हिशेब करावा. माझें घड्याळ कनवटीला होतें. पण रात्रीं त्यांत काय दिसणार ? शेवटीं शहाणपणा सुचला कीं, विचाराचें घड्याळ थांबवावें आणि मुकाट्यानें चालूं लागावें. माझ्या चिकाटीचा शेवट होण्याच्या अगोदरच जंगलाचा शेवट आला आणि मी द्वाराहाटला पोंचलों.

द्वाराहाट बाजाराचें ठिकाण आहें. पण नअू-साडेनअू वाजून गेले होतें, सारा गांव झोंपला होता. आतां बुवांचा आणि स्वामींचा तपास कुठें करायचा ? अेकाद्याचें दार खडखडवावें आणि तो माझ्यावर गुरगुरला तर ? आणि समजा गुरगुरला नाहीं तरी त्याला विचारायचें काय ? आमचे बुवा कुठें आहेत हो ? स्वामी कुठें आहेत हो म्हणून ? वर्ड्स्वर्थची ‘ अिडियट बॉय ’ ही कविता मला आठवली. वेड्या आअीनें मुलाला गाढवावर बसवून मध्यरात्रीं डॉक्टराच्या घरीं पाठवून दिलें होतें. गाढव आणि तो मूर्ख मुलगा दोघे जंगलांत ‘ थंड्या अुन्हाची ’ सहल करायला गेले. शेवटीं वेडी आअी स्वतः त्यांना शोधायला गेली. शहरांत जाअून ती डॉक्टरला विचारती, ‘ Doctor, Doctor, where is my Johnnie ? (डॉक्टर, डॉक्टर,

माझा जॉनी कुठें आहे ? ) बिचाऱ्या डॉक्टरला या वेड्या आओीचा लाडका जॉनी काय माहीत ? झोंप मोडल्यानें तो त्रासला आणि बडबडत बडबडत पुनः जाअून झोंपला ! मी जर दारोदार या बुवा–स्वामींचा तपास करीत राहिलों असतों तर माझीहि तीच गत झाली असती. शेवटीं अुपाय सुचला. मोठ्या गंभीर स्वरानें मला येत असलेल्या अुपनिषदांचे मंत्र ललकारत मी चालूं लागलों.

वीज चमकली म्हणजे थोडेसें दिसायचें, पण मागाहून अंधार दुप्पट व्हायचा. अेका रस्त्याच्या कडेला आलों. तों पुढें सपाट गुळगुळीत जमीन दिसली. जणुं रेतीच पसरली आहे. मला वाटलें, ‘ हें टेनिसकोर्ट येथें कोठलें ? ’ याच्यावरून आपला रस्ता पुढें जात असावा. पण मला शंका आली. अेक दगड घेऊन त्या टेनिसकोर्टावर फेंकला. दगडानें रिपोर्ट दिला कीं, ‘ येथें पाणी आहे ’ आणि त्यानें जलसमाधि घेतली. त्या परोपकारी दगडाला धन्यवाद ! मीं अुजव्या बाजूची वाट धरली आणि पुनः गस्त सुरू केली. थोडा पुढें गेलों आणि अेका दुकानाच्या माडीची लहानशी खिडकी अुघडली गेली–“ काका ? ” मीं म्हटलें, “ आनंद ? ” लगेच कंदील घेअून स्वामी खालीं आले. बुवांनीं स्वैंपाक करून ठेवला होता. त्यांनीं ममतेतें डोळ्यांतून गळणाऱ्या आसवांनिशीं मला जेवूं घातलें. अेवढ्या अंधारांत मी आलों कसा हाच मोठा चर्चेचा विषय झाला. प्रेमाच्या गोष्टींना कधीं अंत असतो ? थकलेल्या शरिरानें जर फर्मान सोडलें नसतें तर आमची सारी रात्र झोंपेशिवाय गेली असती. सकाळीं ‘ टेनिस-कोर्ट ’–तलावाचें दर्शन झालें. तलावावर लाल हिरवें अंजिरी शेवाळ भरलेलें होतें.

आम्ही पुढें निघालों. आतां पथ थोडा राहिला होता. खालीं दरींतून जाअूं लागलें कीं, असह्य वाफारा लागायचा म्हणून पहाडी लोकांप्रमाणें टेकड्यांच्या माथ्यांमाथ्यांवरून जो रस्ता मिळेल तो आम्ही पसंत करूं लागलों. वारंवार जरी चढअुतार करावा लागला तरी कांहीं हरकत नाहीं; पण दरींतील भट्टी टाळलीच पाहिजे. शेवटीं आल्मोडा आलें. तेथें

परिचित स्थानेंहि नव्या नव्यासारखीं दिसायला लागलीं. आम्ही दीड-दोन महिन्यांत किती बहुमोल अनुभव मिळविला होता, किती विचार शिकलों होतों, भव्यतेचें किती आकंठ पान केलें होतें! दृष्टि अगदीं नवी बनून गेली होती, आतां तिला जुनीं दृश्यें नव्यासारखीं भासलीं तर त्यांत काय नवल?

अेक यात्रा पूर्ण झाली; अेक संकल्प फळास आला. पण यांतूनच अमरनाथाच्या यात्रेच्या संकल्पाचा फांटा फुटला होता, तो आम्हांला विश्रांति घेअूं देअीना. बुवा आणि मी स्वामींचा निरोप घेअून पुनः हरिद्वाराकडे चाललों. स्वयंभू महादेव अमरनाथाचें दर्शन आम्हांला घ्यायचें होतें. काश्मीरचा भूस्वर्ग अवलोकन करायचा होता. सृष्टि अनंत आहे, दिशा आणि काळ अनंत आहेत; मग माणसाची वासना, त्याचे संकल्प आणि त्याच्या योजना यांना तरी अंत कोठून असणार?

---

## फलश्रुति : : ४५

रोचनार्था फलश्रुतिः। कोणत्याहि वस्तूची माणसाला लालूच दाखविण्याकरितां जे लाभ दाखविण्यांत येतात ती फलश्रुति होय. मुलांना खरे लाभ दाखवावे तर ते त्यांना प्रत्यक्ष दिसत नाहींत. अेवढ्यासाठीं त्यांना रुचतील असे कसलेहि खरेखोटे लाभ दाखविणें हा आपल्याअिकडे, किंवा जगांतील सर्वच देशांत म्हणा पाहिजे तर, फार जुना रिवाज आहे. त्यांत सत्याचा किती अपमान होतो याचा विचार कोणी करीतच नाहीं; आणि अेक वेळ असत्यच बोलायचें ठरविल्यानंतर त्यांत मर्यादा कसली ठेवायची? असत्याची मात्रा ही कैफी पदार्थांप्रमाणें वाढतच जाते, पण त्यांतच असत्याचा अुतारहि असतो. आपल्या धार्मिक विधींत आणि व्रतांत फलश्रुतीची जणुं चढाओढ चाललेली असते. आजचे जाहिरातदार ज्या

बेशरमपणें खोटे चालवितात, तितकाच बेशरमपणा जुन्या फलश्रुतींतून पुष्कळदां आपल्याला पाहायला मिळतो. 'पुत्रार्थी लाभते पुत्रं धनार्थी लभते धनं।' अित्यादींची मालिका सुरू झाली कीं त्यांचा सहजासहजीं अंत व्हायचा नाहीं! 'भुक्तिं मुक्तिं च विन्दति' पर्यंत पोंचल्याशिवाय भागणार कसें?

या पद्धतीनें जर हिमालयाच्या प्रवासाची फलश्रुति लिहायचीं झाली तर मला सांगावें लागेल कीं ही यात्रा जो करील त्याला शतायुषी असे कमींत कमी शंभर पुत्र होतील, त्याचें घर सोन्याचें होअील; वाटेल तितक्या वेळां त्यानें लग्न केलें तरी तो तरुणच राहील; स्वर्गांतील अप्सरा, हिमालयांतील सिद्धगंधर्व आणि सनत्कुमार अित्यादि निवृत्तिशील ब्रह्मचारी अेकदम अेकाच वेळीं त्याच्यावर तुष्ट होतील! अशी फलश्रुति जर सफळ झाली तर माणसाची काय दुर्दशा होअील, याचा विचार करण्याचें काम आपलें नव्हे.

यात्रेची जर ही फलश्रुति, तर यात्रावर्णनाची फलश्रुति याहूनहि अधिक असली पाहिजे. जो कोणी हें यात्रावर्णन वाचील त्याला अर्थलाभ होअील; जो या वर्णनाचा ग्रंथ संग्रहीं ठेवील, त्याच्या घरांत चोर कधीं शिरणार नाहींत; जो कोणी हें पुस्तक विकत घेअून ब्राह्मणांना आणि विद्यार्थ्यांना—आणि आजच्या युगांत हरिजनांना—फुकट देअील त्याच्यावर ग्रंथकार आचार्य आणि त्याचे प्रकाशक सदोदित संतुष्ट होतील; प्रवास न करतां त्याला प्रवासाचें पुण्य मिळेल अित्यादि.

लोभाबरोबर भीतीची जोड नसेल तर काम अपूर्ण समजायचें. म्हणून जो कोणी या पुस्तकाची निंदा करील, त्यांतील वचनांविषयीं मनांत शंका आणील, तो तर कमींत कमी चार कल्पांपर्यंत रौरव नरकांत खितपत पडेल! आणि जो कोणी हें यात्रावर्णन वाचून फलश्रुतीचा अध्याय सोडून देअील, 'वृथा पाटो भवेत्तस्य श्रम अेव ह्युदाहृतः।'

हिंदुधर्मावर फलश्रुतीनें जेवढा अत्याचार केला आहे तेवढा नास्तिकांनीं-सुद्धां केला नसेल!

पण मला माझ्या प्रवासाची फलश्रुति निराळ्याच रीतीनें द्यायची आहे. ही यात्रा केल्यानें मला काय लाभ झाला हें मीं सांगितलें आणि जो कोणी या प्रकारची यात्रा करून पाहील त्याला प्रत्यक्ष काय काय लाभ होण्याचा संभव आहे अेवढें मीं सांगून टाकलें, कीं माझें काम संपलें.

मला प्रथम कबूल केलें पाहिजे कीं, अशा प्रवासाकरितां जी पूर्वतयारी असली पाहिजे ती माझी नव्हती. पूर्वतयारीवांचून केलेल्या चळवळी कमींत कमी फळ देतात. शिक्षण ही जीवनाची पूर्वतयारी असल्यानें शिक्षकाला तर प्रत्येक बाबतींत पूर्वतयारी पुरेपूर करण्याचें सुचलेंच पाहिजे. पण आजकालचे शिक्षक दुसऱ्यांना जें शिक्षण देतात, तें स्वतःच्या जीवनांत दाखल करण्याअितकीहि दरकार बाळगीत नाहींत. मी माझ्या जीवनांत अेकाहि प्रसंगीं पूर्वतयारी बरोबर केल्याचें मला स्मरण नाहीं. तेव्हां या प्रवासाची फलश्रुति मी काय सांगूं ?

हिमालयाच्या प्रवासाला किंवा अुत्तरेकडील कुठल्याहि प्रवासाला निघणाऱ्याला हिंदी भाषेचें कामचलाअू ज्ञान तर असलेंच पाहिजे. मला तें नव्हतें. जेथें प्रवास करीत असूं तिथला स्थानिक अितिहास आणि स्थानिक भूगोल यांची सामान्य माहिती आपल्याला असली पाहिजे. तीहि मला नव्हती. यात्रेला निघालें म्हणजे तीर्थक्षेत्राचें माहात्म्य जसें मिळेल तसें माणसानें वाचलेलें असलें पाहिजे; नाहीं तर यात्रेंतील अर्धें काव्य मनुष्य गमावून बसतो.

पूर्वतयारींत माझ्याजवळ अुत्साहाचें भांडवल चांगलेंच होतें, शरीर दुर्बल पण काटक होतें, अुधळून टाकायला वेळ वाटेल तेवढा होता, कांहींहि हेतूवांचून जीवन घालविण्याची मानसिक तयारीहि होती. मला स्वैंपाक करतां येत होता, पोहोतां येत होतें, आणि अेकटें अेकटें मनोराज्य करायलाहि येत होतें. निसर्गाबरोबर अेकरूप होण्याअितकी मनोवृत्ति तयार झालेली होती आणि अशा निष्पाप प्रवृत्तीचें फळहि कांहीं तरी सात्त्विकच मिळेल अशी श्रद्धा होती. दुसरी सर्वांत मोठी तयारी म्हणजे प्रेमळ मित्रांची सोबत.

वेदान्तग्रंथांत सांगितलें आहे कीं, भक्तामध्यें दोन प्रकारची वृत्ति असते. मांजराच्या पिलांची आणि माकडाच्या पिलांची. मांजरीचें पिल्लूं सर्वस्वीं

निराधार-डोळे मिटून पडून राहतें; आणि मनांत म्हणत असतें कीं, माझी आओी येओील आणि मला अुचलून घेअून जाओील. अुलट माकडाचें पिल्लू शक्य तेवढें स्वावलंबी असतें. आपली आई कुठें आहे, संकट कोणीकडून येण्याचा संभव आहे अित्यादि गोष्टींकडे तें स्वतःच लक्ष ठेवतें, आणि संकटप्रसंगीं न बोलवतां झट्दिशीं जाअून आओीला बिलगतें. माणसांत या दोन्ही प्रकारच्या वृत्ति असतात. माझ्यांतसुद्धां या दोन्ही वृत्ति योग्य प्रमाणांत असल्यामुळें, तें अेक पूर्वतयारींत गणतां येओील खरें.

हिमालयाच्या यात्रेला अेकादा हिंदु गेला, तर त्याचा मुख्य हेतु धार्मिकच असणार. हिमालयाचा आपण अितर प्रकारें विचारच करूं शकत नाहीं. पण धार्मिक हेतु म्हणजे काय? आपले पाय चालले, पवित्र म्हटल्या गेलेल्या जमिनीवर आपल्या शरीराचा भार पडला, अेवढ्यानेंच आपण पावन होअून जातों, अशी हिंदू लोकांत समजूत असतेच. तसें नसतें तर आंधळे आणि बहिरे यात्रेला निघाले नसते. अेकादा युरोपियन प्रवासी प्रवास करतो तेव्हां तो सुखाचीं शक्य तितकीं साधनें बरोबर बाळगतो. शरीराचें वजन, शरीराची शक्ति आणि शारीरिक आनंद वाढविण्याचा तो प्रथम संकल्प व प्रयत्न करतो. फोटो काढण्याचीं आणि चित्रें रेखाटण्याचीं साधनें बरोबर बाळगून आपले संस्कार स्थायी करण्याची तो धडपड करतो. वांकडेंतिकडें जितकें फिरतां येओील तितकें फिरून अितरांनीं जें पाहिलें नाहीं किंवा जाणलें नाहीं तेंच पाहण्या—जाणण्याचा आणि कशांत तरी पहिला नंबर मिळविण्याचा तो प्रयत्न करतो. धार्मिक प्रवासांत जितक्या अडचणी सहन कराव्या तितकें त्याचें पुण्य जास्ती. भोगविलासामुळें किंवा आळशीअैदीपणामुळें शरीरावर जें पुट चढलें असेल, तें काढून टाकणें ही अेक धार्मिक साधना मानली आहे. माझ्या मतें आपल्या लोकांनीं यात्रांमध्यें तितिक्षेचें तत्त्व दाखल करून यात्रेला खूप उच्च स्थान दिलें आहे. यात्रेकरूंत जर तितिक्षावृत्ति नसेल, तपोलालसा नसेल, तर यात्रास्थानें पवित्र राहूं शकणार नाहींत; आणि त्या त्या स्थळांचें नैसर्गिक सौंदर्य आंबट झाल्याशिवाय राहणार नाहीं. कष्ट सोसल्यानें, तऱ्हे-तऱ्हेच्या अडचणी स्वेच्छेनें सहन केल्यानें, माणसाची शारीरिक, मानासिक आणि आध्यात्मिक भूक प्रदीप्त होते आणि जीवनाचा आनंद सात्त्विक

आणि विशुद्ध होतो. विलासिता आणि कला यांचें वैर असल्यानें तितिक्षा-द्‌वाराच मनुष्याला रसास्वादाची शक्ति मिळवितां आणि टिकवितां येते. जो संयमी आहे, तोच कलारसिक होअूं शकतो.

धार्मिक लाभांत दुसरा अेक मोठा लाभ म्हणजे सत्पुरुषांचें दर्शन. तीर्थांचें माहात्म्य पाहून सत्पुरुष तेथें जाअून राहिल्याचीं अुदाहरणें थोडीं. सृष्टीची भव्यता पाहून किंवा अमुक प्रसंगाची पवित्रता देखून कोणी सत्पुरुष त्या ठिकाणीं जाअून राहतो आणि मग तें स्थान तीर्थ पदवीला पोंचतें. अनेक सत्पुरुषांनीं अेकाच स्थानाला दीर्घकाळ पसंत केलें अथवा अेकाद्या प्रभाव-शाली व्यक्तीनें अेकाद्या स्थानाचें माहात्म्य तयार केलें, कीं लगेच तें स्थान मोठें तीर्थ मानलें जाअूं लागतें. मग तेथें साधुसंत, तपस्वी आणि मुनी यांची जा—ये सुरू होते. प्रत्येक तीर्थाबरोबर जे कांहीं प्रसंग जोडलेले असतील, ते सर्व यात्रेकरूंच्या तोंडीं जिवंत राहिल्यानें, धर्मजीवन आणि धर्मरहस्य आनायासें अशा ठिकाणीं जागृत राहतें. मग अशीं स्थानें सहजच धार्मिक विचारांची देवघेव करणाऱ्या सम्मेलनासारखीं बनतात.

लोकांच्या धार्मिक वृत्तीमुळें ज्ञानसत्रें येथें अखंड चालावींत अशीं साधनें अुत्पन्न होतात; आणि मग धर्मविचारांची कसोटीहि तेथें चांगलीच होअूं लागते. अनेक लोकांचे विचार समोरासमोर अेकमेकांवर आदळूं लागले कीं त्यांतून अत्युच्च समन्वयाची दृष्टि विकसते.

मोठमोठ्या तीर्थांत मीं हे चारी लाभ पाहिले आहेत.

खरे यात्रेकरू साधारणपणें यात्रा चालू असतांना ब्रह्मचर्याचें पालन करतातच; आणि शक्य तेवढें खोटें बोलत नाहींत कीं कोणाला फसवीत नाहींत, हाहि अेक मोठा धार्मिक लाभच मानतां येअील. शुद्ध जीवनाचा आनंद अेक वेळ चाखला म्हणजे तेंच जीवन पुढें चालवावें हें बरें असें माणसाला वाटूं लागतें; आणि कित्येक वेळीं मनुष्य हा संकल्प दृढ धरून बसतो. धार्मिक समजुती, भावना, रिवाज आणि त्यांचें काव्य यांचा खजिना तर यात्रेमुळें माणसांत वाढतोच. अितकेंच नव्हे, तर या सर्वांमुळें विचार अधिकाधिक अुदार होत जातात. मद्रासी ब्राह्मण काश्मीरांत जातो आणि काश्मीरचा

पंडित महाराष्ट्रांत येतो, तेव्हां कट्ट्या धार्मिक म्हटल्या जाणाऱ्या लोकांमध्यें-सुद्धां किती फरक असतो हें पाहून कसल्याहि फेरफारासाठीं माणसाचें मन तयार होतें; आणि अशी चित्ताची अुदारता हेंच शिक्षणाचें सर्वांत मोठें फळ आहे.

शिक्षणाचीं मुख्य क्षेत्रें दोन. अेक मानसशास्त्र आणि दुसरें समाज-शास्त्र. दोन्ही बाजूंनीं माणूस जर दूरवर जाअू शकला तर तो खात्रीनें शिक्षित आहे. मनुष्य आंत अुतरून, अंतर्मुख होअून, स्वतःला तपासून, मानसशास्त्रांत बुडी मारतो; आणि आसपास निरीक्षण करून, दूरवरचा कार्यकारण भाव तपासून माणसासारखीं माणसें कशीं कशीं वागतात याचें निरीक्षण करून तो समाजशास्त्र तयार करतो. आंत अुतरून तो अंतर्यामीला ओळखूं शकतो; बाहेर सर्वत्र फिरून येअून त्याला विराट्पुरुषाचें आकलन करतां येतें. अंतर्यामीची ओळख म्हणजे अध्यात्मशास्त्र, विराट्पुरुषाचा परिचय म्हणजे सृष्टिशास्त्र. दोन्ही मिळून धर्मशास्त्र बनतें. त्याचें परिशीलन हेंच खरें शिक्षण.

प्रवासाचा सद्यःफलदायी लाभ म्हणजे सृष्टीच्या लीलेचें दर्शन होय. अुंच अुंच पर्वत, आणि खोल खोल दऱ्या, विस्तीर्ण नद्या आणि त्यांहूनहि विस्तीर्ण असे पुलिन, सर्वत्र अुगवलेले वृक्ष आणि त्यांच्या वर-खालीं आश्रय घेणारे पशुपक्षी, हें सगळें मोठें काव्य आहे. जेथें पहाड—पर्वत नाहींत आणि जमीन चहूं बाजूंस सरळ सपाट आहे, तेथें ऋतूप्रमाणें नवें नवें सौंदर्य पाहाव-यास मिळतें. कांहीं कांहीं वेळां पाण्याचें टीपूसहि नसतांना स्वच्छ पाण्याचे प्रवाह अुन्हांत धांवणाऱ्या मृगांना फसवून मारून टाकतात; पण म्हणून कांहीं मृगजळाची शोभा कमी होत नाहीं; आणि हवेंत खरोखर ओलावा असला कीं अेकादें अिंद्रधनुष्य अचूक आपला प्रभाव दाखवितेंच.

आणि जर समुद्राचें दर्शन झालें तर भरती-ओहोटीरूपी त्याचा श्वासो-च्छ्वास आपलें लक्ष वेधून घेतल्याखेरीज राहात नाहीं. आपल्या श्वासानें जर आपलें रक्त शुद्ध होतें, तर समुद्राच्या या भरती-ओहोटीनें कशाची बरें शुद्धि होत असेल, अशा तऱ्हेचे कल्पनातरंग अुठल्यावांचून कसे राहतील?

आणि समुद्रावरचे पतंग ( शिडाचीं जहाजें ) जेव्हां लाटांवर डोलूं लागतात, तेव्हां आतां या लाटांतून फुलें फुलतील अशी अुत्कंठा वाटूं लागते. समुद्रांत जसें लाटांमुळें पाण्याचें हृदय वर-खालीं होतें, तसें दृश्य सस्य–श्यामला धरित्रीवरहि केव्हां केव्हां दिसतें.

सूर्योदय आणि सूर्यास्त ही तर नित्यनूतन कवित्वाची अनंतता आहे. या अुभय संध्याकालांची शोभा देशपरत्वें बदलते, स्थानपरत्वें बदलते, ऋतुपरत्वें बदलते, क्षणोक्षणीं बदलते, आणि ढगांच्या लहरीप्रमाणेंहि बदलते.

आणि ढग ? ढग म्हणजे अनंत आकाशाचे चिरप्रवासी यात्रेकरू ! आकाश बदलावयाचें नाहीं आणि ढग क्षणभरहि स्थिर राहायचे नाहींत. या दोघांच्या कात्रींत सांपडलेल्या सूर्याला क्षणोक्षणीं नवी भूमिका धारण करावी लागते ! पृथ्वी–बहुरत्ना वसुंधरा–वाटेल तितकें वैभव दाखवो, तें कमीच आहे असें सिद्‍ध करण्यासाठींच या ढगांची नेहमीं धडपड चालू असते ! या ढगांशीं चढाओढ करण्याचें जर कोणाच्या मनांत येत असेल, तर तें हिमालयांतील बर्फाच्या ढिगांना; पण हिमालयाच्या पहाडापेक्षांहि मोठमोठे पहाड वाटेल त्या ठिकाणीं अुभे करून हे ढग हिमालयाचें, किंबहुना, पृथ्वीचें गर्वहरण करतात ! फरक अितकाच कीं पहाडावर लहान-मोठे असंख्य वृक्ष अुगवतात, तर ढगांवर ढगच अुगवतात !

प्रवासी कितीहि फिरत असला आणि विरक्त असला, तरी त्याला आपलें पोट बरोबर घेअून फिरावें लागतें. यामुळें दुपारीं भुकेची वेळ आली कीं, अतिथिशील झोंपडीचें काव्य त्याला सर्वांहून आकर्षक वाटतें. तशा तर खेड्यांतल्या झोंपड्या आकर्षक असतातच. झोंपड्या, जनावरांचे गोठे, शेतीच्या निरनिराळ्या क्रिया, विणकर, कुंभार, सोनार, सुतार, लोहार वगैरे कारागिरांचे पसरलेले धंदे, सर्वत्र वेगवेगळे आणि अेकत्र मिळून मोठें काव्य असतें.

नदीचें काव्य अेक प्रकारचें, तर तिच्यावरच्या पुलावरचें दुसऱ्याच प्रकारचें.

यात्राव्रत पत्करून भटकत भटकत मनुष्य निसर्गाची विविधरंगी लीला जशी पाहूं शकतो, तसें त्याला विविध लोकदर्शनहि होतें. प्रत्येक ठिकाणची

भाषा वेगळी, रिवाज वेगळे, घरांची बांधणी वेगळी, पोषाख वेगळे. अशा फरकांच्या पाठीमागें काय सोयी आहेत, कोणते आदर्श मानले गेले आहेत, त्यांचा जर तपास केला, तर माणसाला बहुमोल शिक्षण मिळाल्यावांचून राहाणार नाहीं; आणि जसजसा तो खोलांत शिरतो, तसतशी या विविधतेच्या मुळाशीं अेक सार्वभौम अेकता त्याला दिसूं लागते; आणि अेकच मनुष्यहृदय किती प्रकारें विकास पावतें हें पाहाण्यांतच विशेष आनंद असतो. लोकजीवन म्हणजे मनुष्यजातीच्या स्थूल बुद्धीची सूक्ष्मता. निसर्ग बदलला कीं माणसाला आपल्या संवयी बदलल्यावांचून सुटका नाहीं. मनुष्यानें विचार करण्याचें नाकारलें तरीहि रोजची अडचण त्याला कधीं ना कधीं थोडा थोडा विचार करायला प्रवृत्त करते, आणि जें कार्य बुद्धि करीत नाहीं, तें काळ करून देतो. अशा रीतीनें दीर्घ काळाच्या घोटाअीमुळें जें मनुष्यजीवन घडलेलें असतें, त्याची स्वाभाविक मोहकता नजरेंत भरल्यावांचून राहात नाहीं.

आणि लोकस्वभावांत हें सर्व यथार्थ रीत्या अुतरलेलें असल्यामुळें, त्यांत लोकांना अेक प्रकारचें स्वास्थ्यहि लाभतें. अेकाअेकी आलेली श्रीमंती जशी माणसाला बेढंगी वाटते, तशी ही संस्कृति नसते. त्यामुळें या साधेपणांत असाधारण गौरव असतो आणि लोकसंस्कृतीचे हे सर्व नवे नवे प्रकार त्यांच्या स्वाभाविक वातावरणांत जाअून ते तपासतांना मिळत असलेल्या शिक्षणाचें मूल्य कोण अजमावूं शकेल ?

आपल्या देशांत लिखाणांतून तितका अितिहास सांठविला गेलेला नाहीं, जितका तो आपल्या जीवनांत सांठविलेला आहे. त्यामुळें यात्रापर्यटनांत अितिहासदर्शनहि होतेंच. त्यांत आणखी हिमालयाचा प्रदेश तर भारतवर्षाचा प्रांतदेश आहे. येथें संस्कृतीच्या आणि क्रांतीच्या किती तरी लाटा येअून शमल्या असतील. कुरु-पांचालांच्या संस्कृतीपासून तहत कर्नल यंगहस्बंडच्या हल्ल्यानें त्रासून गेलेल्या तिबेटी लोकांच्या आजच्या संस्कृतीपर्यंत सर्व वस्तूंचे ठसे या ठिकाणीं अेकमात्रेंकरून पाहावयाला मिळतात. या बाजूकडे आपलें लक्ष वेधून भगिनी निवेदितानें हिंदु समाजावर मोठे अुपकार करून ठेवले आहेत.

भूरचनेच्या दृष्टीनें व भूस्तरशास्त्राच्या दृष्टीनेंसुद्धां हिमालयाच्या प्रवासा-मधून पुष्कळ ज्ञान मिळतें. हिमालय आडवा नसता तर रशिया आणि चीन-कडील थंड वारे व तिकडील विचित्र संस्कृती या दोन्हींचा आपल्यावर हल्ला झाला असता. गंगानदी नसती तर जशी आपली समृद्धि झाली नसती, तशीच हिमालय नसता तर हिमालयाअेवढी अुत्तुंग आर्य संस्कृतीसुद्धां येथें विकसली नसती.

देशाचा आत्मा आणि देशाचें विराट स्वरूप, अुभयांचें अेकसमयावच्छेदेंकरून दर्शन घ्यावयाचें असेल, तर यात्रा हीच अेक अमोघ साधना आहे.

---

## ह्या पुस्तकांत आलेल्या कठीण शब्दांचा आणि वाक्यांचा

# अर्थ आणि संदर्भ

[ ही टिप्पणी तयार करतांना गुजरात विद्यापीठांतील अेक अध्यापक श्री. नगीनदासभाई पारेख यांनीं परिश्रमपूर्वक तयार केलेल्या याच पुस्तकाच्या गुजराती टिप्पणी–पुस्तिकेची जशी बहुमोल मदत झाली आहे, तसाच खुद्द श्री. काकासाहेबांचाहि हातभार या कामाला लागला आहे. त्यामुळें या टिप्पणीमधून वाचकांना माहिती आणि ज्ञानसंग्रह करून घेतां येण्याजोगा आहे.
—अनुवादक ]

## जीवनाचों ताजगी

पृष्ठ ७. **निसर्गानें ... ... केली** : फुलपांखरें या झाडावरून त्या झाडावर बागडत असतां फुलांतील पूंकेसर आणि स्त्रीकेसर त्यांच्या पायांना चिकटतात; अशा केसरांचा परस्पर संयोग झाला म्हणजे वनस्पतिसृष्टि फळते.

पृष्ठ ७. **मनुष्याची अुत्क्रांति** : काकासाहेब म्हणतात : मनुष्याचें अगदीं प्रारंभीचें जीवन पशूहून आणि वानराहून वेगळें नसणार. गुहेच्या आश्रयास राहावें, कंदमुळें, फळें ओरबडून खावीं, शिकार करून कच्चें मांस खावें आणि निसर्गाचा कोप झाला म्हणजे पटापट मरून जावें, अशी प्राथमिक स्थिति असली पाहिजे. पुढें पाण्यावरून जाण्यासाठीं ताफे बांधावे, जमिनीवरून धांवण्यासाठीं गाढवा-घोड्यांचा अुपयोग करावा, खाण्यासाठीं पशुपक्ष्यांचे आणि माशांचे कळप पाळावे, हें त्याला सुचलें असलें पाहिजे. यानंतरचा काळ म्हणजे तऱ्हतऱ्हेचीं हत्यारें वापरून अुपकरणें तयार करावीं, जमीन नांगरून धान्य तयार करावें, पाणी आणि अग्नि यांच्या मदतीनें तें शिजवावें, गुरांच्या दुधापासून पौष्टिक आहार मिळवावा; प्रथम कांतडी, नंतर लोंकरी, आणि शेवटीं रेशमी वा सुती कपडे वापरण्याचें मनुष्याला सुचलें असलें पाहिजे. गुहांच्या अैवजीं झोंपड्या आणि महाल आले;

आणि भटकणाऱ्या टोळ्या स्थावर होऊन त्यांच्या जमाती, जाती आणि वंश स्थापले जाऊन सामाजिक जीवन समृद्ध आणि जटिल झालें असलें पाहिजे.

पृष्ठ ९. **वाणिज्य वीरांच्या कथा** : बौद्धांच्या जातक कथा, पंचतंत्र, कथासरित्सागर अित्यादि साहित्यांत वणिक् लोकांच्या गोष्टी पावलोपावलीं येतात. जैन लोकांच्या धर्मग्रंथांत आणि कथावाङ्मयांत देखील देशाटनाच्या गोष्टी वाचावयास मिळतात.

पृष्ठ १०. **प्राचीन काळीं ...... पश्चिमेकडे जात** : अुत्तर-ध्रुवाकडे जेव्हां बर्फयुग माजलें तेव्हां तेथील आपले पूर्वज जीव वांचविण्या-साठीं अून कोठें मिळेल हें शोधूं लागले असले पाहिजेत आणि हळूहळू सूर्योदयाच्या किंवा सूर्यास्ताच्या रोखानें फिरत्या गतीनें दक्षिणेकडे पसरले असले पाहिजेत.

पृष्ठ १०. **प्लिनी आणि पेरिप्लस** : अि. स. ४५ च्या आसपास 'पेरिप्लस ऑफ् धि अेरिथ्रिअन् सी' ( अरबी समुद्राचें पंचांग ) या नांवाचा ग्रंथ लिहिला गेला. त्यामध्यें आफ्रिकेचा पूर्व किनारा, हिंदुस्थानचे पश्चिम आणि पूर्व हे दोन्ही किनारे आणि दूर ब्रह्मदेशापर्यंतचा सगळा किनारा यांसकट तेथील बंदरांचीं, त्यांमधील अंतरांचीं आणि कांहीं शहरांचीं अगदीं थोडक्यांत वर्णनें दिलेलीं आहेत. स्वदेशीचा पुरस्कर्ता ग्रीक अितिहासकार प्लिनी यानें हा ग्रंथ लिहिला असावा असें मानण्यांत येतें.

पृष्ठ ११. **समुद्रयात्रेचा निषेध** : 'जे जाय जावा ते पाछा नहीं अवा' अेका गुजराती म्हणीचा हा पूर्वार्ध काय सुचवितो ?

पृष्ठ १४. **विश्वजनीन** : ( Universal ) सर्व प्रकारच्या जनांमध्यें ( लोकांत ) ज्यांचा व्यवहार अबाधित आहे अशा ( क्रिया ).

पृष्ठ १५. **मध्ययुगीन भारतवर्षाचें दर्शन** : मध्ययुगामध्यें राजा-प्रजेचा संबंध पितापुत्रांप्रमाणें मानला जात असे, आणि राजाचें राज्य सरंजामी सरदारांच्या मार्फत टिकविलें जात असे. या राजांची आणि सरदारांची खानदानी हेंच काय ते प्रजेचे हक्क त्या काळीं असत.

पृष्ठ १६. **हिमालय...साऱ्या विश्वाची समृद्धि वाढवितो** : काका-साहेब लिहितात : हिमालय नसता तर आर्यावर्ताची संस्कृति कांहीं निराळीच

झाली असती. हिंदी महासागराचें पाणी अुचलून अुत्तरेकडे धांवणाऱ्या ढगांना तो अडवितो, आणि त्यांचेकडील पाण्याचा प्रत्येक थेंब खालीं खेंचून घेअून हिंदुस्थानाला देतो. हिमालयाच्या दक्षिणेकडील अुताराचें पाणी तर हिंदुस्थानाला मिळतेंच, पण अुत्तरेकडील अुताराचें पाणीदेखील काळजीपूर्वक गोळा करून हिंदुस्थानाला आणून पोंचविण्याचें काम ब्रह्मपुत्रा, सिंधु, सतलज, घोग्रा म्हणजेच शरयु या नद्या करीत असतात. त्यांतल्या त्यांत सिंधु आणि ब्रह्मपुत्रा प्रौढ असल्यानें पित्याला आदरपूर्वक वळसा घालून आपलें काम करतात. त्यांच्या मानानें सतलज आणि घोग्रा कालच्या पोरी. त्या हिमालयाच्या टेकड्यांतूनच आरपार वाट काढून अुत्तरेकडील पाणी सरळ हिंदुस्थानांत घेअून येतात.

हिमालय आहे म्हणून अुत्तर ध्रुवाकडील थंड वारे हिंदुस्थानावर येअून तेथील प्रदेश वैराण करूं शकत नाहींत. हिमालयाच्या जंगलांतील सगळा पाचोळा खताच्या रूपानें पार्वती नद्या खेंचून आणून हिंदुस्थानच्या शेतांना समृद्ध करतात. हिमालय आहे म्हणूनच आपल्याकडील वनस्पतिसृष्टि, प्राणिसृष्टि आणि मानवी संस्कृति अितक्या समृद्ध झाल्या आहेत.

## अङ्गान् वङ्गान् कलिङ्गान्

हे पाहा स्वर्गप्राप्तीचे लोभी किती तरी धन्य महाराष्ट्री यात्रेकरू कसे अंग, वंग, कलिंग, मगध, कुरु, कोसल, केकय, काश्मीर, कुंतल, यवन, जनपद, पांचाल, नेपाल, केरल, पांड्य, तुंडीर, चोल, करनाट, गौड, लाट अित्यादि अनेक देशांत भटकत आहेत. ज्यांना जीवनाचें सार कळतें, त्यांनीं यांच्या संबंधानें आदरच बाळगला पाहिजे. कारण गंगा आदि पुण्यपावन नद्यांचें स्नान घडल्यामुळें त्यांचे देह पवित्र झाले आहेत. अनेक क्षेत्रयात्रा त्यांना घडल्या आहेत, आणि घरांदारांविषयीं, स्त्री-पुत्राविषयीं ते मनांत वैराग्य बाळगून आहेत.

"विश्व गुणादर्श चम्पू", श्लोक २४६ आणि २५२

## प्रकरण १ : संकल्प

पृष्ठ ४. **गच्छति......चेतः** शरीर पुढें चालत आहे आणि नाखूष असें मन मागेंच धांवत आहे. [ शाकुंतल : अंक १ ला ]

पृष्ठ ४. **दरबारांत......मोकळा झाला** : याचा अर्थ समजण्यासाठीं काकासाहेबांच्या अेका खासगी पत्रांतील पुढील अुतारा अुपयोगी पडेल :

" बडोद्यास ' श्री गंगनाथ भारतीय सर्व विद्यालय ' नांवाची अेक राष्ट्रीय शाळा होती. कै. श्री. केशवराव देशपांडे हे त्या शाळेचे संस्थापक आणि संचालक होते. या संस्थेंत शेवटचीं दोन वर्षें मी मुख्य अध्यापक होतों. श्री. केशवराव देशपांडे आणि श्री अरविंद घोष परम मित्र. दोघांनीं मिळून राष्ट्रोद्धाराच्या अुद्देशानें ' भवानी मंदिर ' नांवाची संस्था स्थापन करण्याचें योजिलें होतें. क्रांतिवादी चळवळ या योजनेंतूनच हिंदुस्थानांत अुत्पन्न झाली अशा संशयानें ब्रिटिश सरकारनें अरविंद घोषांबरोबर केशवरावांना पकडण्याचा आणि गंगनाथ विद्यालय मोडण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण बडोद्याच्या श्री सयाजीरावांनीं ब्रिटिश सरकारला त्या वेळीं आपल्या राज्यांत ढवळाढवळ करूं दिली नाहीं. पुढें दिल्ली दरबारच्या वेळीं सयाजीरावांना नमविण्याचा जणुं कटच रचला गेला होता. बादशहाला दरबारांत सलामी द्यायच्या वेळीं सयाजीरावांनीं कंबर भरपूर वांकविली नाहीं आणि बादशहाकडे पाठ न फिरवितां आणि खेकड्याप्रमाणें पाअूल मागें मागें टाकीत जाण्याचा नियम मोडून माणसाप्रमाणें पाठ फिरवून ते आपल्या जागीं गेले; हा ' महान् अपराध ' पुढें करून सरकारनें त्यांना पुष्कळ छळलें आणि चहूं बाजूंनीं राजद्रोहाची ओरड करून त्यांना राज्यकारभारांत अनेक फेरफार करण्याला भाग पाडलें. याच प्रकरणीं केशवरावांना अमरेली प्रांताचें अधिकारीपद सोडून द्यावें लागलें आणि गंगनाथ विद्यालय बंद करावें लागलें...हिमालयांत जाअून ध्यानधारणा करण्याची मला पुष्कळ वर्षांपासून तळमळ लागून राहिली होती. पण मी कर्तव्यबद्ध असल्यामुळें विद्यालय सोडून जाण्याचा विचारहि मनांत आणणें शक्य नव्हतें. पण सयाजीरावांची कंबर वांकली नाहीं म्हणून सरकारनें त्यांचा तेजोवध केला, त्यामुळें ब्रिटिशांना ढवळाढवळ करणें शक्य झालें, गंगनाथ विद्यालय मोडलें, माझ्या जहाजाचा नांगर ओढला गेला आणि मग दीड-दोन वर्षांपासून शिडांत भरलेला वारा त्याला सरळ हिमालयांत घेऊन गेला."

पृष्ठ ४. When I am free : मी स्वतंत्र होओीन तेव्हां किती किती आनंदांत राहीन! डहाळीवर झुलणाऱ्या फुलांच्या बहाराखालीं मी आतां खूप खूप मजेनें काळ घालवीन. [ पहिली ओळ सोडून बाकीच्या ओळी शेक्स्पीअरच्या 'टेम्पेस्ट' नाटकामधील आहेत. ]

पृष्ठ ४. **येअूं का तुजसंगे राहण्या तिथें** : नारायण वामन टिळक यांच्या 'सखि स्वतंत्रते !' या कवितेंतील ओळ. येथील संदर्भावरून 'तिथें' म्हणजे स्वातंत्र्यधाम हिमालयांत.

## प्रकरण २ : प्रयागराज

पृष्ठ ६. **पुंडलिकाचें पुण्यक्षेत्र** : पंढरपूर. [ "पंढरीच्या वाटे, चाभळीचे कांटे, सखा विठ्ठल भेटे पांडुरंग" ]

पृष्ठ ६. **परशुरामापासून.........होतें** : ब्राह्मणाखेरीज दुसऱ्या कोणालाहि आपली अस्त्रविद्या द्यायची नाहीं अशी परशुरामाची प्रतिज्ञा होती. तेव्हां आपण ब्राह्मण आहोंत, असें खोटें सांगून त्याच्यापाशीं अस्त्रविद्या शिकण्यासाठीं कर्ण राहिला होता. या ठिकाणींहि आअीचा लेखकाशीं खरा परिचय नव्हता.

पृष्ठ ७. **स्वर्धुनी** : स्वर्गंगा, आकाशगंगा.

पृष्ठ ७. **ब्रह्मावर्त** : कुरुक्षेत्राजवळील दृषद्वती आणि सरस्वती या दोन नद्यांमधील विठूरच्या आसपासचा प्रदेश.

पृष्ठ ७. **हिंदु... ... सम्राट् अकबर** : अकबर बादशहानें हिंदू राजांशीं सोयरिका केल्या, हिंदु आणि मुसलमान धर्मांचें सार काढून 'दीने अिलाही' नांवाचा नवा धर्मंहि सुरू केला, याचें या ठिकाणीं सूचन आहे.

पृष्ठ ८. **अघोर साधना** : अघोर पंथ नांवाचा शिवभक्तांचा अेक विशिष्ट संप्रदाय आहे. हे लोक अतिशय घाणेरडे असतात. यत्किंचित्हि घृणा न बाळगतां हे लोक म्हणे मांस आणि सडलेलें प्रेत—अितकेंच काय, मलमूत्रसुद्धां खातात. कधीं अंग धूत नाहींत कीं तोंड स्वच्छ करीत नाहींत. मद्यपानासाठीं करवंटी किंवा डोक्याची कवटी ठेवतात. सापाच्या आणि अितर प्राण्यांच्या हाडांची माळ गळ्यांत घालतात. या संप्रदायाचें मूलस्थान बडोदा संस्थानांत आहे म्हणतात. तेथें अघोरेश्वर मठांत अघोर

स्वामी राहात असत. हा संप्रदाय फार प्राचीन आहे. या पंथाचे लोक अबू, काठेवाड आणि बंगाल या भागांत हल्लींहि आढळतात. मार्को, पोलो, प्लिनी, ॲरिस्टाट्ल अित्यादींच्या ग्रंथांतहि या पंथाचा अुल्लेख आढळतो.

पृष्ठ ८. **कुंभ मेळा** : गुरु आणि सूर्य मकर राशींत असतील आणि रविवारीं जर पूर्णिमा आंली तर प्रयाग आणि हरद्वार येथें कुंभयोग मानला जातो. गुरु आणि सूर्य सिंह राशींत अेकत्र आले आणि गुरुवारीं पूर्णिमा आली तर गोदावरीच्या तीरावर, गुरु–सूर्य मेष राशींत अेकत्र आले आणि सोमवारीं वद्य अष्टमी आली तर कावेरीच्या कांठीं, आणि श्रावणमासीं गुरु किंवा सोमवारीं अमावास्या आली तर कृष्णा नदीच्या कांठीं कुंभयोग मानतात.

कुंभ मेळ्याची अुत्पत्तिकथा पुराणांत पुढीलप्रमाणें सांगितली आहे : देवांनीं आणि दानवांनीं मिळून समुद्रमंथन केलें; तेव्हां शेवटीं त्यांतून अमृताचा कुंभ घेऊन धन्वंतरी बाहेर आला. देवांची दृष्टि त्या कुंभावर पडतांच त्यांनीं इंद्रपुत्र जयंताला खूण केली आणि तो अेकदम कुंभ घेअून पळाला. अितक्यांत दैत्यगुरु शुक्राचार्यांनीं दानवांना सावध केलें, तेव्हां ते जयंताच्या मागें लागले. जयंत वाट सांपडेल तिकडे पळत सुटला. बारा दिवस आणि बारा रात्री ही पळापळ आणि ओढाताण चालली, आणि शेवटीं दैत्यांनीं कुंभ घेतला. पण दैत्य सनळेच अमृत पिण्यासाठीं गडबड करूं लागले आणि शेवटीं झगडा अुत्पन्न झाला. अितक्यांत श्रीविष्णु मोहिनी स्वरूप घेअून आले आणि त्यांनीं सर्वांना अमृत वांटून देण्याच्या मिषानें कुंभ आपल्या हातीं घेअून सगळें अमृत देवांना पाजलें. अमृत-कुंभासाठीं देव-दानवांच्या बारा दिवस आणि बारा रात्री चाललेल्या लढाअींत ज्या ज्या ठिकाणीं कुंभ पडला होता त्या त्या जागा पवित्र समजल्या गेल्या आहेत. आणि तेथें तेथें कुंभपर्व भरतें. या युद्धकालांत चंद्रानें अमृत गळूं दिलें नाहीं, सूर्यानें कुंभ फुटूं दिला नाहीं, कुंभ दानवांच्या हातीं गेला तेव्हां बृहस्पतीनें त्याचें रक्षण केलें, आणि जोंवर कुंभ जयंताच्या हातीं होता तोंवर शनीनें त्याचें रक्षण केलें. म्हणून ज्या ज्या स्थानीं हा कुंभ पडला त्या त्या स्थानीं जेव्हां सूर्य, चंद्र आणि बृहस्पति अेका रेषेंत येतात तेव्हां कुंभयोग आला म्हणतात.

पृष्ठ ९. **प्रमाण** : ‘ आधार ’ या अर्थी मीमांसाशास्त्रांतील पारिभाषिक शब्द.

पृष्ठ ९. **प्रत्यक्ष** : अिंद्रियजन्य.

पृष्ठ ९. **अनुमान** : हेतुद्वारा किंवा तर्कद्वारा अेकाद्या वस्तूचा अनुभव किंवा निर्णय करणें.

पृष्ठ ९. **शाब्द** : शब्दानें अुत्पन्न झालेलें. ( विश्वासपात्र माणसाचें वचन. आप्तवाक्यं प्रमाणम् । )

पृष्ठ ९. **अुपमान** : समानधर्माचें कथन.

पृष्ठ १०. **आत्मन्येवच ... ... विद्यते** : ‘ आत्म्यामध्येंचि संतुष्ट याचें कर्तव्य संपलें ’ ( गी. अ. ३।१७ ).

## प्रकरण ३ : अमरपुरी वाराणसी

पृष्ठ ११. **चरम** : आत्यंतिक, शेवटचें.

पृष्ठ ११. **तरी पण काशीसारख्या ... ... आला नाहीं** : काकासाहेब लिहितात : “ माझ्या लेखांत अैतिहासिक व वैज्ञानिक सत्य सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न असतो. पण आदर्शवाद व कल्पनाविहार चालला म्हणजे पाया भरपूर आहे किंवा नाहीं याचें भान राहात नाहीं व मग The wish is father to the thought असें होतें ! औरंगजेबानें बांधलेली ही मशीद मोडण्याचा प्रयत्न हिंदूंनीं केला नाहीं असें या ठिकाणीं जें सूचित केलें आहे तें अितिहाससिद्ध नाहीं असें मागाहून समजलें. पेशव्यांनीं काशीच्या नबाबावर स्वारी करून औरंगजेबाची मशीद पाडून त्या ठिकाणीं विश्वनाथाचें देअूळ पुनः बांधण्याचा मनसुबा केला होता; पण काशीचे ब्राह्मण अुघड्याबोडक्यानें पेशव्यांकडे आले आणि रडून, जाजावून त्यांनीं त्यांची अशी समजूत घातली कीं, ‘ काशी तुम्ही जिंकाल पण त्याच्या अगोदर आमची कत्तल होअील आणि तुम्हांला ब्रह्महत्येचें पातक लागेल; कोणी देअूळ बांधीत असेल तर त्याला नको म्हणणें पाप आहे, तें पाप आम्हांला लागूं नये म्हणून तुम्ही दुसरीकडे एक देअूळ बांधा; आम्ही तेथें येअूं. ’ अशा लोकांपुढें पेशवे हरले आणि गुप्त वेषानें काशींत जाअून गंगास्नान करून

गुपचूप परत आले. अशा रीतीनें काशीकर ब्राह्मणांच्या नामर्दपणाची निशाणी म्हणून ही मशीद आज त्या ठिकाणीं आहे, ही हकीगत नंतर वाचली व त्यामुळें अेक आधार तुटला. तरी पण सामान्यपणें सात्त्विक हिंदु वृत्तीचें खरें चित्र पुस्तकांत दिलें आहे तेंच बरोबर आहे, म्हणून तेथें न बदलतां टीपेमध्यें सत्य हकीगतीला अवकाश दिला आहे. ''

पृष्ठ ११. **कानपूरची विहीर** : १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं नानासाहेबांच्या फौजेंतील लोकांनीं अिंग्रजांची कत्तल करून त्यांना अेका विहिरींत टाकून दिलें होतें असें म्हणतात. ही विहीर अिंग्रजांनीं अजून तशीच ठेवली आहे आणि तिच्यावर या अत्याचाराची हकीगत लिहून ठेवली आहे.

पृष्ठ ११. **दिल्ली शहरासमोरील सेनापतीचें बाहुलें** : ब्रिगेडिअर जनरल जॉन निकल्सन. १८५७ च्या बंडाच्या वेळीं अिंग्रजांनीं दिल्ली पुनः ताब्यांत घेण्यासाठीं जेव्हां १४ सप्टेंबर १८५७ रोजीं हल्ला केला, त्या वेळीं यानें खूप शौर्य दाखविलें होतें. याच लढाअींत त्याला प्राणघातक जखम झाली; पण २० तारखेला अिंग्रजांनीं दिल्लीचा पुरा ताबा घेतल्या-नंतर २३ तारखेला याचें देहावसान झालें. दिल्ली येथें त्याचा पुतळा आहे आणि त्याच्या आसपास त्याच्या नांवाची बागहि आहे.

पृष्ठ १२. **हाअुस अेजंट** : घर-दलाल. मोठ्या शहरांत घर भाड्यानें किंवा विकत घ्यायचें असेल तर या घर-दलालांच्या मार्फत तो व्यवहार करणें सोपें जातें.

पृष्ठ १२. **टॉमस कुक्** : जलप्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुख-सोयींची व्यवस्था करणारी अेक प्रख्यात कंपनी.

पृष्ठ १२. **शिपिंग अेजंट** : बोटीनें देशान्तराचा प्रवास करायचा असेल तर हे दलाल अुपयोगी पडतात. तिकिट घेणें, सामानाची व्यवस्था करणें, वाटेंतील मुक्कामावर हॉटेलची सोय पाहाणें, प्रेक्षणीय स्थळें दाखविणें हीं कामें हे दलाल करून देतात.

पृष्ठ १३. **ट्रॅव्हेलर्स गाअीड** : प्रवाशांचे वाटाडे.

पृष्ठ १४. **तुरग प्रवासी** : घोड्याप्रमाणें शीघ्र गतीनें फिरणारे प्रवासी.

पृष्ठ १५. **पूर्वमीमांसा** : जैमिनी ऋषींनीं रचलेल्या दर्शनशास्त्राला ‘ पूर्वमीमांसा ’ म्हणतात. यांत यज्ञयाग अित्यादि कर्मकांडाचें प्रतिपादन आहे.

पृष्ठ १५. **वेदान्ती** : अुत्तरमीमांसा म्हणजे वेदान्तदर्शन मानणारे.

पृष्ठ १५. **गादाधरी** : न्यायशास्त्राचा प्रख्यात ग्रंथ.

पृष्ठ १५. **दशग्रंथ** : ऋक्, यजुस्, साम आणि अथर्व हे चार वेद, आणि शिक्षा ( स्वरोच्चारासंबंधीं ), छंद, व्याकरण, निरुक्त ( व्युत्पत्ति आणि अर्थ यासंबंधीं ), ज्योतिष आणि कल्प ( सूत्रें ) हीं सहा वेदांगें मिळून दहा ग्रंथ होतात.

पृष्ठ १५. **कबीरांनीं ... ... विणली होती** : कारण कबीर हे मोमीन होते.

पृष्ठ १६. **स्थापत्य** : घरें बांधण्याचें शास्त्र.

पृष्ठ १६. **शिल्प** : कारागिरी.

## प्रकरण ४ : गयेचें श्राद्ध

पृष्ठ १९. **सीतेचा शाप** : कीं सिकते ( वाळू ) चा शाप ?

## प्रकरण ४ अ : गयेची ख्याति

पृष्ठ २७. **लोकानां रक्षणार्थाय ... हेतवे** : लोकांच्या रक्षणासाठीं आणि जगताच्या मुक्तीकरितां.

## प्रकरण ५ : बोधिगया

पृष्ठ २८. **मार** : बौद्धधर्मांत कल्पिलेली आसुरी संपत्तीची अधिष्ठात्री व्यक्ति.

पृष्ठ २८. **भगवान् नचिकेता** : ( कठोपनिषत्–कथा ) वाजश्रवा मुनीचा हा मुलगा. पित्याच्या कल्याणाकरितां तो यमाच्या घरीं ( मृत्यूच्या दारीं ) गेला होता. तीन दिवस तो यमाच्या दारीं अुभा होता. शेवटीं यमाला ही बातमी समजतांच तो धांवत आला आणि त्यानें नचिकेताला वरदान दिलें. तेव्हां नचिकेतानें यमाकडून ब्रह्मज्ञानाची मागणी केली आणि यमानें नाना तऱ्हेचीं प्रलोभनें दाखविलीं तरी त्यांना वश न होतां शेवटीं त्यानें ज्ञान प्राप्त करून घेतलें.

## प्रकरण ६ : बेलूर मठ

पृष्ठ ३०. **खुदीराम बोस :** मुजफरपुरांत पहिला बॉंब टाकणारा बंगाली तरुण.

पृष्ठ ३०. **कन्हैयालाल दत्त :** आपल्या टोळींतून फुटलेल्या व माफीचा साक्षीदार झालेल्या नरेन्द्र गोस्वामीचा जेलच्या अिस्पितळांत खून करून फांशीला जाणारा बंगालमधील क्रांतिकारक तरुण. खुदीरामाचा साथीदार.

पृष्ठ ३०. **आनंदमठ :** बंकिमचन्द्रांची विख्यात कादंबरी. या कादंबरींतच प्रसिद्ध ' वन्दे मातरम् ' गीत आहे.

पृष्ठ ३४. **प्रायो गच्छति...... आपदाः :** भाग्यरहित जेथें जाअी तेथ जाती आपदा !

पृष्ठ ३५. **आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः :** शुद्ध आहारानें चित्त शुद्ध होतें. ( छांदोग्य : ७–२६–२ )

## प्रकरण ७ : भक्तीच्या पुण्यक्षेत्रांत

पृष्ठ ३८. **गौरांगप्रभु श्रीचैतन्य :** श्रीकृष्ण चैतन्य. ' श्रीगौरांगप्रभु ' या नांवानें प्रसिद्ध झालेले बंगालमधील भक्त. यांचा प्रेमभक्तिप्रधान संप्रदाय आजहि बंगाल, वृंदावन, गुजरात वगैरे प्रांतांत चालत आहे.

पृष्ठ ३८. **नेडानेडी :** बंगाली भाषेंत ' नेडी ' म्हणजे बोडका असा अर्थ होतो. या साधूंनीं डोक्याचें मुंडन केलें असल्यामुळें त्यांना ' नेडानेडी ' म्हणतात.

पृष्ठ ४१. **सिद्ध व निषिद्ध :** जी गोष्ट करण्याची शास्त्रांत सूट दिली असेल ती सिद्ध आणि याविरुद्ध ती निषिद्ध.

पृष्ठ ४१. **अयि भुवन मनमोहिनी :** श्रीरवीन्द्रनाथ ठाकुर यांचें प्रसिद्ध राष्ट्रगीत.

## प्रकरण ८ : रामाचा राजधाना

पृष्ठ ४२. **संन्याशांचीं दहा नांवें :** तीर्थ, आश्रम, वन, अरण्य, गिरी पर्वत, सागर, सरस्वती, भारती आणि पुरी.

पृष्ठ ४२. **चार मठ** : दक्षिणेकडे शृंगागिरीमध्यें शृंगगिरी किंवा शृंगेरी, पश्चिमेकडे द्वारकेंत शारदा, पूर्वेकडे श्रीक्षेत्र पुरी येथें गोवर्धन आणि अुत्तरेकडे बदरिकाश्रमांत ज्योतिर्मठ.

पृष्ठ ४२. **ब्रह्मचार्‍यांचे चार प्रकार** : अुत्तरेचे आनंद, दक्षिणेकडचे चैतन्य, पूर्वेकडील प्रकाश, पश्चिमेकडचे स्वरूप.

पृष्ठ ४४. **पुरातत्त्वखातें** : पुरातन वस्तूंचा शोध करणारें खातें.

पृष्ठ ४७. **श्रीसहजानन्द स्वामी** : अयोध्येजवळील छपया नांवाच्या गांवीं जन्मलेले आणि मागाहून गुजरात–काठेवाडमध्यें येअून राहिलेले सहजानंद स्वामी हे रामानंद ( कबीराचे आणि ज्ञानेश्वरपिता विठ्ठलपंतांचे गुरु ) यांचे शिष्य होते आणि गुरूंच्या अवसानानंतर त्यांच्या गादीवर ते आले होते. मागाहून त्यांनीं आपला स्वतंत्र पंथ स्थापन केला.

पृष्ठ ४७. **स्वामीनारायण संप्रदाय** : सहजानंद स्वामींनीं स्थापिलेला संप्रदाय. या संप्रदायाचा प्रधान देव श्रीकृष्ण आहे. वल्लभसंप्रदायाची पूजापद्धति कायम ठेवून त्यांत कित्येक सुधारणा त्यांनीं केल्या आहेत. स्त्री–पुरुषांची दर्शनाची जागा वेगवेगळी असते. स्त्रियांना अुपदेशहि गुरु-पत्नी करते. स्त्रियांनीं गुरूच्या चरणाला स्पर्श करणेंसुद्धां या संप्रदायांत नाहीं. या संप्रदायांतील साधूंत ब्रह्मचारी, साधु आणि पाळा असे तीन वर्ग आहेत. सर्वांनीं ब्रह्मचर्य पाळावयाचें असतें. दोघा-दोघांनीं जोडी-जोडीनें फिरलें पाहिजे असा नियम आहे. वडताळ येथें यांचें मुख्य देअूळ आहे. अहमदाबाद येथेंहि या संप्रदायाचें मोठें देअूळ आहे. ‘ शिक्षापत्री ’ हा यांचा मुख्य ग्रंथ आहे आणि प्रत्येक शिक्षित माणसानें त्याचा नित्य-पाठ केलाच पाहिजे असा नियम आहे. गुजरातेंतील पाटीदार, कोळी वगैरे लोकांत याचा विशेष प्रचार आहे. आचारशुद्धीवर या संप्रदायाचा विशेष भर आहे.

## प्रकरण ९ : आल्मोड्याकडे

पृष्ठ ४८. **वृद्ध टॉल्स्टॉय ...... बरे !** : कौंट टॉल्स्टॉय हे रशियांतील अेक मोठे तत्वज्ञानी आणि साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. आपले विचार आचारांत अुतरविण्याचे त्यांचे नेहमीं प्रयत्न चालत. या

प्रयत्नांत त्यांच्या पत्नीकडून वारंवार अडथळा येअी. शेवटीं अुत्तरवयांत कंटाळून जाअून ते गुप्त रीतीनें घर सोडून चालते झाले आणि थोड्याच काळांत त्यांचें देहावसान झालें.

पृष्ठ ४९. **डार्विनचा जीवनकलह-सिद्धान्त** : चार्ल्स रॉबर्ट डार्विन (१८०९-८२). विद्यार्थिदशेपासूनच याला प्राणिशास्त्राची आणि वनस्पति-शास्त्राची आवड होती. शिक्षण पूर्ण होतांच तो 'बीगल' जहाजाबरोबर दक्षिण अमेरिकेंत आणि प्रशान्त महासागरांत संशोधन करण्यासाठीं गेला. या प्रवासांत त्याला प्राण्यांचें आणि जंगली लोकांचें जें निरीक्षण करावयास मिळालें त्यासंबंधीं त्यानें दोन ग्रंथ लिहिले. अेका ग्रंथांत प्रवासवर्णन आणि पाहिलेल्या प्राण्यांच्याविषयीं माहिती दुसऱ्यांत दिली. यानंतर त्यानें आपल्या जीवनकलहाच्या सिद्धान्ताचें प्रतिपादन केलें. त्यामुळें शास्त्रज्ञांत मोठी खळबळ अुडाली.

डार्विनचा सिद्धान्त असा आहे कीं, वनस्पति आणि प्राणी यांची प्रत्येक जात स्वतःला पोसतां येअील त्याहून अधिक संततीला जन्म देते आणि जगण्याला पुरेशा साधनांच्या अभावीं या संततीमध्यें परस्परांत जगण्यासाठीं कलह माजतो. यांत अितरांपेक्षां जे अधिक बलवान् असतात आणि निसर्गाच्या कठोरतेशीं व विषम परिस्थितीशीं झगडून टिकण्याची शक्ति ज्यांच्यांत अधिक असते ते टिकतात. याप्रमाणें टिकलेल्यांच्या संततीलाहि पुनः जीवनकलह करावा लागतो. आणि त्यांतून जे अधिक लायक असतात ते टिकतात. कालान्तरानें मूळ प्राण्याच्या शरीररचनेंत, बुद्धि-शक्तींत वगैरे अितकें रूपान्तर होतें कीं, तो अेक नवीन प्रकारचाच प्राणी बनतो. अशा रीतीनें अेका योनींतून अनेक योनींचा अुद्भव होतो. या नियमांना Natural Selection, Struggle for existence आणि Survival of the fittest अशीं नांवें डार्विननें दिलीं आहेत.

पृष्ठ ४९. **प्रिन्स क्रोपोट्किन्** : रशियांतील अेका अुमरावाच्या कुळांत यांचा जन्म झाला होता. हे अत्यंत प्रखर विद्वान् असून भूस्तर-विद्या, संगीत, कला, समाजशास्त्र, तत्वज्ञान वगैरे विषयांचे खोल अभ्यासी होते आणि यांना सत्तावीस भाषा अवगत होत्या. यांखेरीज मजूरवर्गांत

क्रांतीचा प्रसार करण्यासाठीं शेतकरी आणि कामकरी यांच्या स्थितीचा खोल अभ्यास करून ते छोटीं छोटीं पत्रकेंहि गुप्तपणें लिहीत असत. त्यांना तीन-चार देशांतील तुरुंगांचा अनुभव होता. आपल्या आयुष्याचीं शेवटचीं वर्षे त्यांनीं अिंग्लंडांत काढलीं; आणि त्या काळांत अनेक अभ्यासपूर्वक ग्रंथ लिहिले. डार्विनच्या सिद्धान्तांना विरोध करून शास्त्रीय शोधांच्या द्वारा त्यांनींहि असें सिद्ध केलें आहे कीं, प्राणि किंवा जाती टिकतात त्या अेकमेकांना मारण्याच्या वृत्तीमुळें नसून परस्परसाहाय्याच्या वृत्तीमुळें टिकतात. अेकमेकांचें सहन करून घेण्याची वृत्ति हीच मुख्यत्वें समाजाला टिकविणारी वृत्ति आहे; आणि जेथें ही वृत्ति नसेल तेथें निव्वळ स्वार्थ आणि विग्रहच चालतो. समाजाची प्रगति होण्यासाठीं परस्परसाहाय्याचें आणि सहकाराचें तत्वच अधिक अुपयुक्त ठरलें आहे.

## प्रकरण १० : नगाधिराज

पृष्ठ ५३. **हिंदुस्थानचें महान् ... ... अिच्छा होती** : बाबरानें आपल्या अेका पत्रांत लिहिलें होतें, " शेवटीं हिंदुस्थानांत कांहींशी व्यवस्था आली आहे आणि माझा खुदातालावर विश्वास आहे कीं त्याच्या मेहेर-बानीनें थोड्याच वेळांत सर्व कांहीं सुव्यवस्थित होअील. हें काम पुरें झालें कीं लगेच मी खुदाची मर्जी असेल, तर अेका क्षणाचाहि विलंब न करतां तुमच्याकडे यायला निघेन. त्या भूमीचा आनंद हृदय कसें विसरेल ? ज्यानें दारू सोडण्याची आणि शुद्ध जीवन घालविण्याची प्रतिज्ञा घेतली आहे, असा माझ्यासारखा माणूस त्या सुखी प्रदेशांतील स्वादिष्ट टरबुजें आणि द्राक्षें कशीं बरें विसरणार ? नुकतेंच परवां हे लोक माझ्याकडे अेक मोठें टरबूज घेअून आले होते; मीं तें कापलें आणि मला घर आठवलें. मला वाटलें माझ्या जन्मभूमीपासून मी दूर पडलों आहें, आणि हा विचार येतांच मला रडूं कोसळलें. " ( स्टॅन्ले लेनकृत ' बाबर. ', पृष्ठ १९५. )

पृष्ठ ५४. **अशरणशरण** : अनाश्रितांचें आश्रयस्थान.

पृष्ठ ५५. **प्रस्थानत्रयी** : मोक्षमार्गाची शिदोरी म्हणतां येअील असे तीन ग्रंथ—गीता, दशोपनिषद आणि बादरायण ब्रह्मसूत्र या तिहींवरील भाष्यें.

## प्रकरण १२ : सच्चित्सुख तो तूं परब्रह्म केवळ

पृष्ठ ६३. **ॲसीरियाची शरशीर्ष लिपि** : ॲसीरिया हा आशिया मायनरच्या अुत्तर सरहद्दीवरील प्रदेश. बाबिलोनच्या पतनानंतर याला चढती कळा लागली आणि त्यानें आपल्या संस्कृतीचा विकास केला. आज तेथील मोडक्या अिमारतींचे अवशेषच फक्त निनेवेहच्या आसपास पडले आहेत. निनेवेह येथें खोदकाम करतांना अेक मोठें पुस्तकालय सांपडलें आहे; आणि त्यांत गणित, भूगोल, पशुपक्षी वगैरेसंबंधींच्या शास्त्रीय ग्रंथांव्यतिरिक्त काव्याचे आणि पुराणांचेहि अनेक ग्रंथ सांपडले आहेत. हे सर्व ग्रंथ मातीच्या विटांवर लिहिले आहेत. या लिपींतील अक्षरें बाणाच्या फाळासारखीं असतात म्हणून त्यांना ‘ शरशीर्ष लिपि ’ म्हणतात.

पृष्ठ ६५. ‘ **मन अेव ... ... मोक्षयोः** ’ : मन हेंच मनुष्याच्या बंधनाचें किंवा मोक्षाचें कारण आहे.

पृष्ठ ६५. ‘ **न कश्चित्......रिपुः** ’ : कोणी कोणाचा मित्र नाहीं कीं शत्रु नाहीं.

पृष्ठ ६५. ‘ **आत्मैव...... आत्मनः** ’ : ‘ आत्माचि आपुला बंधु आत्माचि रिपु आपुला. ’

पृष्ठ ६६. **शिरसि मा लिख** : कपाळीं लिहूं नकोस.

पृष्ठ ७०. **पुरश्चरण** : अेकाद्या मंत्राचा अमुक हजार किंवा लाख जप करण्याचा निश्चय करून व्रतस्थ राहाणें.

## प्रकरण १३ : आल्मोडा

पृष्ठ ७१. **कानकोत्तम ... ... भूषणा** : ती देवी सुवर्णाप्रमाणें अुत्तम कांतीची चकाकणाऱ्या सुवर्णाचीं वस्त्रें धारण करणारी, सुवर्णाच्या वर्णाची आणि सुवर्णाचे अुत्तम अलंकार ल्यालेली आहे.

पृष्ठ ७१. **नन्दाभवति ... ... त्रयम्** : नंदा नांवाची नंदकन्या होअील तिची जो कोणी स्तुति, पूजा आणि ध्यान करील, तो त्रैलोक्याला वश करील.

पृष्ठ ७१. **सैषा प्रसन्ना......मुक्तये** : ती प्रसन्न होईल आणि ‐त्वर देईल तर माणसें ( पारतंत्र्यांतून ) मुक्त होतील.

पृष्ठ ७२. **नफरत** : ( उर्दू ) तिरस्कार.

पृष्ठ ७५. **अपि चेत् ... ... सः** : असो मोठा दुराचारी भजे ‐मज अन्यय जो । मानावा तो जसा साधू त्याचा सुंदर निश्चय ॥

पृष्ठ ७५ **गुहक** : रामायणांतील अेक भिल्ल राजा.

## प्रकरण १४ : खाकीबाबा

पृष्ठ ७८. गुहक ( हिंदी ) : जागा, स्थान.

## प्रकरण १५ : पदमबोरी

पृष्ठ ८६. **धर्मार्थं ... ... वरम्** : दानधर्म करण्यासाठींच ज्याला द्रव्याची गरज वाटते त्यानें तो लोभ सोडून द्यावा हें बरें; चिखलानें अंग भरवून घेअून मग तें धुवायचें, त्यापेक्षां त्याला स्पर्शच न करणें अधिक ‐च्चांगलें नाहीं का ?

पृष्ठ ९०. **कर्मण्यकर्म ... ... यः** : कर्मीं अकर्म जो पाहे अकर्मीं ‐कर्म जो तसें ।

पृष्ठ ९०. **कर्मणोह्यपिबोद्धव्यं ... ... गतिः** : सामान्य कर्म जाणावें विकर्महि विशेष जें । अकर्म तेंहि जाणावें कर्माचें तत्त्व खोल हें ॥

## प्रकरण १६ : गोवध

पृष्ठ ९२. **बॅक्टेरिऑलॉजिकल डिपार्टमेंट** : जंतुशास्त्रविषयक खातें.

पृष्ठ ९४. **विष्कंभक** : मागील अंकाचें थोडक्यांत सार देअून प्रस्तुताचें सूचन करणारा नाटकामधील प्रवेश.

पृष्ठ ९४. **भरतवाक्य** : संस्कृत नाटकांत शेवटीं म्हटला जाणारा आशीर्वादपर श्लोक.

पृष्ठ ९५. **न च तत्प्रेत्य नो अिह** : तो परलोकींहि कामाचा नाहीं आणि अिहलोकींहि अुपयोगाचा नाहीं.

## प्रकरण १७ : धर्मशाळेंतील ऋषिकुल ?

पृष्ठ ९६. '**धीरोद्धता ... ... धरित्रीम्**' : धरणीलासुद्धां जणुं वांकायला लावील अशी ( रामकुमारांची ) धीरोद्धत चाल ( अुत्तर राम० )

पृष्ठ ९६. '**न निवृतो मदनो न च संवृतः**' : तिनें मदन अुघडाहि केला नाहीं, कीं झांकलेलाहि ठेवला नाहीं. ( शाकुंतल ).

पृष्ठ ९६. **बिल्हण** : काश्मीरी कवि.

पृष्ठ ९६. '**पिपासितैः ... ... पीयते**' : तहानेल्यांचें काव्यरस पिअून भागत नाहीं.

पृष्ठ ९८. **किंवदन्ती** : अफवा.

## प्रकरण २० : गंगाद्वार

पृष्ठ ११०. **दीपदान** : दीपदानाचें येथें केलेलें सर्व वर्णन मानव-जीवनाला लागू पडतें.

## प्रकरण २१ : प्रस्थान

पृष्ठ १११. **अमरनाथ** : काश्मीरांतील मोठें तीर्थस्थान.

पृष्ठ १११. **खोजरनाथ** : ज्याप्रमाणें काश्मीरमध्यें अमरनाथ महादेव अत्यंत कठीण जागीं आहे. त्याचप्रमाणें नेपाळच्या अुत्तरेस खोजरनाथ महादेव आहे. फक्त साधू लोकच तेथें जाण्याचें धाडस करतात.

पृष्ठ १११. **राकसताल** : मानस सरोवराच्या शेजारीं असलेलें दुसरें सरोवर रावणहृद.

पृष्ठ ११२. '**धर्मो रक्षति रक्षितः**' : धर्माचें जो रक्षण करतो त्याचें धर्म रक्षण करतो.

पृष्ठ ११२. **ग्यानिमा आणि गडतोक** : दोन तिब्बती शहरें.

पृष्ठ ११३. **चराति चरतो भगः** : चालणारांचें भाग्य चालूं लागतें.

## प्रकरण २२ : हृषीकेशच्या वाटेवर

पृष्ठ ११५. '**अद्य मे ... ... क्रियाः**': आज माझा जन्म सफल झाला, आज माझ्या क्रिया सफल झाल्या.

## प्रकरण २३ : साधूंचें माहेर

पृष्ठ ११६. **ग्रंथसाहेब** : शीखांचा धर्मग्रंथ.

पृष्ठ ११९. **अर्धदग्ध** : ( दग्ध, विदग्ध = विद्‌वान्, संस्कारी ) अर्ध्या हळकुंडानें पिवळा झालेला विद्‌वान्, Half-baked Pandit.

## प्रकरण २४ : नवे नवे अनुभव

पृष्ठ १२८. **छंदसि बहुलम्** ’ : छंदांत सूट. वैदिक भाषेंत व्याकरण ढिलें असतें. अनेक प्रकार चालतात.

## प्रकरण २५ : देवप्रयाग

पृष्ठ १३३. **वामनावताराच्या काळीं......होतें** : शुक्राचार्यांनीं.

## प्रकरण २६ : श्रीनगरला गेलों नाहीं

पृष्ठ १३५. **श्रीचक्र** : तंत्रशास्त्रांत श्रीचक्राची पूजा सांगितली आहे. अेका वर्तुळांत समोरासमोर समभुज त्रिकोण आणि वर्तुळाच्या आसपासहि लहान लहान त्रिकोण असा त्याचा आकार असतो. हें मातेचें प्रतीक समजलें जातें, म्हणून त्याची पूजा होते.

पृष्ठ १३६. **ब्राह्मणा०** ... : अुपनिषदांत जनक राजाच्या यज्ञाच्या वेळीं गोळा झालेल्या ब्राह्मणांना याज्ञवल्क्य मुनि शास्त्रार्थासाठीं आव्हान करीत आहेत, त्या वेळच्यीं हीं वचनें आहेत. त्यांचा अर्थ—‘ तुम्हां ब्राह्मणां-मधून ज्याची अिच्छा असेल त्यानें मला विचारावें, अथवा वाटलें तर सर्वजण मला विचारा. ज्याची अिच्छा असेल त्याला मी विचारतों अथवा सर्वांना मी विचारतों ! ’ पण आव्हान स्वीकारण्याची ब्राह्मणांना हिंमत झाली नाहीं.

## प्रकरण २७ : श्रद्धाभक्तीचा स्पर्श

पृष्ठ १३७. **तत्र को मोहः०** : अेकत्व पाहाणाऱ्याला तेथें कुठला मोह आणि कसला शोक ? ( अीशावास्य० )

पृष्ठ १३८. **मार्गे शूद्रवदाचरेत्** । : प्रवासांत शूद्राप्रमाणें वागण्यास हरकत नाहीं.

## प्रकरण २८ : टेहरी

पृष्ठ १४०. **किमिवहि मधुराणां०** : 'जातीच्या सुंदरांना कांहींहि शोभतें.'

पृष्ठ १४१. Will no one.........again : भावार्थ--ती काय गाते हें मला कोणी सांगणार नाहीं काय ? कदाचित् तिच्या या विषादयुक्त स्वरांत किती तरी जुन्या दुःखद स्मृती आणि जुन्या युद्धांच्या कथा भरल्या असतील; अथवा कदाचित् ती आजची घरगुती कहाणीहि गात असेल ! कीं कोणावर तरी आलेल्या आणि पुनः येण्याचा संभव असलेल्या अशा एकाद्या स्वाभाविक आपत्तीचें, हानीचें किंवा दुःखाचें ती गान करीत असेल ?

पृष्ठ १४१. **अेकश्रुत** : अेकाच स्वरांत गाअिलें जाणारें. ( Monotonous )

पृष्ठ १४२. **व्युत्थान** : समाधि अुतरून सामान्य स्थितीवर येणें.

पृष्ठ १४३. **कलिविडंबन** : संस्कृतांत अेक मनोरंजक प्रकरण आहे. त्यांत अल्पज्ञ मनुष्यानें सभा कशी जिंकावी तें सांगितलें आहे.

पृष्ठ १४४. **घटत्व......चर्चेंत** : शुष्क पांडित्ययुक्त चर्चेंत.

## प्रकरण २९ : बादरूचें गांव

पृष्ठ १४७. **वाचासिद्धि, आणि क्रियाफलाश्रयत्व** : 'सत्य-प्रतिष्ठायां क्रियाफलाश्रयत्वम् ।' ( साधनपाद, योगसूत्रम् )—सत्यनिष्ठाची वाणी अमोघ होते.

## प्रकरण ३० : राढीच्या सीमेवर

पृष्ठ १५२. Lands intersected : समुद्राच्या अखंड खाडीनें वेगळे पडलेले अिंग्लंड व फ्रान्स यांसारखे देश अेकमेकांचा तिरस्कार करतात. जीं राष्ट्रें अेकाच सागराच्या बिंदूंप्रमाणें अेकमेकांत मिसळून अेक झालीं असतीं त्यांच्यामध्यें अुभा राहून अेकादा पर्वतहि त्यांना अेकमेकांचे शत्रू बनवितो. ( कूपर कवीकृत 'टास्क' )

पृष्ठ १५४. **तच्चेतसा स्मरति०** : ( रम्य दृश्यें पाहून आणि मधुर शब्द अैकून शांत असलेल्या जीवालासुद्धां अेक प्रकारची जी हुरहूर लागून राहते ) ती म्हणजे मनोभावाच्या ठिकाणीं स्थिर झालेली मागील जन्मांचीं स्नेहस्मरणेंच असलीं पाहिजेत ( शाकुंतल ).

## प्रकरण ३१ : ‘ यामुन ’ ऋषि

पृष्ठ १५७. **अव्यापी** : पूर्णपणें विस्तृत नसलेली—कारण कित्येक माणसें कविता लिहीत नसलीं तरी कवी असूं शकतील.

पृष्ठ १५७. **अतिव्यापी** : फाजील विस्तृत—कारण कित्येक माणसें कविता लिहीत असलीं तरी कवी नसूं शकतील.

## प्रकरण ३२ : राणागाम

पृष्ठ १५९. **संकुलयुद्ध** : सर्व माणसांचें मिळून अेकदम चाललेलें युद्ध.

पृष्ठ १६०. **लँडस्लिप** : पर्वतावरून पुष्कळ वेळां कडे किंवा मातीचे प्रचंड ढपले ढांसळून पडतात त्याला अिंग्रजींत ‘ लँडस्लिप ’ म्हणतात.

## प्रकरण ३४ : अुपरीकोटची चढण

पृष्ठ १६६. **लास्य** : स्त्रियांचें कोमल नृत्य.

**तांडव** : शिवाचें प्रळयकाळचें नृत्य.

पृष्ठ १६६. **‘ समय ’** : संकेत, मीलनस्थान, करार.

## प्रकरण ३५ : अुत्तर काशी

पृष्ठ १७२. अनिकेत, अनागरिक } = घर नसलेला.

## प्रकरण ३६ : गंगोत्री

पृष्ठ १७८. **अेकहि संघ काशीला पोंचायचा नाहीं** : कोणाच्याहि पंथाचें काम सफळ होणार नाहीं.

यासंबंधीं स्पष्टीकरण देतांना काकासाहेब लिहितात :

“ जैन लोकांत आपल्या वाण्याप्रमाणें यात्रेकरूंना तीर्थस्थानाकडे घेऊन जाण्याचा रिवाज आहे. फरक हा कीं कोणी अेखादा श्रीमंत मनुष्य स्वतःच्या खर्चानें यात्रेकरूंचा संघ तीर्थस्थानांकडे घेऊन जातो—अशा संघनायकाला ‘ संघवी ’ म्हणतात. गुजरातेंत हें आडनांव आपण अैकतों... आपण ज्याप्रमाणें ‘ गंगेंत घोडीं न्हालीं ’ म्हणतों तशासारखा हा प्रयोग आहे. ”

पृष्ठ १८०. ‘ **नैव तस्य ...... कश्च न** ’ : केल्यानें वा न केल्यानें त्यास भावार्थ सारखा ।

## प्रकरण ३७ : बुढ्ढा केदार

पृष्ठ १८२. **यथा काष्ठं च ...... भूतसमागमः** : समुद्रांत ज्याप्रमाणें लांकडाचे ओंडके अेके ठिकाणीं येतात, आणि कांहीं काळ अेकत्र राहून पुनः वेगळे पडतात, तसाच प्राण्यांचा सहवास आहे.

## प्रकरण ३९ : पवाली आणि त्रिजुगी नारायण

पृष्ठ १९१. **आतश बहेराम** : “ मुसलमानी जुलमामुळें जेव्हां पारशी लोक अिराणांतून हिंदुस्थानांत पळून आले तेव्हां आपला पूजेचा अग्नि ते बरोबर घेऊन आले. सध्यां तो अग्नि गुजरातमध्यें संजाना येथें किंवा अुदवाडा येथें अजून सुरक्षितपणें जळत आहे. हा अग्नि कधीं विझला नाहीं.”

## प्रकरण ४० : केदारनाथ

पृष्ठ १९४. **मुलाचा बळी ... ... संतोष मानला** : महंमद पैगंबरांचा पूर्वज अीश्वरनिष्ठ आब्राहाम याला दोन मुलगे होते. त्यांतील लहानाचें नांव अिस्माअिल. बापाचें अिस्माअिलावर विशेष प्रेम होतें. अीश्वरानें त्याची कसोटी पाहण्याचें ठरविलें. अेके दिवशीं स्वप्नांत आब्राहामला अीश्वरानें कुरबानी करण्याची आज्ञा केली. कुरबानीचा कायदा असा आहे कीं आपल्याला अत्यंत प्रिय, आपण जिला बहुमोल समजतों अशा वस्तूचा बळी दिला पाहिजे. आब्राहामनें दुसऱ्या दिवशीं गायीची कीं बकऱ्याची कुरबानी केली. पण पुन्हां रात्रीं स्वप्नांत तीच आज्ञा झाली कीं

'कुरबानी कर.' त्यानें अधिक बलिदान केलें, तरी पुन्हां तेंच स्वप्न! त्यानें नम्र होऊन ईश्वराची प्रार्थना केली कीं 'अय् मालिक, तूं कोणाची कुरबानी मागत आहेस?' ईश्वरानें सांगितलें, 'तुझ्या लाडक्या मुलाची!'

भक्तश्रेष्ठ आब्राहामच्या हृदयाला एवढेंसुद्धां दुःख झालें नाहीं. त्यानें ईश्वराला सर्वस्व अर्पण केलें होतें. दुसऱ्या दिवशीं मुलाला घेऊन भक्तराज कुरबानीच्या जागीं जावयास निघाला. सैतानानें आईला आणि मुलाला फितविण्याचा, त्यांचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण हें सर्वच कुटुंब सच्चें ईश्वरभक्त असल्यामुळें तिघांपैकीं कोणीहि मोहवश झालें नाहीं. बापानें मुलाची गर्दन पकडली आणि तिच्यावर आतां तो सुरी चालविणार इतक्यांत ईश्वरानें त्याला थांबविलें आणि म्हटलें, "तुझ्या भक्तीवर मी प्रसन्न झालों आहें. हा तुझा लाडका मुलगा परत घेऊन जा. मी तुझ्या बकऱ्यावरच संतुष्ट होईन." तेव्हां आब्राहामनें मुलाऐवजीं बकऱ्याचा बळी दिला. तेव्हांपासून बकर–ईदचा सण सुरू झाला.

## प्रकरण ४२ : बदरीधाम

पृष्ठ २००. **सेंट पॉल** : यानें ख्रिस्ती धर्माचें तत्त्वज्ञान व्यवस्थित रीतीनें मांडून त्याच्या प्रचारासाठीं स्वतःप्रमाणें बरोबरच्या माणसांना चहूं बाजूंना पाठविलें होतें.

## प्रकरण ४४ : द्वाराहाट

पृष्ठ २११. **'इडिअट बॉय'...'थंड्या उन्हाची' सहल** : ... ... "मुलगा वेडसर होता. आईच्या सांगण्यावरून तो रात्रीं चंद्रप्रकाशांत डॉक्टरला बोलावून आणण्यास गेला होता; पण वाट चुकला. मुलगा आणि भारवाही तट्टू दोघेहि सारखेच. मुलाला कोंबडा आणि घुबड यांतला भेद ठाऊक नव्हता, आणि सूर्य आणि चंद्र यांच्यांतील भेदहि त्याला उमगत नव्हता! रात्रीचा अनुभव मुलगा आईला सांगतो– "The cock did crow 'tuhoo tuhoo', and the sun did shine so cold" – कोंबडा कसा 'घुघुघू' (घुबडाचा स्वर) करीत ओरडत होता आणि सूर्याचें ऊन कसं थंड होतं!

## प्रकरण ४५ : फलश्रुति

पृष्ठ २१४. **वृथा पाठो भवेत्तस्य०** : त्याचा पाठ फुकट जाअील आणि व्यर्थ श्रम मात्र पदरांत पडतील.

पृष्ठ २२०. **प्रान्तदेश** : सीमान्त प्रदेश.

पृष्ठ २२०. **कर्नल यंगहस्बंड** : हिमालयावर चढण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपैकीं अेक प्रख्यात पुरुष. यानें ल्हासावरहि स्वारी केली होती.

---

ठाणे.
५५४२९
४७९

चुकीची दुरुस्ती—

पान नं. १८, ओळ नं. ३ मध्यें 'मुलें' ऐवजीं 'मुळें' असें वाचावें.

# आमचें प्रकाशन

( शिल्लक नसलेल्या पुस्तकांची किंमत दिलेली नाहीं. )

१–२ सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा ( चतुर्थावृत्ति )
लेखक : म. गांधी ९–०–०

३ खादी-मीमांसा ( द्वितीयावृत्ति ) : भाळूभाई मेहता

४ स्वराज्य-शिष्टाई : म. गांधी

५ संयम की स्वैराचार ? ( खंड १ ला ) : म. गांधी

६ हिंडलग्याचा प्रसाद : काका कालेलकर

७ हिंदु धर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना ( द्वितीयावृत्ति )
लेखक : डॉ. राधाकृष्णन् २–८–०

८ उपनिषदांतील दहा गोष्टी ( चतुर्थावृत्ति )
लेखक : शंकरराव देव ०–१२–०

९ विद्यार्थी-जीवन ( द्वितीयावृत्ति ) : श्री. स. महाजन

१० फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास
लेखक : त्र्यं. र. देवगिरीकर

११ काँग्रेसचा इतिहास ( द्वितीयावृत्ति )
लेखक : डॉ. पट्टाभि सीतारामय्या

१२ समाजवादच कां ? ( द्वितीयावृत्ति )
लेखक : जयप्रकाश नारायण

१३ खानबंधू : महादेवभाई देसाई

१४ पं. जवाहरलाल नेहरू : आत्मचरित्र ( द्वितीयावृत्ति ) १२–८–०

१५ विश्राम ( षष्ठावृत्ति ) : साने गुरुजी १–४–०

१६ भारतीय संस्कृति ( पंचमावृत्ति ) : साने गुरुजी ३–०–०

१७ प्रसाद-दीक्षा : म. गांधी

१८ भिल्ल साधु गुलामहाराज : शं. वि. ठकार

१९ आधुनिक भारत ( द्वितीयावृत्ति ) : आचार्य जावडेकर १२–८–०

२० **हिमालयांतील प्रवास** ( चतुर्थावृत्ति )
लेखक : काका कालेलकर ३–०–०

२१ **गांधीजींचें विविध दर्शन** ( द्वितीयावृत्ति )
संकलनकार : डॉ. राधाकृष्णन् २–८–०

२२ **जिवंत व्रतोत्सव** ( द्वितीयावृत्ति ) काका कालेलकर ३-१२-०

२३ **गांधी-विचार-दोहन** : किशोरलाल मश्रूवाला

२४ **सत्याग्रही महाराष्ट्र** : प्रेमा कंटक १–८–०

२५ **अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र ?** ( द्वितीयावृत्ति )
लेखक : जॉन रस्किन

२६ **जीवन-दर्शन** ( चतुर्थावृत्ति ) : महाकवि खलिल जिब्रान २–८–०

२७ **ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र** : जे. सी. कुमारअप्पा

२८ **बापू** : घनश्यामदास बिडला

२९ **संकृतीचें भवितव्य** ( द्वितीयावृत्ति )
लेखक : डॉ. राधाकृष्णन् १–४–०

३० **महात्मा गौतमबुद्ध** ( द्वितीयावृत्ति ) : डॉ. राधाकृष्णन् १–४–०

३१ **जीवन आणि साहित्य** : आचार्य स. ज. भागवत २–८–०

३२ **प्राचीन साहित्य** ( द्वितीयावृत्ति )
लेखक : कविसम्राट् रवींद्रनाथ ठाकुर १–८–०

३३ **संयम कीं स्वैराचार ?** ( खंड २ रा ) : म. गांधी १-१२-०

३४ **हिंदु-मुसलमान-ऐक्य** : आचार्य जावडेकर १–८–०

३५ **गीता-हृदय** ( चतुर्थावृत्ति ) : साने गुरुजी १–०–०

३६ **हिंदूंचें समाजकारण** : काका कालेलकर १–८–०

३७ **द्विखंड हिंदुस्थान** : डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद ५–८–०

३८ **कॉंग्रेस-कथा** ( द्वितीयावृत्ति ) गो. आ. देशपांडे ३–०–०

३९ **भगवान् बुद्धासाठीं** : शंकरराव देव ३–८–०

४० **आचार्य कृपलानी** : निवडक लेख व भाषणें १–८–०

| | | |
|---|---|---|
| ४१ | **वाल्मीकि आश्रमांतील प्रवचनें** : आचार्य जावडेकर | १–०–० |
| ४२ | **संपूर्ण स्वदेशी** : म. गांधी | २–४–० |
| ४३ | **प्रवासी** : महाकवि खलिल जिब्रान | २–०–० |
| ४४ | **ज्ञानेश्वरी-अंतरंग** : डॉ. रा. द. रानडे | २–८–० |
| ४५ | **गांधीजींचें मानस** : म. गांधी | ३–०–० |
| ४६ | **दिल्ली-डायरी** : म. गांधी–साने गुरुजी | ३–०–० |
| ४७ | **मानवजातीची कथा** : डॉ. हेन्री थॉमस–साने गुरुजी | ६–०–० |
| ४८ | **भारतीय राष्ट्रवादाचा विकास** : प्रा. न. र. फाटक | ३–०–० |
| ४९ | **पैगंबराचा बगीचा** : महाकवि खलिल जिब्रान | १–८–० |
| ५० | **यंत्राची मर्यादा** : नरहरिभाई परीख | २–८–० |
| ५१ | **जवाहरलाल नेहरू** : ( संक्षिप्त आत्मकथा ) | १–६–० |
| ५२ | **माझी नृत्यसाधना** : रोहिणी भाटे | ५–० ० |
| ५३ | **विश्वमानव** : ना. ग. जोशी | २–४–० |
| ५४ | **उपनिषत्सार** : शंकरराव देव | ३–०–० |
| ५५ | **सर्वोदय-योजना** | |
| ५६ | **सर्वोदयाचा इतिहास व शास्त्र** : शंकरराव देव | |
| ५७ | **आपल्या गणराज्याची घडण** : दादा धर्माधिकारी | ३–८–० |
| ५८–५९ | **जागतिक इतिहासाचें ओझरतें दर्शन** : खंड १-२<br>लेखक : पं. जवाहरलाल नेहरू | १५–०–० |
| ६० | **हिरे आणि हिरकण्या** : खलिल जिब्रान | १–८–० |
| ६१ | **प्रयोजन** : अनुवादक–के. नारायण काळे | १–८–० |
| ६२ | **गांधीजींची संक्षिप्त आत्मकथा** | २–८–० |
| ६३–६४ | **जागतिक इतिहासाचें ओझरतें दर्शन** : खंड ३-४ | १५–०–० |

स्थळप्रत

# सोल–एजन्सींचीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | महायुद्ध आणि राष्ट्रसभा | ” | ” | ०–६–० |
| २ | आधुनिक राज्यमीमांसा (भाग १ व २) | ” | ” | ३–०–० |
| ३ | पुरोगामी साहित्य | ” | ” | २–०–० |
| ४ | महाराष्ट्र व हिंदी राजकारण : | ” | ” | १–०–० |
| ५ | समाईक सहकारी स्वराज्य : | ” | ” | ०–४–० |
| ६ | लो. टिळक व म. गांधी : | ” | ” | २–०–० |
| ७ | विनोबाजी भावे : साने गुरुजी | | | १–०–० |
| ८ | पत्री : साने गुरुजी | | | ३–८–० |
| ९ | दरबार गोपाळदास : ह. मो. जोशी | | | ०–२–० |
| १० | त्रिमंत्रि–योजना | | | १–४–० |
| ११ | हिंदी रेल्वे–कामगार : वि. न. साने | | | ०–१२–० |
| १२ | डॉ. सन्यत्सेन : वि. म. भुस्कुटे | | | ३–०–० |
| १३ | भ्रान्त–जीवन : प्रेमा कंटक | | | २–४–० |
| १४ | कविता : ना. ग. जोशी | | | १–०–० |
| १५ | मऱ्हाटी संस्कृति : शं. बा. जोशी | | | ५–०–० |
| १६ | अंतरींचे उमाळे : दादा धर्माधिकारी | | | १–८–० |
| १७ | दैवी संपत् चरित्रमाला : पुष्प १ लें | | | १–०–० |
| १८ | दैवी संपत् चरित्रमाला : पुष्प २ रें | | | १–०–० |

सर्व प्रकारच्या पुस्तकांकरितां प्रथम आमच्याकडे चौकशी करा.

**सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : टिळक रोड, पुणें २**

दा. क्र. e224

REFBK-0009225

REFBK-0009225